<u>सभापतीस्थानी तालिका सभापती माननीय श्री. मोहन जोशी</u>

**पृ.शी.**: आदिवासी भागामध्ये कुपोषणामुळे होणारे बालकांचे मृत्यू

**मु.शी.**: आदिवासी भागामध्ये कुपोषणामुळे होणारे बालकांचे मृत्यू

या विषयावर डॉ. दीपक सावंत, सर्वश्री रामदास कदम, दिवाकर रावते, डॉ. नीलम गोऱ्हे, श्री. परशुराम उपरकर यांनी उपस्थित केलेली अलपकालीन चर्चा

**तालिका सभापती** : या अल्पकालीन चर्चेसंबंधी औपचारिक प्रस्ताव मांडता येणार नाही. या चर्चेसाठी 45 मिनिटांचा वेळ दिलेला आहे. त्यामध्ये 20 मिनिटांचा वेळ मंत्री महोदयांच्या उत्तरासाठी व 25 मिनिटांचा वेळ माननीय सदस्यांच्या भाषणांसाठी दिलेला आहे. या वेळेमध्ये ही चर्चा संपवावयाची असल्यामुळे सर्व माननीय सदस्यांनी सहकार्य करावे. आता सूचना देणारे सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत आपली सूचना वाचतील आणि भाषण करतील.

डॉ. दीपक सावंत (मुंबई विभाग पदवीधर) : सभापती महोदय, कुपोषणावरील चर्चेचे आपण कुपोषण करु नका. या चर्चेकरिता एक तासाचा वेळ द्यावा अशी आम्ही मागणी केली होती त्याऐवजी 45 मिनिटांचा वेळ देण्यात आला आहे. या महत्वाच्या चर्चेसाठी कमी वेळ मिळाला तर चर्चेला अर्थ राहणार नाही. मुंबईला अधिवेशन असो नाही तर नागपूरला अधिवेशन असो प्रत्येक अधिवेशनामध्ये या विषयावर चर्चा होत असते. प्रत्येक वेळी या विषयावरील चर्चा एक तासामध्ये संपवावी असे सांगितले जाते. या करिता आपण सभागृहाचे कार्यवृत्त तपासून पहावे.

**तालिका सभापती** : आजच्या कार्यक्रम पत्रिकेमध्ये भरपूर कामकाज आहे. तसेच, उद्या अधिवेशनाचा शेवटचा दिवस आहे.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, माझी आपणास विनंती आहे की, शक्य असेल तर आपण आजच्याप्रमाणे उद्या सकाळी सभागृहाची विशेष बैठक घेऊन ही चर्चा संपवावी. याचे कारण हा अत्यंत जिव्हाळयाचा विषय आहे, 45 मिनिटामध्ये संपणारा हा विषय नाही.

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, निश्चितपणे ठरावामधील विषय अत्यंत महत्वाचा आहे. मागील चारही अधिवेशनांमध्ये हा विषय चर्चेला आलेला आहे. सभागृहाचे कामकाज करीत

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले...

असतांना काही चौकट ठरवीत असतो. महत्वाचा विषय थोडया वेळामध्ये मांडल्यामुळे त्याचे महत्व कमी होणार नाही. त्यामुळे या विषयावरील चर्चा आपण आजच संपवावी, त्याकरिता 15 मिनिटांचा कालावधी वाढवावा. सकाळी 10.00 ते 11.00 पर्यन्त एक तासात ही चर्चा होऊ शकते.

**तालिका सभापती** : माननीय सभापतींनी या चर्चेकरिता एक तासाचा कालावधी ठरवून दिला होता. परंतु आज आणि उद्या सभागृहामध्ये अनेक महत्वाच्या विषयावर कामकाज आहे या करिता आज सकाळी या प्रस्तावावर चर्चा करण्याकरिता विशेष बैठक घेण्यात आली आहे. माझी सर्व माननीय सदस्यांना विनंती आहे की, आपण सर्वांनी सहकार्य करुन या विषयाला न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न करावा.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, मी नियम 97 अन्वये आपल्या अनुमतीने पुढील विषयावर अल्पकालीन चर्चा उपस्थित करतो :-

"राज्यात गेल्या ९ महिन्यात १८ हजार बालकांचा कुपोषणामुळे मृत्यू होणे, कुपोषणामुळे मृत्यू होऊनही महिला व बालविकास विभागाने हे मृत्यू अन्य कारणास्तव झाल्याचा दावा करणे, सदर विषय आरोग्य विभागाशी संबंधित असतानाही महिला व बालविकास विभागाने खोटा दावा करणे, मेळघाट (जि.अमरावती) या भागात आदिवासी बालमृत्यूचे प्रमाण मोठे असूनही खरी आकडेवारी लपवून ठेवणे तसेच या भागात केवळ एकच बालरोगतज्ञ असणे, कुपोषण निर्मूलनाच्या अनेक योजना सध्या बंद असणे, नंदूरबार, धुळे, जव्हार-मोखाडा, वाडा या भागातही कुपोषित बालकांचे वाढते प्रमाण असणे, करोडो रुपयांचा निधी खर्च होऊनही कुपोषण निर्मूलनाच्या योजनेत शासनाला आलेले अपयश"

सभापती महोदय, विधिमंडळाच्या प्रत्येक अधिवेशनामध्ये न चुकता या कुपोषणाच्या प्रश्नावर लक्षवेधी सूचना, नियम 93 अन्वये सूचना, अर्धा तास चर्चा, नियम 289 अन्वये किंवा नियम 97 अन्वये अशा अनेक माध्यमातून चर्चा करण्यात येत असते. गेल्या 12 वर्षापासून या सभागृहामध्ये मी माननीय सदस्या डॉ. नीलमताई गोऱ्हे, माननीय सदस्य सर्वश्री. रामदास कदम, अरुण गुजराथी, एस. क्यू. जमा इत्यादी अनेक माननीय सदस्यांनी या विषयावरील प्रश्न उपस्थित केले आहेत. तरीसुध्दा या प्रश्नाची अद्यापि तड लागत नाही. शासनाच्या वतीने या बाबतीत काही तरी थातूरमातूर उत्तर दिले जाते आणि आमचे तात्पुरते समाधान केले जाते. आज या सभागृहामध्ये

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत...

नियम 97 अन्वये चर्चा उपस्थित करण्यामागील कारण असे की, गेल्या 9 महिन्यामध्ये 18 हजार बालकांचे कुपोषणामुळे मृत्यू झाले आहेत. यामध्ये आपण साडे सतरा हजार म्हटल्यास तो वादाचा मुद्दा होऊ शकेल, परंतु बळी गेले आहेत ही महत्वाची गोष्ट आहे. कुपोषणाचा विषय आला की, यामध्ये सार्वजनिक आरोग्य विभाग, महिला व बाल कल्याण विभाग, आदिवासी विकास विभाग, ग्राम विकास विभाग, पाणीपुरवठा विभाग, रोजगार हमी योजना विभाग अशा अनेक विभागांशी त्याचा संबंध जोडला जातो.पूर्वी या विषयाचा संबंध केवळ सार्वजनिक आरोग्य खात्याबरोबर होता. माननीय श्री. दिग्विजय खानविलकर या खात्याचे मंत्री असतांना फक्त तेच उत्तर देत असत. या खात्याचा संबंध असतांना कुपोषणाच्या विषयावर खरेदी मात्र सर्व विभाग हिरिरीने करतात. त्यामध्ये शिक्षण विभाग सुध्दा उडी घेते. प्रत्येक विभागाकडून वेगवेगळया गोष्टींचा पुरवठा होतो. काही विभागाकडून औषधे दिली जातात. एकाच प्रकारच्या औषधांचा पुरवठा सर्व डिपार्टमेंट करीत असतात. हे काय चालले आहे? मी या ठिकाणी कुपोषणाच्या आकडेवारीमध्ये न जाता मूलभूत मुद्यावर बोलणार आहे.

महिला व बाल विकास विभागाकडून प्रोटीन सिरप, स्प्रिंकलिंग पावडर खरेदी केले जाते. सार्वजनिक आरोग्य विभागाकडून औषधे खरेदी केली जातात, आदिवासी विकास विभागामार्फत प्रोव्हिटा सिरप खरेदी केले जाते, शिक्षण विभागाकडून आश्रमशाळेतील मुलांसाठी टॉक्सक्वीन खरेदी केले जाते. अशाप्रकारे वेगवेगळया खात्याकडून ही खरेदी केली जाते. सार्वजनिक बांधकाम विभागाकडून आश्रमशाळेचे व प्राथमिक आरोग्य केंद्राचे बांधकाम केले जाते. या कुपोषणाच्या विषयामध्ये वॉर्म रुम हा एक महत्वाचा मुद्दा आहे. नवजात शिशु जन्माला आल्यानंतर व त्याचे वजन कमी असल्यानंतर त्याला हायपोथेरमीया हा आजार होतो. मेळघाट, वाडा - मोखाडा किंवा नंदूरबार सारख्या आदिवासी भागातील प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये वॉर्म रुम कशी असते? प्राथमिक आरोग्य केंद्रामधील एक रुम या करिता रिकामी करुन घेतली जाते व त्यामध्ये एक कॉट टाकली जाते, एक चादर टाकली जाते, ती चादर खराब होऊ नये म्हणून त्यावर मेणकापड टाकले जाते व त्या रुममध्ये एक 100 किंवा 120 वोल्टचा दिवा लावला जातो. प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये वॉर्म रुमची व्यवस्था असणे महत्वाचे असतांना ती व्यवस्था केलेली नसते. अशाप्रकारे या सर्व योजनेचा बोजवारा कां उडाला आहे? एनआरएचएममार्फत करोडो रुपयांची मशिनरी खरेदी केली जाते. मी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत...

त्या दिवशी सभागृहात किती रुपयांची मशिनरी घेतली ते सांगितले आहे. शासनाकडून असे सांगण्यात आले की, 360 जिल्हा रुग्णालयांमध्ये सर्व ठिकाणी आम्ही वॉर्मर्स दिले आहेत. रिसेटल किट दिले आहेत, ऑक्सिजन पंप दिले आहेत. असे सर्व दिले असले तरी पी.एच.सी. मध्ये काय व्यवस्था आहे? याचे कारण ही मुले मोठया प्रमाणावर प्राथमिक आरोग्य केंद्रामधून जवळच्या ग्रामीण रुग्णालयामध्ये पाठविली जातांना मरतात.

बऱ्याच ठिकाणी ॲम्बुलन्स नाहीत. त्या दिवशी मंत्री महोदयांनी ट्रॉमा केअरकरिता ॲम्बुलन्स खरेदी करण्यात येणार आहेत असे सांगितले आहे. या आदिवासी भागाकरिता आपल्याकडे ॲम्बुलन्स आहेत काय? असलेल्या ॲम्बुलन्स या कॉट्रॅक्टवर आहेत. सभापती महोदय, आपण या सर्वांचा डाटा पाहिला तर मी परवा ट्रान्सर्पोटेशनबाबत कोल्हापूरचा आणि कोकणचा प्रश्न मांडला तसाच प्रश्न वेगळया पध्दतीने या ठिकाणी उपस्थित होत आहे. तो म्हणजे कुपोषित बालके एका दवाखान्यातून दुसऱ्या दवाखान्यामध्ये ट्रान्सफर करतांना मरतात. तसेच, या बालकांना त्या दवाखान्यात नेल्यानंतर त्याठिकाणी व्हेंटीलेटरची व्यवस्था नाही किंवा तुमच्या ॲम्बुलन्समध्ये सुध्दा व्हेंटीलेटर नसते. मैलो न् मैल,खड्डयामधून ती ॲम्बुलन्स घेऊन जावयाची असते परंतु त्यामध्ये कोणतीही व्यवस्था नसते अशाप्रकारची ही दुरवस्था झालेली आहे. या करिता शासनाने काय प्रयत्न केले आहेत? या विभागामध्ये काम करीत असतांना माहितीच्या अधिकाराखाली काही माहिती मागविली होती. मंत्री महोदयांनी मला सांगितले की, एनआरएचएमच्या माध्यमातून आम्ही आपल्याला तज्ज्ञ डॉक्टर देणार आहोत. सन 2011-12 चा एनआरएचएमचा अहवाल माझ्याकडे उपलब्ध आहे. त्यामध्ये Component-wise P.I.P. 2011 and 2012 यामध्ये ह्युमन रिसोर्सेस म्हणून एक हेड आहे, Contractual remuneration of the Specialist या करिता शून्य प्रोव्हिजन आहे. हा अहवाल मी आपणाकडे पाठवीत आहे. Anaesthetist, Pediatrician, Obstetrician, Gynecologist, Physician, Dental Surgeon, Radiologist and Pathologist, यांच्याकरिता देखील सन 2011-12 मध्ये शून्य प्रोव्हिजन करण्यात आली आहे.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत . . . .

मी हे एनआरएचएम बाबत सांगत आहे आणि ती माहिती नेटवर आहे. त्यामुळे ही माहिती खोटी असू शकत नाही. मग आपण यासाठी कशी प्रोव्हीजन करणार आहात ?

सभापती महोदय, आपण असे सांगितले की,मेळघाटमध्ये जे डॉक्टर जातील,त्यांना 1 लाख रुपये देणार. मेडिकल ऑफीसरचा सध्याचा पगार 40 हजार रुपये आहे. तो कठून देणार? एवढेच नाही पण येथील एनजीओ यांच्याकडे फार मोठ्या प्रमाणात काम देण्यात आले.मी माहितीच्या अधिकाराखाली सर्व माहिती मागविलेली आहे. केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 अन्वये मेळघाट मधील स्वयंसेवी संस्था म्हणजे एन.जी.ओ. यांना 2009-2010, 2010-2011 या वर्षात कोणतेही अनुदान दिले गेले नाही. याठिकाणी माझ्या कडे जी माहिती आहे, त्यानुसार कोशिश नेटवर्क मेळघाट अंतर्गत मेळघाटमध्ये कोणकोणत्या संस्था काम करतात याची माहिती सांगावयाची तर 1) मोनफोट कम्युनिटी सोसायटी, कुसूमकोट ता.धारणी. श्री. ब्रदर जोष, 2) खोज संस्था, गौरखेडा कुन्भी ता.अचलपुर, श्री.बड्या साने, 3) कोरोकोरा संस्था, श्री.प्रोफे.शुक्ला, 4) सरिता संस्था, अमरावती, श्री.बाबा गणोरकर, 5) महान संस्था,श्री.डॉ.आशिष सातव, सामुदाय विकास कार्यक्रम राबविणे.6) जीवन विकास संस्था, परतवाडा श्री.ब्रदर जुली, 7) अपेक्षा होमिओ सोसायटी, गुरुकुंज मोझरी, तिवसा श्री.डॉ.चुंबळे, 8) प्रेम संस्था, श्री.संजय इंगळे, 9) सेव्ह द चिड्रन इंडिया श्री.अनुरुध्द पाटील या संस्था कार्यरत आहेत. पण माननीय मंत्री महोदय आणि नोडल एजन्सीच्या माननीय मंत्री महोदयांना माहिती आहे की, प्रत्येक गावाच्या मागे, प्रत्येक पाड्याच्या मागे दोन संस्था आहेत. मग ऑफिशिअल काय आहे आणि अन-ऑफिशिअल माननीय मंत्री महोदय आपल्याला माहिती आहे.जर ही माहिती ऑफिशिअल असेल तर मग अन्-ऑफिशिअल माहिती किती मोठी आहे?

सभापती महोदय,सभापती महोदय, आशा संस्थांचे प्रतिनिधी आणि स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी यांच्यामध्ये चक्क मारामारी झाल्याचे मी माझ्या डोळ्यांनी पाहिलेली आहे.जननी सुरक्षा योजनेचे, मातृत्व अनुदान योजनेचे पैसे कोणी घ्यावयाचे? माहेर योजनेअंतर्गत जी साडी दिली जाते, ती कोणी आणावयाची? परंतु आता ही योजना बंद केली असून साडीच्या ऐवजी पैसे दिले जातात. हे अतिशय विदारक सत्य आहे म्हणजे जणूकाही प्रेताच्या टाळूवरचे लोणी खाण्याचा हा प्रकार आहे. त्यामुळे प्रत्यक्षात त्या गरीब लोकांना काही मिळत नाही. मी माननीय मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, आपण माहेर योजना राबविता, पण त्या मध्यमातून काय केले जाते? याबाबतीत



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आपण एकमेकांकडे बोट दाखवून काही उपयोग नाही. कारण ही सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे.

सभापती महोदय, माहेर योजनेमध्ये एक रुम बांधली जाते,मग त्याठिकाणी गर्भवती महिलेला चार दिवस अगोदर आणून ठेवतात, जेणेकरुन इन्स्टीट्युशन डिलीव्हरीचे पैसे आपल्या पी.एच.सी.मध्ये यावयास पाहिजेत. साहेब, याबाबतीत खूप मारामारी होत आहे.प्रत्यक्षात या गरीब, आदिवासी महिलेला माहिती देखील नसते की, मुलाची डिलीव्हरी झाल्यानंतर मला काही पैसे मिळणार आहेत. मात्र याबाबतीत काही ठिकाणी जागरुकता आलेली आहे. पण अजूनही मागासलेल्या भागामध्ये हा अवेअरनेस आलेला नाही. तेथे तीन दिवस अगोदर महिला ॲडमिट होते. तेथे तिला जेवण वगैरे दिले जाते. मात्र तिच्याबरोबर जे नातेवाईक आलेले असतात,त्यांना काहीही दिले जात नाही. त्या महिलेचे जे नातेवाईक किंवा अटेन्डन्ट असतो तो कुठेतरी बाहेर जाऊन खाऊन येतो.परंतु सागरागड किंवा बहिरागड या भागा मध्ये कुठेही हॉटेल्स् नाहीत.तेथे कपभर चहा देखील मिळत नाही.माननीय आदिवासी मंत्री महोदयांना माहिती असेल की,डहाणू परिसरामध्ये सुध्दा काही मिळत नाही. आपले माननीय राज्य मंत्री हे त्याच भागातील आहेत.अशा प्रकारे सदरहू महिलेला अगोदर ॲडमिट केल्यानंतर तिची इन्स्ट्युशन डिलीव्हरी करण्याचा प्रयत्न केला जातो. पण तिला जेव्हा पैसे मिळतात, त्यावेळी जी "आशा" किंवा "एन.जी.ओ."असेल तर त्यावेळी पैसे घेताना त्या बाईचा अंगठा उमटवतात आणि 100 रुपये माझे आणि बाकीचे पैसे तुझे असे म्हणून त्याला बाईला पैसे दिले जातात. कधी-कधी तर त्या बाईला 100 रुपयेच दिले जातात. शासन याबाबत पैसे खर्च करीत नाही असे माझे म्हणणे नाही पण ते पैसे शेवटच्या घटकापर्यंत पोहोचतात की नाही हा प्रश्न आहे.

सभापती महोदय, या विषयाच्या अनुषंगाने किती तरतूद करण्यात आली आहे ते पाहू या. सार्वजनिक आरोग्य विभागाने नवसंजिवनी योजनेसाठी 2011-2012 साठी रु.17,994 इतकी तरतूद केली आहे. महिला बाल विकास विभागाने कुपोषण कमी करण्यासाठी 5017 लाख रुपयांची तरतूद केलेली आहे. त्याठिकाणी इंटरेस्टींग रिमार्क दिलेले आहेत की,"2011-2012 या वर्षात सार्वजनिक आरोग्य विभागास 17,994.51 लाख रुपये इतका नियतव्यय निश्चित केलेला असून जिल्हा स्तरावरील 466.05 लाख नियतव्यय अर्थसंकल्पित केलेला नाही. त्याचप्रमाणे महिला बाल विकास विभागामध्ये "महिला बालकल्याण समिती" या शीर्षाखाली जिल्हा स्तरावरील 683.86 लाख

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



APR/ D/ ST/ 10:10

डॉ.दीपक सावंत . . . .

इतका नियतव्यय निश्चित केला असून, तो पूर्णपणे संकल्पित केलेला आहे.आपण खावटी कर्ज देतो. आज एका वर्तमानपत्राने खावटी कर्जाबाबत आकडेवारी दिलेली आहे. हे खावटी कर्ज डबल भावाने दिले जाते. बाहेर बाजारामध्ये तांदूळ कसा किलो आहे, गहू कसा किलो आहे किंवा इतर वस्तूंचे भाव काय आहेत? यापेक्षा आपण हे अडीचपट दराने का देतो? माननीय मंत्री महोदयांना मी सांगू इच्छितो की, तुम्ही त्यांना हे कर्ज म्हणून देत आहात? यासंबंधात राज्य शासनाकडून असे सांगितले जाईल की, याबाबत टास्क फोर्स नेमलेला आहे. सभापती महोदय, मी फक्त मुद्यां- बाबत बोलत आहे, इतर काही बोलत नाही. दि.04 मे 2009 मध्ये काय-काय झाले ?

सभापती महोदय,श्री.अभय बंग यांची "कवळी-पानगळ" हे पुस्तक आल्यानंतर आपण समिती नेमली.त्यानंतर समितीचा अहवाल आला. मग एक मोठी घोषणा करुन माननीय राज्यपालांच्यामार्फत एक "जिजाऊमाता बाल पोषण मिशन" सुरु केले आणि त्याचे कार्यालय औरंगाबाद येथे ठेवण्यात आले. परंतु ते तीन वर्षे डब्यात होते, त्यावेळी तेथे कोणीही माणूस नव्हता. माझ्याकडे अहवाल आहेत, पाहिजे तर मी आपल्याला देतो.त्यानंतर माझ्याच एका प्रश्नाला उत्तर देताना टास्क फोर्सची घोषणा करण्यात आली. या टास्क फोर्समध्ये कसे काम होणार आहे हे मला माननीय मंत्री महोदयांनी सांगावे.या टास्क फोर्समध्ये माननीय मुख्यमंत्र्यांपासून आयुक्त, एकात्मिक बाल विकास योजनेशी संबंधित असलेले सगळेजण आहेत आणि याबाबत उत्तर देताना शेवटी असे म्हटलेले आहे की, 20 दिवसाच्या आत याची बैठक घेतली पाहिजे आणि दर 40 दिवसांनी कुपोषण आणि बालमृत्यू यासंबंधातील अहवाल सादर केला पाहिजे. तसेच आपण जिल्हा स्तरावर देखील टास्क फोर्स नेमलेला आहे.त्यामध्ये सर्व संबंधित आयुक्त, जिल्हाधिकारी,जिल्हा शिक्षण अधिकारी, आरोग्य अधिकारी,समाजकल्याण अधिकारी,जिल्हा पुरवठा अधिकारी,बालविकास प्रकल्प अधिकारी इ.आहेत. माननीय मंत्री श्री.सुरेश शेट्टीसाहेब, हे सर्व अधिकारी या बैठकीसाठी एका रुममध्ये एकत्र येतील असे आपल्याला वाटते काय ? कारण कुपोषणाचा विषय ही त्यांची प्रॉयॉरिटी नाही. त्यांचे इंटरेस्ट भलतेच असतात. माझे असे म्हणणे आहे की, यासाठी डेडिकेटेड चार माणसे नेमावीत. पण याबाबतीत काम व्हावयास पाहिजे.

सभापती महोदय, हे सर्व करीत असताना मला एक गोष्ट सांगावयाची आहे की, या मेळघाटमध्ये अनेक गर्भवती माता देखील मरण पावलेल्या आहेत.याबाबत जबाबदारी कोण घेणार आहे? आपण असे सांगतो की, आम्ही टीएचआर म्हणजे "टेक होम रेशन" देतो. दरवर्षी 3 ते 6



डॉ.दीपक सावंत . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

या वयोगटातील मुलांना आहार दिला जातो. पण 11 जिल्ह्यातील किशोरवयीन मुलींना सबला योजनेअंतर्गत तो दिला जातो. या सर्व किशोरवयीन मुली ॲनिमिक आहेत आणि सध्या "टेक होम रेशन" याचे वाटप बंद आहे हे मी माननीय मंत्री महोदयांच्या निदर्शनास आणू देऊ इच्छितो. माननीय मंत्री महोदयांनी आपल्या उत्तराच्या भाषणामध्ये सांगावे की,"टीएचआर"चे वाटप होत आहे काय? जर ते सुरु असेल तर मी माझे शब्द मागे घेण्यात तयार आहे. पण प्रत्यक्षात "टीएचआर" देणे बंद आहे.याचे कारण काय ? याची अनेक कारणे असतील. तसेच अंगणवाडीमध्ये ज्यापध्दतीने अन्न शिजवले जाते, ती पध्दत अतिशय चुकीची आहे. जनावर देखील ते अन्न खाणार नाही अशी स्थिती आहे. तसेच "टेक होम रेशन" हे अंगणवाडी सेविकांमध्ये वाटण्यासाठी दिले जाते, पण ते प्रत्यक्षात वाटले जाते की नाही हे मला माहिती नाही. पण ते शिरसोन्याचा पाडा, ता.मोखाडा, जि.ठाणे येथे गुरांना खाण्यासाठी देताना पाहिलेले आहे आणि गुरे ते खात असल्याचा माझ्याकडे फोटोही आहे आणि शासनाच्या "टेक होम रेशन"ची ही स्थिती आहे.

सभापती महोदय, मी माझे भाषण संपविताना एवढेच सांगू इच्छितो की, राज्यामध्ये जे बालमृत्यू होत आहेत, त्यासंबंधात सार्वजनिक आरोग्य विभागाची जबाबदारी आहे.पिडिॲस्ट्रीशन नेमणे, गायनाकॉलॉजिस्ट नेमणे याबाबतीत संबंधित विभागाची जबाबदारी आहे. मी त्यांना एक सजेशन करतो की, अनेक स्वयंसेवी संस्था यामध्ये काम करण्यासाठी तयार आहेत.

यानंतर कु.थोरात . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ D/ ST/ प्रथम सौ. रणदिवे ..... 10:20

डॉ. दीपक सावंत .

नागपूरमध्ये डॉ.शांतीलाल कोठारी या बाबतीत उपोषण करीत आहेत. डॉ. अभय बंग यांनी या बाबतीत काम केलेले आहे. शासनाने त्यांना महाराष्ट्र भूषण हा पुरस्कार दिला पण त्यांच्या योजनांचा शासनाने वापर केला नाही, त्या कार्यान्वित केल्या नाहीत असे दुर्दैवाने म्हणावे लागत आहे.

सभापती महोदय, मी या चर्चेच्या माध्यमातून तीन-चार गोष्टी सूचवू इच्छितो. इलेक्ट्रॉनिक काटे घेण्यात यावेत आणि सध्याचे झोळीतील काटे बंद करण्यात यावेत. अंगणवाडी सेविका हा कुपोषणाचा आत्मा आहे. अंगणवाडी सेविका सक्षम करण्यात यावी कारण या गावामध्ये कोणाचे अल्प वयामध्ये लग्न झाले हे अंगणवाडी सेविका सांगू शकेल. कोणती स्त्री गरोदर आहे हे अंगणवाडी सेविका सांगू शकेल. आवश्यक गोष्टीचा पुरवठा होतो की नाही हे अंगणवाडी सेविका सांगू शकेल.. कुपोषित मूल कुठे जन्माला आले आहे हे अंगणवाडी सेविका सागू शकेल म्हणून अंगणवाडी सेविका याचा आत्मा आहे, तिला सक्षम करण्यात यावे. टास्कफोर्स हा प्रोजेक्टवाईज नेमा. काही वर्षांपूर्वी मेळघाट प्रोजेक्ट केला होता पण त्याच्यामध्ये काहीही झालेले नाही. तो फक्त कागदावर राहिला. मेळघाट प्रोजेक्ट करा, नंदूरबार प्रोजेक्ट करा, मोखाडा प्रोजेक्ट करा पण त्या प्रोजेक्टसाठी त्या जिल्हयातील लोकांनाही बोलवा. माननीय मुख्यमंत्र्यांना यामध्ये सामील करुन घेण्यात येऊ नये, त्यांच्याकडे फक्त रिपोर्ट पाठविण्यात यावा. राज्य मंत्री महोदयांनी आणि मंत्री महोदयांनी हे काम वाटून घ्यावे. टास्कफोर्सची अकाऊन्टॅबिलिटी ठेवण्यात यावी. जर मृत्यू झाला तर सिव्हिल सर्जनला जबाबदार धरण्यात यावे. सिव्हिल सर्जनवर केस फाईल करण्यात यावी. यामध्ये अकाऊन्टॅबिलिटी पाहिजे जोपर्यंत अकाऊन्टॅबिलिटी येणार नाही तोपर्यंत काहीही होणार नाही.

सभापती महोदय, या ठिकाणी मायक्रो न्युट्रिअन्टस देण्यात येतात. हे मायक्रो न्युट्रिअन्टस सिरप फॉर्ममध्ये तसेच आयर्न-फॉलिक ॲसिड टॅबलेट हिंदुस्थान लॅबोरेटरीकडून खरेदी करण्यात येतात, याचे ग्रेडेशन एफडीएकडून प्रमाणित करुन घेण्यात यावे. खरोखरच अमुक वयाच्या मुलांना, कुपोषित मुलांना हे प्रोटिन सिरप पचेल का? कृपा करुन कुपोषणाची आकडेवारी लपविण्यात येऊ नये. कुपोषण आहे हे मान्य करण्यात यावे. विविध कारणांनी मृत्यू होत नाहीत तर मुलांची प्रतिकारशक्ती कमी असते म्हणून श्वशन रोग होतात, दूषित पाण्याने आजार होतात. पाणी पुरवठा

..2..



SMT/ D/ ST/

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत. . .

हे देखील एक महत्वाचे कारण आहे. मे महिन्यात त्या ठिकाणी आपण गेलो तर मे महिन्यात हे लोक अतिशय खरवडून पाणी काढतात आणि ते पितात असे दिसून येते.

सभापती महोदय, शेवटचा मुद्दा असा की, आदिवासी खात्याची जबाबदारी फार मोठी आहे. पण आदिवासी खात्याने आपली जबाबदारी  झटकली आहे. ते प्रत्येक वेळी असे सांगतात की, आम्ही पैसे देतो पण आम्हाला कोणी पैशाचा हिशेब देत नाहीत. आदिवासी खात्याची सगळयात मोठी जबाबदारी आहे. कारण आदिवासी खाते सगळया खात्यांना पैसे देते. त्यांच्या कडून शिक्षण विभागाला पैसे देण्यात येतात, सार्वजनिक आरोग्य विभागाला आणि महिला व बालविकास विभागाला पैसे देण्यात येतात मग आदिवासी विभागाने त्या विभाकडून हिशेब का मागू नये, आणि आम्ही त्यांच्याकडे हिशेब का मागू नये. सभापती महोदय, आदिवासी विभागाची सुध्दा ही जबाबदारी आहे. पुढच्या अधिवेशनात मेळघाटातील कुपोषणावर पुन्हा चर्चा करण्याची वेळ येऊ नये, पॉझि ाटिव्हनेस घेण्यात यावा, डॉक्टरांच्या नेमणुका करण्यात याव्यात, पैसे जास्त लागले तरी चालतील. त्यासाठी पाहिजे तर बाकीच्या पैशाला कट लावला तरी चालेल अशी मी याठिकाणी विनंती करतो व माझे भाषण पूर्ण करतो.

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम ( मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, दिनांक 13 डिसेंबर, 1946 रोजी घटना समितीने राज्य घटनेतील उद्देश पत्रिकेचा ठराव मांडताना माननीय श्री. पंडित जवाहरलाल नेहरुंनी आदिवासींसह सर्व कमकुवत घटकांच्या हक्काचे संरक्षण करण्यास राज्य घटना कटिबध्द आहे, अशा प्रकारचा निर्वाळा दिला होता. सभापती महोदय, स्वातंत्र्य मिळून 60 वर्षे झाल्यानंतर देखील या सभागृहात एक वेळा, तीन वेळा, पाच वेळा नाही तर हजार वेळा कुपोषित बालकांची चर्चा करण्यात आली आहे.

सभापती महोदय, आपल्या माध्यमातून मी शासनाला विचारु इच्छितो की, या विषयामध्ये अनेक खात्याचा समावेश आहे. तेव्हा या सर्व खात्यामार्फत आज या ठिकाणी दोन महिन्यानंतर, तीन महिन्या नंतर, सहा महिन्यानंतर या महाराष्ट्रातील कुपोषण कायमचे बंद होईल असे सांगण्यात येईल का, अशा तऱ्हेचा निर्वाणीचा शेवटचा निर्णय या सभागृहात कधीतरी होईल का? अन्यथा हा न संपणारा विषय आहे. न्यायालयाने या शासनाला अनेक वेळा नोटिसा दिलेल्या आहेत. हे कुपोषण कधी थांबणार आहे, शासन यावर कधी ठोस उपाययोजना करणार आहे, अशा पध्दतीने एक वेळा, दोन वेळा नाही तर अनेक वेळा न्यायालयाने या शासनाकडे विचारणा केलेली आहे. म्हणून या संदर्भात कुठे तरी एकदा निर्णय होणे गरजेचे आहे. अन्यथा आम्ही या ठिकाणी चर्चा करणार आणि चर्चेसाठी आपल्याकडे जास्त वेळ नाही असे सभापती महोदय, आपण आम्हाला सांगणार. दुर्दैवाची बाब अशी आहे की, कुपोषणा सारख्या विषयावरील चर्चेसाठी आपल्याकडे वेळ नाही.

सभापती महोदय, विधिमंडळाचे नियोजन इतके चांगले आहे की, काल दुपारी 3.00 वाजताच सभागृहाचे कामकाज संपले. कामकाज घेण्यात यावे अशी आम्ही मागणी करीत होतो. पण कामकाज पत्रिकेवर कुठलेही कामकाज शिल्लक नव्हते. आणि आज चर्चा करण्यासाठी आमच्याकडे वेळ शिल्लक नाही. म्हणजे विधिमंडळाचे नियोजन किती चांगले आहे, याचा विचार करण्यात यावा. थोडया वेळापूर्वी माननीय मंत्री महोदय, या ठिकाणी उठून उभे राहिले त्याबद्दल मी आपला आभारी आहे. आपल्याला धन्यवाद देतो पण येथे हजारो, लाखो मुले तडफडून मरत आहेत त्यावर चर्चा करण्यासाठी या सभागृहात शासन वेळ देऊ शकत नाही. मंत्री महोदयांनी सभागृहात उभे राहून सांगितले की, एवढया वेळामध्ये ठराविक मुद्यांवरच चर्चा होऊ शकते, असे असेल तर चर्चा घेऊच नका, हे विषय सभागृहासमोर कशासाठी आणण्यात येतात? हे सत्ताधाऱ्यांचे काम आहे. शासनाने

..4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम. . .

या बाबतीत नीटपणे काम केले आणि त्या ठिकाणी कुपोषण झालेच नाही तर त्यावर चर्चा करण्यासाठी वेळेची भीक मागण्याची हौस कोणाला आहे. सभापती महोदय, आम्हाला दु:ख होते, वेदना होतात.

सभापती महोदय, 1993-94 मध्ये सुकथनकर समिती स्थापन करण्यात आली. या सुकथनकर समितीने लोकसंख्येच्या प्रमाणात आदिवासींसाठी निधी उपलब्ध करुन द्यावा अशा प्रकारचा अहवाल दिला होता. या समितीचा अहवाल येऊन 17 वर्षे झालेली आहेत. आदिवासींची संख्या जवळ जवळ 9 टक्के आहे. मग त्या 9 टक्के लोकसंख्येच्या विकासासाठी निधी देण्यात येतो काय हा मूळ मुद्दा आहे. किती खरेदी करण्यात आली, काय खरेदी करण्यात आली, ती आदिवासींपर्यंत किती पोहोचली, पोटाला खायला नाही आणि त्या आदिवासींसाठी मच्छरदाण्या घेण्यात येत आहेत, त्यामध्ये कोणाचा वाटा, कोणाचा घाटा हा पुढचा विषय आहे. म्हणजे जखम एका बाजूला आणि मलमपट्टी दुसऱ्या बाजूला अशी परिस्थिती आहे म्हणून या बाबतीत ठोस निर्णय घेण्याची गरज आहे. आज आदिवासींचे काय व्हायचे ते होऊ देत. त्यांच्या मुलांचे काय व्हायचे होऊ देत पण आमचे काय, आमचा त्यात वाटा काय, खरेदी आमच्याकडूनच झाली पाहिजे, त्यातील टक्केवारी आम्हाला मिळाली पाहिजे, सभापती महोदय, मी या विषयी अधिक बोलणार नाही. मी या विषयी पुढच्या अधिवेशना बोलेन पण या अनुषंगाने मला या ठिकाणी असे सांगावयाचे आहे की, गेल्या 17 वर्षामध्ये आदिवासी विभागाचे 8 हजार 339 कोटी रुपये अन्य ठिकाणी वळविण्यात आले, ही शासनाची आजची अवस्था आहे. म्हणजे आदिवासी विकास विभागाचा पैसा आपण आपल्या खात्याकडे घ्यायचा आणि त्यातून आमचा विकास झाला पाहिजे, मग आदिवासी तडफडत मेले तरी चालतील, ही आजची अवस्था आहे, मग कुपोषण कसे होणार नाही? कुपोषण होईलच.

सभापती महोदय, मुख्य मुद्दा असा आहे की, आदिवासींसाठी देण्यात येणारा निधी आदिवासींच्या लोकसंख्येच्या प्रमाणात देण्यात येणार आहे का? तसेच 8 हजार 339 कोटी रुपये इतर खात्याकडे वळविण्यात आले आहेत ते पैसे आदिवासी विभागाला परत देण्यात येणार आहेत का या प्रश्नाचे उत्तर कोण देणार आहे? या प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी माननीय उप मुख्यमंत्री, माननीय मुख्यमंत्री सभागृहात उपस्थित आहेत का, या प्रश्नाचे उत्तर कोण देणार आहे? आदिवासींची मुले

..5..



श्री. रामदास कदम. . .

मेली तर ती मरु देत, न्यायालय काय निर्णय देईल तो देईल, सभागृहात काय चर्चा व्हायची ते होऊ देत, सभागृहाचे कामकाज संपले की आम्ही येथून निघायचे. नागपूरला येऊन आमची पिकनिक झ ाली. इतके दिवस हे असेच चालले आहे. या बाबतीत शासनाला जे गांभीर्य पाहिजे ते शासनाकडे नाही.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम या ठिकाणी बोलत असताना ते त्यांच्या भावना व्यक्त करीत आहेत, त्यांची मते या ठिकाणी मांडत आहेत. परंतु या ठिकाणी त्या खात्याशी सबंधित असणारे सगळया विभागाचे सक्षम आणि अतिशय कर्तव्यदक्ष असे मंत्रिमहोदय उपस्थित आहेत. तरी देखील काही तरी आरोप करायचा म्हणून अशा प्रकारचा आरोप करण्यात आलेला आहे. माननीय उप मुख्यमंत्र्यांचा आणि माननीय मुख्यमंत्र्यांचा याच्याशी काय संबंध आहे?

( सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम व श्री. विनाक मेटे एकाच वेळी बोलतात )

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्यांनी आपसात बोलू नये.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, मी या ठिकाणी बोलण्यास उभा आहे. आपण मला संरक्षण दिले पाहिजे. मुख्यमंत्री आणि उप मुख्यमंत्री लाल दिव्याच्या गाडीतून फिरतात, तो घामाचा पैसा हा महाराष्ट्रातील अकरा कोटी जनतेचा आहे. सभापती महोदय, आदिवासी विकास विभागाचे 8 हजार 339 कोटी रुपये इतर खात्याकडे वळविण्यात आलेले आहेत त्याचे उत्तर माननीय मंत्री महोदय देण्ार आहेत काय?

यानंतर श्री. बरवड....

अस्ुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय, सन्माननीय मंत्री महोदय सक्षम आहेत.

**तालिका सभापती** (श्री. मोहन जोशी) : सन्माननीय सदस्यांनी आपसात बोलू नये.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, आपण मला संरक्षण द्यावे. आपण सन्माननीय सदस्यांना बोलण्याची संधी कशी दिली ? हे काय चालले आहे. 8239 कोटी रुपये इतर विभागांकडे का वळविले याचे उत्तर माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री देतील. म्हणून ते या सभागृहामध्ये उपस्थित असले पाहिजेत. मला वेड लागलेले नाही. मी काल या सभागृहामध्ये आलेलो नाही. मी गेली 25 वर्षे सभागृहामध्ये आहे. मला कळते, मला समजते. मला सन्माननीय सदस्यांकडून शिकण्याची आवश्यकता नाही. त्यांनी मला शिकवू नये. (अडथळा) तुम्ही शिकविण्याची काही गरज नाही. तुम्ही तुमचे बघा. आपल्याला जे काही बोलावयाचे असेल ते आपल्या भाषणामध्ये बोलावे. (अडथळा)

( सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे बोलण्याचा प्रयत्न करतात )

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्यांनी माझ्याकडे बघून बोलावे.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, हे काय चालले आहे ?

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे यांनी कृपया खाली बसावे. या ठिकाणी महत्वाची चर्चा चालू आहे. सन्माननीय सदस्यांनी सभागृहाचा वेळ घालवू नये.

श्री. रामदास कदम : माननीय मुख्यमंत्र्यांचा आणि माननीय उप मुख्यमंत्र्यांचा एवढा पुळका असेल तर मग हे कुपोषण थांबवा. ही दलाली आहे. याला दलाली म्हणतात.

( सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे बोलण्याचा प्रयत्न करतात )

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी माझ्याकडे बघून बोलावे.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, मी आपल्याकडे बघूनच बोलत आहे. आपण सन्माननीय सदस्यांना थांबवावे.

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य दलाली शब्द वापरत आहेत तो बरोबर नाही.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम : एवढे जर झोंबते तर हे थांबवा. ही दलाली कशासाठी ? हे काय चालले आहे ?

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे यांनी कृपया खाली बसावे. सन्माननीय सदस्यांनी सभागृहामध्ये अशा पध्दतीने एकमेकांशी बोलू नये. या ठिकाणी महत्वाची चर्चा चालू आहे. सन्माननीय सदस्यांनी आपले भाषण पुढे सुरु करावे.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य मला बोलू देत नाहीत, हे बरोबर नाही. या सभागृहामध्ये जर आम्हाला बोलू देत नसाल तर आम्ही एकाही मंत्र्याला बोलू देणार नाही. हे आम्हालाही करता येते. तसे असेल तर आम्ही सभागृहाचे नेते माननीय उप मुख्यमंत्री यांना सुध्दा बोलू देणार नाही.

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय, अशा प्रकारे दलाली शब्द वापरणे बरोबर नाही. तो शब्द कामकाजातून काढून टाकावा.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, आपण सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे यांना बोलण्याची संधी दिली आहे का ?

(सत्ताधारी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात)

**तालिका सभापती** : जे असंसदीय शब्द असतील ते कामकाजातून काढण्यात येतील. सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे यांनी कृपया खाली बसावे. सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी आपले भाषण पुढे सुरु करावे.

(सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम व श्री. विनायक मेटे एकमेकांशी बोलत असतात )

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी सभागृहासमोर ज्या विषयाची चर्चा चालू आहे त्यावर बोलावे.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य मला बोलू देत नाहीत.

**तालिका सभापती** : माझे आपल्याला संरक्षण आहे. आपण आपले भाषण पुढे चालू करावे.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, या महाराष्ट्रामध्ये 9 महिन्यामध्ये साडेसतरा हजार आदिवासी मुलांचे कुपाषण झाले आहे असे उत्तर माननीय मुख्यमंत्री अधिकृतपणे सभागृहात दिलेले

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम ....

आहे. या सरकारसाठी ही लाजिरवाणी बाब आहे. या सरकारला जनाची नाही तर मनाची तरी कोठे आहे ? स्वत:ची कामे करावयाची नाहीत आणि दुसऱ्यांना या सभागृहामध्ये बोलू द्यावयाचे नाही, हे बरोबर नाही. तुमच्या स्वत:च्या पायाखाली काय जळते ते बघा. याला कोण जबाबदार आहे ? अशा महत्वाच्या चर्चेवर, आदिवासींच्या होणाऱ्या कुपोषणाच्या विषयावरील चर्चेवर उत्तर देण्यासाठी या ठिकाणी पाच-पाच मंत्री बसलेले आहेत. मी कोठे नाही म्हटले ? पण हे सर्व मंत्री कुपोषण थांबविण्यामध्ये अपयशी ठरले आहेत.

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य इतर बाबीच सांगत आहेत. चर्चेचा विषय वेगळाच राहिला. यामध्ये प्रश्न काय आहेत ते सांगावे. सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी उत्तम प्रकारे मांडणी केलेली आहे. या ठिकाणी काय केले पाहिजे याबाबत सन्माननीय सदस्यांनी सांगितले तर आम्हाला उत्तर देता येईल. हा काही भांडणाचा विषय आहे का ? कुपोषणाचा महत्वाचा विषय असताना चर्चा चुकीच्या मार्गाने जात आहे. आपल्याला वेळेचे बंधन आहे. आपण वेळेचे बंधन पाळावे.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, आपण जर हे कुपाषण थांबविले असते तर आम्हाला ही चर्चा उपस्थित करण्याची आवश्यकता भासली नसती. कुपोषण थांबविण्यासाठी जे एकात्मिक बाल विकास प्रकल्प अधिकारी आहेत त्यांची मंजूर पदे 553 आहेत. त्यातील 363 पदे रिक्त आहेत. जर आपल्याकडे हे अधिकारी नसतील तर कुपोषण कसे थांबविणार ? प्रश्न काय आहेत ते सांगा असे माननीय मंत्री महोदय म्हणतात. मी तेच सांगतो. एकात्मिक बाल विकास प्रकल्प अधिका-यांची 363 पदे रिक्त आहेत. ही पदे आपण कधी भरणार आहात ? जर पदेच भरली नसतील तर त्या ठिकाणी न्याय कसा देणार ? पर्यवेक्षक कार्यकर्ते याची एकूण 632 पदे रिक्त आहेत. ज्या कार्यकर्त्या आहेत त्यांची 5077 पदे रिक्त आहेत. मिनी अंगणवाड्यांच्या कार्यकर्त्यांची 2399 पदे रिक्त आहेत. ज्या ठिकाणी पदेच नाहीत, अधिकारीच भरलेले नाहीत, त्या ठिकाणी कोण काम करणार, हे माननीय मंत्री महोदयांनी सांगावे. ही जबाबदारी कोणाची आहे, ही पदे कधीपर्यंत भरणार आहात ? आपण या सभागृहामध्ये अनेक वेळा आश्वासने दिलेली आहेत पण

...4...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ ST/ D/

श्री. रामदास कदम ....

ते होत नाही. एखादा मंत्री जर हे काम करीत नसेल तर या सभागृहामध्ये माननीय उप मुख्यमंत्री, माननीय मुख्यमंत्री उपस्थित राहावयास नको का ? त्यांना जाब विचारावयास नको का ? त्यांना जाब कोण विचारणार ?

मघाशी माननीय मंत्री महोदय श्री. बबनराव पाचपुते म्हणाले की, यावर उपाययोजना सांगावी. या उपाययोजनेच्या बाबतीत मी आपल्याला नंदुरबार जिल्ह्याचे उदाहरण देतो. माननीय मंत्री महोदय श्री. सुरेश शेट्टी या ठिकाणी उपस्थित आहेत. नंदुरबार जिल्ह्यामध्ये कुपोषणाची आकडेवारी सगळ्यात जास्त आहे. त्या ठिकाणी प्राथमिक आरोग्य केंद्रे 58 आहेत. प्राथमिक आरोग्य उपकेंद्रे 275 आहेत. ग्रामीण रुग्णालये 10 आहेत. इतर रुग्णालये 23 आहेत. आयुर्वेदिक दवाखाने 8 आहेत. ॲलोपॅथीक दवाखाने 3 आहेत. प्राथमिक हेल्थ युनीट एकही नाही. मोबाईल टीम 1 आहे. हेल्थ सेंटर 4 आहेत. तरंगता दवाखाना 1 आहे. 1537 दवाखाने आहेत पण उपयोग काय आहे ? त्या ठिकाणी जी यंत्रणा हवी ती नाही. माननीय मंत्री महोदय म्हणाले की, काय केले पाहिजे ते सांगावे. काय केले पाहिजे याची कल्पना इतक्या वर्षात आपल्याला आली नाही का ? आपण या खात्याचे मंत्री आहात. आपण पदभार सांभाळलेला आहे. ही जबाबदारी कोणाची आहे ? नंदुरबार जिल्ह्यामध्ये 85 टक्के आदिवासी दारिद्र्य रेषेखाली आहेत. हा शासनाचा अहवाल आहे. त्यांना दारिद्र्य रेषेच्या वर आणण्यासाठी शासन नेमकी काय उपाययोजना करणार आहे ? आपल्याला स्वातंत्र्य मिळून 60 वर्षे झालेली आहेत. या आदिवासींना आणखी किती वर्षे आपण दारिद्र्य रेषेखाली ठेवणार आहोत ? यावर कोण उपाययोजना करणार आहे. त्यासाठी लागणारे जे बजेट द्यावयाचे आहे ते देण्याचे काम माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री करतात. त्यामुळे कोणाला एवढे लागण्याचे कारण नाही. हे खाते सेन्सेटीव्ह आहे, महत्वाचे आहे. कुपोषण मोठ्या प्रमाणामध्ये होत आहे. आदिवासींच्या मुलांना देखील जगण्याचा अधिकार आहे. हे कुपोषण आणखी किती वर्षे चालणार आहे. हे थांबविण्याची जबाबदारी नेमकी कोणाची आहे ?

सभापती महोदय, या ठिकाणी एक गोष्ट आपल्या लक्षात आणून देऊ इच्छितो. आदिवासींना धान्याचा पुरवठा केला जात नाही ही बाब जेव्हा न्यायालयामध्ये गेली त्यावेळी दोन्ही बाजूने युक्तिवाद झाला. 20010-2011 मध्ये केंद्र शासनाकडून 40622 मे.टन एवढा धान्यपुरवठा झाला.

..5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ ST/ D/

श्री. रामदास कदम ....

हे धान्य आदिवासींकडे गेलेच नाही. तीन महिन्यापर्यंत त्यांच्याकडे धान्य पोहोचलेच नाही. ज्या 14 जिल्ह्यांमध्ये ते धान्य आदिवासींना द्यावयाचे होते ते धान्य त्या ठिकाणी गेलेच नाही. न्यायालयाने विचारले की, हे धान्य कोठे गेले ? म्हणजे या ठिकाणी आदिवासींसाठी आलेले धान्य देखील आम्ही खात आहोत. ते धान्य परस्पर बाहेर विकले जात आहे. याचे नियोजन नेमके कोणी करावयाचे ? या गोष्टी जर माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री यांच्या लक्षात आल्या तर ते त्यामध्ये लक्ष घालतील. म्हणून ते या ठिकाणी उपस्थित असावयास पाहिजेत. मला काही शौक नाही. यामध्ये राजकारण करण्याचा कोणताही भाग नाही.

सभापती महोदय, आपण आदिवासी पाड्यांमध्ये देखरेख करण्यासाठी ज्या समित्या नेमलेल्या आहेत त्या समित्यांच्या अहवालाची देखील आतापर्यंत अंमलबजावणी झालेली नाही. ती अंमलबजावणी करण्याचे काम शासनाकडून तत्काळ व्हावे अशी माझी आपल्याला विनंती आहे. आदिवासी अनेक वर्षे विकासापासून वंचित आहेत. आजही अनेक पाड्यांमध्ये पाण्याची व्यवस्था नाही. अनेक पाड्यांमध्ये आज देखील रस्ते नाहीत. अनेक पाड्यांमध्ये हॉस्पिटलची व्यवस्था असली तरी त्या ठिकाणी अधिकाऱ्यांचे नियोजन नाही. त्या ठिकाणी डॉक्टर्स नाहीत. बाकीच्या सगळ्या योजना आपण केलेल्या आहेत पण पण त्या योजनांची अंमलबजावणी होणे अत्यंत गरजेचे आहे. माननीय उप मुख्यमंत्री सभागृहात उपस्थित आहेत. मी आपल्यामार्फत माननीय उप मुख्यमंत्र्यांना सांगेन तसेच माननीय मुख्यमंत्री सभागृहात उपस्थित नसले तरी माननीय मुख्यमंत्र्यांना देखील आपल्यामार्फत माझी विनंती आहे की, आपण स्वत: या आदिवासींच्या न्यायासाठी वैयक्तिक लक्ष घालावे आणि भविष्यामध्ये हे कुपाषण कधी थांबणार, आपण ते कधी थांबविणार, त्यासाठी ठोस उपाययोजना कधी करणार आहात,

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम....

या खात्यांचा समन्वय कशा पध्दतीने ठेवला जाणार आहे, याबाबत सभागृहामध्ये ठोस उत्तर मिळावे अशी आमची अपेक्षा आहे. माननीय उप मुख्यमंत्र्यांना अशी विनंती आहे की, आपण एकदा कुपोषण केव्हा थांबणार आहे ते सांगावे. मग त्याला सहा महिने लागोत किंवा एक वर्ष लागो. या विषयाशी संबंधित जे विभाग आहेत त्यांचा महिन्यातून एकदा किंवा दोन वेळा आढावा घेतला तर काही अंशी कुपोषण थांबवू शकतो.

मघाशी माननीय आदिवासी विकास मंत्री श्री.पाचपुते यांनी म्हटले की, शासनाला उपाययोजना सुचवाव्यात. आदिवासी बालकांचे कुपोषण होण्यासाठी काही कारणे आहेत ती मी येथे नमूद करु इच्छितो. आर्थिकदृष्ट्या दुर्बल, रोजगाराचा अभाव, खुंटलेली क्रय शक्ती त्यामुळे पोषक आहाराचा अभाव, आरोग्याबाबत अज्ञान, स्तनदा-गर्भवती माता व बालकांच्या आहाराकडे दुर्लक्ष, प्रसूतीपूर्व व नंतर काळजी न घेणे, प्रसूतीची क्षमता नसणे, नवजात बालकांची प्रतिबंधात्मक उपचाराची काळजी न घेणे, सामाजिक चालीरिती, अल्पवयात लग्न, दोन मुलांमधील कमी अंतर, चारपेक्षा अधिक अपत्ये. ही कारणे सर्वश्रुत आहेत. या कारणांवर शासनाकडून उपाययोजना होऊ शकलेल्या नाहीत. त्या उपाययोजना मी सुचवू इच्छितो. पूर्व प्राथमिक शिक्षणावर भर दिला पाहिजे, किशोरवयीन मुलींच्या शिक्षणाकडे लक्ष दिले पाहिजे, पाण्याचे शुध्दीकरण केले पाहिजे, बालकांच्या आहारात सोयाबीन कसे मिळेल याकडे लक्ष दिले पाहिजे, महिला व बालविकासासह आरोग्य विभागाच्या यंत्रणेचा सहभाग घेतला पाहिजे. गर्भवती महिलांची प्रसूतीपूर्व काळजी घेतली पाहिजे. निरक्षरता, अंधश्रध्दा, शासकीय यंत्रणेवर अंधविश्वास आहे त्यात बदल केला पाहिजे, बदललेली पर्यावरणीय स्थिती , प्रचंड जंगलतोडीने निखळलेला आर्थिक आधार, त्यातून उत्पन्नाचे साधन शोधण्यासाठी आदिवासींच्या कुटुंबांना शासनाने मदत केली पाहिजे. या सर्व उपाययोजना केल्या तर हे कुपोषण थांबू शकेल. माझी पुन्हा एकदा माननीय उपमुख्यमंत्र्यांना व या सदनाच्या नेत्यांना विनंती आहे की, आदिवासींचा कुपोषणाचा प्रश्न बिकट आहे. त्यांच्या राहणीमानात बदल करण्यासाठी आपण स्वत: लक्ष घालावे. धन्यवाद.

-------

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी यांनी एका चांगल्या विषयावरील चर्चा उपस्थित केली आहे. या चर्चेवर माझे विचार मांडण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी यापूर्वी सुध्दा याच विषयावर चर्चा उपस्थित केली होती. त्यावेळी सुध्दा आम्ही त्या चर्चेत सहभागी झालो होतो. राज्यात जे महत्वाचे व गंभीर प्रश्न आहेत त्यामध्ये कुपोषित बालकांचा प्रश्न आहे. कुपोषित बालकांच्या संदर्भात एका कवीने सांगितले आहे की,

जहाँ बचपन भूखा हो, वहाँ जवानी कैसी होगी
और जहाँ मॉ-बाप कमजोर हों, वहाँ जिन्दगी कैसी होगी.

कुपोषित बालकांचे बालपण सांभाळले नाही तर ते कुपोषण वाढतच राहणार आहे. ही कुपोषित बालके फक्त पहाडी व वन विभागात आहेत अशातील भाग नाही. मुंबईतील झोपडपट्टीत कुपोषित बालके आढळत आहेत. मुंबईत 83 हजार व राज्यात 13 लाख कुपोषित बालके आहेत. या राज्याचे मुख्यमंत्री श्री.शरदचंद्रजी पवार साहेब होते. त्यावेळी त्या सरकारने अर्थसंकल्प मांडला होता. आदिवासींची लोकसंख्या 9 टक्के होती आणि आदिवासी विकास विभागासाठी तरतूद सुध्दा 9 टक्के केली होती. मी माननीय आदिवासी विकास मंत्री श्री.बबनराव पाचपुते यांना असे विचारले की, तुमच्या विभागाला 9 टक्के निधी मिळतो की नाही ? 9 टक्के निधी या विभागाला मिळत नसेल तर त्याचा उल्लेख आम्ही आमच्या भाषणातून करु. पण त्यांनी मला सांगितले की, आमच्या विभागाला 9 टक्के निधी मिळतो. या विभागाची यंत्रणा 5-6 विभागात विभागली गेली आहे. या यंत्रणेमध्ये समन्वय असणे महत्वाचे आहे.

या विभागात न्यूक्लिअस बजेटची संकल्पना राबविली जाते. माझा तालुका आदिवासी आहे. न्यूक्लिअस बजेटचे काम माझ्या तालुक्यात चांगले झालेले आहे. आदिवासींच्या झोपडीवर कौले टाकणे, दीड पॉईन्टचे विजेचे कनेक्शन देणे, घरगुती गॅस देणे याबाबत मी शासनाचे अभिनंदन करीन. पण इतके करुनही कुपोषित बालकांची संख्या कमी का होत नाही हा त्यातील महत्वाचा भाग दिसतो. मेळघाटातील आदिवासींच्या आरोग्याबाबत सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी चांगले मुद्दे मांडले असल्यामुळे मी त्याची पुनरावृत्ती करणार नाही. शिक्षण व जागृती होणे

3....

महत्वाचे आहे. मुंबईतही कॉन्व्हेण्टची शाळा नसेल इतकी उत्तम शाळा चोपडा तालुक्यातील कर्जाणी गावात बांधलेली आहे.

**तालिका सभापती (श्री.मोहन जोशी)** : या अल्पकालीन चर्चेची वेळ सकाळी 10 ते 10.45 पर्यंत होती.

श्री.अजित पवार : सभापती महोदय, आज या विशेष बैठकीत सकाळी 10 ते 10.45 पर्यंत सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत, सन्माननीय सदस्य सर्वश्री रामदास कदम, दिवाकर रावते, डॉ.नीलम गोऱ्हे, सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर यांनी मांडलेल्या एका महत्वाच्या विषयावर अल्पकालीन चर्चा होणार आहे. माझी आपल्याला व दोन्ही बाजूच्या सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, ही चर्चा 11.30 पर्यंत चालू ठेवावी. 11 वाजेपर्यंत दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य बोलतील त्यानंतर माननीय महिला व बालविकास मंत्र्यांना व माननीय आदिवासी विकास मंत्र्यांना 15-15 मिनिटे उत्तरासाठी लागतील. म्हणजे 11.30 वाजता ही चर्चा संपेल. त्यानंतर सभागृहाच्या नियमित बैठकीला सुरुवात करावी.

**तालिका सभापती** : ठीक आहे.

श्री.अरुण गुजराथी : सभापती महोदय, त्या गावात एक चांगले हॉस्पिटल बांधण्यात आले आहे. तेथे इन्फ्रास्ट्रक्चर असताना डॉक्टर्स उपलब्ध होत नाहीत ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे आरोग्य किंवा शिक्षण विषयक योजनांची अंमलबजावणी होण्यासाठी खात्याचे अधिकारी कसे उपलब्ध होतील, हा भाग महत्वाचा आहे. यादृष्टीने शासनाने कार्यवाही करावी अशी विनंती मी सर्व संबंधित मंत्री महोदयांना करीत आहे. मेळघाटला अन्न शिजविण्यासाठी सुध्दा अनुदान दिले जाते. माझ्या माहिती प्रमाणे 2 कोटी रुपये दिले जातात. खावटी कर्ज दिले जाते. मागील खावटी कर्ज संपूर्णपणे शासनाने माफ केले आहे. केवळ खावटी कर्ज माफ करुन चालणार नाही तर त्यासाठी जागृती निर्माण करणे आवश्यक आहे. सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांना सांगू इच्छितो की, आपण शेवटच्या दोन मिनिटात जे बोलला तेच आपले भाषण होते. शरीरयष्टी कमजोर, दोन मुलात अंतर नाही, अल्पवयात लग्न होते, आई-वडील अशक्त, ॲनिमियाग्रस्त

4....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी....

असणे, शेती नाही, रोजगार नाही, उत्पन्न नाही, विडी पत्ता गोळा करणे, डिंक गोळा करणे, मोहाची फुले गोळा करणे, रस्ते नसल्यामुळे एस.टी.वेळेवर येत नाही. शिक्षक नाही, डॉक्टर नाहीत. आपल्याला शासनाने पुढे कसे जावे यासाठी दिशा द्यावयाची आहे.

निर्मला निकेतन नावाची संस्था आहे हे आपल्याला माहीत आहे. या संस्थेने कुपोषण निर्मूलनासाठी विविध योजना राबविल्या आहेत. व्हीसीडीसी या योजनेत त्रुटी होत्या त्या त्यांनी काढून टाकल्या. त्यातून एक चांगल्या प्रकारे ही योजना मोखाडा येथे राबविली आहे. आयसीडीएसच्या माध्यमातून कुपोषित बालकांची संख्या निम्म्यावर आली आहे. आरोहण नावाची चांगली योजना राबविली जात आहे. यापूर्वी बालकांना दोन वेळा खाऊ दिला जात होता. आता चार वेळा खाऊ दिला जातो. बालकांचा हात पोहोचेल तेथे खाऊचा डबा ठेवला जातो. ही योजना उत्तम प्रकारे शासनाने राबविली पाहिजे. बाल कोपरा नावाची योजना सुध्दा चांगल्या पध्दतीने राबविली पाहिजे.

सबल नावाची केंद्र शासनाची योजना आहे. ती राज्यातील 11 जिल्ह्यात राबविली जाते. ही योजना अत्यंत चांगली आहे. म्हणून ती संपूर्ण राज्यात राबविण्यासाठी व्याप्ती वाढवावी. अशी माझी सूचना आहे. सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी कोर्टाच्या निर्णयाचा उल्लेख केला होता. सुप्रीम कोर्टाने असे म्हटलेले आहे की, या शक्तीशाली भारतात श्रीमंत व गरीब यांचे विभाजन करणारे दोन भारत असू शकत नाहीत. एका क्लिपिंगमध्ये असे म्हटले होते की, श्रीमंतांच्या घरात देखील कुपोषित आहेत ते कसे काय ते माझ्या लक्षात येत नाही. आपली ही चर्चा झोपडपट्टीतील व वन क्षेत्रातील कुपोषित बालकांसंबंधीची आहे.

राज्यातील अंगणवाड्यांची दर 3-4 महिन्यांनी तपासणी झाली पाहिजे. मागील 3 महिन्यापेक्षा आता किती प्रगती झाली ते पाहिले पाहिजे. मुलांवर उपचार केले जातात त्याचा आढावा घेतला पाहिजे. मृत्यूंचे विश्लेषण केले पाहिजे. नाशिक जिल्ह्यात 15 हजार कुपोषित बालके आहेत व दररोज सरासरी 5 बालके मृत्यूमुखी पडत आहेत असे सन्माननीय सदस्य श्री.जयवंतराव जाधव यांनी मला सांगितले. पाडा स्वयंसेवक व आशा यांचा सहभाग वाढविला पाहिजे.

नंतर श्री.गिते......

अशुद्धित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ ST/ D/ D/ KTG/ 11:00

श्रीमती शोभा फडणवीस........

सर्वप्रथम रस्त्यांचा कार्यक्रम राबवून सर्व गावांपर्यंत रस्त्यांची सोय उपलब्ध करुन दिली तर त्या ठिकाणी इतर सुविधा पुरविता येतील. मच्छरदाणी किंवा ॲम्ब्युलन्स देऊन उपयोग होणार नाही. प्रत्येक अंगणवाडीत फलक लावून त्यावर मुलांना आहारामध्ये काय काय दिले पाहिजे हे नमूद केले जाते. अन्नपदार्थ, कडधान्य, पालेभाजी, अंडी, डाळी, तेल याचे प्रमाण नमूद केलेले असते. परंतु महागाई निर्देशांक 12 टक्क्यापेक्षा वर गेला आहे. दुसरीकडे रोजगार उपलब्ध करुन दिला जात नसेल हे सांगून काही उपयोग होणार नाही. त्यांची पालेभाजी खायची ऐपत नाही. भाताची पेज आणि गोळाभर भाताच्या आधारे ही आदिवासी मुले जगत असतील तर त्यांना कोणत्या शब्दाने प्रोटिन्स देण्याच्या गोष्टी सांगत आहात?

सभापती महोदय, सगळ्यात मोठी अडचण वन विभागामध्ये आहे. 1980 च्या वन संवर्धन कायद्याने कुपोषणाचे प्रमाण अधिक वाढविले आहे. आदिवासींचे मुख्य खाद्य मशरुम आहे. अमरावतीच्या आयुक्तांनी आदिवासी मुलांना मशरुम खायला देण्याची व्यवस्था केली. परंतु शासनाने त्यावर हरकत घेतली. मशरुम हे आदिवासींचे प्रोटिन्सयुक्त खाद्य आहे. आदिवासी मुले जंगलात जाऊन मशरुम आणून खात होते. त्यामुळे त्यांच्यातील कुपोषणाचे प्रमाण आटोक्यात होते. वन उपज हा खऱ्या अर्थाने आदिवासींचा सुकामेवा म्हटला जातो. शासनाने त्यावर बंदी आणली. दुसरीकडे आदिवासींना रोजगार दिला जात नाही. अशा स्थितीत महागाई निर्देशांक वाढला तर त्यांना कोणत्या मार्गाने प्रोटिन्स मिळणार? पिण्याचे पाणी हे एक महत्वाचे कारण कुपोषणास कारणीभूत ठरत आहे. भार नियमनामुळे वीज पुरवठा होत नाही. त्यामुळे नळ योजना बंद असते. परिणामी पिण्यासाठी नदी किंवा नाल्याच्या पात्रातून पाणी आणले जाते. ते पाणी प्यायल्यामुळे डायरिया, डिसेंट्री असे आजार होतात आणि तेच आजार मृत्यूस कारणीभूत ठरतात.

सभापती महोदय, तिसरे महत्वाचे कारण म्हणजे पाणी पुरवठा योजनेंतर्गत पाणी शुध्द करण्यासाठी ब्लिचिंग पावडरचा पुरवठा केला जातो, ती ब्लिचिंग पावडर आऊटडेटेड असते. त्यात क्लोरिनचे प्रमाण कमी असून चुन्याचे प्रमाण अधिक असते. असे पाणी तपासणी करण्यासाठी ग्रामपंचायतींना मशिन उपलब्ध करुन दिले जाते. त्या तपासणीचे प्रमाण योग्य यावे म्हणून पाण्यामध्ये ब्लिचिंग पावडर अधिक प्रमाणात मिसळली जाते. पर्यायाने पाण्यामध्ये चुन्याचे प्रमाण वाढते. असे पाणी प्यायल्यामुळे रोग होऊन मृत्यूचे प्रमाण वाढते.

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस........

सभापती महोदय, भ्रष्टाचार हा एक मोठा कॅन्सर आहे. जेथे जाऊ तेथे खाऊ असे धोरण सर्व ठिकाणी आपल्याला पहावयास मिळते. त्यामुळे अनेक शासकीय योजनांचा बट्ट्याबोळ झाल्याशिवाय राहणार नाही. मुले ही देशाची संपत्ती आहे त्या दृष्टीने विचार करण्याची गरज आहे. मेळघाटमध्ये 300 गावे असून 350 एन.जी.ओ. आहेत. मी अमरावतीच्या आयुक्तांना पत्र लिहिले आहे. एन.जी.ओ.च्या नावाखाली किती काम झाले याचा आढावा घ्यावा. कुपोषण कमी करण्यासाठी प्रचंड प्रमाणात निधी दिला जातो. हा निधी त्या आदिवासी बालकांपर्यंत पोहोचत नाही. एन.जी.ओ.कडून हा निधी हडप केला जातो. त्या संघटनांमध्ये भांडणे सुरु आहेत. त्यामुळे पहिल्यांदा एन.जी.ओ.चे तेथील कार्य बंद करावे. शासनाकडे प्रचंड यंत्रणा असल्यामुळे शासकीय अधिकाऱ्यांमार्फत आपल्याला त्या भागात काम करता येईल. शासनाकडे शक्ती असताना एन.जी.ओ.ना मोकळे रान का सोडले आहे? सरकारच्या माध्यमातून कुपोषण कमी करण्याचा कार्यक्रम राबविण्यात यावा.

सभापती महोदय, कुपोषित मुले सर्वात प्रथम या एन.जी.ओ.आणून दाखवितात. त्याचे पैसे मागतात आणि तेच केंद्रापर्यंत जातात. त्यांच्या मार्फत वाहने घेऊन फिरतात. परंतु आदिवासी मुलांना अन्न खायला देत नाहीत. त्यामुळे तेथील एन.जी.ओ.वर बंदी आणावी अशी मी शासनाला विनंती करते. वन विभागाने गावांचे पुनर्वसन केले. परंतु त्या गावांमध्ये सुविधा दिलेल्या नाहीत. त्यामुळे त्या गावातील मुलांनी खायचे काय? दवाखान्यामध्ये कुपोषित मुलांना भरती केले जाते असे सांगण्यात येते. परंतु दवाखान्यामध्ये भरती करण्यासाठी तेथे वाहनाची व्यवस्था उपलब्ध आहे काय? आदिवासी आणि दुर्गम भागातील मुले अधिक कुपोषित आहेत. त्यामुळे या राज्यातील गडचिरोली आणि चंद्रपूर हे जिल्हे कुपोषणाच्या बाबतीत प्रथम क्रमांकावर आहेत. अशा भागासाठी जिजाऊ किंवा इतर कोणत्याही योजना राबविल्या तरी सर्वात प्रथम संबंधित विभागांमध्ये समन्वय असणे गरजेचे आहे. अन्यथा या योजनांचे फलित मिळणार नाही. एखाद्या विभागाच्या मंत्र्यांनी बैठक बोलावली तर दुसऱ्या विभागाचे मंत्री बैठकीला येत तर नाहीत, परंतु विभागाचे सचिव देखील बैठकीस यायला तयार नसतात. अशी जर स्थिती असेल तर समन्वय निर्माण करण्यासाठी शासनाने एक समिती नेमावी. या समितीच्या माध्यमातून दरमहा किंवा दोन महिन्यांनी सर्वंकष आढावा घेण्याचे ठरविले तर मोठया प्रमाणात कुपोषण कमी होऊ शकते.

..3..



SGB/ ST/ D/ D/ KTG/ 11:00

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस........

सभापती महोदय, हा राजकीय विषय नाही. देशाच्या संस्कृतीचा, देशाच्या आरोग्याचा विषय आहे. पुढची पिढी कुपोषित जन्माला आली, बालमृत्यूचे प्रमाण अधिक असले तर भारताला चांगले दिवस येतील असे म्हणता येणार नाही. कुपोषणाचा विषय हा गांभीर्याने घ्यावा लागेल. पिण्याचे पाणी, सिंचन, रस्ते यांची सुविधा प्राधान्याने उपलब्ध करुन द्यावी लागेल. अंगणवाडीच्या माध्यमातून आदिवासी बालकांना व गरोदर मातांना पूरक आहार दिला जातो. परंतु खिचडीमध्ये उंदीर, साप, झुरळ सापडल्याची अनेक उदाहरणे आपण पाहिली आहेत. त्या संदर्भात आतापर्यंत कोणावरही कारवाई झालेली नाही. कोणत्या अंगणवाडीच्या संदर्भात कारवाई झाली? कोणत्या अधिकाऱ्यावर कारवाई करण्यात आली आहे? एखाद्या पुरवठादारावर कारवाई केली का? आम्ही जेव्हा एखाद्या अंगणवाडीला भेट देतो तेव्हा तेथे धान्यामध्ये अळ्या असल्याचे दिसून येते आणि अशाच धान्यापासून खिचडी शिजविली जाते. म्हणून सर्वप्रथम गरीब आदिवासी लोकांची आर्थिक स्थिती सुधारल्याशिवाय कुपोषणापासून त्यांची सुटका होणार नाही एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करते.

------

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बबनराव पाचपुते (आदिवासी विकास मंत्री) : सभापती महोदय, सभागृहामध्ये अत्यंत महत्वाच्या आणि गंभीर विषयावर चर्चा उपस्थित करण्यात आली आहे. या चर्चेमध्ये माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत, श्री.रामदास कदम, श्री.अरुणभाई गुजराथी, श्रीमती शोभा फडणवीस यांनी सहभाग घेऊन अत्यंत उपयुक्त सूचना केलेल्या आहेत.

सभापती महोदय, मी सदनाला अवगत करु इच्छितो की, आदिवासी विकास विभागाला 9 टक्के बजेट उपलब्ध करुन दिले जाते. 2009-10, 2010-11 व 2011-12 मध्ये देखील 100 टक्के निधी उपलब्ध झाला हे मुद्दाम नमूद करु इच्छितो. आदिवासी भागामध्ये कुपोषणाचे प्रमाण अधिक आहे आणि इतर ठिकाणी ते नाही असे नाही. 18 हजार बालकांचा मृत्यू झाल्याचे सांगितले जाते. कुपोषणामुळे होणारे मृत्यू आणि बालमृत्यू यामध्ये फरक आहे. माननीय सदस्यांनी केलेल्या सूचना अतिशय महत्वाच्या आहेत. माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस यांनी विभागांमध्ये समन्वय नसल्याचे सांगितले. सर्व विभागांमध्ये व्यवस्थित समन्वय आहे. मागणीप्रमाणे त्या त्या विभागाला निधी उपलब्ध करुन दिला जातो. महिला व बालविकास विभागाने अंगणवाडीच्या बांधकामासाठी 30 कोटी रुपयांची मागणी केली. तो निधी या वर्षी मंजूर करण्यात आला. महिला व बालविकास विभागाने वेगवेगळ्या कामांसाठी निधीची मागणी केली होती. चालू वर्षात त्या विभागाला 42.68 कोटी रुपये वर्ग केले आहेत. नावीन्यपूर्ण योजना आहे. बालमृत्यूचे प्रमाण आणि कुपोषण कमी करण्यासाठी 25 कोटी रुपयांच्या निधीची मागणी केल्याबरोबर 25 कोटी वर्ग केले आहेत. मेळघाटमधील कुपोषण कमी करण्यासाठी गरम अन्न शिजवून द्यायचे आहे. यासाठी 1.80 कोटीचा नवीन प्रस्ताव प्राप्त झाल्याबरोबर मंजूर केला आहे. गरम पदार्थ पुरविणे महत्वाचे आहे.

या ठिकाणी मांडलेला विषय चर्चा करण्याचा आहे. खावटी कर्ज प्रमाणात देत होतो. दोन वर्षापूर्वी याचा अहवाल चांगला आल्यामुळे 4 लाख लोकांना खावटी कर्ज दिले. तो भाव ठरविण्याची जबाबदारी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली समिती आहे त्यांना दिला आहे. धान्य दुकानावरुन धान्य देण्याचा मेळघाटमध्ये प्रयत्न केला होता. परंतु ती योजना यशस्वी झाली नाही. दिलेल्या खावटी कर्जाच्या संदर्भात तक्रारी आलेल्या नाहीत. एक-दोन तक्रारी आल्या होत्या, त्या संदर्भात ताबडतोब चौकशी करुन चुकीचे धान्य आले ते बदलून देण्याचा प्रयत्न केला. गेल्या वर्षी 4 लाख व या वर्षी 3 लाख लोकांना खावटी कर्ज दिले आहे. त्यामध्ये वाहतूक, हमाली, अडत

..5..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बबनराव पाचपुते..........

याचा खर्च म्हणून 1800 रुपये बाजारात भाव होता, तेवढा दर त्यांच्यापर्यंत पोहोचत नाही म्हणून 300 रुपये वेगळे दिले आहेत. काही लोकांकडून खूप मोठया प्रमाणात अवडंबर माजविले जाते. कोणताही विषय असला तरी सर्वप्रथम आदिवासी विकास विभागाबाबत टीका केली जाते. प्रत्यक्षात जाऊन पाहणी केली पाहिजे. कुपोषणाची अनेक कारणे आहेत. आदिवासी समाजामध्ये लवकर लग्ने केली जातात. त्यामुळे देखील अडचणी निर्माण होतात. गरोदर मातांना विशेष सहाय्य दिले पाहिजे. त्यासाठी महिला व बालविकास विभागाने योजना सुरु केली असून ती योजना राबवित आहोत.

नंतर श्री.खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ D/ KTG/ पूर्वी श्री. भोगले..... 11:10

श्री. कपिल पाटील : महोदय, मंत्री महोदयांनी आपल्या उत्तराच्या भाषणात अत्यंत गंभीर विधान करुन राज्यातील आदिवासींचा अपमान केलेला आहे. यामध्ये खरे तर आदिवासींचे आरोग्य आणि बालविकासाचा प्रश्न नसून त्यांच्या वंश विच्छेदाचा प्रश्न आहे. कारण राज्यात 9 महिन्यात 18 हजार मुले मृत पावली व त्यासंदर्भात मंत्री महोदय उत्तर देत आहेत की, आदिवासी लवकर लग्न करतात त्यामुळे हे मृत्यू होतात. म्हणजे त्यांच्या मुलांच्या मृत्यूची जबाबदारी मंत्री महोदय या आदिवासींवर टाकून मोकळे झाले, हे कधीही सहन करता येणार नाही. आदिवासींना मंत्री महोदयांनी या मृत्यूचे प्रमाण वाढण्यासाठी दोषी ठरविले. अशा प्रकारे मांडणी करुन मंत्री महोदय चुकीचे उत्तर देत आहेत, त्यालाच माझी हरकत आहे.

श्री. बबनराव पाचपुते : महोदय, सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी सांगितले की, राज्यात 18 हजार बालकांचे मृत्यू झाले. त्याबाबत मी स्पष्टीकरण देत आहे की, हे मृत्यू केवळ कुपोषणामुळे झालेले नसून ते बालमृत्यू आहेत. कुपोषणामुळे मृत्यू होणे आणि बालमृत्यू यामध्ये फरक आहे, हे सांगण्याचाच मी प्रयत्न करीत आहे.

( विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य बोलण्याचा प्रयत्न करतात )

श्री. कपिल पाटील : मंत्री महोदयांनी अत्यंत आक्षेपार्ह विधान केलेले आहे.

**तालिका सभापती (श्री. मोहन जोशी)** : सन्माननीय सदस्यांनी प्रथम मंत्री महोदयांचे उत्तर पूर्णपणे ऐकून घ्यावे.

श्री. बबनराव पाचपुते : कुपोषणामुळे होणारे मृत्यू आणि बालमृत्यू यात फरक आहे, हेच सांगण्याचा मी प्रयत्न करीत आहे. यासंदर्भात आमच्या विभागाने अभ्यास केला आणि अत्यंत चांगल्या प्रकारचा समन्वय संबंधित विभागांशी आहे. तसेच बालमृत्यूच्या संदर्भात व कुपोषणाच्या संदर्भात आदिवासी भागात अनेक स्वयंसेवी संघटना सुध्दा कार्यरत आहेत. आपण मेळघाट मध्ये काम करणाऱ्या एका संस्थेच्या साहसाबद्दलची माहिती दिली, ते बरोबर आहे. अशाच प्रकारच्या इतरही एनजीओ इतर विभागातून काम करीत आहेत. मी सुध्दा मेळघाट विभागात दोन दिवस राहून त्या भागातील लोकांच्या जीवनाची जवळून पाहणी केली. कुपोषण हा विषय अत्यंत संवेदनशील असल्याने त्यासाठी शासनाला लवकरच चांगले निर्णय घ्यावे लागणार तसेच स्वयंसेवी संघटनांनी जे अहवाल दिलेले आहेत त्यांचाही शासन गांभीर्याने विचार करीत लहान मुले, स्तनदा

.....2



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

माता, गरोदर महिला यांना उत्तर प्रकारचा आहार देणे, आदिवासींच्या मुलांना शिक्षण देऊन त्यांचे अज्ञान दूर करणे, आरोग्याच्या सुविधा पुरविणे अशा विविध योजना आपण राबवित आहोत. तसेच सुवर्ण जयंती सानुग्रह अनुदान योजना ही 220 कोटीची योजना आपण सुरु केली असून त्याचे रिझल्ट सुध्दा चांगले यायला लागले आहेत. शाळेत मुलांची 59 टक्के गळती होती, ती कमी करण्याचा आपण प्रयत्न केला व त्यात सुधारणा करीत आहोत. आदिवासींचे आरोग्य सुधारणे, त्यांना अन्नधान्याचा पुरवठा करणे व त्यात सुधारणा करणे, शुध्द पाणीपुरवठा करणे इ. कार्यक्रम सुध्दा हाती घेतलेले आहेत.

महिला व बालविकास खात्याच्या मंत्री माननीय श्रीमती वर्षा गायकवाड आहेत. त्या देखील दर दोन तीन महिन्यातून एकत्र बसून या विषयावर चर्चा करतात अशा प्रकारे आरोग्य विभागाचा सुध्दा चांगला समन्वय ठेवून आहोत. या माध्यमातून राज्यातील आदिवासीबहुल पाच जिल्ह्यांमध्ये आपण प्रायोगिक तत्वावर एक पायलट योजना राबवित आहोत. त्या माध्यमातून आदिवासींच्या जीवनमानात सुधारणा झाली पाहिजे असेच शासनाचे प्रयत्न आहेत. जास्तीत जास्त सुविधा त्यांच्यापर्यंत कशा पोहचतील यादृष्टीने यंत्रणा कार्यरत करणे आवश्यक आहे. त्यासाठी आपल्याला आदिवासी भागात जी अधिकारी पदे रिक्त आहेत ती भरण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. कुपोषण हा विषय राज्याच्या दृष्टीने अत्यंत लांच्छनास्पद गोष्ट असून या विषयाशी संबंधित इतर विभागांच्या समन्वयाने, ते जे सांगतील त्या पध्दतीने काम करण्याची आमची तयारी आहे. यासाठी निधी कमी पडणार नाही याची काळजी शासन घेणार आहे. त्याचबरोबर आदिवासी भागात मी प्रत्यक्ष पाहिले की, या भागातील लोकांना पुरेसे कपडे सुध्दा मिळत नाहीत. रात्री आपल्याच घरात शेकोटी पेटवून हे लोक तसेच झोपतात. त्यांना अंगावर घेण्यासाठी व थंडीपासून संरक्षण करयासाठी कपडेही नाहीत. मध्यंतरी आम्ही या सर्व गोष्टींची पाहणी केली, मी स्वत: मेळघाटातील खाडी या गावात मुक्कामी राहिलो होतो म्हणून जवळून पहायला मिळाले. या लोकांना दोन चादरी आणि एक ब्लँकेट सुध्दा शासनाच्या माध्यमातून पुरविण्याचे प्रयत्न आम्ही केले आहेत. अशा प्रकारे आदिवासींचे जनजीवन सुधारावे यासाठी ज्या ज्या अडचणी असतील त्या सर्व दूर करण्याची शासनाची तयारी आहे. त्याचबरोबर सन्माननीय सदस्यांनी इतर ज्या सूचना केल्या त्या सर्वच सूचनांचा परामर्ष मला वेळेअभावी घेणे शक्य नाही. तरी देखील त्या सूचनांचा आदर करुन त्या विचारात घेण्याचा प्रयत्न केला जाईल, एवढे सांगून माझे भाषण पुरे करतो.

------

....3

22-12-2011 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) H-3

PFK/ D/ KTG/ पूर्वी श्री. भोगले..... 11:10

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती वर्षा गायकवाड (महिला व बालविकास मंत्री) : महोदय, अल्पकालीन चर्चेमध्ये डॉ. दीपक सावंत, सर्वश्री रामदास कदम, अरुण गुजराथी, एस.क्यू.जमा तसेच श्रीमती शोभाताई फडणवीस या सन्माननीय सदस्यांनी भाग घेऊन ज्या सूचना केल्या त्याबद्दल मी त्यांचे प्रथम आभार व्यक्त करते.

महोदय, भविष्याचा विचार करीत असताना ही एक महत्वपूर्ण चर्चा झाली पाहिजे असे मला वाटते. अशी चर्चा करीत असताना त्यात कोणताही राजकीय आवेश न आणता ही समस्या सुटली पाहिजे यादृष्टीनेच सन्माननीय सदस्यांनी मार्गदर्शक सूचना केलेल्या आहेत. मागील काळात सुध्दा आमच्या यासंदर्भात बैठका झाल्या त्यामध्ये यासंदर्भात विविध विभागांशी चर्चा होते. तशी चर्चा आमदार महोदय आणि सचिवांसोबत सुध्दा होत असते. त्या माध्यमातून आदिवासीं भागासाठी काही नवीन योजना घेता येतील किंवा कसे यासंदर्भातील समन्वय कसा साधता येईल यादृष्टीने आमच्या विभागाने प्रामाणिक प्रयत्न केलेले आहेत. आरोग्य विभागाच्या माध्यमातून मातृत्व अनुदान योजना, मानसेवी डॉक्टर योजना, प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावर केंद्र शासनाच्या विविध योजना राबवित असताना त्यांचा फार मोठ्या प्रमाणात उपयोग होतो. या व्यतिरिक्त ग्रामीण व जिल्हा रुग्णालय स्तरावर आरोग्य विकास केंद्र शासनाने सुरु केले असून त्याच्या माध्यमातून जननी सुरक्षा योजना, राष्ट्रीय प्रजनन सुरक्षा योजना आपण ऑक्टोबर, 2011 पासून सुरु केली आहे. त्यानुसार साधारणपणे 30 दिवसापर्यंतची जी बालके असतात, गरोदर आणि प्रसूतीसाठी आलेल्या माता व स्तनदा माता तसेच नवजात बालक अशा सर्वांसाठी ही योजना सुरु झालेली असून त्या माध्यमातून 14291 माता आणि 1709 अर्भकांना सेवा देण्यात आली आहे.

या व्यतिरिक्त मानव विकास कार्यक्रम या केंद्र शासनाच्या कार्यक्रमाअंतर्गत 22 जिल्ह्यातील 125 तालुक्याच्या 615 प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये एक स्त्री रोग तज्ज्ञ आणि बाल रोग तज्ज्ञ यांच्या माध्यमातून आरोग्य शिबीर आयोजित करुन त्या माध्यमातून 49681 गरोदर माता आणि 20321 बालकांना सेवा देण्यात आली आहे. या व्यतिरिक्त विशेष सेवा योजना म्हणजे आपण स्पेशल न्यू बॉर्न केअर युनिट, स्टरलायझेशन युनिट 35 ठिकाणी सुरु केली असून न्यू बॉर्न केअर सेंटर्स जिल्हा व उप जिल्हा रुग्णालयात निर्माण केले आहेत व 146 रुग्णालयांमध्ये ही संदर्भ सेवा कार्यरत आहे. तसेच या योजनांच्या माध्यमातून आठवड्याचे 24 तास सुध्दा ही सेवा देण्यात येते. मेळघाटच्या बाबतीत सांगायचे तर डॉ. दीपक सावंत यांनी सांगितल्यानुसार जन्म झालेल्या

.....4



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती वर्षा गायकवाड........

बालकांसाठी न्यू बॉर्न रुम्स 11 पीएचसी मध्ये केलेल्या आहेत. मला सांगितले पाहिजे की, यासंदर्भात आम्ही खूप अभ्यास केला.

सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी राजमाता जिजाऊ योजनेचा उल्लेख केला. त्या योजनेच्या माध्यमातून विविध देश, राज्य आणि आपल्या राज्यातील आदिवासींचा अभ्यास केला. तसेच सभागृहात सुध्दा वारंवार जी चर्चा होते ज्या विभागांचा विषय आहे अशा 23 विभागांच्या संदर्भात आम्ही चर्चा केलेली असून त्यांच्याशी समन्वय कसा ठेवता येईल आणि त्या माध्यमातून कुपोषणमुक्त युनिट कार्यक्रम कसा राबविता येईल यासाठी शासन प्रयत्नशील आहे. याची आकडेवारी माझ्याकडे असली तरी मी वेळेअभावी त्यात जात नाही. कारण त्यातून किती कमी केले आणि किती वाढले अशी चर्चा करण्यापेक्षा कुपोषण हा विषय आपल्या राज्यातून समूळ नष्ट कसा करता येईल यादृष्टीने विचार करीत असताना पाच वर्षाचे टार्गेट ठरविण्याचा आम्ही विचार करतो. हे टार्गेट पाच वर्षाचे असले तरी ते तीनच वर्षात कसे पूर्ण करता येईल याचाही विचार करुन काम करण्याचा प्रयत्न करीत आहोत.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. वर्षा गायकवाड ...

सभापती महोदय, महिला व बालविकास विभागाने काही महत्वपूर्ण निर्णय घेतलेले आहेत. आदिवासी विभागामध्ये महिला कामावर जात असतात. खरे म्हणजे शुन्य ते 3 वर्षाच्या बाळाला घरी ठेवून महिला कामावर जात असतात. त्यामुळे आदिवासी विभागात पाळणा घर सुरु करण्याच्या संदर्भात आजच्या कॅबिनेटच्या बैठकीत निर्णय घेण्यात आलेला आहे. 1 जानेवारी, 2012 पासून नंदूरबार, ठाणे, नाशिक, गडचिरोली, अमरावती व चंद्रपूर या सहा जिल्हयात पाळणाघरे सुरु केली जाणार आहेत. सबला योजना चांगली योजना आहे अशी माहिती सन्माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी यांनी दिलेली आहे. 11 ते 18 वर्षाच्या किशोरवयीन मुलींसाठी 11 जिल्हयात ही योजना सुरु करण्यात आलेली आहे. या योजनेचे क्षेत्र वाढले पाहिजे अशी त्यांनी मागणी केलेली आहे. सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी आहार योजना सुरु का केली नाही असा प्रश्न उपस्थित केलेला आहे. यासंदर्भात मी सांगू इच्छिते की, या योजनेच्या माध्यमातून आपण आहार योजना सुरु केलेली आहे. व्यवसाय प्रशिक्षण, जीवन कौशल्य प्रशिक्षण एनजीओंच्या माध्यमातून देण्यास सुरुवात केलेली आहे. सबला योजना 11 जिल्हयांमध्ये राबवली जात आहे. इंदिरा गांधी मातृत्व सहयोग योजनेला केंद्र शासनाकडून 100 टक्के ग्रँट मिळत असते. अमरावती व भंडारा या दोन जिल्हयांसाठी ही योजना असून या योजनेमध्ये 19 वर्षाची महिला गरोदर राहिल्यानंतर महिलेने रुग्णालयात नाव नोंदणी केली तर सदर गरोदर महिलेला दीड हजार रुपये दिले जातात. महिलेची रुग्णालयात डिलीव्हरी झाल्यानंतर बाळाला संपूर्ण लसीचे डोस दिले, मुलाची वाढ व्यवस्थित झाली तर अशा महिलेला हजार रुपये दिले जातात तसेच आईने बाळाला स्तनपान व्यवस्थित दिले तर पुन्हा एक हजार रुपये दिले जातात त्यामुळे सर्व मिळून 4000 रुपये या योजनेच्या माध्यमातून आईला दिले जात असतात. सदर योजनेचा लाभ 19 वर्षाच्या महिलेलाच मिळत असतो.

सभापती महोदय, परिपोषक आहारात 1 रुपयांची वाढ करण्यात आली असून या योजनेसाठी मागच्या बजेटमध्ये 204 कोटींची तरतूद करण्यात आलेली आहे. मेळघाटच्या कुपोषणाच्या संदर्भात सभागृहात वारंवार चर्चा होत असते. महिलांना तसेच महिला बचत गटांना



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. वर्षा गायकवाड ...

प्रोत्साहन मिळावे यासाठी प्रत्येक बचत गटाला हजार रुपये देण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. या योजनेत डाळ, तेल, मसाले यासाठी 1.70 रुपये तसेच भाजीपाल्यासाठी 90 पैसे देण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. या विषयाच्या संदर्भात सन्माननीय सदस्यांबरोबर चर्चा झाली असून त्या बैठकीमध्ये आमच्या विभागाला सन्माननीय सदस्यांकडून बरीच माहिती मिळाली आहे. तसेच सर्व सचिवांना बोलावून या विषयाच्या संदर्भात चर्चा करण्यात आली असून या बैठकीत आमच्या विभागाने काही महत्वपूर्ण निर्णय घेतले आहेत. वैद्यकीय शिक्षण, आदिवासी विभाग, सामाजिक न्याय तसेच पीडब्ल्यूडी विभागाचे सचिव या बैठकीमध्ये उपस्थित होते. मेळघाटमध्ये मी स्वत: गेले आहे. मेळघाटमध्ये रस्त्यांचे डांबरीकरणाचे काम झालेले आहे परंतु गावांना जोडणारे अंतर्गत रस्ते नाहीत. त्यामुळे पीडब्ल्यूडी विभाग व आदिवासी विभागाने समन्वय साधून अभ्यास करावा व रस्त्याची कोठे कोठे गरज आहे त्याची पाहणी करुन त्यासंदर्भात आमच्या विभागाला 15 दिवसात अहवाल द्यावा अशी सूचना करण्यात आली आहे. अंगणवाडी सेविकांचा एमआयएस वाढण्याची गरज आहे. ज्या ठिकाणी कुपोषित बालकांची संख्या जास्त आहे, ज्या ठिकाणी बालमृत्यूचे प्रमाण मोठया प्रमाणात आहे अशा ठिकाणच्या रस्त्यांचे संबंधित विभागाने प्रपोजल द्यावे. यामध्ये आदिवासी विभागाच्या माध्यमातून रस्त्यांसाठी जास्तीचा पैसा कसा देता येईल यासाठी आमचा प्रामाणिक प्रयत्न राहणार आहे.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, सन्माननीय मंत्री महोदया प्रा. वर्षा गायकवाड यांनी आता सांगितले आहे की, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या माध्यमातून मेळघाट येथे गावांना जोडणारे अंतर्गत रस्ते करण्याच्या सदंर्भातील प्रस्ताव पाठविला आहे. खरे म्हणजे या विषयाच्या चर्चेच्या दरम्यान सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मंत्र्यांनी उपस्थित राहणे गरजेचे होते. कारण सदर विभागाचे मंत्री असते तर त्यांनी सांगितले असते की, आम्ही या योजनेसाठी एवढे एवढे पैसे देऊ किंवा माननीय मुख्यमंत्री सभागृहात उपस्थित असते तर त्यांनी सांगितले असते की, मी या कामासाठी एवढे एवढे पैसे उपलब्ध करुन देईन.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. वर्षा गायकवाड : सभापती महोदय, या विषयाच्या संदर्भातील प्रस्ताव आदिवासी विकास विभागाला पाठविला जाणार असून तो विभाग संबंधित विभागाला प्रस्ताव पाठवील. रस्त्यांसाठी आदिवासी विभागाच्या माध्यमातून निधी उपलब्ध करुन दिला जात असतो तसेच काही निधी डीपीडीसीच्या माध्यमातून दिला जात असतो. या विषयाच्या संदर्भात सार्वजनिक आरोग्य विभागाचा जसा संबंध येतो तसाच संबंध वैद्यकीय शिक्षण विभागाचा सुध्दा येत असतो. शहरी भागात आता कुपोषण होतांना दिसत नाही ही वस्तुस्थिती आहे. मराठवाडा, विदर्भ तसेच कोकणच्या भागात खाण्याच्या पध्दती वेगवेगळया आहेत. त्यामुळे या ठिकाणच्या लोकांना अधिक न्युट्रीशिअन्स कसे उपलब्ध होईल याचा अभ्यास केला जात आहे. अंगणवाडीचे लाभार्थी, शालेय शिक्षण घेत असलेले विद्यार्थी, किशोरवयीन मुली, स्तनदा मातांच्या आरोग्याच्या संदर्भात संशोधन करण्याचे मान्य करण्यात आलेले आहे. या विषयाच्या माध्यमातून मी सांगू इच्छिते की, 14 शासकीय महाविद्यालये, 4 कॉर्पोरेट व 27 खाजगी महाविद्यालयांनी प्रत्येकाने एक जिल्हा घेण्याचे मान्य केलेले असून ते इन्फ्रास्ट्रक्चर्स वापरुन काम करणार आहेत. मेळघाटमध्ये महत्वपूर्ण मदत करण्याचे सुध्दा त्यांनी मान्य केलेले आहे. सामाजिक विभागाच्या माध्यमातून पाळणाघरे सुरु करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. खावटी कर्जाच्या माध्यमातून तांदूळ, गहू उपलब्ध करुन दिले जात असते परंतु आम्ही अशी सूचना केली आहे की, यामध्ये जर कडधान्ये, शेंगदाणे दिले तर त्यांना प्रोटीन्स मिळू शकेल.

सभापती महोदय, ज्या कुटुंबात एकही मूल कुपोषित नसेल अशा कुटुंबासाठी बक्षीस योजना सुरु करावी असेही आम्ही सुचवलेले आहे. महिला सक्षम व्हावी, महिला बचत गट सक्षम व्हावे यासाठी परसबाग योजना सुरु करण्यात आलेली असून या योजनेसाठी या वर्षी 25 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. ही योजना सरसकट सुरु करावी अशी आम्ही सूचना केलेली आहे."आशा" वर्कर आणि अंगणवाडी सेविकांना चांगले प्रशिक्षण दिले गेले, मोबाईल दिले तर त्याचा चांगला उपयोग होऊ शकेल. काही ठिकाणी मोबाईलची रेंज पोहचत नाही त्यामुळे अशा गॅपमध्ये बीएसएनएलच्या माध्यमातून टॉवर्स उभे राहिले तर आरोग्याच्या संदर्भात जी टोल फ्री

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. वर्षा गायकवाड ...

सुविधा सुरु होणार आहे त्यामुळे मोबाईलच्या माध्यमातून "आशा" वर्कर तसेच अंगणवाडी सेविकांच्या माध्यमातून आदिवासी विभागात चांगल्या प्रकारच्या सुविधा निर्माण होऊ शकतील.

सभापती महोदय, सार्वजनिक आरोग्य विभाग सुध्दा यासंदर्भात प्रयत्न करीत आहे. सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी आदिवासी विभागात जाऊन डोहाळ जेवण घेतले होते त्यामुळे मी त्यांचे आभार मानते. या योजनेमध्ये ख-या अर्थाने लोकांचा सहभाग वाढला गेला पाहिजे. कॅबीनमध्ये चर्चा न होता ती चर्चा लोकांपर्यंत गेली पाहिजे. त्यामुळेच शासनाने राजमाता जिजाऊ कुपोषण मुक्त ग्राम अभियान सुरु केलेले आहे. या योजनेच्या माध्यमातून जिल्हा पातळीवर जिल्हा परिषदेचे अध्यक्ष, तालुका पातळीवर आमदार, गावपातळीवर सरपंच, पीएचसी लेव्हलवर डॉक्टर्स अशा सर्वांचा आपण योजनेत सहभाग घेतला आहे. या योजनेमुळे 1100 गावे कुपोषण मुक्त झालेली आहेत अशी शासनाकडे माहिती आहे. आमचा विभाग या विषयाच्या संदर्भात शेवटच्या स्थरापर्यंत काम करीत असल्याचे आपल्याला दिसून येईल. या विषयाच्या संदर्भात आम्ही प्रामाणिकपणे प्रयत्न करीत आहेत.

सभापती महोदय, आम्ही आता आदिवासींसाठी इलेक्ट्रॉनिक्स वजन काटे खरेदी करीत आहोत. सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी अंगणवाडी सेविकांना सक्षम करावे अशी सूचना केली असून यासंदर्भात मी सांगू इच्छिते की, ख-या अर्थाने अंगणवाडी सेविकांना सक्षम करण्याची गरज आहे हे आम्हाला देखील मान्य आहे. राज्य स्तरावर मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली कमिटी असून, सुकाणू समितीचे अध्यक्ष माननीय मुख्यमंत्री आहेत. जिल्हयाच्या पालक सचिवांवर खरे म्हणजे या विषयाच्या संदर्भातील जबाबदारी टाकण्याची आवश्यकता आहे. खरे म्हणजे त्यांनाच प्रोजेक्ट ऑफिसर म्हणून घेतले पाहिजे. त्यांनी दर महिन्याला विविध विभागाच्या अधिका-यांबरोबर बैठक घेतली पाहिजे तसेच यामध्ये ज्या योजना सुरु आहेत त्याबाबत त्यांनी एक युनीफॉर्म तयार केला पाहिजे. पालक सचिवांच्या माध्यमातून दर महिन्याला बैठक घेतली जाईल व त्या बैठकीमध्ये सीडीपीओ, सार्वजनिक आरोग्य विभागाचे अधिकारी, आदिवासी विभागाचे अधिकारी असतील व त्यांनी

..5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. वर्षा गायकवाड ...

त्या बैठकीचा रिपोर्ट आमच्या विभागाला पाठविला पाहिजे. दर तीन महिन्यांनी महिला बाल विकासाच्या अंतर्गत सर्व विभागाच्या मंत्र्यांनी या विषयावर चर्चा करुन हा प्रश्न कसा सोडविता येईल याचा प्रयत्न केला पाहिजे.

**तालिका सभापती ( श्री. मोहन जोशी** ) सदर अल्पकालीन चर्चेसाठी 5 मिनिटांचा अवधी वाढवून देण्यात येत आहे.

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.वर्षा गायकवाड : सभापती महोदय, लोकप्रतिनिधींनी सुध्दा यामध्ये सहभाग घ्यावा म्हणून माननीय मुख्यमंत्री महोदयांच्या माध्यमातून त्यांना पत्रे पाठविण्यात आली आहेत. आज विविध विभांगामध्ये समन्वय साधण्याचे काम महिला विभागामार्फत होत आहे. या प्रश्ना संदर्भात उपाय योजना करण्यासाठी दर तीन महिन्याला सन्माननीय सदस्यांना बोलाविले जाईल, सचिवांना बोलाविले जाईल तसेच मंत्री महोदयांना देखील बोलाविले जाईल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस तसेच सन्माननीय सदस्य श्री.सय्यद जामा यांनी जो मुद्दा मांडला त्याच्याशी मी देखील सहमत आहे. मोह फुल आणि लाखोळी डाळीच्या संदर्भातील बाब संबंधितांच्या निदर्शनास आणून देण्यात येईल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी एनजीओच्या संदर्भात मुद्दा मांडला. त्याबाबत सांगू इच्छिते की, आम्ही एनजीओंच्या संदर्भात चर्चा केली त्यावेळी सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत देखील उपस्थित होते. आमदारांशी चर्चा केल्यानंतर आता एनजीओकडे काही रोल देण्याची आवश्यकता आहे असे आम्हाला वाटते. तेव्हा आम्ही एनजीओंना आवाहन करीत आहोत की, त्यांनी गाव, तालुका, जिल्हा या ठिकाणी काम करीत असताना एक तरी गाव दत्तक घेऊन त्या ठिकाणी एकही मूल कुपोषित राहणार नाही याची जबाबदारी घेतली पाहिजे.

सभापती महोदय, महानगरपालिकेमध्ये सोशल रिस्पॉन्सिबीलीटी फंड असतो. या फंडातून सोशल वर्क करण्यात येते. तेव्हा त्यांनी देखील आम्हाला मदत करावी अशी असे आवाहन आहे.

सभापती महोदय, प्रश्न पुष्कळ आहेत. परंतु आपणास मातांच्या सक्षमीकरणाच्या प्रश्नाकडे प्राधान्याने लक्ष द्यावे लागेल. व्हीसीडीसीच्या माध्यमातून आणि सीटीसीच्या माध्यमातून महिलांना सांगितले पाहिजे की, मुलांचे देखील सक्षमीकरण करणे आवश्यक आहे. प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये महिलांना प्रबोधन करण्यासाठी एखादी रुम असेल तर तेथे महिलांचे प्रबोधन करण्यात येईल. मुलांना अशा अशा प्रकारचा आहार दिला पाहिजे असे सांगण्यात येईल. त्या दृष्टीने देखील आमचे प्रयत्न सुरु आहेत.

सभापती महोदय, आज शहरी भागातील झोपडपट्टयांमध्ये देखील मोठ्या प्रमाणावर कुपोषण दिसत आहे. तेव्हा शहरी भागासाठी आता राजमाता जिजाऊ कुपोषण मुक्त शहरी अभियान आणण्याचा प्रयत्न करीत आहोत. या व्यतिरिक्त युसीडीसी होम योजना यासाठी देखील आमचे प्रयत्न सुरु आहेत.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.वर्षा गायकवाड....

सभापती महोदय, मला आपल्या माध्यमातून सभागृहाला विनंती करायची आहे की, कुपोषणाच्या प्रश्नावर मात करण्यासाठी आम्हाला आपल्या सर्वांच्या सहकार्याची आवश्यकता आहे. या संदर्भात आपल्या काही सूचना असतील तर त्याचा देखील स्वीकार करण्यात येईल. विविध विषयांच्या माध्यमातून हा प्रश्न हाताळण्याचा प्रयत्न आपण करीत आहोत. हा प्रश्न विविध विभागाच्या विषयाशी संबंधित असल्यामुळे त्या विभागांचे देखील सहकार्य आवश्यक आहे. एवढे बोलून मी माझे उत्तराचे भाषण पूर्ण करते.

( विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य घोषणा देत बहिर्गमन करतात.)

**तालिका सभापती** : अल्पकालीन चर्चा संपली आहे.

आता सभागृहाची विशेष बैठक स्थगित होत असून सभागृहाची नियमित बैठक सकाळी 11.45 वाजता पुन: भरेल.

(सभागृहाची बैठक सकाळी 11.33 ते 11.45 वाजेपर्यंत स्थगित झाली. )

--------

यानंतर श्री.सरफरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

**पृ.शी./मु.शी.**: नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावासंबंधी

**सभापती** : माझ्याकडे सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर व सन्माननीय सदस्य सर्वश्री दिवाकर रावते, विनोद तावडे, रामदास कदम यांनी नियम 289 अन्वये प्रस्ताव दिलेला आहे. "सन 1982 मध्ये झालेला गिरणी कामगारांचा संप, त्यानंतर बंद पडलेल्या गिरण्यांमधील अडीच लक्ष कामगारांवर उपासमारीची आलेली वेळ" असा प्रस्तावाचा विषय आहे. सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी व इतर सन्माननीय सदस्यांनी आपले म्हणणे थोडक्यात मांडावे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, नियम 289 अन्वये प्रस्ताव देण्यामागील महत्वाचे कारण असे की, मागील अधिवेशनामध्ये गिरणी कामगारांच्या प्रश्नासंबंधी दिलेल्या प्रस्तावावर चर्चा झाली होती. त्यानंतर माननीय मुख्यमंत्र्यांनी विरोधी पक्षाच्या नेत्यांना आपल्या दालनामध्ये बोलावून त्यांच्याबरोबर चर्चा केली होती. सन 1982 सालापासून गिरणी कामगारांचा हा प्रश्न खितपत पडलेला आहे. 1982 साली हा संप सुरु झाल्यानंतर गिरण्या बंद पडल्यामुळे मुंबईतील अडीच लाख गिरणी कामगारांवर उपासमारीची पाळी आली. गिरण्यांच्या जमिनीचा विकास करण्यासाठी एक तृतीयांश जमीन मुंबई महानगरपालिकेला, एक तृतीयांश जमीन गिरणी कामगारांना घरे बांधून देण्याकरिता व एक तृतियांश जमीन म्हाडाला आणि उर्वरित एक तृतीयांश जमीन गिरणी मालकांना व्यावसायिक वापर करण्यासाठी देऊ केली. त्या बंद पडलेल्या गिरण्याच्या जमिनीतील एक तृतीयांश जमिनीचा भाग गिरणी कामगारांना त्यावर घरे बांधण्यासाठी देण्याचे ठरविले होते. त्याची पूर्तता गिरणी मालकांकाडून करण्यात आली नाही. या उलट सन 2002 मध्ये त्या अटीमध्ये बदल करुन अपेक्षित असलेली जागा देण्याऐवजी त्या जागेवर व्यापारी संकुलाचे बांधकाम केले आणि करोडो रुपये कमाविले. अशाप्रकारे गिरणी कामगारांचा प्रश्न एका बाजूला तसाच पडलेला राहिला. त्यामधून गिरणी मालकांनी कोटयवधींची कमाई केली. परंतु आज एकाही गिरणी कामगाराला एक तृतीयांश जागेमधून घर मिळाले नाही. त्यामुळे आज हा गिरणी कामगार रस्त्यावर आला आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर...

मागील अधिवेशनामध्ये माननीय मुख्यमंत्र्यांनी घेतलेल्या बैठकीमध्ये मान्य केले. त्यानंतर गिरणी कामगाराच्या वारसाला सुध्दा घर देण्याचे माननीय मुख्यमंत्र्यांनी मान्य केले होते. ते मान्य करुन सुध्दा आज पाच ते सहा वर्षाचा काळ लोटल्यानंतर कोणतीही कारवाई झालेली नाही. मध्यंतरी गिरणी कामगारांचा प्रचंड मोर्चा मुंबईमध्ये निघाला होता. त्यावेळी माननीय मुख्यमंत्र्यांनी आश्वासित केले होते व म्हणाले होते की, तुमचा प्रश्न ताबडतोब निकालात काढू. परंतु अजूनपर्यन्ता तो प्रश्न निकालात निघाला नाही. हा प्रश्न दिवसें दिवस गंभीर रुप धारण करीत आहे. अडीच लाख गिरणी कामगारांचा हा महत्वाचा प्रश्न असल्यामुळे या सभागृहाचे कामकाज तत्काळ थांबवून या प्रश्नावर चर्चा घडवून आणावी अशी मी आपणास विनंती करतो. याकरिता नियम 289 अन्वये आम्ही दिलेल्या प्रस्तावाला आपण मान्यता द्याल अशी अपेक्षा व्यक्त करतो.

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, गिरणी कामगारांचा प्रश्न हा नुसता जिव्हाळयाचा नाही तर कामगारांमध्ये असहायता निर्माण करणारा झाला आहे. सभापती महोदय,आपणास माहीत आहे की, या सदनामध्ये आपण देखील या गिरणी कामगारांना न्याय दिला होता. माननीय मुख्यमंत्र्यांनी आम्हा विरोधी पक्षाच्या नेत्यांची एक बैठक घेऊन त्यामध्ये कामगारांना घरे देण्यासंदर्भात चर्चा झाली होती. त्या बैठकीला आदरणीय श्री. छगन भुजबळ साहेब सुध्दा उपस्थित होते. त्यावेळी माननीय मुख्यमंत्र्यांनी संबंधित खात्याला आदेश दिले होते की, ज्या गिरणी कामगारांना घरे देणे योग्य आहे त्याची नोंद करुन त्यांच्या वारसांची सुध्दा नोंद करावी. 1 लाख 10 हजार गिरणी कामगारांच्या घराचा प्रश्न असल्यामुळे त्या करिता कुठे जमीन उपलब्ध आहे याची आपण माहिती घेत आहोत असे माननीय मुख्यमंत्र्यांनी आश्वासन दिले होते. या सभागृहामध्ये माननीय मुख्यमंत्र्यांनी असे आश्वासन दिले होते की,ज्या गिरणी मालकांनी जमीन दिलेली नाही ती जमीन आम्ही सहा महिन्यात ताब्यात घेऊ. अन्यथा त्यांचे सर्व प्रकल्प तातडीने थांबविण्यात येतील.

हे सर्व होत असतांना या सरकारमधील सन्माननीय मंत्री श्री. नारायण राणे यांनी जाहिररीत्या दुसरा एक तोडगा सुचविला. ते म्हणाले की, तुम्ही घरे मागू नका, एवढे पैसे देतो ते घ्या आणि मोकळे व्हा. यामुळे गिरणी कामगारांमध्ये अत्यंत संतप्त प्रतिक्रिया निर्माण झाली आहे. आम्हाला घरे मिळणार आहेत की नाहीत अशाप्रकारची शंका त्यांच्या मनामध्ये निर्माण झाली आहे. एवढा सर्व लढा दिल्यानंतर एका बाजूला माननीय मुख्यमंत्री आश्वासित करीत आहे. आणि या सरकारमधील दुसरे एक मंत्री हे होणे शक्य नाही तेव्हा जे काही असेल ते घ्या आणि मोकळे व्हा असे सांगत आहेत. त्यामुळे संभ्रमित झालेल्या गिरणी कामगारांना सरकार नक्की काय करणार आहे हे सांगणे अत्यावश्यक असल्यामुळे सभागृहापुढील सर्व कामकाज थांबवून गिरणी कामगारांच्या या प्रश्नावर तातडीने चर्चा सुरु करावी. या ठिकाणी सव्वा लाख गिरणी कामगारांचा अत्यंत धगधगता प्रश्न आहे. सरकारकडून या बाबतीत निवेदने करण्यात येतात ती ऐकल्यानंतर गिरणी कामगारांमध्ये हवालदिलता निर्माण झालेली आहे. या सर्व परिस्थितीमुळे मुंबई अत्यंत स्फोटक वातावरणामध्ये असल्यामुळे हा अत्यंत तातडीचा विषय आहे. या बाबत सरकारची नेमकी काय भूमिका आहे हे आम्हाला समजणे आवश्यक असल्यामुळे ही चर्चा उपस्थित करण्यासाठी आपण मान्यता द्यावी अशी विनंती करतो. धन्यवाद.

------

22-12-2011 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) K 4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, या ठिकाणी नियम 289 अन्वये सभागृहापुढील कामकाज बाजूला ठेवून मुंबईतील गिरणी कामगारांच्या घराचा प्रश्न तातडीने सोडविण्यासाठी या सभागृहामध्ये चर्चा घडवून आणावी असा आम्ही हा प्रस्ताव दिलेला आहे. सभापती महोदय, आपणास कल्पना आहे की, सन 1982 सालापासून अडीच लाख गिरणी कामगार बेरोजगार झाले आहेत हे सर्व कामगार देशोधडीला लागले आहेत. मुंबईमधील मराठी माणूस पूर्णपणे उद्ध्वस्त करण्याचे पाप आपण करीत आहोत की काय अशी आपणा सर्वांच्या मनामध्ये शंका निर्माण होत आहे.

सभापती महोदय, संयुक्त महाराष्ट्र झाला त्यामध्ये गिरणी कामगारांचा सिंहाचा वाटा आहे. 105 हुतात्म्यांचा बळी देऊन ज्यांनी आम्हाला या सदनामध्ये बसविले आहे, त्याच गिरणी कामगारांवर आज आम्हाला घर द्या म्हणून भीक मागण्याची वेळ येते, आंदोलन करण्याची वेळ येते, रस्त्यावर येण्याची वेळ येते. म्हणून माझी आपणास विनंती आहे की, या सभागृहासमोरील सर्व कामकाज बाजूला ठेवून या प्रश्नावर चर्चा सुरु केली पाहिजे. मागील अधिवेशनामध्ये माननीय मुख्यमंत्र्यांनी आम्हाला आश्वासित केले होते. त्यावेळी दिलेल्या आश्वासनामुळे गिरणी कामगार आशेवर आहे की, आता अधिवेशन सुरु असल्यामुळे आम्हाला काहीतरी न्याय मिळेल, आमच्या घराच्या प्रश्नाबाबत काही तरी निर्णय होईल या आशेने सर्व जण वाट पहात आहेत. या सरकारला फक्त आंदोलनाचीच भाषा कळते काय? या ठिकाणी कापसासाठी आंदोलन केले जाते, ऊसासाठी आंदोलन केले जाते, इंदू मिलच्या जमिनीसाठी आंदोलन गिरणी कामगारांच्या घरांसाठी आंदोलन. तेव्हा आंदोलनाची वाट न पहाता या गिरणी कामगारांच्या घराच्या प्रश्नामध्ये प्राधान्याने लक्ष घालून उद्या हे अधिवेशन संपण्यापूर्वी ठोस असे आश्वासन दिले पाहिजे. सभापती महोदय, ही गिरण्यांची जागा शासनाची आहे.त्या जागेवर वस्त्रोद्योग महामंडळाने धंदा करण्यापेक्षा ज्या जागेवर गिरणी कामगारांनी आपला घाम गाळला आहे त्या जागेवर कामगारांना न्याय देण्याची भूमिका शासनाच्या माध्यमातून, वस्त्रोद्योग महामंडळाच्या माध्यमातून घेतली गेली पाहिजे. यासाठी आपण या चर्चेला वेळ द्यावा अशी मी आपणास विनंती करतो.

------

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर, सन्माननीय सदस्य सर्वश्री.दिवाकर रावते, रामदास कदम यांनी 289 अन्वये प्रस्ताव मांडलेला आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम साहेब म्हणाले ते खरे आहे की, संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीमध्ये हेच गिरणी कामगार सहभागी होते आणि मला नेहमी असे वाटते की,मुंबई वाचविण्यामध्ये आणि मुंबईची पुन्हा आर्थिक उभारणी करण्यामध्ये गिरणी कामगारांचा महत्वाचा भाग आहे.त्याअनुषंगाने मोर्चा निघाला आणि त्याबद्दल सदनामध्ये चर्चा झाली.मात्र या मधल्या काळामध्ये पुढे पुन्हा काही गोष्टी होत आहेत.जसे खटाव मिलच्या ठिकाणी प्रत्यक्ष माननीय मंत्री आणि कामगार नेते गेले होते. आता तेथील जागा ताब्यात आलेली आहे आणि अशा एकंदर 14 मिल आहेत. तेथील जागा लवकर ताब्यामध्ये आली पाहिजे कारण आज मिल कामगार विधीमंडळाच्या अधिवेशनाकडे आशेने पहात आहेत. कारण त्याला असे वाटते की, आपल्याला याठिकाणाहून काहीतरी निर्णय मिळू शकेल. त्यामुळे अधिवेशन संपण्यापूर्वी गिरणी कामगारांना न्याय मिळवून देणारा संदेश जाणे हे आवश्यक आहे. कारण एका मिलचा मालक जर हे करु शकतो आणि सरकारही त्याच्याकडून ते करुन घेऊ शकते तर मग बाकीच्या मिलच्या बाबतीत सुध्दा हे होऊ शकते असा प्रकार असल्यामुळे आज आपण या विषयाच्या बाबत चर्चा केली आणि त्याबाबत उत्तर देत असताना शासनाने त्याअनुषंगाने निर्णय घोषित केला तर सरकारने खऱ्या अर्थाने गिरणी कामगारांना न्याय दिल्यासारखे होईल.

**सभापती** : आजच्या कामकाज पत्रिकेवर या पध्दतीचा कोणताही विषय नाही. मात्र गिरणी कामगारांचा प्रश्न हा अत्यंत महत्वाचा असला . . . .

श्री.दिवाकर रावते (खाली बसून) : याला सन्माननीय सार्वजनिक बांधकाम मंत्री श्री.छगन भुजबळ साहेबांची मान्यता आहे काय ते विचारावे.

**सभापती** : याबाबतीत माझी सभागृहाचे नेते व माननीय उप मुख्यमंत्री यांच्याबरोबर चर्चा झालेली आहे. याबाबतीत सन्माननीय सार्वजनिक बांधकाम मंत्री श्री.छगन भुजबळ यांचे काय मत आहे ते त्यांनी सांगावे.

श्री.छगन भुजबळ : सभापती महोदय, आपला आदेश असेल त्याप्रमाणे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, याठिकाणी सन्माननीय गृह मंत्री श्री.आर.आर.पाटील सिनिअर आहेत की सन्माननीय सार्वजनिक बांधकाम मंत्री श्री.छगन भुजबळ सिनिअर आहेत ते पहा.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : तिकडे तशा प्रकारची भावना नाही. हा गिरणी कामगारांच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा आणि जिव्हाळ्याचा प्रश्न असला तरी याबाबतीत चर्चा करण्यासाठी आपल्याकडे आज आणि उद्या असे दोनच दिवस आहेत. या दोन दिवसामध्ये आपल्यासमोर अंतिम आठवडा प्रस्ताव आणि अन्य कामकाजही आहे. आज जरी हा प्रस्ताव कामकाज पत्रिकेमध्ये नसला तरी काही वेळेला आपण अपवाद करीत असतो. परंतु आज मला तशा प्रकारचा अपवाद करता येणार नाही. त्यामुळे मी हा प्रस्ताव नाकारीत आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, याठिकाणी अडीच लाख गिरणी कामगारांचा प्रश्न असल्याने, आपण त्यांना न्याय दिला पाहिजे अशी आमची आग्रहाची भूमिका आहे.

(काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात.)

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, मराठी माणूस उद्ध्वस्त होत आहे.

(काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात.)

**सभापती** : याबाबतीत मी माझा निर्णय दिलेला आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मागच्या अधिवेशनापासून या विषयाच्या बाबतीत निर्णय झालेला नाही. त्यामुळे याबाबतीत आजची सद्यस्थिती काय आहे याबाबत सरकारतर्फे माहिती दिली पाहिजे.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, याबाबतीत सरकारची भूमिका काय आहे? माननीय मुख्यमंत्र्यांनी जे आश्वासन दिले होते, त्याबाबतीत काय ?

श्री.छगन भुजबळ : सभापती महोदय, याबाबतीत आम्ही सांगितले की, आपण सांगाल त्या प्रमाणे होईल आणि जर विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांचे म्हणणे असेल तर याबाबतीत निवेदन सुध्दा करता येईल.

**सभापती** : या विषयाच्या बाबतीत शासनाची निवेदन करण्याची तयारी आहे.या अनुषंगाने....

(अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात.)

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, गिरणी कामगारांवर जो अन्याय होत आहे म्हणून आम्ही सभात्याग करीत आहोत.

(अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात.)

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, गिरणी कामगारांचा प्रश्न अत्यंत महत्वाचा आहे आणि त्याबाबत शासन काहीही करण्यास तयार नसेल तर आम्ही सभात्याग करतो.





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(यानंतर विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी सभात्याग केला.)

श्री.आर.आर.पाटील :सन्माननीय सार्वजनिक बांधकाम मंत्री श्री.छगन भुजबळसाहेबांनी असे सांगितले की, शासन या विषयाच्या बाबतीत निवेदन करील. जर विरोधी पक्षाला हा प्रश्न इतका महत्वाचा वाटत होता आणि त्यावर चर्चा करणे हे अत्यंत महत्वाचे आहे असे त्यांचे मत होते आणि तसेच त्यांची गिरणी कामगारांना न्याय देण्याची प्रामाणिक इच्छा होती तर मग त्यांना या विषयाच्या बाबतीत अंतिम आठवडा प्रस्ताव देऊन त्यावर चर्चा करता आली असती. पण त्यांनी तसे काही केलेले नाही.

श्री.जैनुद्दीन जव्हेरी : सभापती महोदय, प्रश्नोत्तराच्या तासाची वेळ 15 मिनिटे वाढवून देण्यात यावी.

**सभापती** : होय.

-----

. . . .एल-4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## राज्यात मॅग्नेशियम कार्बोनेटयुक्त गुटख्याची होत असलेली विक्री

**(1) *21589 श्री.पांडुरंग फुंडकर, श्री.जगदीश गुप्ता,श्री.धनंजय मुंडे : तारांकित प्रश्न क्रमांक 17892 ला दिनांक 9 ऑगस्ट, 2011 रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **अन्न व औषधी द्रव्ये प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्यात मॅग्नेशियम कार्बोनेटयुक्त गुटखा विक्रीस शासनाने बंदी घातलेली आहे हे खरे आहे काय,

(2) असल्यास, बाजारात उपलब्ध असलेल्या गुटख्यापैकी शासनाने तपासणी केलेल्या नमुन्यापैकी 99 टक्के नमूने मॅग्नेशियम कार्बोनेटयुक्त आढळून आले, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, याचाच अर्थ बाजारात उपलब्ध असलेला 99 टक्के गुटखा भेसळयुक्त आहे हे खरे आहे काय,

(4) असल्यास, भेसळयुक्त गुटख्यावर निर्बंध आणण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(5) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील, श्री.मनोहरराव नाईक यांच्याकरिता :** (1) हे खरे नाही. तथापि अन्न सुरक्षा व मानदे (अन्न पदार्थाची मानदे व ॲडिटिव्ह) नियम 2011 चे नियमन क्र.3.1.7 नुसार मॅग्नेशियम कार्बोनेटचा वापर गुटख्यात करण्यास प्रतिबंध करण्यात आलेला आहे.

(2) होय, हे खरे आहे.

अन्न व औषध प्रशासनाने एप्रिल, 2009 ते नोव्हेंबर, 2010 या कालावधीत एकूण 115 नमुने काढण्यात आले होते. त्यापैकी 114 नमुने अप्रमाणित दर्जाचे प्राप्त झाले असून 1 नमुना प्रमाणित दर्जाचा प्राप्त झाला आहे.

(3) हे खरे नाही.

तथापि, अन्न निरीक्षक/अन्न सुरक्षा अधिकारी यांनी विश्लेषणासाठी घेतलेल्या नमुन्यात बहुतांशी प्रकरणे मॅग्नेशियम कॉर्बोनेट आढळून आल्याने अप्रमाणित घोषित झालेले आहे.

(4) राज्य शासनाने सन 2002 मध्ये अन्न भेसळ प्रतिबंधक कायद्यांतर्गत 5 वर्षासाठी राज्यात गुटखा उत्पादन, वितरण, साठवणूकीस बंदी घातली होती. तथापि व्यावसायिकांनी उच्च न्यायालयात आव्हान दिले असता शासनाचा निर्णय मा.उच्च न्यायालयाने योग्य ठरविल्याने गुटखा व्यावसायिकांनी मा.सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली असता ऑगस्ट, 2004 मध्ये मा.सर्वोच्च राज्यशासनाचे गुटखा बंदी आदेश रद्द ठरविल्याने आजमितीस राज्यात गुटख्यावर बंदी नाही.

अन्न सुरक्षा मानदे कायद्याचे नियमन क्र.3.1.7 नुसार गुटखा या अन्नपदार्थामध्ये मॅग्नेशियम कार्बोनेट टाकण्यास प्रतिबंध करण्यात आलेला आहे. तथापि, इतर अन्न पदार्थ उदा. कांदा पावडर, लसूण पावडर, फ्रुट पावडर, सूप पावडर, व टेबल सॉल्ट यामध्ये मॅग्नेशियम कार्बोनेट काही मात्रामध्ये वापरास परवानगी देण्यात आली आहे.

खबरदारीचा उपाय म्हणून राज्यात 2009-10 व 2010 ते एप्रिल, 2011 या कालावधीत एकूण 183 नमुने घेतले असून रुपये 6,86,31,179/- एवढ्या किंमतीचा साठा जप्त करण्यात आला आहे. तसेच महाराष्ट्र राज्यातील विविध न्यायालयात आजमितीस सुमारे 400 खटले दाखल





करण्यात आले आहेत.

गुटखा व्यावसायिकांनी अन्न व औषध प्रशासनाने केलेल्या कारवाईस वेळोवेळी याचिका दाखल करुन कारवाईस विरोध दर्शविला आहे. तसेच आजमितीस मा.सर्वोच्च न्यायालयात 2 तर राज्यातील

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उच्च न्यायालयात अनेक याचिका प्रलंबित असून त्यांचे आदेशाचे अधीन राहून कारवाई करण्यात येत.
(5) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, पहिला प्रश्न असा आहे की,"राज्यात मॅग्नेशिअम कार्बोनेटयुक्त गुटखा विक्रीस शासनाने बंदी घातलेली आहे हे खरे आहे काय? याबाबतीत माननीय मंत्री महोदयांनी लेखी उत्तरामध्ये असे म्हटलेले आहे की,"हे खरे नाही."नंतर पुढे असे म्हटलेले आहे की,"तथापि अन्न सुरक्षा व मानदे (अन्न पदार्थाची मानदे व ॲडिटिव्ह) नियम 2011 चे नियमन क्र.3.1.7 नुसार मॅग्नेशिअम कार्बोनेटचा वापर गुटख्यात करण्यास प्रतिबंध करण्यात आलेला आहे." पहिल्यांदा याठिकाणी "हे खरे नाही" असे म्हटले आणि नंतर तथापि असे म्हणून "हे खरे आहे" असे म्हटले आहे. त्यामुळे माननीय मंत्री महोदयांना या उत्तरामध्ये काही सुधारणा करावयाची आहे काय ? कारण "मॅग्नेशिअम कार्बोनेटयुक्त गुटखा विक्रीस बंदी आणि मॅग्नेशिअम कार्बोनेटचा वापर गुटख्यामध्ये करण्यास प्रतिबंध" यामध्ये कोणता फरक आहे? याचा अर्थ काय आहे हे आपण पहिल्यांदा सभागृहाला सांगितले पाहिजे.मी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना शासनाने 99 टक्के गुटखा हा मॅग्नेशिअम कार्बोनेटयुक्त असल्याचे आढळून आले असून, ते खरे आहे असे म्हटलेले आहे.परंतु नंतरच्या प्रश्नाला उत्तर देताना 99 टक्के गुटखा भेसळयुक्त नाही असे म्हटलेले आहे.त्यामुळे या प्रश्नाच्या उत्तरामध्ये असा विरोधाभास आहे की,त्यामुळे काही लक्षात येत नाही.यामधून माननीय मंत्री महोदयांना काय म्हणावयाचे आहे हे स्पष्ट होत नाही.

सभापती महोदय,सदनामध्ये हा प्रश्न चार-पाच वेळा आला आहे आणि आपण याचे साक्षीदार आहात. याबाबत सर्वोच्च न्यायालयाने जो निर्णय दिलेला आहे, त्याची प्रत देखील माझ्याजवळ आहे. याबाबतीत सर्वोच्च न्यायालयाने असा निर्णय दिला आहे की, ज्या गुटख्यामध्ये मॅग्नेशिअम कॉर्बोनेट नाही, अशा गुटख्यावर राज्य शासनाला बंदी आणता येणार नाही. परंतु सभापती महोदय, याठिकाणी पहिल्या प्रश्नाच्या उत्तरामध्ये असे म्हटलेले आहे की, "तथापि अन्न सुरक्षा व मानद (अन्न पदार्थाची मानदे व ॲडिटीव्ह) नियम 2011 चे नियमन क्र.3.1.7 नुसार मॅग्नेशिअम कार्बोनेटचा वापर गुटख्यात करण्यास प्रतिबंध करण्यात आलेला आहे."हे सुप्रीम कोर्टाने





मान्य केले आहे.असे असताना मुंबईमधून जवळपास 115 नमुने घेण्यात आले आणि त्यातील 114 नमुन्यांमध्ये भेसळ आढळून आली आहे.असे असताना मुंबईमध्ये रोज 25 कोटी रुपयांचा गुटखा

विकला जातो आणि त्यासंदर्भात संबंधितांवर कोणत्याही केसेस होत नाहीत. मघाशी माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, आम्ही संबंधितांना 6 कोटी रुपयापर्यंत दंड केलेला आहे. गेल्या दोन-अडीच वर्षामध्ये 7500 . . . .

**सभापती** : माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी आपला प्रश्न विचारावा.

श्री.पांडुरंग फुंडकर  सभापती महोदय, मघाशी सांगितल्याप्रमाणे 7500 कोटी रुपयांचा गुटखा विकला गेला आणि फक्त 6 कोटी रुपयांचा गुटखा पकडण्यात आला. तेव्हा यामागे कोण आहे? तसेच माननीय मंत्री महोदयांना जे अधिकारी उत्तरे लिहून देतात, तीच उत्तरे माननीय मंत्री महोदय येथे सांगतात. परंतु या सर्व गुटखा मालकांना संरक्षण देणारे अधिकारी कोण आहेत आणि अशा प्रकारे मुंबईमध्ये 25 कोटी रुपयांचा आणि संपूर्ण महाराष्ट्रामध्ये 100 कोटी रुपयांचा रोज गुटखा विकला जात असेल आणि तो भेसळयुक्त असेल तर त्यासंबंधात कडक प्रतिबंध करण्यासाठी शासन काय करणार आहे हे सभागृहाला सांगण्यात यावे अशी मी आपल्या माध्यमातून शासनाला विनंती करतो.

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी हा प्रश्न बऱ्याच वेळेला सदनामध्ये मांडलेला आहे.त्यावेळी याबाबतीत आपण वेळोवेळी जी काही कारवाई केलेली आहे, त्याबाबत माहिती दिलेली आहे.मॅग्नेशिअम कॉर्बोनेटवर बंदी घातलेली आहे यासंबंधातील प्रश्न उपस्थित केलेला आहे.याबाबत सांगावयाचे तर एखाद्या पदार्थामध्ये किंवा वस्तूमध्ये मॅग्नेशिअम कॉर्बोनेट घालण्यास प्रतिबंध आहे. त्यामुळे यावर बंदी घालण्याचा विषय येत नाही. कारण मूळातच मॅग्नेशिअम कॉर्बोनेटचा वापर करु नये असा नियम आहे. तसेच सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकरसाहेबांनी 99 टक्के गुटखा भेसळयुक्त आहे असा उल्लेख केला आहे. एप्रिल 2009 मध्ये आणि 2010 मध्ये जवळजवळ 115 नमुने तपासणीसाठी घेण्यात आले आहेत.

यानंतर कु.थोरात . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र.क्र.21589. . .

श्री. सतेज ऊर्फ बंटी डी. पाटील. . .

त्यातील 114 नमुने अप्राणित आले ती टक्केवारी 99 टक्के आहे असे उत्तरात म्हटले आहे. पुढच्या प्रश्नामध्ये बाजारात उपलब्ध असलेला 99 टक्के गुटखा भेसळयुक्त आहे का असे विचारले आहे त्या संबंधीचे उत्तर देत असताना 'हे खरे नाही' असे म्हटले आहे. गुटख्याच्या बंदीच्या बाबतीत महाराष्ट्र शासनाची भूमिका सातत्याने पॉझिटिव्ह राहिलेली आहे. या देशामध्ये कोणीही निर्णय घेतला नव्हता तो निर्णय या राज्याने घेतला आणि गुटख्याची निर्मिती किंवा विक्री यावर बंदी घालण्यात आली. पण त्या बाबतीत सुप्रीम कोर्टाने स्टे दिला याची सर्व सन्माननीय सदस्यांना कल्पना आहे. मधल्या काळात पीएफए ॲक्ट होता आणि 'कोप्टा' ( Copta ) हा कायदा टोबॅको प्रॉडक्टसाठी लागू होता. या पीएफए ॲक्टखाली भेसळ या नावाखाली या सर्व कारवाया करण्यात येत होत्या. परंतु या कारवायांच्या विरोधात हायकोर्टात काही तक्रारी करण्यात आल्या होत्या. परवाच दिनांक 7 डिसेंबर रोजी या संबधीचा निर्णय लागलेला आहे. सन 2006 ला नव्याने झालेल्या पीएफए ॲक्ट कायद्याच्या नमुने तपासण्याच्या कारवाया करता येतात. यापूर्वी नमुने तापासण्यात येत होते पण त्यावर हायकोर्टाने काही प्रमाणात बंदी आणली होती. दिनांक 7 डिसेंबर रोजी दोन याचिकांवरील हायकोर्टाच्या निर्णयामुळे आता नमुने तपासण्याची आणि त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्याची परवानगी मिळालेली आहे.

प्रा. सुरेश नवले : सभापती महोदय, गुटख्यावर बंदी घालण्याचा प्रश्न येत नाही पण गुटखा खाणारे व्यसनी हे सर्वसाधारणपणे गुटखा खातात आणि कुठेही पिचकारी मारतात. गुटखा खाऊन अशी जी पिचकारी मारण्यात येते त्यावर राज्य शासन बंधन घालणार आहे काय?

श्री. सतेज ऊर्फ बंटी डी. पाटील : सभापती महोदय, सार्वजनिक ठिकाणी या सगळया गोष्टी करु नयेत याबाबतीत निश्चितपणे कायदा आहे. तंबाखूजन्य पदार्थाच्या विरोधात मोहीम उघडणारे महाराष्ट्र राज्य हे पहिले राज्य आहे हे मी या ठिकाणी अभिमानाने सांगू इच्छितो. शैक्षणिक संस्थांच्या भोवती 100 मीटर अंतरापर्यंत तंबाखूजन्य पदार्थ विकले जाऊ नयेत या पध्दतीचा कायदा केंद्र शासनाने केला आणि ऑगस्ट मध्ये त्या कायद्यामध्ये काही बदल करुन मुख्याध्यापकापासून एखाद्या संस्थेमध्ये असणारे ॲडमिनिस्ट्रटिव्ह ऑफिसर या सर्वांना कायदेशीर कारवाई करण्याचे अधिकार केंद्र शासनाने नुकतेच दिलेले आहेत. त्या संदर्भात नव्याने तंत्र शिक्षण

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र.क्र.21589. . .

श्री. सतेज ऊर्फ बंटी डी. पाटील. . .

विभाग असेल किंवा इतर सर्व विभागांना एकत्रित करुन ही मोहीम या राज्यामध्ये राबविण्याचा शासनाने प्रयत्न केलेला आहे. दिनांक 26 जानेवारीपर्यंत या राज्यातील शैक्षणिक संस्थांचा परिसर हा तंबाखूमुक्त करण्याचे अभियान अन्न व औषध प्रशासन विभागाच्या माध्यमातून घेण्यात आलेले आहे. गुटखा असेल, तंबाखूजन्य पदार्थ असतील या पासून भावी पिढी वाचली पाहिजे त्यासाठी जे-जे करता येईल ते करण्याचा प्रयत्न शासनाचा आहे.

श्री. संजय केळकर : सभापती महोदय, उत्तरामध्ये असे म्हटले आहे की,"अन्न सुरक्षा व मानदे नियम 2011 चे नियमन क्र.3.1.7 नुसार गुटखा या अन्नपदार्थामध्ये मॅग्नेशियम कार्बोनेट टाकण्यास प्रतिबंध करण्यात आलेला आहे. तथापि, इतर अन्न पदार्थ उदा. कांदा पावडर, लसूण पावडर, फ्रुट पावडर, सूप पावडर व टेबल सॉल्ट यामध्ये मॅग्नेशियम कार्बोनेट काही मात्रामध्ये वापरास परवानगी देण्यात आली आहे." सभापती महोदय, "काही मात्रामध्ये" परवानगी देण्यात आलेली आहे याचा अर्थ काय?एका बाजूला असे सांगण्यात येते की, बंदी आहे आणि दुसऱ्या बाजूला सांगण्यात येते की, "काही मात्रामध्ये" परवानगी आहे. ती किती मात्राची परवानगी आहे याचा काही उल्लेख करण्यात आलेला नाही. म्हणून मॅग्नेशियम कॉर्बोनेट चालणार आहे की चालणार नाही यासंबंधीचा खुलासा करण्यात यावा.

सभापती महोदय, माझा दुसरा प्रश्न असा आहे की, या ठिकाणी शाळा आणि कॉलेजेसच्या परिसरात 100 मीटरचा उल्लेख केलेला आहे तसेच कारवाई करण्यास मुख्याध्यापकांना परवानगी देण्यात आलेली आहे. परंतु या राज्यामध्ये आजही राजरोसपणे मोठया प्रमाणात शाळेच्या कम्पाऊण्डच्या बाहेर गुटख्याची विक्री चालू आहे. त्यावर कठोर उपाययोजना करण्याची गरज आहे त्या संदर्भात शासन काय करणार आहे?

श्री. सतेज ऊर्फ बंटी डी. पाटील : सभापती महोदय, मॅग्नेशियम कॉर्बोनेट हे कशामध्ये घातल्यानंतर त्याचे दुष्परिणाम होतात याचे निकष ठरलेले आहेत म्हणून काही प्रमाणात याची मात्रा इतर पदार्थामध्ये वापरण्यास फुड ॲक्टमध्येच परवानगी दिलेली आहे. म्हणून तसा उल्लेख केलेला आहे. गुटख्यामध्ये मॅग्नेशियम कॉर्बोनेट याचा वापर करण्यास प्रतिबंध आहे कारण याची केमिकल रिॲक्शन वेगळया पध्दतीने होते. प्रत्येक वस्तुच्या रिॲक्शन्स वेगळया असतात. सन्माननीय

..3..

सदस्यांनी शैक्षणिक संस्थांच्या बाबतीत सांगितलेले आहे. त्या संदर्भात मोठया प्रमाणात मोहीम राबविण्यात आली आहे. त्यापेक्षा पुढे जाऊन शासनाने येणाऱ्या जिल्हा परिषदांच्या आणि पंचायत समित्यांच्या निवडणुकीमध्ये गुटखा, सिगारेट, तंबाखू खाणाऱ्यांना तिकीट देण्यात येणार नाही, एवढा पुरोगामी निर्णय घेण्याचा शासन प्रयत्न करीत आहे. तंबाखूजन्य पदार्थांच्या विरुध्द एक शपथ या सदनातील सर्व आमदार महोदयांना मी सर्क्युलेट करणार आहे. लोकप्रतिनिधी म्हणून आपला आदर्श समाजासमोर ठेवण्याचा प्रयत्न तुम्ही आणि आम्ही सर्वांनी मिळून भविष्यकाळात करु या. कायद्याची अंमलबजावणी कडक करण्याचा प्रयत्न निश्चितपणे आहे.

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय, गुटख्याचे अनधिकृतरित्या उत्पादन करणाऱ्या बऱ्याचशा फॅक्टरीज जालना जिल्हयामध्ये आहेत, याची माहिती शासनाकडे आहे का, शासनाकडे माहीत असो किंवा नसो या फॅक्टरीजकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात येणार आहे का?

श्री. सतेज ऊर्फ बंटी डी. पाटील : सभापती महोदय, या पूर्वी देखील या सदनामध्ये या बाबत चर्चा झालेली आहे. जालन्यामध्ये फक्त एकच फॅक्टरी अधिकृतपणे चालू आहे. परंतु अनधिकृतरित्या काही फॅक्टरीज चालविण्यात येत असतील तर त्याबाबतीत सन्माननीय सदस्यांनी माहिती दिली तर निश्चितपणे त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल.

श्री. चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, गुटख्यावर सन 2002 साली बंदी घालण्यात आली ही अभिनंदनीय बाब आहे हे मला मान्य आहे परंतु सुप्रीम कोर्टात हा निर्णय का टिकला नाही. सुप्रीम कोर्टात जी पळवाट सापडलेली आहे ती लक्षात घेऊन गुटख्यावर पूर्णपणे बंदी घालण्याच्या दृष्टीने कायद्यामध्ये काही परिवर्तन करण्यात येणार आहे का?

श्री. सतेज ऊर्ज बंटी डी. पाटील : सभापती महोदय, सुप्रीम कोर्टाने ज्या कारणामुळे स्टे दिलेला आहे त्या बाबतीत राज्य शासनाकडून काही माहिती मागविण्यात आली होती ती माहिती घेऊन निश्चितपणे ही बंदी कायम रहावी यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहेत.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, निवडणुकीच्या काळात अशा प्रकारचा निर्णय घेण्यात येणार आहे असे माननीय मंत्री महोदयांनी सांगितले आहे. सार्वजनिक ठिकाणी ज्या प्रमाणे

..4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सिगारेट ओढण्यावर बंदी आहे त्याप्रमाणे गुटखा खाण्यावर बंदी आहे का, नसेल तर तश्ी बंदी घालण्यात येणार आहे का? अन्न व औषध प्रशासन विभागात अन्न निरीक्षकांची पदे मोठया प्रमाणात रिक्त आहेत त्यामुळे सर्व्हिलन्सला खूप अडचणी येतात तेव्हा ती पदे तत्काळ भरण्यात येतील काय?

श्री. सतेज ऊर्फ बंटी डी. पाटील : केंद्र शासनाचा 'कोप्टा' (Copta) कायदा आहे त्यामध्ये सिगारेट आणि या संदर्भातील उल्लेख आहे पण गुटख्याचा उल्लेख नाही तो आणण्यासाठी शासन पुढाकार घेईल. अन्न निरीक्षकांच्या बाबतीत परवाच औरंगाबाद हायकोर्टाचा निकला लागलेला आहे त्यामुळे यापूर्वी जी भरती प्रक्रिया झाली होती ती पदे भरण्यासाठी हायकोर्टाने मुभा दिलेली आहे.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, माझ्या स्मरणाप्रमाणे गेल्या दोन वर्षात जवळ जवळ पंधरा ते वीस वेळा गुटख्याचा प्रश्न सभागृहात चर्चिला गेला आहे. ज्यांच्यावर या संदर्भातील केसेस होतात त्या बाबतीत सन्माननीय गृह राज्यमंत्र्यांनी वेळोवेळी उत्तर दिलेले आहे आता ते अन्न व औषध प्रशासन विभागाचे माननीय राज्यमंत्री म्हणून उत्तर देत आहेत. गुटख्याच्या संदर्भात ज्यांच्यावर केसेस होतात त्या कसेसचे निकाल लागून त्यांना शिक्ष होते का? माननीय राज्यमंत्र्यांकडे गृह विभाग असल्यामुळे एक हात उजवा आणि एक हात डावा अशी परिस्थिती आहे त्यामुळे या दोन्ही विभागात को-ऑर्डिनेशन असणे अपेक्षित आहे. पुण्यामध्ये श्री. महेश झगडेंसारखे कार्यक्षम अधिकारी आलेले आहेत, त्यांनी चांगले काम केलेले आहे म्हणून माझी विनंती आहे की, यामध्ये जे गुन्हेगार सापडलेले आहेत ती प्रकरणे द्रुतगती न्यायालयात नेऊन, त्याला चालना देऊन, चांगला वकील नेमून काही लोकांना शिक्षा झाली तर त्यावर बंधन येईल तेव्हा अशा प्रकारची कार्यवाही करण्यात येईल का?

श्री. सतेज ऊर्फ बंटी डी. पाटील : सभापती महोदय, जवळ जवळ 12 खटल्यांमध्ये शिक्षा झालेली आहे. कनव्हिक्शन रेटच्या बाबतीत दोन्ही सभागृहात अनेक वेळा चर्चा झालेली आहे. गृह विभागाने देखील अशा ज्या केसेस होतात त्यांचे निकाल लवकरात लवकर लावण्यासाठी समिति नेमली असून त्या समितीचा अहवाल शासनाला प्राप्त झालेला आहे. त्या संदर्भात शासन निश्चितपणे कारवाई करीत आहे. कनव्हिक्शन रेट वाढविण्याचा प्रयत्न निश्चितपणे आहे.

..5..

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मी या ठिकाणी असा प्रश्न उपस्थित केला होता की, सन 2002 मध्ये राज्य सरकारने गुटख्यावर बंदी आणली.

यानंतर श्री. बरवड....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 21589 .... श्री. पांडुरंग फुंडकर ...

महाराष्ट्र हे पुरोगामी राज्य आहे. या पुरोगामी राज्यामध्ये त्यावेळी गुटख्यावर बंदी आणण्याचा एक चांगला निर्णय घेतला होता आणि त्या निर्णयाबद्दल आम्ही शासनाचे अभिनंदनही केले होते. परंतु नंतर गुटखा उत्पादक कोर्टात गेले. हायकोर्टाने त्यांच्या विरोधात आणि राज्य सरकारच्या बाजूने निर्णय दिला. त्यानंतर ते सुप्रीम कोर्टात गेले. सुप्रीम कोर्टाने जो निर्णय दिला त्यामध्ये असे स्पष्ट म्हटले आहे की, ज्या गुटख्यामध्ये मॅग्नेशियम कार्बोनेट नाही अशा गुटख्यावर राज्य सरकारला बंदी आणता येणार नाही. पण ज्या गुटख्यामध्ये मॅग्नेशियम कार्बोनेट आहे त्या संदर्भात कायद्यामध्ये अशी तरतूद आहे की, अशी भेसळ करुन गुटखा विकता येणार नाही. सभापती महोदय, ज्यावेळी गुटखा बनविला जातो त्यावेळी त्यामध्ये मॅग्नेशियम कार्बोनेट टाकल्याशिवाय गुटखा तयारच होऊ शकत नाही. गुटख्याचा जो उत्पादक त्यामध्ये मॅग्नेशियम कार्बोनेटची भेसळ करतो, ज्यामुळे कॅन्सर सारखा दुर्धर रोग होतो, अशा मॅग्नेशियम कार्बोनेट टाकणाऱ्या उत्पादकावर छापे घालून, त्यांच्या कारखान्यावर छापे घालून ताबडतोब त्यांच्यावर कारवाई करणे आवश्यक होते परंतु त्यामध्ये असे झाले की, जे गुटखा विक्री करतात किंवा गुटख्याची वाहतूक करतात त्यांच्यावर या केसेस दाखल केलेल्या आहेत. कोणत्याही उत्पादकाला त्यामध्ये दोषी धरण्यात आलेले नाही. माझा असा प्रश्न आहे की, राज्य सरकार कॅन्सर सारख्या दुर्धर रोगापासून भावी पिढीला वाचविण्यासाठी जे गुटखा उत्पादक मॅग्नेशियम कार्बोनेट घालून गुटख्याचे उत्पादन करतात अशा उत्पादकांच्या कारखान्यांवर छापे घालून आणि त्यांच्यावर ताबडतोब कारवाई करुन मॅग्नेशियम कार्बोनेटयुक्त गुटख्याचे उत्पादन बंद करणार आहे का ?

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील : सभापती महोदय, या निर्णयाच्या संदर्भात सुप्रीम कोर्टामध्ये अपील झाले त्यावेळी राज्य शासनाचा अधिकार नाही म्हणून या निर्णयाला स्थगिती मिळाली. छाप्याच्या संदर्भात माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी या ठिकाणी सांगितले. गुटख्याचे जे उत्पादन होते त्यामध्ये आपल्या राज्यात एक-दोन ठिकाणे सोडली तर प्रामुख्याने गुजरात आणि कर्नाटक या दोन राज्यामध्ये गुटख्याचे उत्पादन होते. आपल्या राज्यामध्ये जालना येथे संकेत प्रॉडक्शन या एकाच ठिकाणी उत्पादन होते. ते एक ठिकाण सोडले तर प्रामुख्याने हे उत्पादन

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 21589.... श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील..

गुजरात आणि कर्नाटक राज्यामधून येते. ते प्रॉडक्ट आपल्याकडे आल्यानंतर सॅम्पल घेण्याशिवाय दुसरा पर्याय या ठिकाणी राहात नाही. सॅम्पल घेतल्यानंतर आपण त्या संदर्भात कारवाई करतो. परंतु माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर साहेबांनी या ठिकाणी सांगितल्याप्रमाणे गुजरात सरकारला आणि कर्नाटक सरकारला आपणही विनंती केलेली आहे. सुप्रीम कोर्टाच्या निर्णयाच्या अधीन राहून त्यांनी त्या ठिकाणी कारवाई करावी या पध्दतीची विनंती निश्चितपणे दोन्ही सरकारला केली जाईल.

---

**सभापती** : यानंतर प्रश्न क्रमांक 22628 घेण्यात येईल. श्रीमती अलका देसाई ...

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, माझा तिसरा प्रश्न आहे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

...3...

RDB/

**सिंधुदुर्ग जिल्ह्यातील दोडामार्ग कळणे, बांदा, मळगांव, मार्गे रेडी येथे मोठ्या प्रमाणात खनिज वाहतुकीमुळे रस्ते पूर्णत: नादुरुस्त झाल्याबाबत**

**(2) * 22787 श्री.परशुराम उपरकर : तारांकित प्रश्न क्रमांक 16394 ला दि.18 एप्रिल, 2011 रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) सिंधुदुर्ग जिल्ह्यातील दोडामार्ग कळणे, बांदा, मळगांव, मार्गे रेडी येथे मोठ्या प्रमाणात खनिज वाहतुकीमुळे रस्ते पूर्णत: नादुरुस्त होऊन खड्डेमय झाले आहे हे खरे आहे काय,

(2) तसेच खनिज वाहतुकीचे डंपरमुळे या रस्त्यावर सुमारे 10 ते 15 अपघात होऊन नागरीक मृत झाले हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, मा.मंत्री सार्वजनिक बांधकाम यांनी दिलेल्या आश्वासनानुसार गावाबाहेरुन वळणमार्ग तयार करण्याचे दृष्टीने मळेवाड, आरोंदा, निरवडे व दोडामार्ग या रस्त्यासाठी पर्यायी जागा उपलब्ध झाली आहे काय,

(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रणजित कांबळे, श्री. छगन भुजबळ यांच्याकरिता** : (1) प्रश्नांकित रस्त्यावरून होणाऱ्या जड वाहतुकीमुळे डांबरी पृष्ठभागावर पडलेले खड्डे डांबर मिश्रीत खडीने भरून रस्ते वाहतुकीस सुस्थितीत ठेवण्यात आले आहेत.

(2) हे खरे नाही. प्रश्नांकित रस्त्यावरील वेंगुर्ला व दोडामार्ग पोलीस स्टेशनच्या हद्दीत ऑक्टोबर, 2010 ते ऑक्टोबर, 2011 या कालावधीत खनिज वाहतुकीच्या डंपर अपघातात कोणीही मृत झ ाल्याची नोंद नाही. सांवतवाडी पोलीस स्टेशनच्या हद्दीत जानेवारी, 2010 ते ऑक्टोबर, 2011 या कालावधीत 4 अपघात झाले आहेत.

(3) खनिज वाहतुकीसाठी गावाबाहेरून वळण रस्ता काढण्यासाठी अद्याप जागा उपलब्ध झालेली नाही. पर्यायी जागा उपलब्ध होताच निधी, निकषच्या अधीन राहून काम हाती घेण्यात येईल.

(4) प्रश्नांकित वळण रस्त्यासाठी खात्यामार्फत सर्वेक्षण करून जागा संपादनासाठी विहित मार्गाने प्रस्ताव राबविण्यात येत आहे.

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय, उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, अशा प्रकारे मृत्यू झाल्याची एकही नोंद नाही. 4.12.2011 रोजी आरोंदा येथे दिनेश नाईक या युवकाचा डंपरखाली चिरडून मृत्यू झाला हे खरे आहे का ? अशा प्रकारचे किती मूत्यू होण्याची वाट शासन बघत आहे ? त्या ठिकाणी या डंपरच्या वाहतुकीमुळे रस्ते नादुरुस्त झालेले आहेत. आपण डांबराने खड्डे भरल्याचे मान्य केले आहे. हे रस्ते नादुरुस्त होऊ नये म्हणून त्या रस्त्यांची स्ट्रेंग्थ आपण चांगली करणार आहात का ? पत्रादेवी ते झाराप हा रस्ता पूर्ण झालेला नसताना त्या रस्त्यावरुन जी वाहतूक होते ती वाहतूक...

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

ता. प्र. क्र. 22787 .....

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर यांना सांगू इच्छितो की, आपल्याला प्रश्न विचारावयाचा असेल तर विचारावा. आपल्याला जर वर्णन करावयाचे असेल तर ते बरोबर होणार नाही.

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय, मी प्रश्न विचारतो. त्या ठिकाणी जी वाहतूक होते ती थांबविण्याकरिता आपण आणि पोलीस विभाग प्रयत्न करणार का ? या मायनिंगच्या वाहतुकीकरिता पर्यायी रस्ते काढण्याचे आश्वासन माननीय मंत्री महोदयांनी दोन वर्षापूर्वी सभागृहात दिले होते ते पर्यायी रस्ते शासन तातडीने करणार का ?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, हे खरे आहे की, त्या रस्त्यावर मागच्या दोन वर्षामध्ये 4 अपघात झाले. ज्या कळणे येथे मॅग्नेशियम माईन आहे तिथपासून रेडी बंदरापर्यंत डंपरच्या माध्यमातून सगळे ट्रक्स चालतात. त्या ठिकाणी फार मोठ्या प्रमाणावर हेवी ट्राफीक आहे हे आपल्यालाही माहीत आहे आणि ही बाब सत्य आहे. मी निश्चितपणे एक गोष्ट सांगू इच्छितो की, मागच्या दोन वर्षापासून सतत त्यांचा दुरुस्तीचा कार्यक्रम चालू आहे. या वर्षी 3 नोव्हेंबरपासून 30 नोव्हेंबरपर्यंत जेवढे खड्डे होते आणि ज्या ज्या ठिकाणी टार कोट आणि सिल कोट प्रस्तावित होते ते भरण्याचे काम मोठ्या प्रमाणावर झाले. माझ्याकडे फोटोग्राफ्स आहेत. मी आपल्याला दाखवू शकतो. पाहिजे तर पटलावर ठेऊ शकतो. आता त्या रस्त्याची अतिशय चांगल्या पध्दतीने दुरुस्ती झालेली आहे. त्या ठिकाणी सध्याच्या परिस्थितीमध्ये खड्डे नाहीत. सन्माननीय सदस्यांनी त्यांचा तिसरा प्रश्न परत विचारावा.

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय, झाराप-पत्रादेवी रस्ता अजून बांधून पूर्ण झालेला नसताना त्या रस्त्यावरुन जी वाहतूक होते त्यामुळे धुळीचे साम्राज्य निर्माण झालेले आहे आणि अपघात होण्याची शक्यता आहे. आपण आणि पोलीस विभाग ही वाहतूक बंद करणार का ? परवा झाराप-पत्रादेवी रस्त्याच्या बाबतीत माननीय मंत्री महोदयांनी उत्तर दिले. तो रस्ता अजून पूर्ण झालेला नाही. त्या रस्त्यावरुन मोठ्या प्रमाणावर डंपरची वाहतूक होत आहे. हजारो डंपर त्या रस्त्यावरुन जात आहेत. म्हणून त्या रस्त्यावरची वाहतूक थांबविण्याकरिता आपल्या विभागाने

...5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 22787 ..... श्री. परशुराम उपरकर ....

पोलीस विभागाला पत्र दिलेले आहे. तो रस्ता पूर्ण करण्याचे आश्वासन माननीय मंत्री महोदयांनी दिले पण आपण पोलीस विभागाच्या मदतीने ती वाहतूक थांबविणार का ?

श्री. छगन भुजबळ : सभापती महोदय, झाराप-पत्रादेवी रस्त्याच्या संदर्भात परवा मी सांगितले होते की, हा रस्ता चौपदरी करण्याचे काम केंद्र शासनाच्या माध्यमातून सुरु आहे. कंत्राटदाराने जे वाढीव काम केले त्याला केंद्र शासनाने मान्यता दिलेली नव्हती म्हणून ते काम थांबले होते. त्यानंतर मुंबईमध्ये जी बैठक झाली त्यामध्ये माननीय मुख्यमंत्री आणि आम्ही माननीय केंद्रीय मंत्र्यांना सांगितल्यानंतर त्याची तपासणी होऊन परत त्याला मान्यता मिळत आहे आणि त्यामुळे ते काम होत आहे. झाराप-पत्रादेवी रस्ता हा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 17 आहे. हे काम सुरु होत आहे. यामध्ये प्रश्न असा आहे की, हा जो मार्ग आहे तो साधारणपणे बांदा, सातर्डा, तेरेखोल, टाटा कॉलनी, कन्हाळ आणि रेडीबंदर असा आहे. मघाशी राज्यमंत्र्यांनी सांगितल्याप्रमाणे रस्ता पूर्णपणे दुरुस्त आहे. तो रस्ता काही ठिकाणी डबल आहे, काही ठिकाणी सिंगल आहे. परंतु काही महत्वाच्या ठिकाणी बायपास काढावा अशा प्रकारची मागणी होती. त्या बायपासच्या संदर्भामध्ये सुध्दा जिल्हाधिकाऱ्यांनी दोन वेळा बैठका घेतल्या. सरपंचांना देखील कळविण्यात आले की, तुम्ही आम्हाला जमीन उपलब्ध करुन द्यावी, आम्ही बायपास रस्ते करतो.

मघाशी माननीय राज्यमंत्र्यांनी सांगितल्याप्रमाणे हा रस्ता चांगला आहे परंतु त्याच वेळेला त्या ठिकाणी खाणीच्या खनिजाची वाहतूक फार मोठ्या प्रमाणावर आहे. त्या ठिकाणी गेल्या चार वर्षामध्ये काही अपघात होऊन काही लोक दगावले. सुदैवाने या वर्षी तसे काही झालेले नाही. तरी सुध्दा हा अतिशय अपघातप्रवण असा भाग निर्माण झालेला आहे. पोलिसांबरोबर संपर्क साधून या बाबतीत आणखी कोणत्या पध्दतीने नियोजन करता येईल त्यासाठी निश्चितपणे प्रयत्न करण्यात येईल. रस्ता चांगला आहे परंतु त्या ठिकाणी डंपरची वाहतूक मोठ्या प्रमाणावर आहे, या गोष्टी मला या ठिकाणी नमूद करावयाच्या आहेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

ता. प्र. क्र. 22787 .....

श्री. विजय सावंत : सभापती महोदय, दोडामार्ग-कळणे-बांदा-मळगाव हा रस्ता तेथे जेवढी वाहतूक आहे त्या पध्दतीचा केला पाहिजे. हा रस्ता व्हिलेज रोडसारखा केलेला असल्यामुळे तो रस्ता दुरुस्त केल्यानंतर परत दोन चार महिन्यात खराब होतो. त्याप्रमाणे त्याची दुरुस्ती केलेली आहे का ?

श्री. छगन भुजबळ : सभापती महोदय, हा रस्ता अगोदरच सुरु झालेला आहे. हे रस्ते अगोदरच बनविले गेले आहेत आणि खनिज काढण्याचे काम आता सुरु झालेले आहे.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ पूर्वी श्री.बरवड 12:25

ता.प्र.क्र.22787......

श्री.सुभाष चव्हाण : सभापती महोदय, या रस्त्यावरुन खनिजाचे डम्पर्स जात असल्यामुळे हा रस्ता नादुरुस्त झालेला आहे. रस्त्याच्या दुरुस्तीसाठी खनिज विभागाकडून निधी दिला जातो. त्यानुसार या विभागाने सन 2011-2012 या वर्षासाठी किती निधी दिला व त्यापैकी किती खर्च झ ाला आहे आणि रस्त्याच्या दुरुस्तीची कोणती कामे करण्यात आली आहेत ?

श्री.छगन भुजबळ : सभापती महोदय, ज्या रस्त्यावरुन खनिजाची वाहतूक होत असते या खनिजापोटी संबंधितांकडून काही मूल्य आकारले जाते. त्यापैकी काही रक्कम रस्त्याच्या दुरुस्तीसाठी दिली जाते. परंतु हा रस्ता नादुरुस्त आहे असे नाही. हा रस्ता दुरुस्त आहे. त्याबाबतचे माझ्याजवळ फोटो आहेत. फक्त हा रस्ता काही ठिकाणी अरुंद आहे. खनिजाची ने-आण करणाऱ्या डम्पर्सची संख्या मोठया प्रमाणावर आहे ही वस्तुस्थिती आहे.

-----

**सभापती** : प्रश्न क्रमांक 21604.

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, आजच्या प्रश्नांच्या यादीतील क्रमांक 3 वरील प्रश्न राहिलेला आहे.

**सभापती** : सन्माननीय सदस्या श्रीमती अलका देसाई यांना मी सांगू इच्छितो की, मी आपले नाव पुकारले होते. त्यावेळी आपण तो प्रश्न उपस्थित करावयास पाहिजे होता.

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, आपण दोन क्रमांकावरील प्रश्न पुकारला नव्हता म्हणून मी जागेवरुन उठले नाही.

**सभापती** : मी प्रश्न क्रमांक 3 वर असलेले श्रीमती अलका देसाई हे नाव पुकारले होते.

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, तसे नाही.

**सभापती** : मग कसे आहे ते मला सांगावे.

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, आपण दोन क्रमांकावरील प्रश्न पुकारला नव्हता म्हणून मी जागेवरुन उठले नव्हते.

**सभापती** : मी क्रमांक 3 वरील प्रश्न पुकारला होता. मी सन्माननीय सदस्या श्रीमती अलका देसाईंचे नाव पुकारले होते.

( अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलत असतात. )

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मेळघाट (ता.चिखलदरा, जि.अमरावती) येथील शासकीय निवासस्थानी कर्मचारी व अधिकारी राहत नसल्याबाबत**

**(3) * 22628 श्रीमती अलका देसाई , श्री.एम.एम.शेख , श्री.सुभाष चव्हाण , श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप** : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) मेळघाट (ता.चिखलदरा, जि.अमरावती) येथे शासनाने लाखो रूपये खर्च करून अधिकारी व कर्मचाऱ्यांकरिता चांगल्या प्रकारची निवासस्थाने बांधली परंतु या निवासस्थानी कुठलेच अधिकारी व कर्मचारी राहत नसल्याने ही निवासस्थाने ओस पडली असून तेथे गैरप्रकार चालू असल्याचे माहे सप्टेंबर, 2011 मध्ये वा त्या दरम्यान उजेडात आले हे खरे आहे काय,

(2) असल्यास, अधिकारी व कर्मचाऱ्यांना मुख्यालयी राहण्याचे शासनाचे आदेश असून देखील हे अधिकारी व कर्मचारी शहराच्या ठिकाणी राहत असल्याने नागरिकांच्या कामास विलंब होत असल्याचे निदर्शनास आले हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, शासनाने याबाबत संबधित कर्मचारी व अधिकारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रणजित कांबळे, श्री.छगन भुजबळ यांच्याकरिता** : (1) हे खरे नाही.

प्रश्नांकित निवासस्थांनामध्ये कोणत्याही प्रकारचे गैरप्रकार निदर्शनास आलेले नाहीत.

(2) प्रश्न उद्भवत नाही.

(3) प्रश्न उद्भवत नाही.

(4) प्रश्न उद्भवत नाही.

सभापती महोदय, माझी लेखी उत्तराला हरकत आहे.

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, उत्तर क्रमांक 2 मुळे मी स्वत: समाधानी नाही. या लेखी उत्तरात प्रश्न उद्भवत नाही असे उत्तर दिलेले आहे. मी या प्रश्नात असे विचारले होते की, अधिकारी व कर्मचाऱ्यांना मुख्यालयी राहण्याचे शासनाचे आदेश असून देखील हे अधिकारी व कर्मचारी शहराच्या ठिकाणी राहतात का, या प्रश्नाला, प्रश्न उद्भवत नाही असे उत्तर दिले आहे. हे अधिकारी तेथे राहतात की नाही ? मी सत्य प्रश्न विचारला असेल तर असत्य लेखी उत्तर का देण्यात आले ?

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, त्या ठिकाणच्या निवासस्थानामध्ये अधिकारी रहात आहेत. प्रश्न उद्भवत नाही असे उत्तर देण्याचे कारण असे आहे की, त्या निवासस्थानात वेगवेगळया विभागांचे अधिकारी राहतात. त्यामध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाचे, आरोग्य विभागाचे, महसूल विभागाचे अधिकारी राहतात. त्यांचा सार्वजनिक बांधकाम विभागाशी संबंध असल्यामुळे अशा प्रकारचे उत्तर दिलेले आहे.

3....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.22628....

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, या निवासस्थानांमध्ये अधिकारी राहत असतील तर त्यांनी त्या घरात रहावे अशा प्रकारची नोटीस का देण्यात आली आहे, ते तेथे रहात असते तर त्यांना नोटीस इश्यू करण्याचे कारण नव्हते. त्या अधिकाऱ्यांना नोटीस इश्यू झाल्याची बातमी त्याच विभागातील सर्व वर्तमानपत्रातून आलेली आहे. मी त्याच्या आधारे बोलत आहे.

श्री.छगन भुजबळ : सभापती महोदय, त्या ठिकाणी असलेली निवासस्थाने वेगवेगळया विभागांची आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागाची 16 निवासस्थाने आहेत, त्यापैकी 15 निवासस्थानात अधिकारी रहात आहेत. गृह विभागाची 21 निवासस्थाने आहेत, त्यापैकी 17 अधिकारी तेथे राहतात, महसूल विभागाची 29 निवासस्थाने आहेत, या सर्व निवासस्थानात अधिकारी राहतात. आरोग्य विभागाची 36 निवासस्थाने आहेत या सर्व निवासस्थानात अधिकारी राहतात. तेथे एकूण 102 निवासस्थाने असून 97 निवासस्थानांमध्ये वेगवेगळया विभागाचे अधिकारी रहात आहेत. बांधलेल्या निवासस्थानात कोणतेही अधिकारी/कर्मचारी रहात नाहीत, त्यामुळे ती ओस पडली आहेत हे म्हणणे खरे नाही म्हणून प्रश्न उद्भवत असे उत्तर दिलेले होते.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, विधिमंडळ कार्यालयाने व मंत्रालयाने याही गोष्टीची दखल घेणे आवश्यक आहे. त्याबाबतचा मी पॉईन्ट ऑफ प्रोसिजर उपस्थित करीत आहे. तेथील क्वार्टर्स बांधकाम विभागाने बांधलेल्या आहेत. पण त्यात वेगवेगळया विभागांचे अधिकारी रहात आहेत. ते अधिकारी तेथे रहात नाहीत अशा प्रकारची तक्रार झाल्यामुळे हा प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने ही क्वार्टर्स बांधली असल्यामुळे त्या विभागाकडे हा प्रश्न गेला. मलाही या सभागृहात असा अनुभव आला आहे की, बॉम्बस्फोटाच्या संदर्भात विषय होता. पुढील सर्व कार्यवाही मदत व पुनर्वसन विभागाने करावयाची होती. परंतु बॉम्बस्फोट म्हटले असल्यामुळे तो विषय गृह विभागाकडे आला. कोणत्या विभागाने उत्तर दिले तर त्या प्रश्नाला न्याय मिळू शकतो हे विधानमंडळ सचिवालयाने व सामान्य प्रशासन विभागाने बघणे आवश्यक आहे. सन्माननीय सदस्यांना त्यांना अपेक्षित असलेल्या विभागाकडून उत्तर मिळावे असे वाटत असते. सामुदायिक जबाबदारीतून त्या विभागाकडून उत्तर देता येईल. पण न्याय मिळण्यासाठी संबंधित विभागाने उत्तर देण्याचीही आवश्यकता आहे.

4...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.22628....

श्री.छगन भुजबळ : सभापती महोदय, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या प्रश्नासंबंधी सन्माननीय गृह मंत्र्यांनी मत मांडले आहे ते खरे आहे. तेथे ट्रान्झिट स्वरुपाची निवासस्थाने नाहीत. कायम स्वरुपी निवासस्थाने प्रत्येक विभागाला दिलेली आहेत. ही निवासस्थाने सामान्य प्रशासन विभागाकडून वितरित केली जातात. सार्वजनिक बांधकाम विभागाने हा प्रश्न सामान्य प्रशासन विभागाकडे पाठविला होता. परंतु त्यांनी आमच्या विभागाला उत्तर देण्यास सांगितले. त्यामुळे आमच्या विभागाने उत्तर दिलेले आहे. गृह विभागाचा जो आक्षेप आहे तो नोंद घेण्यासारखा आहे.

------

5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

**सिंधुदुर्ग जिल्ह्यात दारु विक्रीला बंदी असतांनाही पाऊच मधून दारु विक्री होत असल्याबाबत**

**(4) * 21604 श्री.प्रकाश बिनसाळे , श्री.हेमंत टकले , श्री.किरण पावसकर** : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) सिंधुदुर्ग जिल्ह्यात दारु विक्रीला बंदी असतांनाही पाऊच मधून दारु विक्री होत असल्याचे माहे ऑगस्ट, 2011 च्या दुसऱ्या सप्ताहात उघडकीस आले, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(3) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्‌नुसार पाऊचद्वारे होत असलेली दारुची विक्री बंद करणेबाबत कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.आर.आर.पाटील** : (1) नाही. तथापि सीमेलगतच्या गोवा राज्यातून विक्रीसाठी आणलेले पाऊच बाळगलेले आरोपी मिळून आल्याने मुंबई दारुबंदी अधिनियम, 1949 चे कलम 65 (ख), (ड) या प्रमाणे एकूण 19 केसेस केलेल्या असून त्यामध्ये 90 मि.ली.मापाचे रु.42959/- किंमतीचे 1796 पाऊच जप्त करण्यात आले असून एकूण 20 आरोपींना अटक करण्यात आली आहे.

(2) व (3) सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या सीमेलगत गोवा राज्याची सरहद्द आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यात दारुची चोरटी वाहतूक होऊ नये म्हणून इन्सुली, सातार्डी, शिरोडा, आरोंदा, चिजघर अशी पोलीस चेकपोस्ट कार्यरत आहेत. पोलीस चेकपोस्टवर वाहनांची कसून तपासणी करण्यात येत असून त्या वाहनामध्ये अवैध गोवा बनावटीचे पाऊच व इतर दारु मिळून आल्यास त्यांच्याविरुद्ध कडक कायदेशीर कारवाई करण्यात येत आहे.

तसेच सिंधुदुर्ग जिल्ह्यात अवैध दारु धंद्यांना आळा घालण्यासाठी पोलीस ठाण्यामध्ये विशेष पथके कार्यान्वित असून त्यांचेमार्फत, तसेच स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा, सिंधुदुर्ग यांचेमार्फत अवैध दारु धंद्याविरुद्ध कठोर उपाययोजना करण्यात येत आहे.

(4) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, सिंधुदुर्ग हा पर्यटन जिल्हा आहे. तेथे दहशतीचे सावट असते अशा प्रकारच्या बातम्या वर्तमानपत्रातून येत असल्याचे सन्माननीय सदस्यांनी वाचले असेल. त्याचबरोबर तेथे दारुच्या पाऊचचा सुळसुळाट झाल्याचेही वाचनात येत असेल. कॉलेजमध्ये जाणारे विद्यार्थी टपरीवरुन हे पाऊच विकत घेतात. तरुणाईला आकर्षित करण्यासाठी तेथे लाखो रुपयांची दारु विकली जाते. लेखी उत्तरात असे नमूद केले आहे की, "एकूण 19 केसेस केलेल्या असून त्यामध्ये 90 मि.मी.मापाचे रु.42,959/- किंमतीचे 1796 पाऊच जप्त करण्यात आले. तसेच गोव्यातून आलेले पाऊच सिंधुदुर्ग जिल्ह्यात विकले जातात." माझा स्पष्ट प्रश्न असा आहे की, गोव्यातून कॅनमधून दारुची वाहतूक केली जाते. सिंधुदुर्गमध्ये दारुच्या पाऊचचे पॅकिंग करण्याचे काम केले जाते. पोलिसांनी केलेल्या कारवाईत वाहतूक मार्गाने आलेली

6....

NTK/

ता.प्र.क्र.21604.....                                    श्री.किरण पावसकर....

दारु पकडली आहे.  पण सिंधुदुर्ग जिल्ह्यातच दारुची निर्मिती होते. 90 मि.ली.चा पाऊच 15 रुपयात विकला जातो.  विकणाऱ्याला तो पाऊच 10 रुपयास मिळत असल्यामुळे त्याला 5 रुपये नफा मिळतो. असे असताना "स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा, सिंधुदुर्ग यांचेमार्फत अवैध दारु धंद्याविरुध्द कठोर उपाययोजना करण्यात येत आहे." असे उत्तरात म्हटले आहे.  ही उपाययोजना करण्यात येत असेल पण सिंधुदुर्ग जिल्ह्यातच दारुची निर्मिती होत असल्याची खात्याला माहिती आहे काय, त्यांच्यावर विभागाने कारवाई केलेली आहे काय, त्यांच्याकडून आतापर्यंत किती माल हस्तगत केला आहे ?

नंतर श्री.गिते......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.21604...

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, यासंदर्भातील माहिती पोलिसांना मिळाली होती आणि त्या अनुषंगाने पोलिसांनी अनधिकृतपणे दारु विकणाऱ्या आरोपींना अटक केलेली आहे. गोवा राज्यातून अवैधपणे दारु येऊ नये म्हणून इन्सुली,सातार्डी, शिरोडा, आरोंदा, चिजघर या ठिकाणी पोलीस चेकपोस्ट निर्माण करण्यात आली आहेत. परंतु बऱ्याच वेळा जंगलमार्गे अवैधपणे दारु आणली जाते व तिची विक्री करण्यात येते. या वर्षात अशा प्रकारच्या अवैध दारु विक्रीच्या संदर्भात 560 केसेस रजिस्टर्ड झालेल्या आहेत. त्यात पाऊच मधून विक्री करण्याच्या संदर्भात 19 केसेस आहेत. या 560 केसेस रजिस्टर्ड झाल्या आहेत, त्यात 530 आरोपींना अटक करण्यात आली आहे. यामध्ये 9661 लिटर दारु जप्त करण्यात आली आहे. दारु निर्मितीसाठी लागणारी रसायने आणि दारु असा 2 कोटी 17 लाख 89 हजार 37 रुपयांचा माल जप्त केला आहे. एवढया मोठया प्रमाणात आरोपींना अटक करणे, एवढया मोठया प्रमाणात माल जप्त होणे ही गोष्ट या घटनेवरुन स्पष्ट होते. दारु गाळणे आणि तिची विक्री करणे हा अजामीनपात्र पुन्हा ठरविलेला आहे. परंतु परवा कलकत्ता येथे विषारी दारु पिऊन फार मोठया प्रमाणात जीवित हानी झाली आहे. मागे मुंबई शहरात देखील असाच प्रकार झाला होता. असा प्रकार मुंबई शहरात वा राज्यातील इतर शहरात होऊ नये म्हणून राज्यातील सर्व पोलीस स्टेशन यांना अलर्ट रहाण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. पोलीस आणि नागरीक यांना दक्ष राहण्याच्या सूचना दिलेल्या आहेत.

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, या प्रश्नाची माहिती दोन भागात आलेली आहे. दारु विक्रीसाठी बनविण्यात येणारे पाऊच गोवा येथे बनविले जातात. दुसरे असे की, ही अवैध दारु कॅनमध्ये आणून त्या कॅनचे रिपॅकींग करुन ती दारु सिंधुदूर्ग जिल्हयात विकली जाते. ही दारु छोटया पाऊचमध्ये दिली जाते, त्यामुळे ती स्वस्त पडते. पर्यायाने त्या अवैध दारुचा प्रचार आणि प्रसार करण्यास जास्त वेळ लागत नाही. ही वस्तु प्रत्येक गावी सहज उपलब्ध होत आहे. त्या दारुचे पाऊच लहान असल्यामुळे सिंधुदूर्ग जिल्हयातून त्याचा फैलाव संपूर्ण महाराष्ट्रात होण्याची शक्यता फार मोठी आहे.लेखी उत्तरात म्हटले आहे की, कडक कारवाई करण्यात येत आहे. कडक कारवाईचे निश्चित स्वरुप काय आहें? परराज्यातील अवैध दारु येऊ नये म्हणून पोलीस पथके निर्माण केली आहे. त्या पथकांची संख्या किती आहे, सिंधुदूर्ग जिल्हयात या बाबतीत पोलीस पथके निर्माण केली आहेत, त्या पथकातील पोलिसांची संख्या पुरेशी आहे काय ?



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.21604..

श्री.आर.आर.पाटील : गोवा राज्यातून अवैध दारु येऊ नये म्हणून आपण पोलीस चेकपोस्ट निर्माण केलेले आहेत. परंतु जंगलातून अवैधपणे दारु आणली जाऊ शकते. त्या ठिकाणी पोलीस पथके ठेवली आहेत, तेथील पोलिसांची संख्या निश्चितच कमी आहे. त्या पोस्टचेकमध्ये पोलिसांची संख्या वाढविण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. यासाठी आणखी पथके वाढविण्याची आवश्यकता भासली तर पथके वाढविली जातील. सिधुदूर्ग जिल्हयात कायदा व सुव्यवस्था चांगली ठेवण्यासाठी पोलीस बळ मोठया प्रमाणात लागते. या कामाकडे दुर्लक्ष होणार नाही याची निश्चितपणे दखल घेण्यात येईल.

-----------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## राज्यात जेष्ठ नागरिकांवर होत असलेले हल्ले

**(५) * २१९९२ श्री.रमेश शेंडगे , श्री.विक्रम काळे , श्री.हेमंत टकले , श्रीमती उषाताई दराडे , श्री.अरुण गुजराथी , श्री.अनिल भोसले , श्री.प्रकाश बिनसाळे , डॉ.दिपक सावंत , श्री.परशुराम उपरकर , श्री.संजय पाटील , श्री.विनायकराव मेटे , श्री.सतीश चव्हाण , श्री.चरणसिंग सप्रा , श्री.राजन तेली , श्रीमती अलका देसाई , श्री.सुभाष चव्हाण , श्रीमती दिप्ती चवधरी , श्री.चंद्रकांत पाटील , श्री.विनोद तावडे , श्री.भगवान साळुंखे , श्री.धनंजय मुंडे , श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप , श्री.संदिप बाजोरिया , श्री.किरण पावसकर , श्री.सुभाष भोईर , डॉ.निलम गोऱ्हे :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सन २००९ मध्ये ५० वर्षावरील ३२० वृद्धांची हत्या झाल्याचे व मुंबईत गेल्या सहा महिन्यात ६ हत्या तसेच लाखो रूपयांचा ऐवज लुटल्याच्या घटना घडल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) तसेच मुंबईत एकाच महिन्यात सहा वृध्द महिलांची माहे सप्टेंबर, २०११ मध्ये वा त्यादरम्यान हत्या करण्यात आली हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार ज्येष्ठ नागरिकांना सरंक्षण देणेबाबत व हत्यासत्र रोखण्याबाबत कोणती कार्यवाही व उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे, तसेच संबंधित गुन्हेगारांवर कोणती कठोर कारवाई करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सतेज उर्फ बंटी डी.पाटील,श्री.आर.आर.पाटील यांच्याकरिता :** (१) नाही, तथापि, राज्यात सन २००९ ते २०११ या कालावधीत एकूण १४६ वृद्धांच्या हत्या झाल्या असून मुंबईत गेल्या सहा महिन्यात वृद्धांच्या हत्येसंदर्भात ८ गुन्हे दाखल झाले आहेत. सदर आठही गुन्हे उघडकीस आले असून चोरीस गेलेल्या ८,८६,५००/- रु.च्या ऐवजापैकी ८,२४,०००/- किंमतीचा ऐवज हस्तगत करण्यात आला आहे.

४..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(२), (३) व (४) मुंबईत माहे सप्टेंबर, २०११ मध्ये एकूण चार वृद्ध महिलांच्या हत्या घडल्याबाबत गुन्हे नोंदविण्यात आले आहेत. सदर चारही गुन्ह्यातील आरोपींना अटक करण्यात आली असून चोरीस गेलेली मालमत्ता हस्तगत करण्यात आली आहे.

राज्यातील जेष्ठ नागरीकांना संरक्षण देणाच्या दृष्टीने प्रत्येक पोलीस ठाण्याच्या हद्दीत राहणाऱ्या जेष्ठ नागरीकांची माहिती संकलीत करुन त्याच्या नोंदीचे स्वतंत्र रजिस्टर तयार करण्यात आले आहे. तसेच जेष्ठ नागरीकांना तात्काळ मदत देण्याच्या दृष्टीने टोल फ्री हेल्प लाईन सुरु करण्यात आली आहे. जेष्ठ नागरीकांकडून तक्रार प्राप्त झाल्यास तात्काळ बिट मार्शल मार्फत मदत करण्यात येते.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. रमेश शेंडगे : सभापती महोदय, राज्यात विशेषत: पुणे, मुंबई येथे ज्येष्ठ नागरीकांची हत्या होत आहे ही एक मोठी चिंतेची बाब झालेली आहे. एकटया ऑगस्ट,२०११ मध्ये ज्येष्ठ नागरीकांच्या मोठया प्रमाणात हत्या झाल्या आहेत. दिनांक १७ ऑगस्ट,२०११ रोजी श्रीमती आरती छाबला यांची हत्या सांताक्रुझ येथे झाली. ३० तारखेस श्रीमती कविता सूचक यांची ४६ वर्षाच्या महिलेची हत्या जुहू येथे झाली. ९ सप्टेंबर रोजी साविया फ्रान्सीको या ८० वर्षाच्या महिलेची दादर येथे हत्या झाली. १२ तारखेस श्रीमती भारती शहा या ६८ वर्षाच्या महिलेची हत्या झाली. श्रीमती लतिका कांबळे या ५५ वर्षाच्या महिलेची विक्रोळी येथे हत्त्या झाली. श्रीमती सरोज पटेली या ६७ वर्षाच्या महिलेची मालाड येथे हत्या झाली. चोरीच्या अथवा वेगवेगळया उद्देशाने ज्येष्ठ नागरीकांची हत्या होत आहे. ज्येष्ठ नागरीकांच्या हत्या होऊ नयेत म्हणून शासनाकडून कोणत्या प्रकारची कार्यवाही करण्यात येत आहे ? ६० ते ७०,७० ते ८०. ८० ते ९० अशा वेगवेगळया वयोगटासाठी वेगवेगळया योजना आखून त्यांच्या सुरक्षिततेची काळजी शासनाकडून धेण्यात येईल काय ? तसेच या ज्येष्ठ नागरीकांसाठी शासन काही धोरण आखणार आहे काय आणि ते कधी आखले जाणार आहे ?

५...

२२-१२-२०११ ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) P-५

ABG/ प्रथम श्री.खंदारे १२:३५

ता.प्र.२१९९२..

श्री. आर.आर.पाटील : जानेवारी, २०११ ते सप्टेंबर, २०११ या कालावधीत मुंबईसह महाराष्ट्रात एकूण ७७ गुन्हे नोंद झालेले आहेत. त्यात ६२ गुन्हे उघड झालेले असून ९७ आरोपींना

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अटक झालेली आहे. हे गुन्हे कसे व कशामुळे झाले आहेत याचे ॲनॉलिसीस केले असता असे दिसून आले आहे की, ज्येष्ठ नागरीकांच्या हत्या प्रामुख्याने व्याजाने दिलेल्या पैशांचा वाद, जमिनीचे वाद, जमिनीचे हिस्सेवाटप, घरगुती पैशांचे वाद, घरगुती भांडणे, नशेच्या भरात वृध्दांच्या हत्या, एका घटनेमध्ये तर नातवाने आजिला मारल्याची घटना अलिकडच्या काळात घडली आहे. नातेवाईकाकडून आणि ओळखीच्या लोकांकडूनच अशा प्रकारच्या हत्या होत आहेत. म्हणून सन्माननीय सदस्यांनी व्यक्त केलेली चिंता बरोबर आहे. यासंदर्भात संवेदनशील उपाययोजना शासनाने हातात घेतलेल्या आहेत. वृध्दांसाठी १०३ क्रमांक मुंबईसाठी व १०२९ क्रमांक हा उर्वरित महाराष्ट्रासाठी टोल फ्री नंबर सुरु केलेला आहे. या वृध्द माणसांनी टोल फ्री क्रमांकावर फोन केला तर तातडीने मदत करण्याच्या सूचना पोलीस विभागाला देण्यात आलेल्या आहेत. जे वध्द आहेत, त्यांची मुले नोकरीसाठी बाहेर देशात वा बाहेर राज्यात नोकरीला असतात त्यांना सुध्दा टोल फ्री क्रमांच्या सुविधे बाबतची कल्पना देण्यात आलेली आहे. जे वृध्द आहेत, त्यांची नावे पोलीस स्टेशनमध्ये रजिस्टर्समध्ये नोंदी करुन ठेवणे, या वृध्द माणसाच्या सेवेसाठी घरात नोकर ठेवलेले असतात, तेच नोकर त्या वध्द माणसाची हत्या करतात, अशा अनेक बाबी उघड झाल्या आहेत. मुंबई आणि पुणे येथे एकाकी वृध्द रहात आहेत, त्यांनी जे नोकर ठेवलेले आहेत, त्यांच्या ओळखी करुन घेणे, तसेच त्यांचे मूळ गाव, पत्ता या विषयी माहिती जपून ठेवणे असेही काम या राज्यात आम्ही सुरु केलेले आहे. या सर्व वध्दांचे रजिस्टेशन करुन घेऊन त्यांना पूर्णपणे संरक्षण देण्याचा आमचा प्रयत्न आहे. वयोवृध्दांकडे जे नोकर आहेत, मग ते प्रांतीतील असतील वा बाहेर प्रांतातील असतील त्यांची सर्व माहिती संकलीत करुन ठेवून त्या माहिती बाबत तेथील पोलिसांशी संपर्क करुन सत्यता तपासून घेण्याचे काम देखील आम्ही सुरु केलेले आहे. वयोवृध्दांसाठी ज्या उपाययोजना करावयाच्या आहेत, त्या सर्व करण्याची भूमिका शासनाची आहे.

श्री. हेमंत टकले : या देशामध्ये आणि राज्यामध्ये रहाणाऱ्या वृध्द नागरिकांच्या अनेक समस्या आहेत. त्यात सुरक्षितता ही सगळयात महत्वाची समस्या आहे. यासाठी राज्य शासनाने हेल्पाईन सुरु केलेली आहे. त्यांचा टोल फ्री नंबरवर दूरध्वनी आला तर त्यांना आपण मदत

६..



ता.प्र.२१९९२..

श्री.हेमंत टकले..

करणार आहात. ७० वर्षानंतरचे व,ध्द शारीरिकदृष्टया सक्षम नसताना ते पोलीस मदत मागण्यास कसे काय येऊ शकतील हा एक प्रश्न निर्माण होतो. त्यांच्यासाठी अधिक व्यापक योजना करुन

त्याभागात जे पोलीस बंदोबस्तासाठी असतील त्यातील एक पोलीस अधिकारी सातत्याने त्यांाच्या संपर्कात राहील. त्यांच्या घरी राहणारी माणसे कोण आहेत. त्यांचे नातेवाईक कोण आहेत, त्यांच्यासोबत कोण रहात आहेत याबाबतची माहिती संकलित करुन घेऊन त्या विषयीची प्रितिबंधात्मक उपाययोजना या हत्या बंद होण्यासाठी करता येईल काय ?

श्री. आर.आर.पाटील : यासंदर्भात आणखी काय करता येईल हे तपासून घेतले जाईलच. शासनाने यापूर्वी वयोवृध्द व्यक्तींना मदत करण्याची भूमिका शासनाने घेतलेली आहे. जे वृध्द ज्या परिसरात एकटे राहतात, त्या ठिकाणच्या स्वयंसेवी संस्थांची मदत घेऊन, तसे कार्यकर्ते नसतील, अशा ठिकाणी स्वत: पोलीस मदत करतील. कधी त्यांना गॅसची गरज असते. त्यांना कधी तरी दवाखान्यात नेण्याची गरज असते. अशी सुध्दा कामे पोलिसांनी सुरु केलेली आहेत. केवळ त्यांना संरक्षण देणे एवढीच मदत न करता त्यांना आवश्यक असलेली मदत देण्याची व्यवस्था करण्यात येईल. तसेच त्यांना एकाकी वाटू नये. आम्ही हेल्पलाईन सुरु केल्यानंतर अनेक कॉल असे आले की, आम्हाला घरात एकाकी वाटते आहे, माझ्यासमवेत गप्पा मारण्यासाठी कोणी तरी पाठवा. पोलिसांनी ते सध्दा काम केले आहे. या कामाची व्याप्ती वाढवून त्याकडे अधिक लक्ष देण्यात येईल.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, या वयोवृध्द माणसाच्या संरक्षणासाठी पोलीस विभाग चांगल्या प्रकारे काम करीत आहे. परंतु नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरोच्या आकडेवारीनुसार संपूर्ण भ्ंारतामध्ये महिलांच्या हत्या होतात. ५० वर्षाच्या वरच्या महिलांच्या हत्या होण्यामध्ये महाराष्ट्र एक क्रमांकाचे राज्य आहे...

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

ता.प्र.क्र.21992..... डॉ.नीलम गोऱ्हे.........

मध्यंतरी आपण असे जाहीर केले की, शहरात तंटामुक्त समिती नेमणार आहोत. शहरामध्ये वॉर्ड स्तरावर सुरक्षा देणाऱ्या समित्या तयार झाल्या तर ज्येष्ठ नागरिकांना मदत मिळू शकेल. म्हणून शहरात दक्षता समित्यांची व्याप्ती वाढवून वॉर्ड स्तरावर त्यांना सुरक्षिततेच्या दृष्टीने काही मदत लागली तर ती देण्यासाठी एखादा फोरम पोलीस स्टेशनच्या अखत्यारित सुरु केला जाईल काय?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, सूचना निश्चितच योग्य आहे. निव्वळ हे काम पोलिसांनी करावयाचे म्हटले तर अगोदरच संख्याबळ कमी आहे आणि त्यांच्यावर असलेल्या जबाबदाऱ्या विचारात घेता खूप मर्यादा येण्याची शक्यता आहे. त्यामुळे समाजसेवकांची मदत घेण्याच्या दृष्टीने ग्रामीण भागाप्रमाणे शहरामध्ये तंटामुक्त समिती स्थापन करुन ते लोकांमध्ये जाऊन काम करतील, काही अडी-अडचणी असतील तर पोलिसांशी संपर्क साधतील. असा उपक्रम सुरु करावयाचे ठरविले आहे. प्रायोगिक तत्वावर औरंगाबाद शहरामध्ये तंटामुक्त समिती स्थापन करुन सहकार्य घेण्याची भूमिका आम्ही स्वीकारली आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, ज्येष्ठ नागरिकांच्या हत्यांचा विषय गेली तीन वर्षे सातत्याने सभागृहात मांडण्याची वेळ आमच्यावर आली आहे. मंत्री महोदयांनी सांगितलेले उपाय केल्यामुळे गेल्या तीन वर्षात ज्येष्ठ नागरिकांच्या हत्यांचे प्रमाण कमी झाले, वाढले की त्याच स्तरावर आहे, याचे विश्लेषण करुन नवीन योजनेचा विचार केला का? प्रत्येक वेळी तेच तेच उत्तर दिले जात असताना गेल्या तीन वर्षात अशा गुन्ह्यांचे प्रमाण वाढले की कमी झाले?

श्री.आर.आर.पाटील : उपाययोजना सुरु करावयास गेलो त्या त्या वेळी पैशाच्या आमिषाने नोकरांकडून होणाऱ्या हत्या कमी झाल्या, चोरी करण्याच्या उद्देशाने होणाऱ्या हत्या कमी झाल्या, घरामध्ये वेगवेगळ्या सेवा देण्यासाठी जे येतात त्यांच्याकडून होणाऱ्या हत्या कमी झाल्या. पण ज्या उपाययोजना केल्या त्यामुळे या हत्या कमी झाल्या असल्या तरी गेल्या वर्षभरात पैशासाठी, वाटणीसाठी नातेवाईकांनी केलेल्या वृध्दांच्या हत्येमध्ये वाढ झाली आहे.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पुणे येथील कात्रज ते देहूरोड येथे सर्व्हिस रोड तातडीने करणेबाबत**

**(६) * २२४७४ श्री.मोहन जोशी , श्री.सुभाष चव्हाण :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील कात्रज ते देहूरोड दरम्यान सुमारे एकवीस किलोमीटरचा बाह्यवळण महामार्ग चौपदरी महामार्ग करताना त्याच्यालगत सेवा रस्ते करण्याचे नियोजन होते परंतु बहुतांश ठिकाणी असे सेवा रस्ते झाले नसल्याने हा महामार्ग मृत्यूचा सापळा बनल्याचे माहे ऑगस्ट-२०११ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार संबंधित कंपनीवर कोणती कारवाई केली तसेच सेवा रस्ते तातडीने करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रणजित कांबळे, श्री.छगन भुजबळ यांच्याकरिता :** (१) नाही.

राष्ट्रीय महामार्गाची मालकी ही केंद्र शासनाच्या रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालय, नवी दिल्ली यांची असून कात्रज ते देहूरोड या वळणमार्गाची एकूण लांबी ३४.४३० कि.मी. आहे. सदर वळणमार्गाचे चौपदीकरणाचे काम सन २००३ मध्ये भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत पूर्ण करण्यात आले. सदर काम करतेवेळी त्यावेळी जागेवरील परिस्थितीनुसार ९.७७५ कि.मी. लांबीमध्ये सेवारस्ते बांधणे प्रस्तावित होते. त्यापैकी ६.४०८ कि.मी. लांबीतील सेवारस्ते पूर्ण करण्यात आले. तद्नंतर ऑक्टोबर २००८ मध्ये अतिरिक्त २० कि.मी. लांबीमध्ये सेवारस्त्याचे काम हाती घेऊन आज अखेर एकूण २६.४०८ कि.मी. लांबीमध्ये सेवा रस्त्याचे काम पूर्ण करण्यात आलेले आहे.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

श्री.मोहन जोशी : सभापती महोदय, मंत्रीमहोदयांना उत्तरामध्ये सुधारणा करावयाची आहे काय?

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, सुधारणा करावयाची नाही.

श्री.मोहन जोशी : सभापती महोदय, पहिल्या प्रश्नाला उत्तर "नाही" असे दिले आहे. दुस-या प्रश्नाच्या उत्तरामध्ये शासनाने मान्य केले की, २००३ मध्ये हा राष्ट्रीय महामार्ग पूर्ण करण्यात आला. या रस्त्याची प्रस्तावित लांबी ३४.४३ कि.मी. होती. त्यापैकी फक्त २६.४० कि.मी.लांबीचा रस्ता पूर्ण झाला आहे. उर्वरित कामाच्या विलंबाची कारणे काय आहेत? २००३ ते २०११ या ८ वर्षाच्या काळात हा रस्ता पूर्ण न केल्यामुळे अनेक अपघात होऊन लोकांना आपले प्राण गमवावे लागले.याला जबाबदार कोण? या महामार्गाच्या दोन्ही बाजूस वारजे, बाणेर, बालेवाडी आदी गावे आहेत. तेथे अनेक टाऊनशिप उभ्या राहिल्या आहेत. तेथील नागरिकांना हे रस्ते पूर्ण न झाल्यामुळे त्रास होत आहे. उर्वरित सेवा रस्ते ६ महिन्यांच्या आत पूर्ण केले जातील का? काम

..३..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पूर्ण न होण्यास विलंबाची कारणे काय आहेत? ज्या निरपराध नागरिकांना आपल्या प्राणास मुकावे लागले त्याला जबाबदार कोण?

श्री.छगन भुजबळ : सभापती महोदय, हा रस्ता म्हणजे मृत्यूचा सापळा बनला आहे असे २०११ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय? असा प्रश्न विचारला होता. त्या प्रश्नाला "नाही" असे उत्तर दिलेले आहे. या भागामध्ये जे अपघात झाले त्या अपघातामध्ये २००८ मध्ये ६ लोकांचा मृत्यू झाला, २०१० मध्ये १८ आणि २०११ मध्ये ४ लोकांचा मृत्यू झाला. हा रस्ता राष्ट्रीय महामार्ग आहे. कात्रज ते देहूरोड वळण रस्ता महामार्गाचा भाग आहे आणि तो रस्ता ३४.४३ कि.मी.चा आहे. १ जून, २००० ला चौपदरीकरणाचे काम सुरु झाले आणि ३१.१०.२००३ ला हे काम पूर्ण झाले. त्या वेळेला खरे तर ९.७६ कि.मी.चे सेवा रस्ते बांधण्याची योजना राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाची होती. परंतु त्या वेळेला फक्त ६.४ कि.मी.लांबीचे सेवा रस्त्यांचे काम पूर्ण करण्यात आले. उर्वरित काम करावयाचे राहिले हे खरे आहे. त्या भागामध्ये डिफेन्स, एच.ई.एम.आर.एल.कडून या रस्त्यांचे बांधकाम करण्यासाठी परवानगी मिळालेली नव्हती. त्याचबरोबर कात्रज घाट बाह्यवळण मार्गाचे काम जे अन्य काम होते, रिअलाईनमेंट केल्यामुळे त्या कामाची योजना पूर्ण न झाल्यामुळे ते काम वगळण्यात आले होते. मध्यंतरी पुण्यामध्ये ऑक्टोबर, २००८ मध्ये कॉमनवेल्थ गेम्स झाले. त्यावेळी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडून २० कि.मी.चे सेवा रस्ते बांधण्यात आले. एकूण २६.४ कि.मी.लांबीचे सेवा रस्ते तयार झाले. या रस्त्यांचे सहा पदरीकरणाचे काम सुरु आहे. १ ऑक्टोबर, २०१० रोजी हे काम सुरु झाले. या कामांतर्गत या मार्गावरचे जे काही सेवा रस्त्यांचे काम अपूर्ण आहे, ते काम या कामामध्ये समाविष्ट करण्यात आले आणि या कामाबरोबरच ते काम पूर्ण करण्यात येईल.

श्री.मोहन जोशी : सभापती महोदय, ५० टक्के काम अपूर्ण आहे. हजारो सहकारी गृहनिर्माण सोसायट्या त्या भागात उभ्या राहिल्या आहेत. २००३ ते २०११ या ८ वर्षाच्या काळात ५० टक्के काम अपूर्ण आहे. काम पूर्ण होण्यास आणखी कालावधी लागणार आहे. हे सेवा रस्ते त्या भागातील नागरिकांच्या दृष्टीने अतिशय मोलाचे आहेत. त्यामुळे शासन किती दिवसात हे काम पूर्ण करणार आहे?

..४..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रणजित कांबळे : हे काम नॅशनल हायवे विभागाचे असून त्यांनी ३ वर्षे कन्सोर्शियम सोबत कॉन्ट्रॅक्ट केला आहे. दोन्ही सेवा बाजूचे काम पूर्ण करण्यासाठी तीन वर्षे लागणार आहेत. हा शहराच्या आतील भाग आहे. आजूबाजूला अनेक हौसिंग कॉलनी झाल्याचे माननीय सदस्यांनी सांगितलेच आहे. हा रस्ता सहा पदरी करताना जंक्शनच्या ठिकाणी अपघात होतात म्हणून सहा पदरी मार्गावर प्रत्येक जंक्शनला फ्लायओव्हर किंवा अंडरपास निर्माण करणार आहोत. ९ ठिकाणी अंडरपास केले जाणार आहेत. लोकल ट्रॅफिक हायवेवरुन किंवा खालून जाईल या दृष्टीने कार्यवाही केली जाणार आहे.

-------

..५..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**राज्यातील टोल धोरणाचा अभ्यास करुन त्यामध्ये बदल सुचविण्यासाठी नेमलेल्या समितीच्या अहवालाबात**

**(७) * २१५२७ श्री.भगवान साळुंखे , श्री.चंद्रकांत पाटील , डॉ.रणजित पाटील , श्री.नागो पुंडलिक गाणार , श्री.रामनाथ मोते , श्री.धनंजय मुंडे : तारांकित प्रश्न क्रमांक १९२९९ ला दिनांक २ ऑगस्ट, २०११ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्वच राज्य मार्ग व महामार्गावरील टोल वसुलीबाबत शासनाने नवीन टोल वसुली धोरण आणण्याची मागणी माहे ऑक्टोबर, २०११ मध्ये वा त्या दरम्यान जेष्ठ समाजसेवक श्री.अण्णा हजारे यांनी केली हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नवीन टोल धोरणाचे स्वरुप काय आहे,
(३) तसेच राज्यातील टोल धोरणाचा अभ्यास करुन त्यामध्ये बदल सुचविण्यासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याने नेमलेल्या समित्यांचे अहवाल प्राप्त झाले असून या समितीकडून दोन टोल नाक्यातील अंतर ३५ किलोमीटर वरुन ५० किलोमीटरपर्यंत करण्याची शिफारस असूनही अद्याप त्यात कोणताही बदल झाला नसल्याचे माहे मे, २०११ च्या तिसऱ्या सप्ताहात निदर्शनास आले आहे हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, समितीच्या शिफारशीनुसार कार्यवाही न करण्याची कारणे काय आहेत,
(५) असल्यास, नवीन टोल धोरणांची अंमलबजावणी करण्यासाठी तसेच टोलनाक्यातील अंतर समितीच्या शिफारशीनुसार करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.छगन भुजबळ :** (१) पथकर स्थानकांवर उद्योजकामार्फत वसूल करण्यात येत असलेल्या रक्कमेत पारदर्शकता आणण्याची मागणी केलेली आहे.
(२) शासनाने सुधारित पथकर धोरण दिनांक ३० जुलै, २००९ रोजी निर्गमित केले आहे. यामध्ये खाजगीकरणांतर्गत प्रकल्पात घ्यावयाचा वाव, पथकर वसूलीचा दर, पथकर स्थानकातील अंतर, पथकरातून द्यावयाच्या सूट व सवलती नमूद केल्या आहेत.
(३), (४) व (५) राज्यातील टोल धोरणाचा अभ्यास करुन त्यामध्ये बदल सुचविण्यासाठी समिती स्थापित करण्यात आलेली आहे.
शासनाने पथकर स्थानकाच्या अडचणी संदर्भात स्थापित केलेल्या समितीच्या शिफारशीनुसार यापुढील खाजगीकरणांतर्गत हाती घेण्यात येणाऱ्या नवीन प्रकल्पांमध्ये पथकर नाक्यातील अंतर ४५ ते ५० कि.मी. ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

नंतर श्री.खर्चे...

PFK/ पूर्वी श्री. भोगले...... 12:55

ता. प्र. क्र. 21527......

श्री. भगवान साळुंखे : महोदय, या निमित्ताने मी मंत्री महोदयांना विचारु इच्छितो की, टोलनाक्यावर वाहतुकीच्या होत असलेल्या कोंडीवर उपाय सुचविण्यासाठी नेमलेल्या सी.पी. जोशी समितीने कोणत्या प्रमुख शिफारशी केल्या आहेत, तसेच या शिफारशींची अमलबजावणी करण्याबाबत कधी व कशी उपाययोजना केली जाणार आहे ?

पथकर नाक्यावर डीजीटल स्क्रीन लावण्यासाठी नेमलेल्या सबनीस समितीने कोणत्या शिफारशी केल्या आहेत व त्यांची अमलबजावणी कशी व कधी केली जाणार आहे ?

पथकर वसुली करणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी गणवेशाची सक्ती करावी तसेच पोलिसांकडून त्यांचे चारित्र्य तपासणी अहवाल घ्यावेत या शिफारशीची अमलबजावणी केली आहे काय ?

श्री. छगन भुजबळ : महोदय, यासाठी तीन समित्या स्थापन करण्यात आल्या होत्या. त्यात इलेक्ट्रॉनिक पध्दतीने फलक लावण्याच्या संदर्भात एक समिती होती. तसेच या पथकर नाक्यांवर शेजारी ज्या विविध अडचणी होत्या त्यांचा अभ्यास करुन काय करता येईल यासाठी सुध्दा एक समिती नेमली होती. इलेक्ट्रॉनिक्स पध्दतीने पथकर वसुलीसाठी तिसरी समिती होती. या समित्यांचे कामकाज पूर्ण होऊन त्यांनी वेगवेगळे उपाय सुचविलेले आहेत. त्यात इलेक्ट्रॉनिक पध्दतीने पथकर वसुल करण्यासाठी जी सूचना केली त्यानुसार 26 जानेवारी नंतर पथकर नाक्यावर इलेक्ट्रॉनिक फलक लावण्याच्या संदर्भात जालना ते औरंगाबाद रस्त्यावर प्रायोगिक तत्वावर सुरुवात करण्यात येईल. त्या फलकावर प्रकल्पाची किंमत, बँकेचे कर्ज व व्याज, आस्थापना खर्च, रिन्यूव्हलचा खर्च व कंत्राटदाराला एकूण मिळणारा फायदा ही सर्व माहिती लावण्यात येईल. त्याचबरोबर या सर्व पथकर नाक्यांवर सर्वच ठिकाणी संगणक बसविण्याचे काम सुरु केले असून एमएसआरडीसीच्या अंतर्गत असलेले दहा ते पंधरा पथकर नाकेच शिल्लक राहिले, उर्वरित सर्वच ठिकाणी संगणक सुरु करण्यात आलेले आहेत. या संगणकांच्या माध्यमातून एकूण किती वाहने गेली, दररोज किती रक्कम मिळाली याची माहिती मिळणार आहे. तिसरी गोष्ट म्हणजे या टोल नाक्यांवर वेळ जातो म्हणून विशिष्ट प्रकारचा टॅग गाड्यांवर लावला तर सेन्सरच्या माध्यमातून वेगवेगळ्या टोल नाक्यावर जरी ती गाडी गेली तरी टोलचे पैसे गाडी मालकाच्या बँक खात्यातून आपोआप वळते करुन घेण्याची सोय होणार आहे, परिणामी वाहतुकीची

....2



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 21527...... श्री. छगन भुजबळ .......

कोंडी सुटण्यास काहीशी मदत होईल. यासंबंधीचे टेंडर काढलेले असून वित्त विभागाकडे ते टेंडर प्रलंबित आहे. तसेच टोल नाक्यावरील सुविधांच्या संदर्भात देखील एक सूचना होती. त्यानुसार पुरुषांसाठी प्रसाधान गृहाची सूचना केलेली आहे त्याचाही विचार शासन स्तरावर सुरु आहे.

प्रा. सुरेश नवले : महोदय, पथकरातून माजी आमदारांना सूट दिली जाणार आहे काय ? तसेच राज्यातील वेगवेगळ्या टोल नाक्यांवर जी गुंडगिरी सुरु झालेली आहे, दहशतीचे वातावरण तयार झालेले आहे त्याला शासन प्रतिबंध करणार आहे काय ?

श्री. छगन भुजबळ : महोदय, या पथकरातून विद्यमान लोकसभा, राज्यसभा, विधानसभा व विधान परिषद सदस्य, केंद्र व राज्य शासनाची वाहने, पोलिसांची वाहने, लष्कर, टपाल व तार विभागाची वाहने, रुग्ण वाहिका, शववाहिनी, अग्निशमन दलाची वाहने इ. ना सूट दिलेलीच आहे. पण सभागृहातील बहुतांशी सन्माननीय सदस्यांचा सूर पाहता तसेच त्यांच्याही भविष्य काळाचा विचार करता आपली मागणी मी मान्य करतो व यासंबंधीचे आदेश तत्काळ निर्गमित करण्यात येतील.

**सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे.

---------

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.: औचित्याचे मुद्दे**

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. राम पंडागळे यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. राम पंडागळे : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील सार्वजनिक महत्वाच्या व निकडीच्या बाबीवर औचित्याचा मुद्दा मांडणार असून त्या माध्यमातून शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न करणार आहे.

महोदय, दादर येथील इंदू मिलची 12.5 एकर जागा भारत रत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या भव्य स्मारकासाठी द्यावी व तेथे त्यांचे स्मारक उभारावे असा ठराव दि. 20 डिसेंबर, 2011 रोजी आपल्या सभागृहाने एकमताने मंजूर करुन शासनाच्या माध्यमातून तो ठराव केंद्र शासनाकडे पाठविण्यात आलेला आहे.

महोदय, उपरोक्त घटनेशी निगडीत असलेली बाब म्हणजे मुंबईतील दादर रेल्वे स्थानकाचे "डॉ. बाबासाहेब आंबेडकर रेल्वे स्थानक" असे नामकरण करण्याची जनतेची होत असलेली मागणी, त्यावर अद्यापही निर्णय घेण्यात आलेला नसल्यामुळे जनतेत पसरलेला तीव्र असंतोष, वरील दोन्ही बाबी या केंद्र शासनाच्या अखत्यारित असल्यामुळे दादर रेल्वे स्थानकाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर असे नाव देण्याबाबत ठराव करुन केंद्राकडे पाठविण्यात यावा अशी मी मागणी करीत आहे.

महोदय, ही मागणी करीत असताना सभागृहाच्या वतीने तसेच आपल्या वतीने मी शासनाला विनंती करणार आहे की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे महापरिनिर्वाण दादर येथील चैत्यभूमी येथे झालेले आहे. सबंध राज्यातूनच नव्हे तर संपूर्ण भारतातून लाखो लोक या स्मारकाचे दर्शन घेण्यासाठी दादरला उतरतात. अशा वेळेस या भाविकांच्या मनात सहाजिकच संभ्रम निर्माण होतो की, ज्या बाबासाहेबांनी भारताची घटना लिहिली होती, जेथे त्यांच्यावर अंत्य संस्कार झाले, त्या त्यांच्याच भूमीला आजपर्यंत महाराष्ट्र शासन व केंद्र शासनाने "चैत्यभूमी" नाव का दिले नाही ? ही बाब ऐतिहासिक स्वरुपाची तर आहेच पण बौध्द व दलितांच्या अस्मितेचा प्रश्न सुध्दा आहे. म्हणून सबंध सभागृहाच्या वतीने माझी शासनाला विनंती आहे की, दादर स्थानकाला "चैत्यभूमी" असे नाव देण्यात यावे, अशी विनंती करुन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा विजय असो अशी घोषणा करतो आणि माझे भाषण संपवितो. .....जय भीम.....

---------

( नंतर श्री. जुन्नरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>अशासकीय ठरावाबाबत</u>**

श्री.रमेश शेंडगे : सभापती महोदय, मागील शनिवार दिनांक 17 डिसेंबर, 2011 रोजी याच बाबतीत माझा अशासकीय ठराव सभागृहात आला होता. परंतु पुढील आठवडयात आपला अशासकीय ठराव चर्चेला घेतला जाईल असे आपण निदेश दिले होते. उद्या अधिवेशन संस्थगित होणार आहे त्यामुळे याबाबतीत आपण निर्णय द्यावा अशी विनंती आहे.

**सभापती** : आपला अशासकीय ठराव निश्चितपणे घेतला जाणार आहे.

----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**:औचित्याचे मुद्दे (पुढे सुरु....

**सभापती** :सन्माननीय सदस्य श्री. रमेश शेंडगे यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. रमेश शेंडगे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. तालुका खेड, चिपळूण येथील वशिष्ठी नदीतून पारंपारिक पध्दतीने हात पाटी द्वारे वाळू उत्खननासाठी शासनाने चार गटांचा लिलाव जाहीर करणे 1) मोजे भुले, ता.चिपळूण 2) मोजे केतकी, ता. चिपळूण 3) मोजे सोनगाव ता. खेड 4) मोजे करमाळा ता.चिपळूण येथील प्रत्येक संस्थांना प्रत्येकी 23 होडया उत्खननासाठी वापरावयाच्या होत्या. परंतु दिनांक 2.12.2011 पासून दाभोळ येथील काही संस्थांनी इतर गटामध्ये घुसखोरी करुन 23 होडया ऐवजी अनाधिकृतपणे 150 होडया खाडीमध्ये घुसवून बेकायदेशीरपणे रेतीचे उत्खनन करुन शासनाचे कोट्यावधी रुपयांचे नुकसान केले आहे. यामध्ये तहसीलदार, खनिकर्म मंडळाचे अधिकारी व मंडल अधिकारी यांचा सहभाग असल्यामुळे या सर्वांची चौकशी करुन कारवाई करण्यात यावी अशी मी औचित्यांच्या माध्यमातून मागणी करीत आहे.

-----

**सभापती** : या ठिकाणी सन्माननीय मंत्री महोदय श्री. बबनराव पाचपुते उपस्थित आहेत त्यांना मी सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्य श्री. राम पंडागळे यांनी अत्यंत महत्वाच्या बाबीवर औचित्याचा मुद्दा उपस्थित. त्यामुळे सन्माननीय मंत्री महोदयांनी याबाबत नोंद घ्यावी तसेच त्या विभागाचे संबंधित मंत्री किंवा अन्य मंत्र्यांशी चर्चा करावी व यासंदर्भात कोणती कार्यवाही करणे आवश्यक आहे ते पहावे.

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, नोंद घेण्यात आली आहे.

----------

**रेल्वे स्थानकाच्या नामकरणाबाबत**

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मला आपल्या निदर्शनास एक बाब आणून द्यावयाची आहे. मी अशाच प्रकारे रेल्वेच्या नामांकरणाचा प्रस्ताव या सदनात उपस्थित केला होता. त्या प्रस्तावाला माननीय मंत्री महोदयांनी मला लेखी उत्तर दिले होते व त्या लेखी उत्तरात असे सांगितले होते की, रेल्वेच्या 1953 च्या अमुक अमुक नियमानुसार कोणत्याही रेल्वे स्थानकाचे नामांतर करता येणार नाही. नामकरणाच्या संदर्भात अनेक माहिती जोडून या विषयाच्या संदर्भात मी हक्कभंग दाखल केला होता. परंतु सदर हक्कभंग नाकारण्यात आला. नामांकरणाच्या संदर्भात आपण त्यावेळी माननीय मंत्री महोदयांचे म्हणणे सत्य मानून माझा हक्कभंग नाकारला होता. माननीय मंत्री महोदयांनी रेल्वेच्या संदर्भात जी माहिती दिली होती ती सत्य असेल व कोणत्याही रेल्वे स्थानकाचे नामांतर करता येत नाही असे जर आपले मत झाले असेल व आता या विषयाच्या संदर्भात आपण जे निदेश दिलेले आहे ते पाहता मी रेल्वे नामकरणाच्या संदर्भात जो हक्कभंग दिला होता तो नाकारला गेल्यामुळे नवीन प्रश्न आता निर्माण झालेला आहे.

( सत्ताधारी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य सभागृहात घोषणा देत असतात)

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी कृपया शांतता पाळावी. मी सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांना सांगू इच्छितो की, आपण रेल्वे स्थानकाच्या संदर्भात जी माहिती दिलेली आहे ती वस्तुस्थिती आहे. रेल्वे स्थानकाच्या नामाभिधानाच्या संदर्भात अशाच प्रकारचा एक प्रस्ताव पाठविल्यानंतर त्यावेळच्या संबंधित मंत्र्यांनी या अनुषंगाने एवढेच सांगितले होते की, "ही बाब केंद्र शासनाच्या अखत्यारितील असल्यामुळे या संदर्भात काय वस्तुस्थिती होती ती पाहतो व उद्यापर्यंत यासंदर्भात निर्णय देतो".

( सत्ताधारी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य सभागृहात घोषणा देत असतात)

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राम पंडागळे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते सदनात प्रश्न मांडतात त्यावेळी आम्ही एकाग्र होऊन त्यांचे म्हणणे ऐकत असतो. त्यांनी मांडलेल्या सामाजिक किंवा समतेच्या प्रश्नाबाबत त्यांना आम्ही मदत करण्याचा प्रयत्न करीत असतो. परंतु मला सांगावयाचे आहे की, दादर स्टेशनला चैत्यभूमी असे नाव देण्याची मागणी केली त्यावेळी त्यांनी या विषयाच्या सदंर्भात आक्षेप घेतलेला आहे. एका बाजूला शिव शक्ती भिम शक्ती अशा प्रकारच्या वल्गना करता आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव चैत्यभूमीला देण्यात यावे याबाबत आम्ही ठराव मांडतो त्यावेळी आपण आमच्या ठरावाला विरोध करण्यासाठी उभे राहता ही दु:खाची बाब आहे.

( सत्ताधारी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य सभागृहात घोषणा देत असतात)

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी कृपया खाली बसावे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मी परखडपणे व नम्रपणे सभागृहाला सांगू इच्छितो की, माझे मित्र सन्माननीय सदस्य श्री. राम पंडागळे यांनी जो मुद्दा मांडला त्यासंदर्भात मी एक शब्दही काढला नाही, काही सुध्दा बोललो नाही. या विषयाच्या संदर्भात ठराव मांडण्याची विनंती केली त्याबाबतीत सुध्दा आम्ही एक शब्दही बोललो नाही. आपल्या औचित्याच्या मुद्याच्या संदर्भात माननीय सभापती महोदयांनी जे निदेश दिले त्याबाबतीत मी त्यांना आठवण करुन दिली की, मी सुध्दा या विषयाच्या संदर्भात प्रस्ताव मांडला होता. रेल्वेच्या प्रस्तावाच्या संदर्भात मला सभागृहाने जो आदेश दिला व त्या विषयाच्या संदर्भात मी जो हक्कभंग दिला होता तो का नाकारला गेला यासंदर्भातच मी माननीय सभापती महोदयांना विचारणा केली होती. त्यासंदर्भात माननीय सभापती महोदयांनी सांगितले होते की, "यासंदर्भात काय वस्तुस्थिती होती ती पाहतो व उद्यापर्यंत निर्णय देतो". रेल्वे स्थानकाच्या नामाभिदानाच्या संदर्भात मी जे विचार व्यक्त केले होते त्यामध्ये तुमच्या प्रस्तावाचा, तुमच्या बोलण्याचा, तुमच्या निदर्शनाचा तसेच निवेदनाचा काही एक संबंध नव्हता. मी जो मुद्दा उपस्थित केला होता तो मुद्दा माननीय सभापती महोदयांनी मान्य देखील केलेला आहे.

एल्फीस्टन रेल्वे स्थानकाला प्रभादेवी नाव द्यावे असा प्रस्ताव मी काही महिन्यापूर्वी



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

मांडला होता. मी महापौर होतो तेव्हापासून मी हा विषय उपस्थित करीत आलेलो आहे. सन्माननीय सदस्यांनी मांडलेल्या प्रस्तावाच्या संदर्भात मा.सभापती महोदयांनी, मंत्रीमहोदयांना निदेश दिलेले आहेत परंतु माझ्या प्रस्तावाच्या संदर्भात जे काही घडले त्याबाबत मी माननीय सभापती महोदयांना आठवण करुन दिली त्यावेळी माननीय सभापती महोदयांनी सांगितले की, तुमची बाब तपासून घेण्यात येईल. त्यामुळे मी जो मुद्दा मांडलेला आहे त्यामध्ये आपल्या मुद्याचा काही एक संबंध आलेला नाही एवढेच मला या निमित्ताने सांगावयाचे आहे. या ठिकाणी सत्ताधारी पक्षाचे सदस्य ज्या प्रकारे वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहेत ते बरोबर नाही. आम्ही आपल्या प्रस्तावाला विरोध केला नाही की, त्यावर एक शब्दही बोललो नाही. आपण जो मुद्दा उपस्थित केलेला आहे त्यावर आमच्या पक्षाने अधिकृत विरोध जाहीर केलेला असतांना सुध्दा तुम्ही मांडलेल्या प्रस्तावावर आम्ही एक शब्दही काढला नाही.

( सत्ताधारी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य सभागृहात घोषणा देत असतात)

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी कृपया शांत रहावे. सन्माननीय सदस्य श्री. राम पंडागळे यांनी मांडलेल्या औचित्याच्या मुद्याच्या संदर्भात मी अगोदरच निर्णय दिलेला आहे. आता पुढील कामकाज घेण्यात येईल.

..6..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**शाळेतील शिक्षकांना गुंडाकडून होत असलेली मारहाण**

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, शिक्षकांवर होणा-या हल्ल्याच्या संदर्भात काल सभागृहात चर्चा झाली होती. ठाणे जिल्हयाच्या मुरबाड येथील एका शाळेतील शिक्षकाला पाच गुंडांनी मारहाण केली होती व या विषयाच्या संदर्भात मी काल सभागृहात मुद्दा उपस्थित केला होता त्यावेळी माननीय उपसभापती महोदयांनी या विषयाच्या संदर्भात आज निवेदन केले जाईल असे निदेष दिले होते परंतु यासंदर्भात अजूनही शासनाकडून निवेदन करण्यात आले नाही.

----

..7..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.:औचित्याचे मुद्दे** **( पुढे सुरु....**

**सभापती** :सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, मी औचित्याच्या मुद्यामार्फत सभागृहाचे लक्ष वेधू इच्छितो. मोजे बोवरीपाडा ता. बोरीवली,जि.मुंबई उपनगर येथील अनुसूचित जमातीच्या प्रवर्गातील दारिद्रय रेषेखाली श्री. जयराम धापसे आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या वैयक्तिक मालकीच्या घरातून जोरजबरदस्तीने, अनाधिकृतपणे ताबा मिळवून सर्वश्री रामेवर पटेल व मुनीर अब्दूल मुलाणी, मुंबई पोलीस बक्कल क्रमांक 2534 मरोळ, पोलीस ठाणे

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप.

.

या गैर अर्जदाराने माहे नोव्हेंबर 2011 मध्ये मिळविलेला अनधिकृत ताबा आणि धापसी कुटुंबीयांवर वेळावेळी सन 2010 ते 2011 च्या उत्तरार्धापर्यंत मारझोडीचा प्रयत्न केला. सदर बाबतीत तक्रार नोंदविण्यास दहिसर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक श्री.गौतम रणदिवे आणि त्यांच्या कनिष्ठ कर्मचाऱ्यांनी टाळाटाळ केली. तसेच हे संपूर्ण प्रकरण सामोपचाराने मिटविण्यास अक्षम्य कुचराई केली. पोलिसांच्या या दंडेली बाबत धापसी कुटुंबीयांना अकारण घबराटीच्या छायेत रहावे लागत असून त्यांना पोलीस अतिरेक सोसावा लागत आहे. भयग्रस्त झालेले धापसी कुटुंबीय, त्यांचे नातेवाईक आणि स्वयंसेवी संघटनांनी पोलिसी कृष्ण कृत्याच्या विरोधात तीव्र जन आंदोलन छेडण्याचा निर्धार व्यक्त केलेला आहे. तेव्हा या बाबत शासनाने तातडीने वेळीच कारवाई व उपाय योजना करण्याची आवश्यकताआहे.

**सभापती** :सन्माननीय सदस्यांनी माझ्याकडे कागदपत्रे द्यावीत. ती कागदपत्रे मी गृह विभागाकडे पाठवून देईन.

मी सर्व सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की,आपण औचित्याचे मुद्दे शुक्रवारी घेतो. तथापि,काही महत्वाचे विषय असल्यामुळे मी एक-दोन सन्माननीय सदस्यांना बोलण्याची संधी दिली होती. परंतु या ठिकाणी अनेक सन्माननीय सदस्यांनी औचित्याचे मुद्दे मांडण्यासाठी हात वर केलेले आहेत. मी सर्वच सन्माननीय सदस्यांना औचित्याचे मुद्दे मांडण्याची संधी दिली तर सभागृहापुढील कामकाज बाजूला राहील. सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांना मी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी दिली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा. सन्माननीय सदस्या ॲड.उषा दराडे यांना उद्या औचित्याचा मुद्दा मांडण्याची संधी देण्यात येईल.

------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. काल सातारा जिल्ह्यातील सोनगाव येथे फोर्स-वन मध्ये काम करणारे पोलीस अधिकारी श्री.जयवंत जाधव हे मद्यधुंद होऊन धाब्यावर जेवायला गेले होते. रात्री 11.30 वाजता त्यांचा धाब्यावर वादविवाद झाला. रात्री 2.45 पर्यंत त्यांनी कुठेतरी वेळ व्यतीत केला. नंतर 2.45 वाजता सातारा जिल्ह्यातील खिंडवाडी बाग येथील एका ओढ्यात उतरुन त्यांनी दगड जमा केले. त्या दगडाने त्यांनी स्वत: एक डम्पर फोडला. त्यानंतर गोडोली चौकापासून पवई नाक्यापर्यंत व पवई नाक्यापासून ते हाय-वे पर्यंत त्यांनी जवळपास 81 गाड्या फोडल्या. त्यांना जरी अटक झाली असली तरी त्यांच्या बाबतीत सातत्याने सांगितले जात आहे की, लोकांनी त्यांना मारहाण केल्यामुळे ते बोलण्याच्या परिस्थितीमध्ये नाहीत. अधिवेशन उद्या संपणार आहे. या घटनेमुळे सातारा जिल्ह्यामध्ये अस्वस्थता निर्माण झालेली आहे. फोर्स-वन मध्ये काम करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्याने अशा प्रकारचे कृत्य केले असल्यामुळे त्यांच्यावर लवकरात लवकर कारवाई केली पाहिजे. तसेच त्या पोलीस अधिकाऱ्याने ज्या निरपराध लोकांच्या गाड्यांची तोडफोड केलेली आहे त्यांना नुकसान भरपाई देण्यासाठी सातारा पोलीस स्टेशनने लवकरात लवकर पावले उचलली पाहिजेत. जो अधिकारी सर्वांचे संरक्षण करण्यासाठी नेमलेला आहे त्यांच्याकडून असे कृत्य होणे बरोबर नाही. मी या संदर्भातील माहिती आपल्याकडे देते.

-------

..3..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे

श्री.राजेंद्र मुळक (संसदीय कार्य राज्य मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था शिर्डी यांचा सन 2010-2011 या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आला आहे.

------

श्री.राजेंद्र मुळक : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने लोक आयुक्त आणि उप लोक आयुक्त यांचा सन 2009 या वर्षाचा 37 वा सन सन 2010 या वर्षाचा 38 वा वार्षिक अहवाल आणि दिनांक 6 जुलै 2010, दिनांक 6 जुलै, 2010, दिनांक 24 मार्च, 2011 व दिनांक 26 एप्रिल, 2011 रोजीचे विशेष अहवाल त्यावरील स्पष्टीकरणात्मक ज्ञापनासह सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक व विशेष अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहेत.

------

श्री.राजेंद्र मुळक : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळ मर्यादित, पुणे (मेस्को) यांचा सन 2006-2007 चा पाचवा वार्षिक अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आला आहे.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी यांचा वार्षिक अहवाल वेळेत सादर केल्याबद्दल मी मंत्रीमहोदयांचे अभिनंदन करतो. परंतु आता सन्माननीय मंत्री महोदयांनी जो अहवाल सादर केला तो सन 2006-2007 मधील आहे. अहवाल येण्यास इतकी वर्षे लागत असतील तर योग्य नाही. आपण या पूर्वी देखील या बाबत निदेश दिलेले आहेत.

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : मानननीय मुख्यमंत्री महोदयांनी सामान्य विभागामार्फत सर्वच विभागांना अहवाल विहित वेळेत सादर करण्याबाबत कडक सूचना देणे गरजेचे आहे. जर अहवाल सादर करण्यास 10 वर्षे लागत असतील तर ते योग्य नाही. कमीत कमी तीन वर्षात अहवाल सादर करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावेत अशा सूचना संबंधितांना द्याव्यात.

श्री.राजेंद्र मुळक : सभापती महोदय, आपण निदेश दिल्याप्रमाणे सूचना देण्यात येतील.

------

श्री.राजेंद्र मुळक : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र वैधानिक विकास मंडळानी माननीय राज्यपालांना सादर केलेले सन 2010-2011 चे वार्षिक अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहेत.

-------

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.मोहन जोशी )**

श्री.राजेंद्र मुळक : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र पाटबंधारे वित्तीय कंपनी मर्यादितचा सन 2007-2008 व 2008-2009 या वर्षांचे वार्षिक अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : : वार्षिक अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहेत.

-----

श्री.सचिन अहिर (उद्योग राज्यमंत्री ): सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने मराठवाडा विकास महामंडळ मर्यादितचा सन 2009-2010 चा 43 वा वार्षिक अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आला आहे.

---

..5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विदर्भ विकास महामंडळ मर्यादित सन 2008-2009 चा 38 वा वार्षिक अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आला आहे.

------

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ मर्यादित यांचा सन 2008-2009 या वर्षाचा 47 वा वार्षिक अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आला आहे.

-----

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाचे सन 2003-2004 व 2004-2005 या दोन वर्षांचे वार्षिक अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

महोदय,कॅटने डेप्युटेशनवर दिलेल्या सी.ए.यांचे निधन झाल्यामुळे आणि त्यांच्या जागी सी.ए.ची नियुक्ती करण्यास विलंब झाल्यामुळे अहवाल सादर करण्यास उशीर झालेला आहे. यापुढे अहवाल वेळेवर सादर होण्याबाबत काळजी घेण्यात येईल.

**तालिका सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहेत.

----

प्रा.वर्षा गायकवाड (महिला व बालविकास मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र ग्रामपंचायत कर व फी (सुधारणा) नियम , 2011 प्रसिध्द करणारी अंतिम अधिसूचना क्रमांक व्हीपीएम-2069/प्र.क्र.106/पं.रा-4 (22), दिनांकित 21 नोव्हेंबर, 2011 सभागृहासमोर ठेवते.

**तालिका सभापती** : अधिसूचना सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली आहे.

----

..6..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेंद्र मुळक (जलसंपदा राज्यमंत्री ): सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विदर्भ् पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर लेख्यावरील भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांचा सन 2008-2009 या वर्षाचा अलग लेखापरीक्षा अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : लेखापरीक्षा अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आला आहे.

------

श्री.राजेंद्र मुळक : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, मुंबई यांचा सन 2010-2011 चा वार्षिक अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आला आहे.

-----

यानंतर श्री.सरफरे..

,

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेंद्र मुळक : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे यांचा सन 2009-2010 या वर्षाचा महालेखापाल, महाराष्ट्र-1 यांचा लेखा परिक्षण अहवाल व त्यावरील अनुपालन अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**तालिका सभापती (श्री.मोहन जोशी)** : अनुपालन अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

-----

प्रा. वर्षा गायकवाड (महिला व बालविकास मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुणे विद्यापीठ, पुणे यांचा सन 2009-2010 या बासष्टावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवते.

**तालिका सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

------

प्रा. वर्षा गायकवाड : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने शिवाजी विद्यापठ, कोल्हापूर यांचे सन 2008-2009 व 2009-2010 या वर्षांचे वार्षिक लेखे सभागृहासमोर ठेवते.

**तालिका सभापती** : वार्षिक लेखे सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

------

प्रा. वर्षा गायकवाड : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ,नागपूर यांचे सन 2008-2009 व 2009-2010 या वर्षांचे वार्षिक लेखे सभागृहासमोर ठेवते.

**तालिका सभापती** : वार्षिक लेखे सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

------

प्रा. वर्षा गायकवाड : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांचे सन 2008-2009 व 2009-2010 या वर्षाचे वार्षिक लेखे सभागृहासमोर ठेवते.

**तालिका सभापती** : वार्षिक लेखे सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सचिन अहिर (गृहनिर्माण राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग महामंडळ मर्यादित यांचा सन 2010-2011 या वर्षाचा 45 वा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**तालिका सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

-----

प्रा. वर्षा गायकवाड (महिला व बालविकास मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महिला आर्थिक विकास महामंडळ यांचा सन 2006-2007 व 2007-2008 या वर्षाचा अनुक्रमे बत्तिसावा व तेहतिसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवते.

**तालिका सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

**पृ.शी./मु.शी.**: अंदाज समितीचा अहवाल सादर करणे

डॉ. नीलम गोऱ्हे (समिती सदस्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अंदाज समितीचा 16 वा नियोजन विभाग व वित्त विभागाच्या खर्चाच्या नवीन बाबी संदर्भातील अहवाल, 17 वा वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, रोजगार व स्वयं रोजगार व सामान्य प्रशासन विभागाच्या खर्चाच्या नवीन बाबीसंदर्भातील अहवाल सभागृहाला सादर करते.

**तालिका सभापती** : अंदाज समितीचा सोळावा, सतरावा व अठरावा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

**पृ.शी./मु.शी.**: सार्वजनिक उपक्रम समितीचा अहवाल सादर करणे

श्री. हेमंत टकले (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सार्वजनिक उपक्रम समितीचा आठवा अहवाल सभागृहाला सादर करीत आहे.

**तालिका सभापती** : सार्वजनिक उपक्रम समितीचा आठवा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: पंचायती राज समितीचा अहवाल सादर करणे

ॲड. उषा दराडे (समिती सदस्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पंचायती राज समितीचा सातवा व आठवा अहवाल सभागृहाला सादर करीत आहे.

**तालिका सभापती** : पंचायती राज समितीचा सातवा व आठवा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचा अहवाल सादर करणे व संमत करणे

श्री. चंद्रकांत पाटील (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचे प्रतिवृत्त सभागृहाला सादर करीत आहे.

शुक्रवार, दिनांक 23 डिसेंबर, 2011 रोजीच्या कामकाजाच्या क्रमात दाखविण्यात येणाऱ्या अशासकीय कामकाजास द्यावयाचा वेळ ठरविण्याकरिता गुरुवार, दिनांक 22डिसेंबर, 2011 रोजी समितीची बैठक झाली. अशासकीय कामकाजासाठी एकूण 150 मिनिटांचा वेळ उपलब्ध आहे. विधानपरिषदेकडे एकूण चार अशासकीय विधेयके पुर:स्थापनार्थ आहेत. त्यांना 10 मिनिटांचा वेळ देण्यात यावा व उर्वरित 140 मिनिटांचा वेळ खालीलप्रमाणे अशासकीय विधेयकांना व ठरावास देण्यात यावा.

बॅलटव्दारा ठरविलेल्या प्राथम्यक्रमानुसार अशासकीय विधेयके

1) सन 2011 चे वि.प.वि. क्रमांक 8 महाराष्ट्र लोक आयुक्त आणि उप लोक आयुक्त (सुधारणा) विधेयक, 2011 श्री.दिवाकर रावते, वि.प.स. यांचे - 30 मिनिटांपेक्षा जास्त नाही.

2) सन 2011 चे वि.प.वि. क्रमांक 13 महाराष्ट्र सहाय्यक प्रजनन तंत्रज्ञान (नियमन) विधेयक, 2011 श्री. विनोद तावडे, वि.प.स. यांचे - 30मिनिटांपेक्षा जास्त नाही.

3) सन 2011 चे वि.प.वि. क्रमांक 9 महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (सुधारणा) विधेयक, 2011 श्री. विजय सावंत, वि.प.स. यांचे - 25 मिनिटांपेक्षा जास्त नाही.

4) सन 2011 चे वि.प.वि. क्रमांक 4 बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, 2011 श्री.विनोद तावडे, वि.प.स. यांचे - चर्चा अपूर्णावस्थेत - 30 मिनिटांपेक्षा जास्त नाही.

शनिवार, दिनांक 17 डिसेंबर, 2011 रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दाखविण्यात आलेला परंतु पुढे ढकलण्यात आलेला अशासकीय ठराव



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश शेंडगे, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक 47 - 25 मिनिटांपेक्षा जास्त नाही

**तालिका सभापती** : अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचे प्रतिवृत्त सभागृहास सादर झ ााले आहे.

श्री. चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचे प्रतिवृत्त सभागृहाला संमत आहे, असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

**पृ.शी./मु.शी.**: विशेष हक्क समितीचा अहवाल सादर करण्याची मुदत वाढविणे

श्री.अरुण गुजराथी (समिती प्रमुख) : सभापती महोदय, मी प्रस्ताव प्रस्तुत करतो की,

१) श्री.पांडुरंग फुंडकर, मा.विरोधी पक्ष नेते, विधानपरिषद यांनी श्री. श्री.निवास कर्वे, सह आयुक्त तथा उपाध्यक्ष (निलंबनाधीन), अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, अमरावती यांचेविरुध्द उपस्थित केलेले विशेषाधिकार भंगाचे व अवमानाचे प्रकरण,
२) श्री.पांडुरंग फुंडकर, मा.विरोधी पक्ष नेते, विधानपरिषद यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बुलढाणा यांचेविरुध्द उपस्थित केलेले विशेषाधिकार भंगाचे व अवमानाचे प्रकरण,
३) श्री.पुरुषोत्तम खेडेकर लिखित "शिवरायाच्या बदनामीची केंद्रे" या पुस्तकावरील मजकुरांवर आधारित "लोकप्रभा" अंकामधील प्रा.हरी नरके यांच्या "फॅसिस्ट शक्तीमुळे बहूजनाचे विभाजन" या लेखातील अवमानजनक लिखाणामुळे उद्‌भवलेले विशेषाधिकार भंग व अवमानाचे प्रकरण.

या तीन प्रकरणांवरील विशेष हक्क समितीचे अहवाल सादर करण्याकरिता म.वि.प.नियम १७८(१) च्या परंतुकान्वये पुढील अधिवेशनाच्या शेवटच्या दिवसापर्यंत मुदत वाढवून देण्यात यावी.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभापती** : आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होईल आणि दुपारी 2.00 वाजता पुन: भरेल.

(दुपारी 1.33 ते 2.00 मध्यंतर)

----

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(मध्यंतरानंतर)

**सभापतीस्थानी - माननीय उप सभापती**

**पृ.शी./मु.शी.: नियम 93 अन्वये सूचना**

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य सर्वश्री. रामनाथ मोते, संजय केळकर, भगवान साळुंखे, विनोद तावडे, नागो पुंडलिक गाणार वि.प.स. यांनी "रात्र शाळांच्या समस्यांची माहिती घेण्यासाठी व त्यावर उपाययोजना करण्यासाठी शासनाने समिती गठीत केली होती. या समितीच्या अहवालानुसार शासनाने कोणतीही कार्यवाही केली नसल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे वि.प.स.यांनी "पुणे जिल्ह्यातील वडगांव मावळ कामशेत जवळ विद्यावती चॅरिटेबल ट्रस्ट अनाथ आश्रमातील अल्पवयीन मुलगी गरोदर राहिल्याचे 24 नोव्हेंबर 2011 रोजी वृत्तपत्रात प्रसिध्द होणे, ज्या अनाथालयांमध्ये मुला-मुलींना एकत्रित ठेऊन संस्था चालक शासकीय अधिकाऱ्यांना हाताशी धरुन चालवित असलेल्या गोरखधंद्याची चौकशी करण्याची नितांत आवश्यकता" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

सन्माननीय सदस्य श्री.नागो पुंडलिक गाणार, वि.प.स.यांनी "शासनाच्या परवानगी शिवाय विकासकाशी करारनामा केल्यास पदाधिकाऱ्यांविरुध्द फौजदारी गुन्हा दाखल करण्याचे सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे आदेश असतानाही विकासकाशी करारनामा करणाऱ्या मुंबईतील घाटकोपर येथील काजरोळकर सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या पदाधिकाऱ्यांना उपनगर जिल्हाधिकारी कार्यालयाकडून पाठीशी घालण्याचा उघडकीस आलेला प्रकार"या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे.तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे.

सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर,वि.प.स.यांनी"सिंधुदुर्ग जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या 2010-2011 चे लेखापरीक्षण करतेवेळी लेखा परिक्षकाने "अ" वर्ग देणे,प्रत्यक्षात या बँकेची आर्थिक परिस्थिती बिकट असणे"या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे.तो नियम 93 चा होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** ......

सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम, वि.प.स. यांनी "रत्नागिरी जिल्ह्यातील ज्योती नर्सिंग महाविद्यालयाला नर्सिंग अभ्यासक्रम सुरु करण्याकरिता मान्यता देण्याची आवश्यकता"या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे.

उर्वरित नियम 93 च्या सूचनांना मी दालनात अनुमती नाकारली आहे.

-----

. . . . .व्ही-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**पृ.शी.**: 3 ते 6 वर्षे वयोगटातील बालकांवर अभ्यासाचे ओझे

लादण्यात येणे

**मु.शी.**: 3 ते 6 वर्षे वयोगटातील बालकांवर अभ्यासाचे ओझे लादण्यात येणे याबाबत सर्वश्री.रामनाथ मोते, संजय केळकर,भगवान साळुंखे, विनोद तावडे,नागो पुंडलिक गाणार वि.प.स.यांनी नियम 93 अन्वये दिलेली सूचना.

श्री.राजेंद्र दर्डा (शालेय शिक्षण मंत्री ) : सभापती महोदय, सर्वश्री.रामनाथ मोते, संजय केळकर, भगवान साळुंखे, विनोद तावडे, नागो पुंडलिक गाणार यांनी 3 ते 6 वर्षे वयोगटातील बालकांवर अभ्यासाचे ओझे लादण्यात येणे"या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

. . . .व्ही-4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, या सदनामध्ये सातत्याने आम्ही शिक्षकांच्या पगाराच्या संदर्भात, वेतन वाढीच्या संदर्भात तसेच त्यांच्या सेवा-शर्तीच्या संबंधात शासनाशी सातत्याने संघर्ष

करीत असतो. याठिकाणी नियम 93 च्या सूचनेच्या माध्यमातून आम्ही 3 ते 6 वयोगटातील मुलांचा महत्वाचा प्रश्न मांडत आहोत. त्यांच्या पाठीवरील ओझे कमी करण्यासाठी आमच्या याठिकाणी काही सूचना आहेत. आज परिस्थिती अशी आहे की, पूर्व प्राथमिक शिक्षणावर शासनाचे कोणत्याही प्रकारचे नियंत्रण नाही. त्यामुळे त्यांचा अभ्यासक्रम किंवा अन्य काही गोष्टींबाबत शासनाने उत्तर देताना म्हटलेले आहे की, यासंदर्भात अधिनियम तयार केला होता.परंतु याबाबतीत न्यायालयामध्ये एक प्रकरण गेले आणि त्यासंदर्भातील आदेश 2001 मध्ये रद्द झाला. माझा असा प्रश्न आहे की, या आदेशाबाबत न्यायालयामध्ये नक्की कोण गेले होते ? तसेच सदरहू आदेश न्यायालयाने रद्द केला की शासनाने मागे घेतला आहे याबाबत माहिती मिळावी आणि दुसरा विषय असा आहे की, 3 ते 6 वयोगटातील विद्यार्थ्यांना शिक्षणाची जबाबदारी, तसेच जो केंद्र शासनाच्या कायदा आहे त्याबाबत 2009 मध्ये बालकांचा शिक्षण हक्क विधेयक राज्यात लागू करण्यात आलेले होते, त्याअनुषंगाने आता शासनावर जबाबदारी आहे. म्हणून या वयोगटातील विद्यार्थ्यांना शिक्षण देण्यासाठी आणि त्यांना शिक्षणाच्या प्रवाहामध्ये आणण्यासाठी शासन कोणती उपाययोजना करणार आहे? हा अत्यंत महत्वाचा विषय असल्यामुळे याबाबत माननीय मंत्री महोदयांनी अधिक माहिती दिली तर बरे होईल.

श्री.राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते आणि इतर सन्माननीय सदस्यांनी खरे म्हणजे याठिकाणी अत्यंत महत्वाचा विषय उपस्थित केलेला आहे. 3 ते 6 वयोगटातील मुलांवर अभ्यासाचे कोणतेही ओझे पडता कामा नये. मूल सहा वर्षानंतर पहिल्या वर्गामध्ये जाते. पहिल्या वर्गामध्ये प्रवेश घेण्यापूर्वी म्हणजेच वयाच्या सहा वर्षांपूर्वी पूर्वतयारी करण्यासाठी प्ले-ग्रुप, के.जी. किंवा अप्पर के.जी.मध्ये प्रवेश घेतला जातो.सभापती महोदय, राज्यामध्ये पूर्व प्राथमिक शिक्षणाच्या केंद्रातील प्रवेशाचे नियमन करण्यासाठी आणि इतर अनुषंगिक बाबींवर नियंत्रण करण्यासाठी महाराष्ट्र शालेय पूर्व केंद्र (प्रवेशाचे नियमन) अधिनियम, 1996 (अधिनियम क्र.29) प्रसिध्द करण्यात आला होता. त्यानंतर अनेक ज्या संस्था शाळा चालवित होत्या त्यांच्याकडून तसेच अनेक लोकप्रतिनिधींकडून वेगवेगळया सूचना आल्या. त्याबाबत शासनाबरोबर त्यांनी चर्चा केली.मध्यंतरीच्या काळामध्ये काही लोक हायकोर्टामध्ये देखील गेले.मात्र हाय कोर्टाच्या सांगण्यावरुन नाही तर त्यावेळी झालेल्या चर्चेनुसार अधिनियम 1996 चे निरसन करण्यात आले. खरे म्हणजे या अधिनियमाच्या माध्यमातून शालेय पूर्व केंद्राची नोंदणी,प्रवेश देण्याची प्रवेश देण्याची

22-12-2011 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) V-5

APR/ 14:00

श्री.राजेंद्र दर्डा . . . .

कार्यपध्दती, मुलाखतींवर बंदी, शालेय व अनौपचारिक शिक्षणासाठी पुस्तके विहित करणे इ.अनेक विषय होते. त्यानंतर जेव्हा हे लक्षात आले की, आपण 1996 चा जो अधिनियम आहे, त्याला

पुनर्जीवित करावयास पाहिजे. तेव्हा डॉ.कुमूद बन्सल यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली. पण त्यांनी व्यक्तिगत कारणामुळे अध्यक्ष पदाचा राजीनामा दिला.

सभापती महोदय, मी आपल्या माध्यमातून सदनाला सांगू इच्छितो की, नुकतेच सप्टेंबर महिन्यामध्ये शालेय शिक्षण विभागाचे माननीय राज्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली एका समितीचे गठन करण्यात आलेले आहे. शालेय शिक्षण विभाग, महिला व बाल विकास विभाग, आदिवासी विकास विभाग, नगरविकास विभाग, ग्रामविकास विभाग, सामाजिक न्याय विभाग, अल्पसंख्यांक विभाग इ.विभागांचे जे सचिव आहेत ते या समितीचे सदस्य आहेत आणि या समितीची एक बैठक देखील झ ालेली आहे. या समितीमध्ये काही शैक्षणिक संस्थांचे प्रतिनिधी आणि शिक्षण तज्ज्ञांनाही घेण्यात आले आहे. या समितीला सहा महिन्याचा वेळ देण्यात आलेला आहे. त्यानंतर आपण निश्चितपणे या विषयाबाबत काही करु शकतो. पण एक गोष्ट खरी आहे की, आजच्या दिवशी शालेय शिक्षण विभागाच्या प्रवेश प्रक्रियेवर किंवा या संस्थावर आपले कोणतेही नियंत्रण नाही आणि आम्ही त्याचे नियमन करण्यासाठी ही समिती गठीत केलेली आहे.सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी अत्यंत महत्वाचा मुद्दा उपस्थित केला, त्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय,....

**उप सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आपल्याला निवेदनावर फक्त एकच प्रश्न विचारता येईल.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, माझा प्रश्न नाही. पण मी काल एक मुद्दा उपस्थित केला होता आणि त्या बाबत आपण आदेशही दिले होते. तसेच याठिकाणी माननीय मंत्री महोदय देखील उपस्थित आहेत.त्यामुळे शासनाकडे यासंदर्भात काही माहिती असेल तर शासनाने त्याबाबत निवेदन करावे.

श्री.राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, प्रधान सचिव, महाराष्ट्र विधान मंडळ यांनी हे पत्र गृह विभागाला पाठविलेले आहे. परंतु मी सकाळी आल्याबरोबर याबाबत माहिती घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यानुसार न्यू इंग्लिश स्कूल, मुरबाड येथील कार्यरत शिक्षक श्री.संदेश रघुनाथ गोडांबे यांनी आपणास मारहाण झाल्याची फिर्याद मुरबाड पोलीस ठाणे येथे दिनांक 21 डिसेंबर 2011 रोजी



श्री.राजेंद्र दर्डा . . . .

दीड वाजता दाखल केली होती आणि सदर गुन्हा हा दखलपात्र गुन्हा म्हणून केस नं.167/2011 असा नोंद झाला आहे. त्यामध्ये फौजदारी प्रक्रिया दंड संहिताचे कलम 324, 143, 147, 148, 149, 323, 504 व 506 लागू केला आहे आणि 21 डिसेंबर 2011 रोजी दुपारी 4.00 वाजता श्री.राकेश

दत्तात्रय डोंगरे व श्री.नानासाहेब दामोदर पाटील या दोन आरोपींना अटक करण्यात आली असून पुढील तपास सुरु आहे.

-----

. . . .व्ही-7

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**पृ.शी.**: वादळी वाऱ्यामुळे अलिबाग तालुक्यातील 6 खलाशी बेपत्ता असणे

**मु.शी.**: वादळी वाऱ्यामुळे अलिबाग तालुक्यातील 6 खलाशी बेपत्ता असणे याबाबत श्री.जयंत प्र.पाटील यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

(सन्माननीय सदस्य अनुपस्थित)

----

. . . .व्ही-8

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**पृ.शी.**: विदर्भातील आदिवासी विभागांतर्गत सुरु असलेल्या आश्रमशाळा सलग एकाच पाळ्यांमध्ये सुरु न ठेवता दोन पाळ्यांमध्ये सुरु ठेवण्यात येणे

**मु.शी.**: विदर्भातील आदिवासी विभागांतर्गत सुरु असलेल्या आश्रमशाळा सलग एकाच पाळ्यांमध्ये सुरु न ठेवता दोन पाळ्यांमध्ये सुरु ठेवण्यात येणे याबाबत सर्वश्री नागो

पुंडलिक गाणार,नितीन गडकरी, रामनाथ मोते, भगवान साळुंखे यांनी नियम 93 अन्वये दिलेली सूचना

श्री.बबनराव पाचपुते (आदिवासी विकास मंत्री) : सभापती महोदय,सर्वश्री.नागो पुंडलिक गाणार, नितीन गडकरी, रामनाथ मोते, भगवान साळुंखे यांनी " विदर्भातील आदिवासी विभागांतर्गत सुरु असलेल्या आश्रमशाळा सलग एकाच पाळीत सुरु न ठेवता दोन पाळीत सुरु ठेवण्यात येणे" या विषयावर नियम 93 अन्वये प्रस्तावाची सूचना दिली आहे, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्या प्रमाणे, मी पुढील निवेदन करीत आहे.

(येथे सोबत जोडलेले निवदन छापावे.)

. . . .व्ही-9

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



श्री.नागो पुंडलिक गाणार : सभापती महोदय, मी या सूचनेमध्ये तीन मुद्दे उपस्थित केले होते. पहिला मुद्दा म्हणजे विदर्भातील आदिवासी विभागांतर्गत सुरु असलेल्या आश्रमशाळा सलग एकाच पाळीमध्ये सुरु न ठेवता दोन पाळ्यांमध्ये सुरु ठेवल्या जात आहेत. पण याबाबत जे उत्तर देण्यात आले आहे, ते चुकीचे आहे. याठिकाणी असे उत्तर देण्यात आलेले आहे की, शाळेच्या वेळेमध्ये बदल करुन वेळ सकाळी 9.00 ते संध्याकाळी 4.30 वाजेपर्यंत केली आहे आणि हे उत्तर चुकीचे असून आजही दोन पाळ्यांमध्ये शाळा भरत आहे.

यानंतर कु.थोरात . . . .

अशुध्दीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ प्रथम सौ. रणदिवे ..... 14:10

श्री. नागो पुंडलिक गाणार. . .

माझा दुसरा प्रश्न असा होता की, आदिवासी आश्रमशाळेतील शिक्षकांना महिन्याचे वेतन 1 तारखेला दिले जात नाही. "त्या संदर्भात सूचना देण्यात आल्या आहेत" असे उत्तर देण्यात आलेले आहे. वर्षातून दोन किंवा तीन वेळाच पगार मिळतो कधीही महिन्याचा पगार त्या महिन्याला मिळत नाही ही वस्तुस्थिती आहे. सभापती महोदय, दिनांक 1 नोव्हेंबर, 2005 पूर्वी नियुक्त झालेल्या शिक्षक कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करण्याबाबत माझा तिसरा प्रश्न असा होता. या प्रश्ना बाबत निवेदनामध्ये असे म्हटले आहे की, "दिनांक 1 नोव्हेंबर, 2005 रोजी किंवा त्यानंतर नियुक्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांना नियमित निवृत्ती वेतन योजने ऐवजी केंद्र शासनाच्या धर्तीवर नवीन परिभाषित अंशदान निवृत्ती याजना लागू केली आहे." म्हणजे मी उपस्थित केलेले मुद्दे आणि निवेदनामध्ये दिलेली माहिती ही विषयांतर करणारी आहे, चुकीची आहे. म्हणून या निवेदनामध्ये दुरुस्ती करण्यात यावी व योग्य माहिती देण्यात यावी अशी माझी विनंती आहे.

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, उत्तर देत असताना सन्माननीय सदस्यांना अपेक्षित असणारे उत्तर देता येणार नाही. सकाळी आणि दुपारी भरविण्यात येणाऱ्या शाळांच्या संदर्भात प्रश्न विचारण्यात आलेला आहे. वास्तविक पहाता या आदिवासी आश्रमशाळा आहेत आणि आश्रमशाळांची संकल्पना अशी आहे की, मुले तेथेच राहतात त्यामुळे शिक्षकांनीसुध्दा तेथेच रहावे आणि त्यांनी मुलांच्या गुणात्मक शिक्षणाच्या संदर्भात लक्ष द्यावे. बाकीच्या शाळांमध्ये विद्यार्थी घरुन येतात म्हणून त्या शाळा सकाळी 11.00 ते संध्याकाळी 5.00 पर्यंत चालतात. येथे मात्र तशी परिस्थिती नाही. तरी सुध्दा आश्रम शाळांच्या वेळेमध्ये सुधारणा करण्यात यावी अशा प्रकारची मागणी आलेली आहे. त्या ठिकाणी जोपर्यंत बायोमेट्रिक हजेरी पध्दत सुरु करण्यात येणार नाही तोपर्यंत या बाबतीत निर्णय घ्यावयाचा नाही असे मी कालच सांगितलेले आहे.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, मला सन्माननीय मंत्र्यांच्या उत्तराला विरोध करावयाचा नाही पण मला मंत्री महोदयांच्या लक्षात आणून द्यावयाचे आहे की, शासनाच्या म्हणण्यानुसार सकाळी 11.00 ते संध्याकाळी 5.00 अशा एका सत्रामध्ये या आश्रमशाळा सुरु आहेत. सन्माननीय सदस्यांचा प्रश्न असा होता की, सकाळी 11.00 ते सध्याकाळी 5.00 या वेळेत या शाळा न भरता दोन सत्रामध्ये भरत आहेत आणि ही वस्तुस्थिती त्यांनी शासनाच्या निदर्शनास आणलेली आहे. सकाळी 11.00 ते संध्याकाळी 5.00 पर्यंत या शाळा सुरु ठेवण्यास त्यांची हरकत नाही.

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बबनराव पाचपुते : मी या ठिकाणी तेच सांगितलेले आहे. दोन सत्रामध्ये आश्रमशाळा सुरु आहेत, त्याच्या ऐवजी त्या एका सत्रात करण्याच्या संदर्भात आश्रमशाळेतील लोक, अनेक आमदार यांची बैठक होऊन मागणी करण्यात आली होती. मुले त्याच ठिकाणी रहात असल्यामुळे मुले सकाळी लवकर शाळेत आली तर त्यांना बाकीचे काम उरकण्यासाठी आणि थोडासा अभ्यास करण्यासाठी दुपारी वेळ मिळतो म्हणून मुद्दाम या आश्रमशाळा दोन सत्रामध्ये ठेवण्यात आलेल्या आहेत. आश्रमशाळांमध्ये शिक्षक शाळेत येत नाहीत, गैरहजर असतात ही जी अडचण होती ती बायोमेट्रिक हजेरी पध्दती सुरु केल्यानंतर संपणार आहे. बायोमेट्रिक हजेरी पध्दत सुरु केल्यानंतर त्या शिक्षकाची दिवसातून तीन वेळा हजेरी घेण्यात येईल. त्यामुळे हा प्रश्न राहणार नाही. हा प्रश्न संपला तरी मुलांवर गुणात्मक लक्ष देण्यासाठी शिक्षकांनी वेळ दिला पाहिजे या संदर्भात शिक्षकांना सूचना देण्यात येतील आणि येत्या जून महिन्यापासून या शाळा एका सत्रामध्ये सुरु करण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

सन्माननीय सदस्यांनी जो दुसरा प्रश्न विचारलेला आहे त्या संदर्भात निवेदनामध्ये असे म्हटलेले आहे की, "दिनांक 1 नोव्हेंबर, 2005 रोजी किंवा त्यानंतर नियुक्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी नियमित निवृत्ती वेतन योजने ऐवजी केंद्र शासनाच्या धर्तीवर नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे." त्याचबरोबर शिक्षकांचा पगार 1 तारखेला व्हावयास पाहिजे पण त्या मध्ये काही अडचणी येतात. बाकीच्या अडचणी आहेत या संदर्भात पी.ओ.लेव्हलला आणि खालच्या स्तरावर सूचना देण्यात आलेल्या आहेत. सर्वसाधारणपणे 1 तारखेऐवजी किमान 5 तारखेच्या आत सर्व पगार झाले पाहिजेत, अशा प्रकारच्या अत्यंत सक्त अशा सूचना देण्यात आलेल्या आहेत.

----

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: अतिरिक्त आयुक्त, आदिवासी विकास, अमरावती यांनी जनरेटर खरेदी प्रकरणात केलेला भ्रष्टाचार

**मु.शी.**: अतिरिक्त आयुक्त, आदिवासी विकास, अमरावती यांनी जनरेटर खरेदी प्रकरणात केलेला भ्रष्टाचार याबाबत श्री. जगदिश गुप्ता यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

( सन्माननीय सदस्य अनुपस्थित )

----

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : मिहान प्रकल्पामुळे भूमिहीन होणाऱ्या शेतकऱ्यांना बाजारभावापेक्षा अधिक किंमत अदा करुन दिलासा देण्याची आवश्यकता.

**मु. शी.** : मिहान प्रकल्पामुळे भूमिहीन होणाऱ्या शेतकऱ्यांना बाजारभावापेक्षा अधिक किंमत अदा करुन दिलासा देण्याची आवश्यकता यासंबंधी डॉ. नीलम गोऱ्हे,सर्वश्री दिवाकर रावते,रामदास कदम, डॉ.दीपक सावंत, सर्वश्री गोपीकिसन बाजोरिया, किसनचंद तनवाणी,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

डॉ. नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करते.

"नागपूर येथील विमान तळाचे आंतरराष्ट्रीय विमानतळात रुपांतर करुन तेथे विमान दुरुस्तीचा मोठा हब उभारण्यासाठी लागणारी हजारो एकर जागा संपादित करण्याकरिता नोडल एजन्सी म्हणून कार्यरत असलेल्या शासनाच्या मिहान कंपनीने या प्रकल्पामुळे भूमिहीन होणाऱ्या हजारो शेतकऱ्यांना विश्वासात घेऊन बाजारभावापेक्षा अधिक किंमत अदा करुन त्यांना दिलासा देण्याची आवश्यकता असताना याबाबत,शासनाने दाखविलेली अक्षम्य उदासीनता, यामुळे तमाम शेतकऱ्यांत पसरलेला तीव्र असंतोष व संतापाची लाट, परिणामी जमीन संपादनाची प्रक्रिया लांबणे, विमानतळ विस्तारीकरणाच्या सदर महत्वाकांक्षी प्रकल्पासाठी लागणाऱ्या सोय-सुविधा उपलब्ध नसणे, सदर प्रकल्प अन्य राज्यात जाण्याचा निर्माण झालेला धोका, या सर्व बाबी लक्षात घेता शासनाने या प्रकरणी तातडीने केलेली व करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया."

श्री. पृथ्वीराज चव्हाण ( मुख्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, नागपूर या ठिकाणी अधिवेशन होत आहे. मिहान प्रकल्पाच्या संदर्भात ही लक्षवेधी सूचना विचारण्यात आलेली आहे आणि या लक्षवेधी सूचनेला उत्तर देण्यासाठी सन्माननीय मुख्यमंत्री स्वत: सभागृहात आलेले आहेत ही महत्वाची गोष्ट आहे.

सभापती महोदय, मला या लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून दोन-तीन प्रश्न विचारावयाचे आहेत. जमिनीच्या किंमतीमध्ये तफावत आहे आणि या तफावतीमुळे जमिनीची वेगवेगळया पध्दतीची वर्गवारी केली आहे. या वर्गवारीमुळे काही शेतकऱ्यांना फक्त एक ते दीड लाख रुपये भाव देण्यात आलेला आहे. मी मध्यंतरी सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे निवेदन वाचले त्यामध्ये वेळ पडली तर 146 हेक्टर जमिनीला हेक्टरी दीड कोटी रुपयाची भरपाई देण्याची तयारी दाखविलेली आहे. एकूण 4188 हेक्टर जमीन पाहिजे आहे त्यापैकी 146 हेक्टर जमिनीला दीड कोटी रुपये भाव देण्यास शासन तयार झालेले आहे. शेतकऱ्यांना त्यांच्या शेतीची वाजवी किंमत दिलीच पाहिजे. परंतु बाकीचे जे शेतकरी आहेत आणि ज्यांनी शेवटपर्यंत जमिनी देण्याचे थांबविण्या ऐवजी सुरुवातीलाच शासनाला सहकार्य केले आहे त्या शेतकऱ्यांना मात्र कवडीमोलाने आपल्या जमिनी विकाव्या लागल्या आहे. सन 2004 पासून आज 2011 हे वर्षे सुरु आहे. या मधल्या तीन-चार वर्षाच्या कालावधीमध्ये जमिनीचे भाव प्रचंड प्रमाणात वाढलेले आहेत. म्हणून माझा प्रश्न असा आहे की, ज्या शेतकऱ्यांनी सुरुवातीला जमिनी दिल्या त्यांना 12.5 टक्के विकसित जमीन देण्यात येणार होती. त्याप्रमाणे किती शेतकऱ्यांना विकसित जमीन देण्यात आलेली आहे?

सभापती महोदय, निवेदनाच्या शेवटच्या परिच्छेदामध्ये असे म्हटले आहे की, "रोजगार उपलब्ध होणार आहे." पण या कंपनीने स्थानिक लोकांना वेटर, मोलकरीण आणि शिपाई या पलीकडचे रोजगार दिलेले आहेत असे चित्र दिसत नाही. किंबहुना रोजगार द्यावयाला सुरुवातच झालेली नाही म्हणून शैक्षणिक पात्रतेनुसार रोजगार देण्याच्या संदर्भात शासनाने काय धोरण आखलेले आहे. माझा तिसरा प्रश्न असा आहे की, आमच्या माहिती प्रमाणे मंदीच्या परिणामामुळे या मिहान प्रकल्पामध्ये 50 पैकी फक्त 4 कंपन्यांनीच कामाला सुरुवात केलेली आहे. मग उर्वरित कंपन्यांनी गाशा गुंडाळला आहे काय? नवीन कंपन्या येथे येण्याच्या संदर्भात शासन काय प्रयत्न करीत आहे, याचे उत्तर देण्यात यावे, अशी माझी विनंती आहे.

..6..





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, मिहान प्रकल्प विदर्भाच्या दृष्टीने, नागपूरच्या दृष्टीने आणि या राज्याच्या दृष्टीने किंबहुना देशाच्या दृष्टीने एक महत्वाचा प्रकल्प आहे. या प्रकल्पाची मुख्य रुपरेषा अशी आहे की, अस्तित्वात असलेल्या विमानतळाला आंतरराष्ट्रीय दर्जा देऊन त्यामध्ये दोन धावपट्टया तयार करण्यात याव्यात. नागपूरची विशेष भौगोलिक परिस्थिती लक्षात घेऊन ज्यांना एमआरओ असे म्हणतात या विमान दुरुस्ती कंपन्या या ठिकाणी याव्यात. भारतावरुन जी विमाने उड्डाण करतात त्यांना काही मेन्टेनन्सच्या सर्व्हिसेस लागल्या तर त्यांना दुबई किंवा सिंगापूरला जावे लागू नये तसेच जी विमाने नागपूरवरुन उड्डाण करुन पुढे जातात त्यांनी नागपूरला उतरावे त्या माध्यमातून प्रचंड मोठा आर्थिक फायदा नागपूरला, या राज्याला आणि देशाला मिळेल. या ठिकाणी नोकऱ्या निर्माण होतील आणि अर्थ व्यवस्थेमध्ये भर पडेल अशी ही मूलभूत कल्पना आहे. त्याच बरोबर याच्या शेजारी जे विशेष आर्थिक क्षेत्र निर्माण करण्यात आलेले आहे. त्या विशेष आर्थिक क्षेत्रामध्ये जी औद्योगिक उत्पादने होतात त्यांची निर्यात करण्याची किंवा ती उत्पादने विमानाने पाठविण्याची गरज असते अशा प्रकारची औद्योगिक उत्पादनांचे उद्योग भारताच्या मध्यभागी असलेल्या शहरात प्रस्थापित केले तर या ठिकाणी खूप मोठे उद्योग येतील आणि त्याचा फायदा या राज्याला, विदर्भाला आणि नागपूरला मिळेल अशी मूळ कल्पना होती.

सभापती महोदय, सुरुवातीला सन 2000 मध्ये ही संकल्पना केली गेली. सन 2002 ला जमीन अधिग्रहण करण्याचे काम सुरु झाले. त्यानंतर या प्रकल्पाकरिता एकंदर 4188 हेक्टर जमीन घेण्याचे ठरले होते. त्यापैकी काही जमीन शासकीय आहे, ती फक्त हस्तांतरित करावयाची आहे. अधिग्रहण करावी लागणारी जमीन 3008 हेक्टर एवढी आहे. त्यापैकी 2862 चे निवाडे झालेले आहेत. फक्त 136 हेक्टर जमीन नागपूर शहरांतर्गत आहे. इतर जमीन शहराबाहेर असलेली ग्रामीण जमीन आहे. स्वाभाविक आहे की, नागपूर शहरातील जमिनीचा भाव आणि ग्रामीण भागातील जमिनीचा भाव वेगळा असतो, म्हणून या जमिनीचे अधिग्रहण होऊ शकलेले नाही. ज्याला इंग्रजीमध्ये क्रिपिंग ॲक्विझिशन असे म्हणतात. हळूहळू आपण जमीन घेत गेलो की, नंतर घेतलेल्या जमिनीच्या किंमती भरमसाठ वाढलेल्या असतात. असे व्हायला नको होते पण तसे झालेले आहे. दुर्दैवाने ही 136 हेक्टर जमीन सोडता येणे शक्य नाही कारण ती नेमकी दुसऱ्या धावपट्टीमध्ये आहे.

यानंतर श्री. बरवड....

अशुद्धित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पृथ्वीराज चव्हाण ...

शिवणगाव-जामठा-जयताळा येथील जमीन आहे. ही जमीन अधिग्रहीत झाली नाही तर या प्रकल्पाची मूळ संकल्पनाच संपून जाईल. किंबहुना ती एमआयडीसीच ठरेल. त्यामध्ये आंतरराष्ट्रीय काही होणार नाही. त्या ठिकाणी दुसरी धावपट्टी झाली तरच त्या ठिकाणी एमआरओ आणू अशी अट आहे.

ज्यावेळी आपण बोईन्ग कंपनीकडून मोठ्या प्रमाणात विमाने विकत घेतली त्यावेळी अट घातली होती. तुम्हाला मोठा खर्च करुन एमआरओ करावा लागेल आणि आम्ही नागपूरला अमुकअमुक सुविधा देऊ. ते त्यांनी मान्य केले. त्यामुळे दुसरी धावपट्टी होणे अत्यंत आवश्यक आहे. त्याकरिता राहिलेली 146 हेक्टर जमीन अधिग्रहीत करणे अतिशय गरजेचे आहे. आपल्याला माहीत आहे की, आपण कोठलाही प्रकल्प करतो तेव्हा एक तर भूसंपादनाचा खर्च येतो. भूसंपादन अधिनियम, 1894, तसेच 1966 चा अधिनियम आहे त्या माध्यमातून आतापर्यंत आपण भूसंपादन केलेले आहे. परंतु ही जमीन संपादित करावयाची शिल्लक राहिलेली आहे. त्याचबरोबर पुनर्वसन करण्याचा जो खर्च आहे तो आपण 1999 च्या कायद्याप्रमाणे करतो. या दोन गोष्टी यामध्ये आहेत. पहिल्या प्रश्नाचे उत्तर असे आहे की, यामध्ये उशीर झालेला आहे. काही जमीन अधिग्रहीत केलेली नाही. ती शहरातील जमीन आहे म्हणून त्या जमिनीला अधिक किंमत द्यावी लागेल. तशा प्रकारचा निर्णय झालेला आहे. हे निगोशिएटेड आहे. आपण कम्पल्सरी ॲक्विझिशन करणार नाही. कारण शेवटी शेतकऱ्याला योग्य तो भाव मिळाला पाहिजे आणि प्रकल्पही झाला पाहिजे. त्याकरिता जे अधिकारी नियुक्त केले होते त्यांनी ज्या लोकांच्या जमिनी आहेत त्यांच्याशी चर्चा करुन त्यांचे पुनर्वसन कशा प्रकारे केले जाणार आहे हे सांगून निगोशिएटेड किंमत पहिल्यांदा सव्वा लाख रुपये प्रती हेक्टर अशी निर्धारित केली. ती चर्चा केल्यानंतरही लोकांनी सांगितले की, एवढी किंमत चालणार नाही. नंतर मग शासनाकडून नुकताच एक निर्णय घेतला गेला की, आपण प्रती हेक्टरी दीड कोटी रुपये किंमत द्यावी. ही फक्त संपादनाची किंमत आहे. पुनर्वसनाचा खर्च वेगळा आहे. त्यांना कोठे पुनर्वसित करावयाचे हा भाग वेगळा आहे. त्यामुळे या दोन्ही किंमती वेगवेगळ्या आहेत.

सन्माननीय सदस्यांचा दुसरा प्रश्न असा होता की, बऱ्याच कंपन्या स्थानिकांना नोकरी

..2...

RDB/

श्री. पृथ्वीराज चव्हाण ....

देणार होत्या पण त्यांनी नोकऱ्या दिलेल्या नाहीत. आता फक्त काही ठराविक कंपन्याच आलेल्या आहेत आणि ही गोष्ट स्वाभाविक आहे की, त्यांनी सुरुवातीला ड्रायव्हर, शिपाई अशा नोकऱ्या लोकांना दिल्या. त्या प्रकल्पामध्ये जर उच्च पदावर नोकऱ्या द्यावयाच्या असतील, इंजिनिअर्स किंवा सॉफ्टवेअरचे लोक भरावयाचे असतील तर त्यासाठी त्यांना त्या क्वालिफिकेशनचे लोक पाहिजेत. त्यासाठी प्रशिक्षण देण्याची व्यवस्था आपण केलेली आहे. आपल्या खर्चाने त्यांना प्रशिक्षण देऊन कोणत्या तरी चांगल्या पगाराची नोकरी मिळेल याकरिता सुध्दा प्रयत्न चालू आहेत. अजूनपर्यंत एक-दोन कंपन्या सोडल्या तर कामच सुरु झालेले नाही. मला खात्री आहे की, ज्यावेळी सर्व कंपन्या येतील त्यावेळी नोकरीचा काही प्रश्न येणार नाही.

सन्माननीय सदस्यांनी पुढचा प्रश्न असा विचारला की, किती कंपन्यांनी काम सुरु केले आहे ? 51 कंपन्यांना 1780 एकर जमिनीचे वाटप झालेले आहे. अनेक कंपन्यांनी बांधकामे सुरु केलेली आहेत. मला सांगण्यास आनंद होतो की, देशातील सर्वात मोठी सॉफ्टवेअर कंपनी किंबहुना जगातील एक मोठी सॉफ्टवेअर कंपनी असलेल्या टाटा कन्सल्टन्सी कंपनीने त्या ठिकाणी जमीन घेतली होती आणि त्या जमिनीमध्ये दोन-चार दिवसापूर्वी माझ्या हस्ते पायाभरणी समारंभ झाला आणि या प्रकल्पामध्ये पहिल्या टप्प्यामध्ये 8 हजार लोक आणि दुसऱ्या टप्प्यामध्ये एकूण 16 हजार लोक घेतले जाणार आहेत. हा दुसरा प्रकल्प आहे. त्यामुळे हळूहळू लोक येण्यास तयार होत आहेत. त्या ठिकाणी प्रचंड प्रमाणावर रोजगार निर्माण होईल. संपूर्ण प्रकल्प पूर्ण झाल्यावर कमीतकमी सव्वा ते दीड लाख लोकांना रोजगार मिळेल आणि त्यामध्ये प्रकल्पग्रस्तांच्या मुलांना निश्चितपणे सामावून घेण्यात येईल असे मला वाटते.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, या ठिकाणी जेव्हा प्रकल्प येतात त्यावेळी प्रत्येक जण कबूल करतात की, आम्ही स्थानिक लोकांना नोकऱ्या देऊ. पण आतापर्यंत आलेल्या कंपन्यांमध्ये आमचा अनुभव काही चांगला नाही. त्या ठिकाणी ज्या कंपन्या येणार आहेत त्यांनी स्थानिक लोकांना प्राधान्य देऊन किती टक्क्यापर्यंत स्थानिक लोकांना सामावून घ्यावयाचे आहे ? आपण सांगितले की, त्या क्वालिटीचे जे इंजिनियर्स वगैरे पाहिजेत त्यासाठी त्यांना नोकऱ्या देण्याकरिता प्रशिक्षण आपण देणार आहोत. किती लोकांना त्या ठिकाणी नोकऱ्या मिळू शकतील ?

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, संपूर्ण प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर किती नोकऱ्या उपलब्ध होऊ शकतील या बाबतीत त्यातील टप्पे मी विस्ताराने आपल्याला सांगितले. जोपर्यंत जमीन अधिग्रहण होत नाही, जोपर्यंत दुसरी धावपट्टी होत नाही तोपर्यंत ते लोक आलेले नाहीत. त्या लोकांनी सांगितले होते की, आम्ही दुसरी धावपट्टी झाल्यावर येऊ. त्यामुळे ज्यावेळी संपूर्ण प्रकल्प पूर्ण होईल त्यावेळी जवळजवळ सव्वा ते दीड लाख लोकांना नोकऱ्या लागणार आहेत. त्यामुळे जे 1000 ते 1500 प्रकल्पग्रस्त आहेत त्यांच्या घरातील एक-एक व्यक्तीला योग्यतेप्रमाणे नोकऱ्या देण्यामध्ये मला काहीच अडचण वाटत नाही. आता कोणत्या नोकऱ्या मिळतील हे सांगणे अवघड आहे. जोपर्यंत मोठ्या प्रमाणावर लोक येऊन काम सुरु करीत नाहीत तोपर्यंत ते सांगणे अवघड आहे. आता टीसीएस कंपनी आलेली आहे. त्यांनी दोन दिवसांपूर्वी पायाभरणी समारंभ केलेला आहे. त्यांना इमारत उभी करण्यासाठी दोन वर्षे लागतील. त्यानंतर लोक येण्यास सुरुवात होईल्. त्यानंतर त्यांना नोकऱ्या लागतील. त्या ठिकाणी खूप लोक येणार आहेत. सत्यम कंपनीला आम्ही पहिल्यांदा जमीन दिली. ताल मॅन्युफॅक्चरींग नावाची विमान कंपनी येत आहे. बोईन्ग कंपनी येणार आहे. अशा अनेक कंपन्यांनी जमिनी घेऊन ठेवलेल्या आहेत. महिंद्रा अँड महिंद्रा, मोरास कंपनी वगैरे कंपन्या येणार आहेत. त्या ठिकाणी डी.वाय.पाटील यांच्या संस्थेने एक आंतरराष्ट्रीय शाळा सुरु केलेली आहे. त्यामुळे त्या ठिकाणी चांगल्या प्रकारचे इन्फ्रास्ट्रक्चर तयार होईल. मला असे वाटते की, राज्यातीलच नव्हे तर देशातील अत्यंत उत्कृष्ट स्पेशल इकॉनॉमीक झोन त्या ठिकाणी निर्माण होत आहे.

सभापती महोदय, माझी आपल्या माध्यमातून सभागृहातील सर्वपक्षीय नेते मंडळींना विनंती आहे आणि विशेषत: नागपूर परिसरातील आणि विदर्भातील सर्व राजकीय पक्षाच्या नेत्यांना मला विनंती करावयाची आहे की, हे अधिग्रहण मात्र पूर्ण झाले पाहिजे. ते जर झाले नाही तर पुढचे काहीच होणार नाही. दुसरी जर धावपट्टी झाली नाही तर ते होणार नाही. त्या ठिकाणी साधे विमानतळ आहेच. पण स्पेशल इकॉनॉमीक झोन करावयाचे आहे त्यामध्ये ज्यांनी येण्याचे वचन दिलेले आहे ते येणार नाहीत आणि मग त्यामध्ये आणि एमआयडीसीमध्ये काही फरक असेल, असे मला वाटत नाही. नागपूरचे भवितव्य ठरविणारा हा प्रकल्प आहे. आपण सर्वांनी त्याकरिता खूप प्रयत्न केलेले आहेत. मला असे वाटते की, अलीकडे शासनाने जे निर्णय घेतले त्यामुळे

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. पृथ्वीराज चव्हाण .....

निश्चितपणे या प्रकल्पाला चालना मिळेल आणि त्याकरिता शासनाने भरपूर पैसे दिलेले आहेत. आतापर्यंत बजेटमध्ये इतके पैसे कधीही ठेवले गेले नव्हते तेवढे पैसे आम्ही हा मिहान प्रकल्प पूर्ण करण्याकरिता ठेवलेले आहेत. जवळजवळ 7-8 वर्षाच्या ब्रेकनंतर पुन्हा याला शासनाने चालना दिलेली आहे आणि हा प्रकल्प पूर्ण करण्याकरिता सर्वांचे सहकार्य अपेक्षित आहे.

श्री एस.क्यू.जमा : सभापति महोदय, मैं तो सभी विदर्भ वासियों की ओर से माननीय मुख्यमंत्री महोदय को धन्यवाद दूंगा कि उन्होंने मिहान कार्गो हब के काम को बहुत ही गति दे दी है. मेरा पहला प्रश्न यह है कि डिफेंस मिनिस्ट्री का गजराज नाम का एक प्रोजेक्ट था. उस प्रोजेक्ट की जो लेंड है, उस लेंड के बदले में दूसरी लेंड उनको देनी है. वह मामाला बहुत दिनों से पेंडिंग पड़ा है. उस बारे में माननीय मंत्री महोदय से जानना चाहूंगा कि डिफेंस मिनिस्ट्री का गजराज प्रोजेक्ट यहां से तो शिफ्ट होगा, लेकिन उन्होंने दूसरा जो बेस बनया है उसकी लेंड स्वेपिंग के बारे में माननीय मुख्यमंत्री जी का क्या कहना है ?

मेरा दूसरा प्रश्न यह है कि एमएडीसी ने एयरपोर्ट ऑथिरिटी ऑफ इंडिया से एग्रीमेंट करके आधे कर्मचारियों का ट्रांस्फर किया है. उनकी पगार के बारे में एक प्रश्न है और एयरपोर्ट के जनरल मेंटेनेंस के बारे में भी मैं कहना चाहूंगा कि वहां पर रन-वे पर भी कुछ पॉट होल्स हैं, वह रन-वे स्मूथ नहीं हैं. मेरा कहना है कि नागपुर एयरपोर्ट का इंटरनेशनल इम्पॉर्टेंस है. यहां से करीब 4 सौ से ज्यादा प्लेन ईस्ट-वेस्ट, नॉर्थ-वेस्ट तथा साऊथ डायरेक्शन में क्रास करते हैं. मेरा प्रश्न है कि एमआइटेल जो कि पहले एमआइपीएल था, यह एमएडीसी के साथ और एयरपोर्ट ऑथिरिटी के साथ ज्वाइंट वेंचर कम्पनी है. अखबारों में पढ़ने को मिलता है कि उनके पास फंड नहीं है. उनका कहना है कि वे एयरपोर्ट का रख-रखाव ठीक ढंग से नहीं कर पाते हैं. वहां पर ट्रालीज ठीक ढंग से नहीं चल रही हैं या वहां के दूसरे उपकरण ठीक से काम नहीं कर रहे हैं. इसलिए माननीय मुख्यमंत्री जी मैं जानना चाहता हूं कि क्या माननीय मुख्यमंत्री जी इस बारे में कुछ आदेश देंगे ताकि एयरपोर्ट का मेंटेनेंस ठीक ढंग से हो सके और एयरपोर्ट का जनरल स्टेटस ऊंचा हो सके?

...5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी दोन तीन प्रश्न विचारलेले आहेत. संरक्षण खात्याचा जो गजराज प्रकल्प आहे त्याकरिता 400 हेक्टर जमीन लागणार आहे. तितकी जमीन आज त्या प्रोजेक्टला उपलब्ध आहे. फक्त त्यांना जमीन एका विशिष्ट ठिकाणी देण्यात येणार आहे की, ज्यामुळे एअरपोर्ट ऑपरेशनला काही अडचण निर्माण होऊ नये. यातील जी जमीन एअरपोर्टच्या ऑपरेशनल एरियामध्ये आहे त्या जमिनीच्या मालकीबद्दलही प्रश्न निर्माण झ ालेला आहे. ती जमीन एअरपोर्ट ॲथॉरिटी ऑफ इंडियाची आहे किंवा डिफेन्स मिनिस्ट्रीची आहे. त्यामुळे त्या जमिनीची मालकी एकदा निश्चित झाली की जमिनीची अदलाबदली करुन विमानतळाला लागणारी जी जमीन आहे ती आम्ही घेणार आणि त्याच्या बदल्यात 400 हेक्टर जमीन जी आमच्याकडें आता आहे ती जमीन आम्ही गजराजला देणार. परंतु मुळात आम्हाला जी जमीन एअरपोर्टसाठी घ्यावयाची आहे त्या जमिनीची मालकी संरक्षण खात्याची आहे की एअरपोर्ट खात्याची आहे हा वाद चालू आहे.

यानंतर श्री. गिते ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पृथ्वीराज चव्हाण...

तो वाद सोडविण्याकरिता मी दिल्ली येथे गेलो होतो. संरक्षण मंत्री, तसेच केंद्रीय उड्डयन मंत्री यांचे समवेत चर्चा केली आहे. या कामासाठी जमिनीची अदला बदल करु. ती जमीन कोणाची आहे ते तुम्ही नंतर ठरवा. परंतु ती जमीन अदला बदल करुन आम्हाला उपलब्ध करुन द्यावी. तो एक प्रश्न निर्माण झाला आहे.

दुसरे असे की, या ठिकाणी एक्झस्टींग रन-वे किंवा त्याला रिसर्फेसिंग करणे गरजेचे आहे. या कामासाठी 30 ते 40 कोटी रुपयांचा खर्च येणार आहे. आपल्याला माहिती आहे की, एमआयपीएलजी कंपनी आहे.त्यात निम्मी भागीदारी केंद्र सरकारच्या एअरपोर्ट ॲथॉरिटीची आहे आणि निम्मी भागीदारी महाराष्ट्र सरकारच्या एमएडीसीची आहे. त्यामुळे यापुढे जे प्रोजेक्ट करु ते निम्मे निम्मे भागीदारीत करण्याचा विचार आहे. खरे म्हणजे एअरपोर्टचा रन-वे लवकर दुरुस्त करावयाचा आहे. त्यासाठी प्रयत्न चालू आहेत. हे ज्वॉईंट व्हेंचर आहे ही बाब मी मघाशीच सांगितली आहे.

-----------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**लक्षवेधी सूचना क्रमांक 2 संबंधी**

**उप सभापती** : आजच्या कार्यक्रमपत्रिकेत दाखविण्यात आलेली लक्षवेधी सूचना क्रमांक 2 उद्या चर्चेला घेण्यात येईल.

-------

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : कृषी शाखेच्या विद्यार्थ्यांनी एमपीएससीच्या परीक्षेस पूर्वीप्रमाणेच अभ्यासक्रम ठेवणे बाबतची केलेली मागणी

**मु. शी.** : कृषी शाखेच्या विद्यार्थ्यांनी एमपीएससीच्या परीक्षेस पूर्वीप्रमाणेच अभ्यासक्रम ठेवणे बाबतची केलेली मागणी यासंबंधी सर्वश्री सतीश चव्हाण, रमेश शेंडगे, विक्रम काळे, श्रीमती उषाताई दराडे, सर्वश्री हेमंत टकले, दीपक सावंत,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.सतीश चव्हाण (औरंगाबाद विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"वर्ग-१/वर्ग-२ पदासाठी (एम.पी.एस.सी.) महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत सरळ सेवा भरतीची प्रक्रिया केली जात असणे, सन २००७ यावर्षी आखण्यात आलेल्या अभ्यासक्रमानुसार सध्या परीक्षा घेतल्या जात असणे, कृषीशास्त्र व फलोत्पादनशास्त्र हा सदर परीक्षेत ऐच्छिक विषय असणे, सन २००७ च्या अभ्यासक्रमानुसार १६०० गुणाची परीक्षा असणे, त्यापैकी ४०० गुण ऐच्छिक विषयास असणे, कृषि शाखेतून पदवीधर झालेल्या मुलांना याचा २५ टक्के फायदा होत असणे व शेतकऱ्यांच्या मुलांना प्रशासकीय सेवत प्रवेश करण्याची संधी उपलब्ध होत होती परंतु एम.पी.एस.सी. ने अभ्यासक्रमाचा नवा मसुदा २१ नोव्हेंबर, रोजी जारी केला असून या नव्या अभ्यासक्रमातून ऐच्छिक विषयाला फाटा देण्यात आलेला असण्याचे कृषी शाखेच्या विद्यार्थ्यांना नवीन अभ्यासक्रमानुसार फायदा होणार नसल्यामुळे सदर अभ्यासक्रमात ऐच्छिक विषय पूर्वीप्रमाणेच ठेवणेबाबत होत असलेली मागणी व कृषी शाखेच्या विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झालेली असंतोषाची भावना, यावर शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही."

श्री.पृथ्वीराज चव्हाण ( मुख्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

------

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सतीश चव्हाण : सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेला अतिशय व्यापक असे उत्तर विभागाकडून देण्यात आले आहे. या सभागृहात माननीय मुख्यमंत्री उपस्थित आहेत, त्यामुळे त्यांच्याकडून आम्हाला न्याय मिळेल अशी आमची अपेक्षा आहे. 22 नोव्हेंबर,2011 रोजी एम.पी.एस.सी.चा नवीन मसुदा जाहीर करण्यात आला आहे. या परीक्षेतून कृषी विषयाला पूर्णपणे हद्दपार करण्यात आलेले आहे. उत्तरात असे म्हटले आहे की, नवीन अभ्यासक्रमात सामान्य अध्यंयनाच्या पेपरवर भर दिला आहे. या ठिकाणी विभागाने अत्यंत चुकीचे उत्तर दिलेले आहे. यासंबंधीचा ड्राफ्ट माझ्याकडे उपलब्ध आहे. तो ड्राफ्ट मी आपल्या मार्फत शासनास सादर करतो. त्यामध्ये ऐच्छिक विषयात इतिहास, भूगोल, कायदा, राज्यघटना, अर्थशास्त्र या विषयांचा समावेश आहे. या परीक्षेत केवळ याच विषयाचे विद्यार्थी पास होतील. यात कृषी विषयाचा कोठेही उल्लेख दिसून येत नाही. ड्राफ्ट वाचल्यानंतर 900 पैकी त्यास 20 गुण असतील. कृषी विषयास अनन्य साधारण महत्व आहे. आतापर्यंत ऐच्छिक कृषी विषयामुळे ग्रामीण भागातील कृषी पदवीधर चांगल्या प्रकारे भरती होत होते. या राज्यात मा.श्री.मनोहर जोशी मुख्यमंत्री असताना, ज्यांच्या अर्जाला 7/12 चा उतारा जोडलेला असावयाचा, त्यास अग्रक्रमाने प्रवेश दिला जात होता. तो जी.आर. संबंधित विभागाने गुपचूप मागे घेतला. त्यांनी तो जी.आर.कधी मागे घेतला हे कोणाला कळू दिले नाही. ग्रामीण कृषी पदवीधरांना एमपीएससीमधून हद्दपार करण्याची चाल सरकारकडून खेळण्यात येत आहे.

महोदय, तसेच उत्तरात असेही म्हटले आहे की, सदर कामाकरिता आयोगाकडे कोणत्याही प्रकारचे स्वत:चे विषय तज्ज्ञ उपलब्ध नाहीत. त्यांच्याकडे तज्ज्ञ नाहीत तर ते परीक्षा कशी काय घेणार ? भाडोत्री माणसे घेऊन एमपीएससी परीक्षा कशी काय घेणार आहे ? सन्माननीय सदस्य श्री. जयंतराव जाधव यांनी या पूर्वीही शासनाला सांगितलेले आहे की, ज्याचे उत्तर पर्यायांमध्ये नाही, अशा प्रकारचे प्रश्न विद्यार्थ्यांना विचारले गेले आहेत. आपण उत्तरात असेही म्हटले आहे की, परीक्षांची योजना आणि अभ्यासक्रम हा आयोगाचा अधिकार आहे. आयोगाने चूक केली तर त्याचे कान कोण धरणार? आपण त्यांना काही विचारणार आहात की नाही ? या संस्थेचे आजी, माजी अध्यक्ष चार, पाच वर्षापासून तुरुंगात आहेत. याबाबतीत मी काही बोलत नाही. ग्रामीण भागावर अन्याय करणारा मसुदा आपण रद्द करणार काय ? आपण चार पेपर दिलेले आहेत, त्यातील एक पेपर कृषी विषयाचा ठेवणार काय ?

5..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पृथ्वीराज चव्हाण : मी महाराष्ट्रात मुख्यमंत्री म्हणून येण्यापूर्वी काही दिवस केंद्रीय लोकसेवा आयोग तसेच यु.पी.एस.सी.चे काम पहात होतो. आता एमपीएससीचे काम चालले आहे, ही अतिशय व्यापक प्रक्रिया असून त्यात बदल करण्याचे काम संपूर्ण देशात होत आहे. यु.पी.एस.सी.परीक्षा प्रक्रियेमध्ये बदल केला गेला होता. देशातील सर्व राज्य आयोगाचे अध्यक्ष यांच्या बैठका होतात, त्यातील एका बैठकीत अशा प्रकारचा विचार मांडण्यात आला होता की, एमपीएससी तथा तत्सम आयोगांकडून परीक्षा घेतली जाते, त्यामध्ये मोठया प्रमाणात दोष आहेत. अवाढव्यपणा आहे. अडचणी आहेत, त्यात सुधारणा करणे गरजेचे आहे. कोर्टात अनेक केसेस दाखल झालेल्या आहेत. या परीक्षांच्या उत्तरपत्रिका दाखवा. उत्तरपत्रिकेचे मुल्यांकन कसे होते, त्याचे मुल्यांकन कोणी केले, असे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. आता सध्याची जी प्रचलित पध्दती आहे, त्यात दोन,तीन महत्वाचे बदल केले गेले आहेत ते आपण लक्षात घेतले पाहिजे. पूर्व परीक्षा झाल्यानंतर मुख्य परीक्षा होते, त्यात 1600 गुणाचे 8 पेपर आहेत. त्यानंतर 200 गुणांची मुलाखत होते. असे एकूण 1600 अधिक 200 अशा गुणांचे मुल्यांकन होते. यात वस्तुस्थिती अशी आहे की, मराठी, इंग्रजी, सामान्य अध्ययन-1 आणि सामान्य अध्ययन-2 हे कंपलसरी एकूण 800 गुणांचे चार विषय आहेत आणि चार ऑप्शनल पेपर आहेत. या वैकल्पीक विषयांची अडचण आहे.यात 34 विषय दिलेले आहेत. त्यात बरीचशी मुले कृषी विषय घेतात ही वस्तुस्थिती आहे. परंतु 34 विषयांचे तज्ज्ञ शोधणे, त्यासाठी पेपर सेंटर्स शोधणे, पेपर तपासणीस शोधणे. मला दिल्लीचा अनुभव आहे. दिल्ली येथील सर्वात जास्त विद्यार्थी आयएएस्च्या परीक्षेत पाली आणि अर्धमागधी हा विषय घेतात. आम्हाला कोडे पडले की, विद्यार्थी संस्कृत,तसेच इतर विषय न घेता पाली आणि अर्धमागधी हा विषय का घेतात. याचे आम्ही उत्तर शोधले. परंतु ते उत्तर काही चांगले नव्हते. 34 ऐच्छिक विषय करणे हे योग्य नाही. म्हणून आता 34 ऐच्छिक विषयाचा प्रश्न आता सोडून दिलेला आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे नव्या प्रक्रियेमध्ये चार सामान्य अध्यायनाचे विषय आहेत. एक कायदे विषयक पेपर आहे. एक महाराष्ट्राचा इतिहास आणि भुगोल यासंबंधीचा पेपर आहे, तिसरा महाराष्ट्रातील अर्थव्यवस्था आणि योजना याबद्दलचा पेपर आहे आणि आर्थिक विकास आणि तंत्रज्ञान असा चौथा पेपर आहे. कृषी या विषयाचा सहभाग सायन्स टेक्नॉलॉजीमध्ये आहे. आपले म्हणणे रास्त आहे की, कृषी विषयाचा सहभाग,त्याचा वाटा खूप कमी

6..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

झालेला आहे हे खरे आहे. दुसरी सुधारणा अशी आहे की, हे चारही पेपर ऑब्जेक्टीव्ह आहेत. ते संगणकाच्या माध्यमातून तपासले जातात. विद्यार्थ्याने परीक्षा दिल्या नंतर त्याच्या उत्तराची कार्बन कापी त्यास तेथेच दिली जाईल. परीक्षांमध्ये पारदर्शकता आणण्याकरिता संगणकाच्या माध्यमातून तपासणे आवश्यक आहे व त्यासाठी ऑब्जेक्टीव पेपर असणे आवश्यक आहे. याबाबतीत कोणाचे दुमत असण्याचे कारण नाही. फक्त विषय एवढाच आहे की, चार पेपरचा जो अभ्यासक्रम ठेवलेला आहे, त्यामध्ये जे वेटींग आहे. इतिहास, भुगोल यास किती गुण द्यावयाचे. अर्थव्यवस्थेला किती गुण द्यावयाचे. कायदा आणि घटना यास किती गुण द्यावयाचे. कृषी विषयाचा सहभाग कमी झालेला आहे, तो वाढविला पाहिजे हा मुळ मुद्दा आहे. अशा प्रकारचा बदल करण्याची माहिती आयोगाने 29 नोव्हेंबर, 2011 रोजी प्रसिध्द केलेली आहे. त्यावर 15 डिसेंबर, 2011 पर्यंत जनतेकडून सजेशन्स, आब्जेक्शन मागितलेल्या आहेत. त्या सजेशन्स, आब्जेक्शनमधील सूचनांचा देखील विचार करुन यात काही बदल करावयाचे असतील तर तशी विनंती आयोगाकडे करण्यात येईल. मी एक गोष्ट नमूद करु इच्छितो की, कृषी हा विषय कितीही महत्वाचा असला तरी इतर विषय देखील तेवढेच महत्वाचे आहेत. ग्रामीण भागातील मुले इंजिनिअर होत नाही, ग्रामीण भागातील मुले अर्थशास्त्र शिकत नाहीत, असे म्हणणे चुकीचे ठरेल. आपल्याला सर्वांगिण अशी मुले तयार करावयाची आहेत. आपल्याला सर्व विषयात तज्ज्ञ असणारी, घटनेचा अभ्यास असणारी मुले हवी आहेत. कृषी विषयाचा सहभाग कमी आहे की जास्त आहे ही बाब तपासून घेऊन त्यामध्ये काही बदल करावयाचा असेल तर तशी विनंती आयोगाला करण्यात येईल. संगणकाच्या माध्यमातून परीक्षा पेपर तपासणे, वैकल्पीक पेपर कमी करणे हा चांगला बदल आहे. त्यामुळे त्याचे समर्थन करावे अशी मी सर्व सदस्यांना विनंती करतो.

डॉ.दीपक सावंत : वैकल्पीक पेपर कमी करणे, परीक्षा पेपर संगणकाच्या माध्यमातून तपासणी हे चांगले बदल आहेत अशी माहिती माननीय मुख्यमंत्री महोदयांनी या ठिकाणी दिली आहे. हा बदल स्वागतार्ह आहे. कारण अनेक विषयाचे तज्ज्ञ पेपर तपासणीसाठी शोधणे हे कठीण काम आहे. आज बिहार, उत्तर प्रदेश, हरियाणा येथील विद्यार्थी मोठया प्रमाणात केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत पास होतात. महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांचे केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत पास होण्याचे प्रमाण नगण्य आहे. आपण दिल्लीमध्ये होतात, त्यामुळे या गोष्टीची आपल्याला

पूर्णपणे माहिती आहे. कृषी हा विषय स्कोअरींग विषय मानला जातो म्हणून विद्यार्थी तो विषय परीक्षेसाठी घेतात. दुसरे कोणतेही कारण नाही. एखादा विषय स्कोअरींग विषय कमी करुन आपल्याच विद्यार्थ्यांचे पाय मागे ओढणे हे संयुक्तीक वाटत नाही. इंग्रजी आणि मराठी विषय हे इलेस्टेटीव्ह आहेत. याच्यामध्ये विद्यार्थी 100-100 गुण मिळवू शकत नाहीत ही दुसरी अडचण आहे. या सर्व अभ्यासक्रमावर पुन्हा नव्याने विचार करण्यात येईल काय ?

श्री. पृथ्वीराज चव्हाण : यासंदर्भात हरकती व सूचना मागविण्यात आल्या आहेत, त्यावर निश्चित विचार केला जाणार आहे. स्कोअरींग विषयासंबंधीची मला माहिती नाही. ही अडचण सोप्या पध्दतीने सोडविली जाते. त्यांचे वेटींग कमी केले जाते. उदाहरणार्थ् संस्कृत सारखा विषय आहे. गणीतासारखा विषय आहे. एक विद्यार्थी इतिहास घेणार असेल...

यानंतर श्री. भोगले..

अस्सुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्रमांक-3........ श्री.पृथ्वीराज चव्हाण.....

एक गणित विषय घेणार असेल तर त्यांची तुलना होऊ शकत नाही. त्याकरिता अतिशय शास्त्रोक्त पध्दतीने, संख्या शास्त्राच्या आधारे स्कोअरिंग सबजेक्टचे वेटिंग कमी केले जाते आणि कमी स्कोअरिंग सबजेक्टचे वेटिंग वाढविले जाते. प्रत्येकाला समान न्याय मिळाला पाहिजे. अन्यथा सगळे गणित आणि इंजिनिअरिंगचे विषय घेतील आणि कृषी विषयाला संधी मिळणार नाही. गणित 100 टक्के, संस्कृत 100 टक्के स्कोअरिंगचे विषय आहेत म्हणून वेटिंग कमी केले जाते. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून देखील अशा प्रकारचे वेटिंग केले जाते. स्कोअरिंग सबजेक्ट आहे म्हणून दोनच विषयांचे जास्त विद्यार्थी येणे हेही योग्य नाही. तरी देखील आपण ज्या भावना व्यक्त केल्या आहेत त्या आयोगापर्यंत पोहोचविण्याचा निश्चितपणे प्रयत्न राहील.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, प्रश्न स्कोअरिंग सबजेक्टपुरता मर्यादित नाही. आपला देश कृषीप्रधान आहे, आपले राज्य सुध्दा कृषीप्रधान आहे. लोकसेवा आयोगाच्या परीक्षेमध्ये शेतीचा एक विषय ऑप्शनल सबजेक्टमध्ये आहे. इतर सर्व विषयांचा माननीय मुख्यमंत्र्यांनी उल्लेख केला. केंद्रीय लोकसेवा आयोग आणि महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची परीक्षा उत्तीर्ण होणाऱ्या उमेदवारांच्या बुध्दिमत्तेचा कस लागला पाहिजे याबद्दल कोणाचे दुमत असण्याचे कारण नाही. मागील अनुभव आला त्यामधून ही कल्पना पुढे आली. शेती हा विषय राज्याच्या आणि देशाच्या दृष्टीने महत्वाचा गाभा असेल आणि तो जर बाजूला पडला तर पुढे कसे जाता येईल? कृषी हा स्कोअरिंग विषय आहे म्हणून घ्यायचा किंवा घ्यायचा नाही हे महत्वाचे नसून हा विषय वगळला तर ग्रामीण भागातील उमेदवारांवर एकप्रकारे अन्याय होईल. नवीन विषय परीक्षेमध्ये अंतर्भूत करावेत अशी कोणी मागणी केलेली नाही. परंतु जे विषय पूर्वी निश्चित केले आहेत तेच विषय परीक्षेसाठी असावेत अशी विनंती आहे. 32 किंवा 38 ऑप्शनल सबजेक्ट असल्यामुळे त्या विषयाचे पेपर सेट करण्यासाठी आणि तपासण्यासाठी तज्ज्ञ मिळणार नाहीत हे खरे आहे. परंतु कृषी विषयातील तज्ज्ञ कृषीप्रधान देशामध्ये मिळत नाहीत हे संयुक्तिक वाटत नाही. म्हणून माझी विनंती आहे की, लोकसेवा आयोगाच्या ड्राफ्टमध्ये देखील स्पष्ट म्हटले आहे, शेती विषयाचा सुध्दा पर्याय दिला पाहिजे. तशा पध्दतीच्या सूचना लोकसेवा आयोगाला दिल्या जातील काय?

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, मी यापूर्वी जे उत्तर दिले त्यामध्ये शेती विषयाचे तज्ज्ञ मिळणार नाही असे म्हटले नव्हते. 3-4 ऐच्छिक विषय आहेत. कोणताही ऐच्छिक विषय घेता येतो. एखादा विषय घेतला तर त्या विषयाचे तज्ज्ञ मिळणे अडचणीचे होते याची मला माहिती आहे. आज ग्रामीण भागामध्ये वकील नाहीत किंवा बी.एससी.केलेले विद्यार्थी नाहीत, अर्थशास्त्राचे शिक्षण घेतलेले विद्यार्थी नाहीत असे म्हणणे देखील ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांवर अन्याय करणारे ठरेल. शिक्षणाच्या सुविधा चांगल्या प्रकारे उपलब्ध झालेल्या आहेत. त्यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थी चांगली स्पर्धा करु शकतील. ऐच्छिक विषय बंद करणे याबद्दल कोणाचे दुमत नसावे. ऑब्जेक्टिव्ह परीक्षेबद्दल दुमत नसावे. महत्वाचे म्हणजे कृषी विषयाचा समावेश किती असावा? तो 100 टक्के असावा की 50 टक्के असावा? कृषी विषयाचा सहभाग वाढविला पाहिजे हे सभागृहाचे मत आहे. ते निश्चितपणे आयोगाला कळविण्यात येईल.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या वर्ग 1 आणि 2 च्या सरळ सेवाभरतीबद्दलचा हा प्रश्न आहे. शासकीय यंत्रणेच्या दृष्टीने हा अतिशय महत्वाचा प्रश्न आहे. आपल्या सुदैवाने माननीय मुख्यमंत्री याच खात्याचा केंद्र सरकारमध्ये कारभार सांभाळीत होते. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून घेतल्या जाणाऱ्या परीक्षा पध्दतीमध्ये व्यापक बदल करण्याची आवश्यकता आहे. या सभागृहात अनेकदा या विषयावर चर्चा होत असताना पुरेसा कर्मचारी वर्ग उपलब्ध नाही, लोकसेवा आयोगाकडून घेतल्या जाणाऱ्या परीक्षांमध्ये होणारी दिरंगाई आणि निकाल जाहीर करण्यामध्ये होणारा विलंब हे कारण सांगितले जाते. या संदर्भात या प्रश्नाच्या अनुषंगाने व्यापक योजना राबविण्याचा विचार केला जाईल काय?

श्री.पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचा हा मुख्य प्रश्न आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून रिक्रूटमेंट करण्यामध्ये दिरंगाई होते, चुका होतात हे विषय देखील या प्रश्नामध्ये अंतर्भूत आहेत. काही वर्षापूर्वी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचा कारभार प्रचंड वेगळया प्रकारे चालू होता. अजून प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. बरीच वर्षे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या माध्यमातून आपण रिक्रूटमेंट करु शकलो नाही.त्याचे परिणाम आज दिसून येत आहेत. गेल्या 2-3 वर्षात कामकाज सुरळीतपणे सुरु झाले आहे. वर्ष 2009-10 मध्ये 4.33 लाख अर्ज आले होते. त्यातील 3378 उमेदवारांची निवड करुन शिफारस करण्यात आली. वर्ष 2010-11

..3..



श्री.पृथ्वीराज चव्हाण.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मध्ये 5.85 लाख अर्ज आले होते. त्यातील 6066 उमेदवारांची निवड केली गेली. वर्ष 2011-12 मध्ये नोव्हेंबर, 11 पर्यंत 6.10 लाख अर्ज आले, त्यापैकी 6905 उमेदवारांची शिफारस करण्यात आली. 8700 लोकांची प्रक्रिया सुरु आहे. मागील तीन वर्षात खूप प्रगती झाली आहे. एका बाजूला ऑनलाईन अर्ज स्वीकारण्याची व्यवस्था केली गेली. सिलॅबसमध्ये बदल करण्याचा प्रयत्न झाला. पूर्वी जे ऐच्छिक विषय होते ते फार लिखित स्वरुपाचे होते. ते तपासण्यास वेळ लागत होता. आता कॉम्प्युटरच्या माध्यमातून पेपर तपासण्याची प्रक्रिया जलद गतीने केली जाते. त्याच बरोबर कार्यालयाचे संगणकीकरण करण्यात येत आहे. त्यामुळे या बदलानंतर महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची प्रक्रिया मजबूत होईल, पारदर्शी होईल. मध्यंतरी घोटाळा झाला, तसा प्रकार होणार नाही.

-----

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : मुंबईतील सारा सहारा मार्केटला आग लागून अब्जावधी रुपयांच्या मालाचे झालेले नुकसान

**मु. शी.** : मुंबईतील सारा सहारा मार्केटला आग लागून अब्जावधी रुपयांच्या मालाचे झालेले नुकसान यासंबंधी सर्वश्री भाई जगताप, श्रीमती अलका देसाई, सर्वश्री चरणसिंग सप्रा, हेमंत टकले, रमेश शेंडगे, ॲड. उषाताई दराडे, सर्वश्री विक्रम काळे, किरण पावसकर, प्रकाश बिनसाळे, श्रीमती विद्या चव्हाण, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.भाई जगताप (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय गृह मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"इलेक्ट्रॉनिक वस्तू आणि सौंदर्य प्रसाधने, कपडे, घरगुती वस्तू, परफ्युम तसेच चिनी खेळणी आदीसाठी प्रसिध्द असलेल्या क्रॉफर्ड मार्केटजवळील सारा-सहारा संकुल, मनीष आणि मेहता मार्केटला दि. २६/११/२०११ च्यासुमारास भीषण आग लागण्याची घटना घडणे, १३ तासांहून अधिक काळ धुमसत राहिलेल्या या आगीत सुदैवाने कुठलीही जीवितहानी झाली नसली तरी तिन्ही शॉपिंग संकुलातील सुमारे तीनशेहून अधिक दुकाने आगीच्या भक्ष्यस्थानी पडून भस्मसात होणे, सारा-सहारा मॉल आणि मनीष मार्केटमध्ये मुख्यत्वे करुन इलेक्ट्रॉनिक्सची दुकाने होती, मोबाईल, गॉगल्स, कपडे, फुटवेअर, खेळणी, डिजिटल कॅमेरे अशी सुमारे पाचशेहून अधिक दुकाने असल्याची शक्यता असणे, तसेच तिथे अनेक दुकान मालकांची गोदामेही होती त्यात कोटयावधी किंमतीचा माल साठवून ठेवण्यात येणे, या आगीत अंदाजे अब्जावधी रुपयांचे नुकसान झाल्याचे वर्तवण्यात येणे, राज्यशासनाने या अग्निकांडाची चौकशी करुन तातडीने करावयाची कारवाई व याबाबत राज्यशासनाची प्रतिक्रिया."

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील (गृह राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, एक महिन्यापूर्वी मुंबई शहरामध्ये एक प्रचंड आग लागली. सारा सहारा मार्केटला मध्यरात्री लागलेली आग स्प्रेड होऊन शेजारील मनीष मार्केट, मेहता मार्केटला आग लागली. निवेदनामध्ये म्हटले आहे की, हा घातपाताचा प्रकार आहे असे जाणवत नाही. सारा सहारा मार्केट, मनीष मार्केट आणि मेहता मार्केट या तीन वेगवेगळ्या इमारती आहेत. या तीनही इमारतींमध्ये बरेच अंतर आहे. मध्यरात्री 3.00 वाजता आग लागल्यानंतर 20 मिनिटांमध्ये अग्निशमन दल तेथे पोहोचले. आगीचे कारण शॉर्ट सर्किट असल्याचे सांगितले जाते. शॉर्ट सर्किट झाल्यास विद्युत पुरवठा बंद करणे एक तातडीचा पर्याय असतो. आपण स्वत:च्या घरी देखील तो पर्याय अंमलात आणतो. तसे न करता या तीन इमारतीमध्ये पसरलेली आग सुमारे 14 तास विझविता आली नाही. या प्रकरणात घातपात नसल्याचे सांगण्यात येत आहे. हे कितपत खरे आहे? मला मुद्दाम सांगितले पाहिजे की, मी विधानसभेचा सदस्य असताना क्रॉफर्ड मार्केटच्या पुनर्विकासाचा प्रश्न त्या सभागृहात उपस्थित झाला होता. त्यावेळी प्रचंड गदारोळ झाला होता. या सभागृहात देखील त्या प्रश्नावरुन गदारोळ झाला होता.

क्रॉफर्ड मार्केटचा पुनर्विकास करण्यासाठी महानगरपालिकेच्या माध्यमातून आग्रह धरण्यात आला होता.

नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ल.सू. क्र. 4....... श्री. भाई जगताप .......

सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून हे मार्केट डेव्हलप होऊ नये म्हणून शासनाकडून देखील प्रयत्न केला आहे. हे मार्केट डेव्हलप होण्याबाबत अगोदरपासूनच लपून छपून, आतमधून कोणी तरी प्रयत्न करीत आहे की कसे असा संशय यामध्ये निर्माण होत आहे. कारण मनिष मार्केट, सारा-सहारा, मोहता मार्केट हे क्रॉफर्ड मार्केटच्या एकदम बाजूलाच असून या मार्केटला अशा प्रकारे कोणी आग लावली आणि हा घातपात नाही असे सांगितले जाते म्हणून या प्रकरणाची सखोल चौकशी करुन जे दोषी आढळून येतील त्यांच्याविरुध्द गुन्हे दाखल करणे आवश्यक आहे. या जळालेल्या मार्केटमध्ये एकूण 500 दुकाने बेचिराख झाली. सर्व दुकाने मध्यमवर्गीयांची असून प्रचंड वित्त हानी झालेली आहे. तसेच या आगीबाबतचा सर्व्हे सुध्दा माझ्या माहितीप्रमाणे झालेला नाही. माझी विनंती आहे की, या आगीत ज्यांची दुकाने जळून नुकसान झाले त्यांना शासन मदत करणार आहे काय ?

श्री. आर.आर.पाटील : या आगीची चौकशी पोलीस आणि मुंबई महापालिकेचे वरिष्ठ अधिकारी मिळून करीत आहेत. आतापर्यंत केलेल्या चौकशीत असे आढळून आले की, कोणी स्थानिक नागरिक किंवा दुकानदार असा कोणावर देखील संशय व्यक्त झालेला नाही. एका टपरीला आग लागली होती व त्यानंतर शेजारच्या इमारतीत ती आग पसरली. यामध्ये सारा-सहारा, सारा कॉर्नर, ग्रीन हाऊस, मनिष मार्केट या भागातील एकूण 661 दुकाने जळाली. या 661 दुकानांमध्ये अधिकृत गाळ्यांची संख्या 214 एवढी होती. आगीचे सर्व्हेक्षण पूर्ण झाले असून इमारतीचे 8 कोटीचे नुकसान झाले आणि दुकानदारांनी सांगितल्यानंतर ज्यांचे पंचनामे जिल्हाधिकारी मुंबई कार्यालयाने केले त्यानुसार 23.71 कोटीचे दुकानांचे नुकसान झालेले आहे. तसेच शॉर्ट सर्किटमुळे ही आग लागली असे तपास करणाऱ्या अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे.

श्री. भाई जगताप : महोदय, मंत्री महोदयांनी उत्तर दिले त्याप्रमाणे मी अगोदरच सांगितले की, वेगवेगळ्या ठिकाणी असणाऱ्या दुकानांचे नुकसान झालेले आहे. मी स्वत: या ठिकाणी गेलो होतो, मंत्री महोदयांनी सुध्दा पाहणी केली. मागील वेळेस हा भाग माझा मतदारसंघ होता. या प्रकरणी जरी कोणावर संशय व्यक्त होत नसला तरी रात्री 3.30 वाजता आग लागते हीच संशयास्पद बाब आहे. तसेच संशय व्यक्त झाला नसला तरी पोलिसांनी तसा संशय घेणे आवश्यक

....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप .........

आहे, त्याशिवाय हे शक्य होणार नाही. कारण यामध्ये संशय घेण्यासारखीच परिस्थिती आहे. शासनाने या प्रकरणाच्या तपासाची दिशा जरी वेगळी केली तरी मला वाटत नाही की त्यामुळे याच्या मुळाशी जाता येईल आणि या निमित्ताने कदाचित ही सुरुवात सुध्दा असू शकते, याचाही तपास शासनाने करावा. म्हणूनच या प्रकरणाची सखोल चौकशी वेगवेगळ्या अँगल्समधून करणे गरजेचे आहे. तशी चौकशी शासन करणार आहे काय ?

श्री. आर.आर.पाटील : महोदय, आतापर्यंत कोणावर संशय व्यक्त केला नसला तरी आगीमुळे झालेले नुकसान मोठ्या प्रमाणात आहे. म्हणून मुंबई क्राईम ब्रँचच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून हा खरोखरच घातपाताचा प्रकार आहे की काय यादृष्टीने चौकशी केली जाईल.

श्री. राम पंडागळे : महोदय, या आगीच्या संदर्भात कोणावरही संशय व्यक्त होत नसल्याची माहिती मंत्री महोदयांनी सभागृहात दिली आहे. पण सध्या हिंदुस्थानात वास्तव्य करीत नाहीत असे गुंडच नव्हे तर गुंडाच्याही पलीकडचे, जे भारताबाहेर आहेत, त्यांनी एका दुकानाच्या मालकाला गाळा खाली कर म्हणून दमदाटी चालू केली होती. त्याने गाळा खाली करण्यास नकार दिला आणि सांगितले की आम्ही येथील गाळेधारक आहोत, आम्ही खाली करणार नाही. त्यानंतर थोड्याच काळात या कॉम्प्लेक्सला आग लागली. अशा प्रकारचे हे गँगस्टर्स आहेत, त्यांच्याविरुध्द कोणीही तक्रार करण्यास पुढे धजावणार नाही. कोणाला गोळ्या खाऊन मरायचे नाही. ही बाब अत्यंत गंभीर असून अशीच चर्चा मुंबईत आहे. या निमित्ताने माझा प्रश्न आहे की, जरी कोणी तक्रार केली नसली तरी ही बाब गंभीर स्वरुपाची असल्याने या प्रकरणाच्या पाठीमागे जे गँगस्टर्स आहेत त्यासंबंधीचा तपास करुन पोलीस खाते कानाला धरुन त्यांना पकडणार आहे काय ? त्याचप्रमाणे हे गाळेधारक फार गरीब आहेत, एका-एका दुकानात एक-एक कोटीची "इम्पोर्टेड गुड्स" भरलेली होती, त्यामुळे कोट्यवधीचे नुकसान या दुकानदारांचे झालेले आहे. या गाळेधारकांना शासनाच्या वतीने किमान 50 लाखापर्यंतची प्रत्येकी मदत दिली जाईल काय ?

श्री. आर.आर.पाटील : महोदय, या प्रकरणाची चौकशी अगोदरच करण्यात आली असून सन्माननीय सदस्यांनी सुचविल्यानुसार जर यातील आरोपी सापडले तर त्यांच्या कानाला पकडून आणण्याऐवजी हाताला पकडून आणण्याचे काम पोलीस नक्कीच करतील. तसेच अशा प्रकारची

....3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील........

कोणतीही मदत शासनाकडून दिली जात नाही. ज्या गाळेधारकांचा विमा काढलेला असेल त्यांना विमा कंपनीकडून नुकसान भरपाई मिळणारच आहे. शासनाला शक्य आहे तेवढी मदत जरुर करेल. त्यात त्यांनी जर बँकेकडून कर्ज घेतलेले असेल तर त्या कर्जाच्या व्याजात सवलत मिळावी म्हणून शासनाकडून नक्कीच प्रयत्न करण्यात येतील.

--------

( नंतर श्री. अजित .........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: अमरावती व नागपूर विभागातील नझूल जमिनींच्या संदर्भातील सुधारित धोरण

**मु.शी.**: अमरावती व नागपूर विभागातील नझूल जमिनीच्या संदर्भातील सुधारित धोरणासबंधी माननीय महसूल मंत्र्यांचे निवेदन

श्री.बाळासाहेब थोरात (महसूल मंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 46 अन्वये पुढील निवेदन करतो.

अमरावती व नागपूर विभागातील नझूल जमिनीच्या संदर्भातील प्रश्न बराच काळ प्रलंबित होता. त्यामुळे ज्या जमिनीचे व्यवहार न होणे आणि अन्य प्रश्न निर्माण झाले होते. या संदर्भातील सुधारित धोरणास मंत्रिमंडळाने मान्यता दिलेली आहे. सदरहू धोरण मी सभागृहाच्या पटलावर ठेवत आहे.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

( प्रेस : येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे. )



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: भूमीधारी संवर्गातून भूमीस्वामी हक्क प्रदान करणे

**मु.शी.**: भूमीधारी संवर्गातून भूमीस्वामी हक्क प्रदान करणे या संबंधी माननीय महसूल मंत्र्यांचे निवेदन.

श्री.बाळासाहेब थोरात ( महसूल मंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 46 अन्वये पुढील निवेदन करतो.

सभापती महोदय,भूमीधारी संवर्गातून भूमीस्वामी संवर्गातील हक्क प्रदान करण्या संदर्भातील काही प्रश्न होते. भूमीधारी संवर्गातून भूमीस्वामी संवर्गात रुपांतर करण्याबाबत शेतकऱ्यांना मोठया प्रमाणावर त्रास होत होता. हा त्रास दूर करण्यासाठी सुवर्ण जयंती राजस्व अभियाना अंतर्गत ज्या शेतकऱ्यांना भूमीधारी संवर्गातून भूमीस्वामी संवर्गात जायचे आहे त्यांचा सहा महिन्यामध्ये शिबिराच्या माध्यमातून प्रश्न हा सोडविला जाईल. त्या संदर्भातील निवेदन मी सभागृहाच्या पटलावर ठेवत आहे.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

(प्रेस : येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे )

-------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**:औचित्याचे मुद्दे

(पुढे सुरू.....)

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री.संजय केळकर यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, मावळची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून सभागृहाचे लक्ष वेधण्यासाठी मी औचित्याचा मुद्दा मांडण्यासाठी उभा आहे.

सभापती महोदय, ठाणे जिल्ह्यामध्ये निरनिराळ्या ठिकाणी धरणांची कामे सुरु आहेत. त्यातील काळू प्रकल्प प्रस्तावित आहे. अनेक वर्षापासून त्या प्रकल्पाला स्थानिकांचा आणि शेतकऱ्यांचा विरोध आहे. तसेच प्रकल्पासाठी ज्या विविध परवानगीची आवश्यकता असते त्या परवानगी मिळालेल्या नसताना ठेकेदाराने काम सुरु ठेवले म्हणून तेथील स्थानिक शेतकरी ते काम बंद करण्यासाठी तेथे गेलेले आहेत. त्या ठिकाणी एका बाजूला पोलिसांचा व एसआरपींचा फौजफाटा उभा आहे तर दुसरीकडे शेतकऱ्यांचा मोठा जमाव उभा आहे असे तेथे वातावरण आहे. कोणत्याही प्रकारची परवानगी नसताना ठेकेदाराने बेमुर्वतखोरपणे काम सुरु ठेवल्यामुळे तेथील लोकांचा राग आहे. त्या ठिकाणी संघर्षाचे वातावरण निर्माण झालेले आहे. तेथील वातावरण कधीही चिघळू शकते. काळू प्रकल्पाच्या ठिकाणी मावळ सारखा घटना घडू नये म्हणून तेथील काम तातडीने बंद करुन त्या ठिकाणी कायदा आणि सुव्यवस्था राखावी अशी मी आपल्या मार्फत सरकारला विनंती करीत आहे.

------

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री.संजय केळकर यांनी आणखी एक औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, आपण मला दुसरा औचित्याचा मुद्दा मांडण्याची संधी दिली त्याबद्दल मी आपले आभार मानतो.

सभापती महोदय, रायगड जिल्ह्यामध्ये पेण अर्बन ही 75 वर्षा पूर्वीची बँक आहे. या बँकेचे जवळपास अडीच लाख ठेवीदार असून त्यांच्या जवळपास 53 कोटी रुपयांच्या ठेवी आहेत. आता ही बँक बुडालेली आहे. या बँकेच्या कारभारा संदर्भात गेल्या वर्षापासून संघर्ष समितीच्या माध्यमातून आंदोलन सुरु होते. मध्यंतरी ठेवीदारांसह संघर्ष समितीने पेण ते सह्यादी अशी पदयात्रा काढली होती. ही बँक आता लिक्विडीशनमध्ये जाणार आहे अशा प्रकारच्या बातम्या वर्तमानपत्रात येत आहेत. अर्धा रायगड जिल्हा बँकेमुळे भरडला गेला आहे. आज तेथील ठेवीदार अडचणीत आलेला आहे. त्याची दिशाभूल झालेली आहे. आम्ही संघर्ष यात्रा काढल्यानंतर माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री आणि सहकारी मंत्री यांची चर्चा झाली होती. कोणत्याही परिस्थितीमध्ये आम्ही ही बँक लिक्विडीशनमध्ये जाऊ देणार नाही असे त्यांनी सांगितले होते. त्या बँकेवर पूर्ण वेळ प्रशासक नेमला जाईल असे त्यांनी सांगितले होते. ठेवीदारांच्या निरनिराळ्या मागण्या देखील मान्य करण्यात आल्या होत्या. परंतु प्रशासक नेमण्या व्यतिरिक्त कोणत्याही प्रकारचे काम झालेले नाही. खरे म्हणजे शासन ही बँक वाचवू शकते. महाराष्ट्रामध्ये अनेक बँका बुडाल्या असल्या तरी ही बँक वाचविण्याचे अनेक प्रस्ताव शासनाकडे उपलब्ध आहेत. तेव्हा पेण अर्बन बँक लिक्विडीशनमध्ये जाऊ नये यासाठी सरकारने तातडीने पावले उचलावीत अशी माझी विनंती आहे.

-------

..5..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: मुरबाड तालुक्यातील न्यू इंग्लिश स्कूल, मुरबाड येथील शाळेतील शिक्षक श्री.संजय गोडांबे यांना शाळेत घुसून करण्यात आलेली मारहाण

**मु.शी.**: मुरबाड तालुक्यातील न्यू इंग्लिश स्कूल, मुरबाड येथील शाळेतील शिक्षक श्री.संजय गोडांबे यांना शाळेत घुसून करण्यात आलेली मारहाण या विषयावर सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी उपस्थित केलेल्या औचित्याच्या मुद्यास अनुलक्षून माननीय गृहमंत्र्यांचे निवेदन

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील (गृह राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी "मुरबाड तालुक्यातील न्यू इंग्लिश स्कूल, मुरबाड येथील शाळेतील शिक्षक श्री.संजय गोडांबे यांना शाळेत घुसून करण्यात आलेली मारहाण" या विषया संबंधी उपस्थित केलेल्या औचित्याच्या मुद्यास अनुलक्षून पुढील निवेदन करीत आहे.

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे. )

..6..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**विशेष उल्लेख**

**पृ.शी** : चंद्रपूर जिल्ह्यातील कारखान्यांतून रसायन मिश्रित पाणी सरसकटपणे नदीत सोडल्यामुळे नद्यांतील पाणी प्रदूषित होणे

**मु.शी** : चंद्रपूर जिल्ह्यातील कारखान्यांतून रसायन मिश्रित पाणी सरसकटपणे नदीत सोडल्यामुळे नद्यांतील पाणी प्रदूषित होणे याबाबत श्री.जैनुद्दीन जव्हेरी, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**उप सभापती** : माननीय सदस्य श्री जैनुद्दीन जव्हेरी यांनी विशेष उल्लेखा संबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.जैनुद्दीन जव्हेरी (वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखा संबंधीची सूचना मांडतो.

चंद्रपूर जिल्हा हा प्रदूषणाच्या क्रमवारीत देशात दुसऱ्या क्रमांकावर पोहोचला आहे. या जिल्ह्यातील 130 हून अधिक उद्योग अति प्रदूषणकारी असल्याची नोंद आहे. संपूर्ण जिल्हा वायू प्रदूषणाच्या विळख्यात सापडला असला तरी त्यावर नियंत्रण मिळवणे जिल्हा प्रशासनाला शक्य झालेले नाही. आता याच उद्योगांमुळे जल प्रदूषणाची आणखी एक समस्या समोर येऊ लागली आहे. कुठलीही प्रक्रिया न करता उद्योगातील रसायनमिश्रित पाणी सरसकट नदीनाल्यांमध्ये सोडले जात असल्याने वर्धा, इरई, झरपट, उमा या सारख्या नद्या प्रदूषित होत आहेत. या दूषित जलस्त्रोताचा फटका शेकडो गावांना बसत असून नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे. वरोरा परिसरात वर्धा पॉवर, कर्नाटक, एमटा.कोल माईन्स, यासारख्या कंपनीतील रासायनिक मिश्रित पाणी सरळ वर्धा नदीत सोडले जाते. त्यामुळे पोटाचे आजार, फ्लोरोसिस, हाडे ठिसूळ होणे व इतर अनेक आजार होत आहेत. या सर्व बाबींबाबत संबंधित विभागाकडे तक्रार करुन सुध्दा अद्यापपर्यंत कोणतीच कार्यवाही झालेली नाही या सारखी दु:खद शोकांतिका नाही. तेव्हा प्रदूषण करणाऱ्या सर्व कारखान्यांवर तातडीने कारवाई करावी या करिता मी विशेष उल्लेखाची सूचना देत आहे.

-------

..7..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी** :राज्य शासनाच्या सर्व विभागांतील अंशकालीन स्वरुपाच्या कर्मचाऱ्यांना शासकीय सेवेत सामावून घेणे

**मु.शी** :राज्य शासनाच्या सर्व विभागांतील अंशकालीन स्वरुपाच्या कर्मचाऱ्यांना शासकीय सेवेत सामावून घेणे या बाबत श्री.भगवान साळुंखे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**उप सभापती** : माननीय सदस्य श्री.भगवान साळुंखे यांनी विशेष उल्लेखा संबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.भगवान साळुंखे (पुणे विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखा संबंधीची सूचना मांडतो.

सभापती महोदय, मी एका गंभीर विषयाकडे शासनाचे लक्ष वेधत आहे. राज्य शासनाचा महसूल विभाग सोडून उर्वरित सर्वच विभागांमध्ये तृतीय व चतुर्थश्रेणी कर्मचारी वर्ग नेमण्याकडे शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष झाले आहे. आजमितीस सर्व विभागांमध्ये अंशकालीन स्वरुपाचे हजारो कर्मचारी सेवारत आहेत. त्याचा सेवाकाल आठ ते दहा वर्षाचा पूर्ण होऊन देखील त्यांना शासनाने अद्याप नियमित सेवेत सामावून घेतलेले नाही. त्यामुळे त्यांच्यामध्ये कमालीची अस्वस्थता असून त्यांचे जीवन अस्थिर स्वरुपाचे झालेले आहे. तेव्हा या अंशकालीन सेवकांना शासनाने नियमितपणे सेवेत सामावून घ्यावे अशी मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनास विनंती करीत आहे.

-----

यानंतर श्री.सरफरे..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: राज्यातील सर्व ओढे, नाले, नद्या, जलाशय व जलस्त्रोत पूर्णपणे प्रदूषणमुक्त होण्याकरिता राज्य शासनाने करावयाची उपाय योजना

**मु.शी.**: राज्यातील सर्व ओढे, नाले, नद्या, जलाशय व जलस्त्रोत पूर्णपणे प्रदूषणमुक्त होण्याकरिता राज्य शासनाने करावयाची उपाय योजना याबाबत श्री पांडुरंग फुंडकर, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**उपसभापती** : माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्षनेता) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"विविध कारखान्यातून व आस्थापनातून नदीत सोडण्यात येणाऱ्या सांडपाण्यावर प्रक्रिया न केल्यामुळे देशातील अनेक मोठया नद्या प्रदूषित झाल्या आहेत. महाराष्ट्राचा विचार करता राज्यातील 70 नद्या दूषित झाल्याचे राज्य सरकारने मान्य केले आहे. कारखान्यातून नद्यांमध्ये सोडण्यात येणाऱ्या पाण्यावर प्रक्रिया करुन ते सोडण्यात यावे असा कायदा शासनाने केला असूनही त्याची अंमलबजावणी कारखानदारांकडून होत नसून महाराष्ट्र राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून याकडे दुर्लक्ष केले जात असल्यामुळे शासकीय आकडेवारीनुसार सन 2010 मध्ये 150 व्यक्तींना दूषित पाणी पिण्यामुळे प्राणास मुकावे लागले होते तर 20,05,000 व्यक्तींना दूषित पाण्यामुळे जलजन्य साथीच्या आजारांची लागण झाली होती. सद्या भूगर्भातील पाण्याच्या पातळीतही घट झाली असून पंपाव्दारे येणारे पाणीही पिण्या योग्य नसते. शासनाचा व जनतेचा दूषित पाण्याच्या प्रश्नाकडे पाहण्याचा सद्याचा दृष्टीकोन जर बदलला नाही तर भविष्यात पिण्याच्या पाण्याची परिस्थिती भयावह निर्माण होण्याचा धोका उत्पन्न झाला आहे.

जगभरात अमेरिका, युरोपातील प्रगत देश व काही अविकसित देशांनीही अनेक वर्षापासून त्यांच्या नद्या व जलाशय स्वच्छ ठेवण्याचा उपक्रम राबवून यशस्वी केला आहे. सद्या राज्य शासन करीत असलेल्या तुटपुंज्या मार्गाने व निरर्थक पध्दतीने खर्च होणाऱ्या आर्थिक तरतुदीतून हा प्रश्न सुटण्याची शक्यता दिसत नाही. दूषित पाण्याच्या प्रश्नाची व्याप्ती व करावयाची उपाय योजना

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

श्री. पांडुरंग फुंडकर...

लक्षात घेऊन गाव पातळीवर, तालुका पातळीवर हा प्रश्न सोडविण्यासाठी कृती कार्यक्रम आखणे आवश्यक आहे. प्रदूषण निर्मूलनाच्या कार्यक्रमासाठी व्यापक लोक सहभाग, लोक जागृती होणे आवश्यक आहे. यातूनच शासनावर या चांगल्या कामासाठी दडपण निर्माण होऊन महाराष्ट्र राज्यातील सर्व ओढे, नाले, नद्या, जलाशय व जलस्त्रोत पूर्णपणे प्रदूषणमुक्त होण्याकरिता राज्य शासनाने लवकरात लवकर ठोस उपाय योजना करावी याकरिता माननीय पर्यावरण मंत्री महोदयांना व माननीय पाणी पुरवठा मंत्री महोदयांना सूचित करावे म्हणून या विशेष उल्लेखाव्दारे ही बाब मी सदनाच्या निदर्शनास आणत आहे".

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: देवळाली कॅम्प, जिल्हा नाशिक येथील कुमारी प्रियंका लकारीया या अल्पवयीन बालिकेचे अपहरण करुन तिच्यावर पाशवी बलात्कार करुन करण्यात आलेला खून

**मु.शी.**: देवळाली कॅम्प, जिल्हा नाशिक येथील कुमारी प्रियंका लकारीया या अल्पवयीन बालिकेचे अपहरण करुन तिच्यावर पाशवी बलात्कार करुन करण्यात आलेला खून याबाबत श्री.जयवंतराव जाधव,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री.जयवंतराव जाधव यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. जयवंतराव जाधव (नाशिक स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"देवळाली कॅम्प जिल्हा नाशिक येथील कुमारी प्रियंका लकारीया या अल्पवयीन बालिकेचे अपहरण करुन तिच्यावर पाशवी बलात्कार करुन या बालिकेचा खून केलेल्या संशयित आरोपीची नुकतीच अतिरिक्त जिल्हा सत्र न्यायालयाने पुराव्याअभावी मुक्तता करणे, पोलिसांनी सबळ पुरावे सादर न केल्यामुळे आरोपी निर्दोष ठरण्यास झालेली मदत या निरागस बालिकेचे अपहरण, बलात्कार व खून असे तिहेरी गुन्हयांचे प्रकरण माणुसकीला काळिमा फासविणारे असल्याने या आरोपींना कठोरात कठोर शिक्षा होण्यासाठी शासनाने उच्च न्यायालयात अपिल दाखल करण्याची आवश्यकता, पोलीस खात्याने न्यायालयात वस्तुनिष्ठ पुरावे सादर करण्यासाठी सद्सदविवेकबुध्दीला स्मरुण प्रामाणिकपणे प्रयत्न करण्यासाठी शासनाने संबंधितांना कडक आदेश द्यावेत अशी मागणी या विशेष उल्लेखाव्दारे शासनाकडे करीत आहे".

-----------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

**पृ.शी.**: मुंबई शहर व उपनगरात एमएमआरडीएने 9 फ्लायओव्हर खालील पार्कींग व्यवस्था रद्द करणे

**मु.शी.**: मुंबई शहर व उपनगरात एमएमआरडीएने 9 फ्लायओव्हर खालील पार्कींग व्यवस्था रद्द करणे याबाबत श्री.रामदास कदम, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. रामदास कदम (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"मुंबई शहरात व उपनगरात एमएमआरडीएने 9 फ्लायओव्हर ब्रिजखालील पार्कींग योजना रद्द केल्याने सुमारे 6 हजार वाहनांच्या पार्कींगचा प्रश्न निर्माण होणे, अगोदर वाहतूक कोंडीमुळे शहराची अवस्था बिकट झाली असल्याने वाहतूक कोंडीमुळे त्यामध्ये आणखी भर पडणे, या करिता शासनाने पार्कींगची व्यवस्था करण्याकरिता उपाय योजना करण्याची आवश्यकता"

सभापती महोदय, मुंबईमध्ये जे मोठे ब्रिज आहेत त्यातील 9 ब्रिजखालील पार्कींगची व्यवस्था अचानक रद्द करुन टाकण्यात आली आहे. त्या ठिकाणी सुशोभिकरणाच्या माध्यमातून काम केले जाणार आहे. एक तर शासनाजवळ पैसे नाहीत, काही ब्रिजच्या खाली यापूर्वी सुशोभिकरण करण्यात आले होते ते नष्ट झाले आहे, उद्ध्वस्त झाले आहे. त्या ठिकाणी माणसे झोपत आहेत. एक तर मुंबईत मोठया प्रमाणावर कुठेही पार्कींगची व्यवस्था नाही. असे असतांना या ठिकाणी कोणत्या मार्गाने व्यवस्था होणार आहे. त्यामुळे काढण्यात आलेले आदेश ताबडतोब थांबविण्याबाबत आपण शासनाला निदेश द्यावेत अशी माझी विनंती आहे".

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेच्या 41 प्राथमिक शाळांमध्ये सोमवार दि.28.11.2011 पासून सेमी इंग्रजी माध्यम पहिला टप्पा सुरु करणे

**मु.शी.**: सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेच्या 41 प्राथमिक शाळांमध्ये सोमवार दि.28.11.2011 पासून सेमी इंग्रजी माध्यम पहिला टप्पा सुरु करणे याबाबत श्री.दिवाकर रावते, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

सभापती महोदय, अनिर्बंध सत्तेमधून भ्रष्टाचारी मनोवृत्ती निर्माण होते. त्याचे उदाहरण मी या ठिकाणी मांडीत आहे. मला काय वाटते म्हणजे प्रशासनाला काय वाटते या करिता कायद्यामध्ये तरतूद करुन ते त्यामध्ये बसवितात. मंत्री महोदयांना काय वाटते यानुसार ते घडत नाही. जर ते कायद्यात बसत नसेल तर प्रशासन त्याला मान्यता देत नाही. ते कायद्यात कसे बसवावयाचे हे सांगितल्यानंतर त्याला मान्यता मिळते. महानगरपालिका किंवा स्थानिक स्वराज्य संस्थेमधून निवडून आलेल्या सदस्यांनी स्वत:हून कोणताही ठराव केला तरी तो जर कायद्यामध्ये बसत नसेल तर त्या ठिकाणी असलेला प्रशासकीय अधिकारी तो स्वीकारीत नाही ही पध्दत आहे. या संदर्भातील कायदे बनविण्याचा अधिकार राज्य शासनाला असल्यामुळे निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींनी काहीही ठराव केला तरी आणि कितीही हडेलहप्पी केली तरी तो राज्य शासनाच्या कायद्यात बसत नसेल तर स्वीकारता येत नाही. त्याचे एक उत्तम उदाहरण मी या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून मांडणार आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये अनिर्बंधता निर्माण झाली आहे. मी बोलेन तेच घडणार अशाप्रकारचा एक राजदंड त्या ठिकाणी निर्माण झाला आहे. त्याचे हे बोलके व दुर्दैवी उदाहरण आपणास देत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

श्री. दिवाकर रावते...

बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, 2009 च्या कलम 29 मध्ये प्राथमिक शिक्षणाचा अभ्यासक्रम पूर्ण करण्या बाबतच्या तरतुदी आहेत. त्यानुसार प्राथमिक शिक्षणाचे माध्यम मातृभाषा असावे असे बंधन आहे. असे असतांनाही सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये प्राथमिक शिक्षणासाठी सेमी इंग्रजी माध्यम देण्यास तेथील मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सुरुवात केली आहे. शैक्षणिक वर्ष सुरु होत असतांना सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेकडे 41 प्राथमिक शाळांमध्ये सोमवार दि.28.11.2011 पासून सेमी इंग्रजी माध्यम पहिला टप्पा म्हणून सुरु करण्यात आला आहे. म्हणजेच जून महिन्यात सुरु झालेल्या शाळांमध्ये आतापर्यन्त मातृभाषेमध्ये शिक्षण दिले जात होते परंतु आता मध्येच त्या शाळांमध्ये इंग्रजी भाषेतून शिक्षण देण्यास सुरुवात करण्यात आली. आपल्याला जे काही बदल करावयाचे असतील तर ते शाळा सुरु होते तेव्हापासून करावयाचे असतात. या शाळांच्या प्रगती अहवालानुसार सेमी इंग्रजीचा प्रयोग यशस्वी झाल्यानंतर पुढील वर्षीपासून सर्वच शाळांमधून सेमी इंग्रजीचा वापर करण्यात येणार आहे.

शिक्षण हक्क कायद्यात मातृभाषेची तरतूद असतांना सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेने सेमी इंग्रजी माध्यम लागू करण्याचा ठराव जिल्हापरिषदेत संमत केला आहे. सदर ठराव संमत करण्यापूर्वी सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी कायद्यातील उपरोक्त तरतुदी लक्षात घेऊन सदर ठराव संमत करण्यापासून जिल्हापरिषदेला रोखणे आवश्यक होते. हा ठराव कायद्यामध्ये बसणारा नाही असे सांगणे हे मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांचे काम असते. तथापि त्यांनी कायद्यातील तरतुदींकडे दुर्लक्ष केले आहे. तरी या संदर्भातील माननीय ग्रामविकास मंत्री यांनी व्यक्तिश: लक्ष घालावे आणि सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेने स्वीकारलेल्या सेमी इंग्रजी माध्यम पध्दत त्वरित बंद करण्याबाबत जिल्हा परिषदेस आदेश द्यावेत व याबाबत जिल्हाधिकाऱ्यांनी कायद्याची पायमल्ली करणारे पाऊल उचलले आहे त्याबाबत त्यांना जाब विचारण्यात यावा व शासन व्यवस्थेमध्ये शैक्षणिक धोरणाची पायमल्ली केल्याबद्दल त्यांची त्या ठिकाणाहून त्वरित बदली करण्यात यावी. याकरिता मी ही विशेष उल्लेखाची सूचना उपस्थित करीत आहे .

हा शैक्षणिक बदल करण्याबद्दल माझी तक्रार नाही, परंतु तो जून महिन्यापासून करण्यात यावा. जूनपासून नोव्हेंबरपर्यन्त मुले मराठी भाषेत शिक्षण घेत आहेत आणि मला वाटते म्हणून इंग्रजी माध्यमाचे शिक्षण देण्यासाठी कायदा पायदळी तुडविण्याचे प्रकार चालू आहेत ते ताबडतोब

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

श्री.दिवाकर रावते...

थांबविण्यात यावेत. यामध्ये म्हातारी मेलीच आहे, परंतु काळ सोकावेल. तो सोकावलेला असला तरी तो एवढा सोकावेल की तो आता कुणालाच थांबविता येणार नाही भविष्यात देखील थांबविता येणार नाही. या करिता मी ही धोक्याची घंटा वाजवीत आहे. धन्यवाद.

----

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ पूर्वी श्री.सरफरे . . .. 15:20

**पृ.शी.**: शुन्य ते अठरा वयोगटातील बालकांच्या मृत्यूचे वाढत असलेले प्रमाण

**मु.शी.**: शुन्य ते अठरा वयोगटातील बालकांच्या मृत्यूचे वाढत असलेले प्रमाण याबाबत श्री.हेमंत टकले वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.हेमंत टकले (विधानसभेव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

सभापती महोदय, टाटा सामाजिक विज्ञान संस्थेने नुकताच एक अहवाल प्रसिध्द केला आहे आणि ज्याच्यामध्ये 0 ते 18 वयोगटातील बालकांच्या मृत्यूचे प्रमाण प्रचंड मोठे आहे.या प्रमाणामध्ये विना हेतू आणि अपघाताने मृत्यू होण्याचे प्रमाण वाढलेले आहे असे त्यातून निदर्शनास आले आहे आणि हा सार्वजनिक आरोग्याचा महत्वाचा प्रश्न आहे. याबाबत व्यापक जनजागृती कार्यक्रम हाती घेण्याची आवश्यकता आहे. तसेच संरक्षणात्मक नवीन कायदा करण्याचीही आवश्यकता आहे. त्याचप्रमाणे या बाबतीत इजा होणार नाही अशी साधने निर्माण करुन ती उपलब्ध करुन देण्यासाठी शासनाने पुढाकार घ्यावा अशी मी विनंती करतो.

----

. . . 2 डी-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : राज्याच्या अनेक मुख्य नद्यांमधील प्रदूषणात मोठ्या प्रमाणात वाढ होणे

**मु.शी.** : राज्याच्या अनेक मुख्य नद्यांमधील प्रदूषणात मोठ्या प्रमाणात वाढ होणे याबाबत डॉ.नीलम गोऱ्हे वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उप सभापती** : मा□□य सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय,मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडते.

याठिकाणी गेल्या तीन वर्षापासून सदनामध्ये नद्यांच्या प्रदूषणाबाबत विविध माध्यमातून अनेक सन्माननीय सदस्य चर्चा उपस्थित करीत आहेत आणि आता महानगरपालिकांची निवडणूक होत आहे.अशा वेळेला पुणे, पिंपरी-चिंचवड आणि पश्चिम महाराष्ट्रातील ज्या अनेक नद्या आहेत, त्यामध्ये मुळा-मुठा,पवना भीमा या सर्व नद्यांमध्ये प्रक्रिया न केलेले सांडपाणी सोडल्यामुळे या नद्यांचे पाणी प्रदूषित झालेले आहे. तसेच रासायनिक मैला आणि त्याचसोबत भांडी, वाहने आणि जनावरे धुणे आणि आसपासच्या सर्व ग्रामपंचातींचे पाणी या नद्यांमध्ये मिसळते. जी परिस्थिती पश्चिम महाराष्ट्रामध्ये आहे,तीच परिस्थिती विदर्भामध्ये आहे. येथील अनेक नद्या ज्यासंदर्भात महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाला उच्च न्यायालयाने प्रतिज्ञा पत्राव्दारे सादर करण्यास सांगितले आहे की,तुम्ही याबाबतीत सरकारकडे कोणती प्रक्रिया प्रस्तावित केलेली आहे. यामधून अनेक आजारांचा संसर्ग होत असताना सरकारने नदी प्रदूषणाच्या संदर्भात एकत्रित आराखडा तयार न केल्यामुळे या सर्व महानगरपालिका आणि ग्राम पंचायत क्षेत्रामध्ये प्रचंड मोठया प्रमाणात रोगराई आणि नैसर्गिक हानी होत आहे.या विशेष उल्लेखाबाबत आपण स्वत: लक्ष घालून संरक्षण द्यावे याकडे मी लक्ष वेधत आहे.

-----

2डी-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : मुंबईतील पवई येथील आय.आय.टी.कॅम्पस्
मधील तीन वसतीगृहातील विद्यार्थ्यांना उपहार-
गृहातील पदार्थ खाल्ल्यामुळे झालेली विषबाधा

**मु.शी.** : मुंबईतील पवई येथील आय.आय.टी.कॅम्पस्
मधील तीन वसतीगृहातील विद्यार्थ्यांना उपहार-
गृहातील पदार्थ खाल्ल्यामुळे झालेली विषबाधा
याबाबत श्री.रमेश शेंडगे वि.प.स.यांनी दिलेली
विशेष उल्लेखाची सूचना.

**उप सभापती** : माननीय सदस्या श्री.रमेश शेंडगे यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.रमेश शेंडगे (नामनियुक्त) : सभापती महोदय,मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

सभापती महोदय, दिनांक 25 सप्टेंबर 2011 रोजी मुंबईतील पवई येथील आय.आय.टी. कॅम्पस् मधील तीन वसतीगृहातील विद्यार्थ्यांना उपहारगृहातील पदार्थ खाल्ल्या मुळे विषबाधा होणे. तपासामध्ये सदर वसतीगृहातील पिण्याचे पाणी सुध्दा दूषित असल्याचे आढळणे.उपहारगृह चालकाने महानगरपालिका तसेच अन्न व प्रशासन विभागाचे कोणतेही प्रमाणपत्र घेतल्याचे सिध्द न होणे. हका-नुडल्स् हा पदार्थ दूषित असल्याचे आढळणे. देशातील उच्च प्रतीचे तांत्रिक व इतर शिक्षण देणाऱ्या या अग्रेसर संस्थेत अशा प्रकारे विद्यार्थ्यांना विषबाधा होणे ही अतिशय गंभीर व चिंतेची बाब असणे, याबाबत शासनाने केलेली व करण्यात येत असलेली उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया. धन्यवाद.

-----

. . . 2 डी-4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**पृ. शी.** : राज्यातील नगरविकास विभाग असणाऱ्या महानगर

पालिका,नगरपालिका,नगरपंचायती मध्ये नवीन भरती
करण्यावर आलेले निर्बंध.

**मु. शी.** : राज्यातील नगरविकास विभाग असणाऱ्या महानगर
पालिका,नगरपालिका,नगरपंचायती मध्ये नवीन भरती
करण्यावर आलेले निर्बंध याबाबत ॲड.उषाताई दराडे
वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उप सभापती** : मा□□य सदस्या ॲड.उषाताई दराडे यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

ॲड.उषाताई दराडे (विधानसभेव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडते.

"राज्यातील नगरविकास विभाग असणाऱ्या महानगरपालिका, नगरपालिका, नगरपंचायती आस्थापनेवरील खर्च 35 टक्के पेक्षा जास्त नसावा अशी अट नगरविकास विभागाने घातल्या कारणाने नवीन भरती करण्यावर आलेले निर्बंध, यापूर्वी करण्यात आलेल्या बहुसंख्य भरती खुल्या प्रवर्गातून करण्यात येणे, परिणामी शासनाच्या आरक्षित धोरणानुसार बहुसंख्य आरक्षित पदे भरण्यात न येणे, यासाठी 35 टक्के खर्चाची अट शिथिल करावी याबाबत शासनाने तातडीने करावयाची उपाययोजना याबाबत मी विशेष उल्लेखाची सूचना देत आहे.

----

. . . .2 डी-5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

22-12-2011 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) DD-5

APR/ 15:20

**पृ.शी.**: कोकणातील भूविकास बँकेतील कर्मचाऱ्यांना
गेल्या सात महिन्यापासून पगार न मिळणे.

**मु.शी.**: कोकणातील भूविकास बँकेतील कर्मचाऱ्यांना गेल्या सात महिन्यापासून पगार न मिळणे या बाबत श्री.परशुराम उपरकर, वि.प.स.यांनी यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.किरण पावसकर (विधानसभेव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

सभापती महोदय, कोकणातील भूविकास बँक आणि या बँकेमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना गेल्या सात महिन्यापासून पगार मिळालेला नाही आणि त्यांच्याकडे रिकव्हरी करण्यासाठी देखील पैसे नाहीत. परंतु भू-विकास बँकेची जी शिखर बँक आहे, ती बँक ग्रामीण भागात काम करीत नसतानाही त्या बँकेमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना पगार दिला जातो. तसेच भूविकास बँकेमधील जे कर्मचारी दोन वर्षापूर्वी जे रिटायर झालेले आहेत, त्यांचेही पूर्णपणे पैसे देण्यात आलेले नाहीत. त्यामुळे या कर्मचाऱ्यांना ते पैसे तातडीने देण्यासाठी मी या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून विनंती करीत आहे.

-----

. . . .2 डी-6

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**पृ.शी.**: राज्यात मुंबई व पुणे शहरात दहशतवादी हल्ल्यातील पीडितांच्या कुटुंबीयांना मदत व त्यांचे पुनर्वसन करण्याबाबत.

**मु.शी.**: राज्यात मुंबई व पुणे शहरात दहशतवादी हल्ल्यातील पीडितांच्या कुटुंबीयांना मदत व त्यांचे पुनर्वसन करण्याबाबत श्री.जयवंतराव जाधव वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना .

. **उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.जयवंतराव जाधव यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.जयवंतराव जाधव (नाशिक स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

सभापती महोदय, राज्यात विशेषत: मुंबई आणि पुणे या शहरांमध्ये गेल्या पाच वर्षामध्ये झ ालेले दहशतवादी हल्ले आणि झालेल्या स्फोटामध्ये हकनाक बळी पडलेले पीडित व त्यांच्या कुटुंबीयांची मदत व पुनर्वसनाची अनेक प्रकरणे केंद्र व राज्य शासनाकडे प्रलंबित रहाणे. मानवी हक्क आयोगाच्या न्यायपीठाने या दिरंगाईबाबत दिनांक 20 ऑक्टोबर 2011 अखेरपर्यंत अहवाल देण्याची मुदत देऊनही शासनामार्फत मदत देण्यास चालढकल करण्यात येणे. त्यामुळे दशहतवादी हल्ल्यातील पीडितांमध्ये व कुटुंबीयांमध्ये निर्माण झालेला असंतोष व निराशेचे वातावरण. या दहशतवादी हल्ल्यामध्ये हकनाक बळी पडलेल्या या नागरिकांच्या वैद्यकीय मदतीसाठी व पुनर्वसनाबाबत शासनाने तातडीने कार्यवाही करावी अशी मागणी मी या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून विनंती करीत आहे.

-----

. . . .2 डी-7

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**पृ.शी.**: महाराष्ट्रातील प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियमामध्ये सुधारणा घडवून आणणे

**मु.शी.**: महाराष्ट्रातील प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियमामध्ये सुधारणा घडवून आणण्याबाबत

श्री.सतीश चव्हाण, वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.सतीश चव्हाण यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.सतीश चव्हाण (औरंगाबाद विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

सभापती महोदय, महाराष्ट्रातील प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम 1952 मध्ये सुधारणा घडवून आणण्याबाबत राज्य शासनाने विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली सुधारणा व दुरुस्ती करण्यासाठी 12 सदस्यांची समिती गठीत केली होती. सदरहू समितीने शासनास अहवाल सादर करताना आणि कोणताही प्रकल्प राबविताना आधी पुनर्वसन नंतर धरण तसेच प्रकल्पामुळे बाधित होणाऱ्या प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करताना गावठाणाच्या 8 कि.मी.आत जमीन उपलब्ध करुन द्यावी यासाठी जमीन उपलब्ध असणे इ.शिफारशी करुनही त्याची अंमलबजावणी होत नसल्याचे उघडकीस येणे याबाबत पुनर्वसन कायदा समितीकडून सुचविण्यात आलेल्या शिफारशींची अंमलबजावणी करण्यात यावी अशी मागणी मी या विशेष उल्लेखाव्दारे शासनास करीत आहे.

----

. . . .2डी-8

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**पृ.शी.**: चंद्रपूर जिल्ह्यात प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये औषधे उपलब्ध नसणे

**मु.शी.**: चंद्रपूर जिल्ह्यात प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये औषधे उपलब्ध नसणे याबाबत श्री.जैनुद्दीन जव्हेरी वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची

सूचना

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.जैनुद्दीन जव्हेरी यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.जैनुद्दीन जव्हेरी (वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली स्थानिक प्राधिकारी संस्था) :सभापती महोदय मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

सभापती महोदय, चंद्रपूर जिल्ह्यात प्राथमिक आरोग्य केंद्रात औषधे खरेदी करण्यासाठी मागील वर्षापासून सुमारे साडेतीन कोटी रुपयांचा निधी शासनातर्फे देण्यात आला. या निधीला जिल्हा परिषदेकडून अद्यापपर्यंत मंजुरी देण्यात आलेली नाही.यामुळे रुग्णांना वेळेवर औषधोपचार मिळत नसल्यामुळे अनेक रुग्णांना मृत्यूला सामोरे जावे लागत आहे. तसेच आरोग्य केंद्रामध्ये औषधाचा साठा उपलब्ध नसल्यामुळे वैद्यकीय अधिकारी यांनी जिल्हा परिषदेकडे वारंवार औषध साठा पुरविण्यासाठी पत्रव्यवहार करुनही आजपावेतो औषधांचा साठा पुरविण्याकरता निधी मंजूर करण्यात आला नसल्याने रुग्ण व त्यांचे नातेवाईक यांच्यामध्ये औषधे वेळेवर मिळत नसल्याने चिंता निर्माण झालेली आहे. त्यामुळे त्यांच्यामध्ये तीव्र असंतोषाची भावना पसरलेली आहे. सबब प्राथमिक आरोग्य केंद्रास त्वरित औषधे पुरविण्याबाबत दुर्लक्ष व टाळाटाळ करणाऱ्या जिल्हा परिषदेवर तातडीने कारवाई करावी व याबाबत संबंधितांना आदेश द्यावेत. याकरता मी विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे. आपण ती स्वीकृत करावी.

-----

. . . .2 डी-9



श्री.परशुराम उपरकर : सभापती महोदय, मला विशेष उल्लेखाची सूचना मांडण्यास परवानगी देण्यात यावी ही विनंती.

**उप सभापती** : आज बऱ्याच सन्माननीय सदस्यांना विशेष उल्लेखाच्या सूचना मांडण्यासाठी परवानगी दिली आहे. त्यामुळे तुम्हालाही मी परवानगी देतो.परंतु उद्या विशेष उल्लेख घेण्यात येणार नाहीत.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**पृ.शी.**: मुंबईतील लालबाग येथील हाजी कसम चाळीच्या पुनर्विकासाच्या बाबतीत विकासकाकडून होत असलेली दिरंगाई.

**मु.शी.**: मुंबईतील लालबाग येथील हाजी कसम चाळीच्या पुनर्विकासाच्या बाबतीत विकासकाकडून होत असलेली दिरंगाई याबाबत श्री.परशुराम उपरकर वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.परशुराम उपरकर (विधानसभेव्दारा निर्वाचित) :सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

सभापती महोदय, मुंबईमध्ये लालबाग येथील हाजी कसम चाळीच्या पुनर्विकासाचे काम करण्यासाठी निशा डेव्हल्पर्स यांना 2007 मध्ये संमती देण्यात आलेली आहे. परंतु विकासकाकडून दोन-तीन वर्षामध्ये पुनर्वसनाबाबत कोणतीही हालचाल झालेली नाही. तेथे वेळकाढूपणाचे धोरण अवलंबिले जात असल्याने या चाळीतील तीनही इमारतींना धोकादायक पध्दतीने तडे गेले असून न्यायालयाने विकासकाला दोन महिन्यामध्ये ते दुरुस्त करण्याचे आदेश दिलेले असताना निशा डेव्हलपरच्या मालकाकडून सदरहू आदेश न पाळल्यामुळे न्यायालयाचा अवमान करण्यात आला आहे. उलट तेथील इमारतीचा काही भाग पडल्यामुळे तेथे रहाणाऱ्या रहिवाशांमध्ये भीती व दहशतीचे वातावरण निर्माण करुन त्यांची हकालपट्टी करीत, या जागी टॉवर बांधण्याचा डाव बिल्डर कडून रचला जात असून तेथील 614 कुटुंबीयांची फसवणूक केल्याचे दिसून येत आहे. याबाबत शासनाने चौकशी करुन कार्यवाही करावी यासाठी मी विशेष उल्लेखाची सूचना देत आहे.

-----

. . . .2 डी-11



**उप सभापती** : आता अंतिम आठवडा प्रस्ताव चर्चेसाठी घेण्यात येईल.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सभागृहामध्ये माननीय मंत्री महोदय उपस्थित नाहीत.

**उप सभापती** : मी माननीय मंत्री महोदयांना कळविले असून, ते 5 मिनिटांमध्ये सदनामध्ये येत आहेत.

(काही सन्माननीय सदस्य खाली बसून बोलतात.)

**उप सभापती** : ठीक आहे. मी दहा मिनिटांसाठी सभागृहाची बैठक स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक 03 वाजून 28 मिनिटांनी 10 मिनिटांसाठी स्थगित झाली.)

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर कु.थोरात . . . .

अप्रधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ प्रथम सौ. रणदिवे ..... 15:30

**( स्थगितीनंतर )**

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती )**

**पृ.शी.**: राज्यात बिघडलेली कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती.

**मु.शी.**: राज्यात बिघडलेली कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती या विषयावर सर्वश्री पांडुरंग फुंडकर, दिवाकर रावते, विनोद तावडे, रामदास कदम, संजय केळकर, डॉ. दीपक सावंत, श्रीमती शोभा फडणवीस, डॉ. नीलम गोऱ्हे, सर्वश्री चंद्रकांत पाटील, जयंत प्र. पाटील, डॉ. रणजित पाटील, सर्वश्री धनंजय मुंडे, रामनाथ मोते, परशुराम उपरकर, गोपीकिसन बाजोरिया वि.प.स. यांचा प्रस्ताव.

श्री. रामदास कदम ( मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) :सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 259 अन्वये पुढील प्रस्ताव मांडतो.

"महाराष्ट्रामध्ये चांद्यापासून बांद्यापर्यंत चोऱ्या, दरोडे, लुटमार,खंडणी, दंगलीचे प्रमाण वाढलेले असणे, एकूण गुन्हेगारीत वाढ झालेली असताना पोलिसांच्या व विधी व न्याय खात्याच्या संशयास्पद भूमिकेमुळे गुन्हेगारांना शिक्षा होण्याचे प्रमाण केवळ 6 ते 7 टक्क्यापर्यंतच असणे, शिक्षा झालेले आरोपी देखील हजारोंच्या संख्येने फरारी झाल्याचे निदर्शनास येणे, तसेच महिला व बालकांवरील अत्याचारात पुरोगामी महाराष्ट्रात इतर राज्याच्या तुलनेत झालेली वाढ, लैंगिक अत्याचाराच्या जाचाला महिला पोलीससुध्दा बळी पडल्याचे नुकतेच निदर्शनास येणे, अल्पवयीन मुली व महिलांवर बलात्कार करुन त्यांचा खून करण्याच्या घटनांमध्ये वाढ होणे, सायबर गुन्ह्यांच्या माध्यमातून आर्थिक फसवणूक करण्याच्या घटनेत वाढ झालेली असणे, गडचिरोलीमध्ये नक्षलवाद्यांचा प्रभाव कमी करण्यास शासनास उपयश येणे, नक्षलवाद्यांचे लोण गडचिरोलीपर्यंत मर्यादित न राहता पुण्यापर्यंत पोहोचणे, गुन्हेगारांवर कारवाई न करणाऱ्या पोलिसांनी केलेल्या गोळीबारात वारकरी, गावकरी व शेतकरी बळी पडणे, परंतु या घटनांची चौकशी अद्यापपर्यंत न होणे, मुंबई येथे झालेल्या साखळी बॉम्बस्फोटाच्या खऱ्या सूत्रधारापर्यंत पोहोचण्यास अद्यापपर्यंत गृह विभागास अपयश येणे, कायदा व सुव्यवस्थेच्या या बिघडलेल्या परिस्थितीमुळे संपूर्ण महाराष्ट्रातील जनतेमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

..2...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम. . .

सभापती महोदय, कायदा व सुव्यवस्थेच्या बाबतीत "आबाचींच प्रतिमा होते आबांचीच वैरी" असे मी म्हटले तर ते चुकीचे होईल काय असा प्रश्न मला पडलेला आहे. संबंध महाराष्ट्रात आबांची एक वेगळी नि:स्वार्थ प्रतिमा आपल्याला पहावयास मिळते.

**उप सभापती** : आज मला पहिल्यांदाच कवी रामदास बघावयास मिळाले आहेत.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, मी आपला आभारी आहे. मी आपल्याला धन्यवाद देतो. कोकणात गेल्यानंतर आम्ही महाराष्ट्रात आहोत की, बिहारमध्ये प्रवेश केला आहे असा प्रश्न कधी कधी आम्हाला पडतो. म्हणून मी ही कविता केलेली आहे. आबांबाबत दादांशिवाय सहसा कधीही कोणी डायरेक्ट आरोप करु शकणार नाही. कोकणात गेल्यानंतर आम्ही नेमके कुठे आहोत असा प्रश्न माझ्या सारख्याला पडतो. त्यामुळे आता कोकणात जावयाचे की नाही, तेथे एखादी सभा घ्यावयाची की नाही, असा प्रश्न आम्हाला पडलेला आहे म्हणून एक गोष्ट मी पहिल्यादाच आबांच्या लक्षात आणून देऊ दच्छितो. गेल्या सहा महिन्यात जवळ जवळ 1430 खून झालेले आहेत. 1091 खुनाचे प्रयत्न झालेले आहेत. 6927 जबरी चोऱ्या झालेल्या आहेत. 831 बलात्कार झालेले आहेत. हे आकडे काही वेगळेच सांगून जातात. गेल्या महिनाभरामध्ये सहा महिलांच्या आत्महत्या झाल्या, त्याबाबतचा प्रश्न प्रश्नोत्तराच्या तासत चर्चेला आला होता त्यामुळे त्याबाबत मी सभागृहाचा वेळ घेऊ इच्छित नाही.

सभापती महोदय, जवळ जवळ 800 गुन्हेगार पॅरोलवर सुटलेले आहेत. पॅरोलवर सुटलेले 800 गुन्हेगार मोकाट सुटणे हे या राज्याच्या दृष्टीने गंभीर आहे. म्हणून या बाबतीत माननीय मंत्री महोदयांनी वैयक्तिक लक्ष घालावे. या गुन्हेगारांना मुळातच जर कोणी जामीन दिला नसेल तर त्यांना पॅरोलवर कसे सोडण्यात आले? पॅरोलवर सोडल्यानंतर ते पुन्हा जेलमध्ये गेले नसतील, ते पोलीस स्टेशनमध्ये हजर झाले नसतील तर त्यांना ज्यांनी जामीन दिलेला आहे त्यांच्यावर कारवाई करण्यात येणार आहे का, केली असेल तर ती काय कारवाई करण्यात आली आहे? या मोकाट सुटलेल्या 800 गुन्हेगारांवर तातडीने कारवाई करुन त्यांना पुन्हा जेलमध्ये डांबण्यात येणार आहे का? याचे उत्तर माननीय मंत्री महोदय, त्यांच्या उत्तराच्या भाषणात देतील अशी माझी अपेक्षा आहे.

**( सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री. मोहन जोशी )**

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम. . .

सभापती महोदय, 7 वर्षामध्ये जवळ जवळ 23 हजार कैदी फरार झालेले आहेत. एवढे गुन्हेगार ज्यावेळी वॉन्टेड असतात त्यावेळी या राज्याची कायदा व सुव्यवस्थेची परिस्थती काय असेल हे कोणा जोशी आडनावाच्या ज्योतिषाला विचारण्याची आवश्यकता नाही. या बाबत लहान मूल देखील सांगू शकेल. सभापती महोदय, मी आपल्याला उद्देशून बोललो नाही तर जोशी आडनाव असलेले ज्योतिषी जास्त असतात महणून मी जोशी हे नाव घेतलेले आहे. सभापती महोदय, सन 2003 ते 2009 पर्यंत जे 23 हजार कैदी फारर झालेले आहेत, या बाबतीत माननीय मंत्री महोदयांनी तातडीने लक्ष घालावे, अशी माझी विनंती आहे. 15715 बालकांवर मोठया प्रमाणात अत्याचार झालेले आहेत. त्यापैकी फक्त 598 आरोपींना शिक्षा झालेली आहे.त्यामुळे हे गुन्हे सिध्द होण्याचे प्रमाण फक्त 3.8 एवढे आहे. केवळ केसेस नोंदवून घेणे आणि त्या कोर्टात पाठविणे एवढेच पोलिसांचे काम मर्यादित न ठेवता जे गुन्हे कोर्टात पाठविण्यात येतात ते गुन्हे सिध्द होतील आणि त्या गुन्हेगारांना शिक्षा होईल या अनुषंगाने जे प्रयत्न व्हावयास पाहिजेत ते प्रयत्न महाराष्ट्रात होत नाहीत. त्या पलीकडे जाऊन माझ्याकडे आकडेवारी आहे पण ती आकडेवारी सांगून मी सभागृहाचा जास्त वेळ घेऊ इच्छित नाही.,

सभापती महोदय, राजधानी दिल्लीच्या खालोखाल मुंबईमध्ये आणि या महाराष्ट्र राज्यामध्ये बलात्काराच्या घटना झालेल्या आहेत. गेल्या वर्षी सर्वाधिक म्हणजे 414 बलात्काराच्या घटना दिल्लीमध्ये घडलेल्या आहेत. तर मुंबईत 194 बलात्काराच्या घटना घडलेल्या आहेत म्हणून या बलात्काराच्या घटना कशा कमी होतील याकडे थोडेसे अधिक लक्ष घालून कायदा व सुव्यवस्था शाबूत आहे हे दाखविण्याचे काम माननीय मंत्री महोदयांकडून होईल अशी मी अपेक्षा व्यक्त केली तर ती चुकीची आहे असे मला वाटत नाही.सभापती महोदय, नक्षलवादी कारवायामध्ये दिनांक 1 फेबुवारी, 2009 मध्ये 15 लोक शहीद झालेले आहेत.दिनांक 8 ऑक्टोबर, 2009 मध्ये 17 लोक शहीद झालेले आहेत. दिनांक 21 मे, 2010 मध्ये 16 लोक शहीद झालेले आहेत. फेब्रुवारी, 2005 मध्ये 7 लोक शहीद झालेले आहेत. नोव्हेंबर, 2005 मध्ये 10 लोक शहीद झाले आहेत. ऑगस्ट 2003 मध्ये 5 लोक शहीद झालेले आहेत. अशा पध्दतीने शहीद झालेल्या लोकांची फार मोठी आकडेवारी पहावयास मिळते, ही बाब महाराष्ट्रासाठी निश्चितपणे भूषणावह नाही. म्हणून नक्षलवाद्यांचा अत्याचार थांबविण्यासाठी शासन पूर्णपणे अपयशी ठरले आहे की काय अशी शंका

..4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम... . .

माझ्या मनात निर्माण होते. सभापती महोदय, हेलिकॉप्टर घेण्यात येणार आहेत आणि या हेलिकॉप्टरच्या माध्यमातून टेहळणी करण्यात येणार आहे, असे या सभागृहात उत्तर देण्यात आले होते. या सर्व गोष्टींच्या फक्त घोषणा करण्यात आल्या पण त्याची अंमलबजावणी झाली काय या बाबतचा आढावा घेणे अत्यंत आवश्यक आहे असे मला वाटते.

सभापती महोदय, विनयभंगाचा गुन्हा अजामीनपात्र करण्यात येईल अशी घोषणा या ठिकाणी करण्यात आली होती. पण आतापर्यंत त्याची अंमलबजावणी होऊ शकलेली नाही. ती अंमलबजावणी माननीय मंत्री महोदयांकडून होईल अशी माझी अपेक्षा आहे. भारतीय दंड विधान संहिता कायद्यातील गुन्ह्यांचे प्रमाण महाराष्ट्रामध्ये 90.60 टक्के, तामिळनाडूमध्ये 62 टक्के, राजस्थानमध्ये 60 टक्के, नवी दिल्लीमध्ये 58 टक्के आहे. महाराष्ट्र पोलिसांची कार्यपध्दती कशी आहे हे यावरुन स्पष्ट होते. हे महाराष्ट्राला निश्चितपणे भूषणावह नाही. माननीय मंत्री महोदयांनी यामध्ये निश्चितपणे लक्ष घालावे अशी माझी विनंती आहे. वाहन चोरांनी पोलिसांचे टेन्शन अधिक वाढविलेले आहे असे मी म्हटले तर ते चुकीचे ठरणार नाही. मुंबईमध्ये नोव्हेंबर, 2011 पर्यंत 4296 चोरीला गेलेल्या आहेत.

यानंतर श्री. बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. रामदास कदम .....

कोठे आहे कायदा व सुव्यवस्था ? म्हणून या गाड्या चोरांच्या बाबतीमध्ये फक्त 25 टक्के म्हणजे 1055 गुन्हे उघडकीस आले. बाकीचे गुन्हे आतापर्यंत का उघडकीस आले नाहीत ? ही जबाबदारी कोणाची ? या बाबतीत देखील आपण लक्ष घालणे अतिशय आवश्यक आहे.

सभापती महोदय, 10 महिन्यामध्ये मुंबईतून 744 व्यक्ती हरवलेल्या आहेत. माननीय मंत्री महोदयांनी ही बाब अतिशय गांभीर्याने घ्यावी, अशी माझी विनंती आहे. या ज्या 744 व्यक्ती गायब झालेल्या आहेत त्यामध्ये बहुतांश मुली आहेत. या मुली गायब का होत आहेत, त्यांना कोण घेऊन जातो, या मुली कोठे जात आहेत, त्यांचे पुढे काय होते, लहान मुले गायब होत असतील तर त्यांचे पुढे काय होते ? या बाबतीत मी आपल्याला एक उदाहरण देतो. आपले पोलीस कशा पध्दतीने काम करीत आहेत हे त्यातून दिसून येईल.

विरारला राहणाऱ्या श्री. रमाशंकर पांडे या व्यक्तीच्या मुलीचे नाव सोनी रमाशंकर पांडे आहे. त्या मुलीचे वय 17 वर्षे 6 महिने आहे. तिला अजून 18 वर्षे पूर्ण झालेली नाहीत. एक महिन्याच्या अगोदर मागच्या 23 तारखेला कासीम नावाचा एक मुस्लीम मुलगा या मुलीला घेऊन गेलेला आहे. हा जो उत्तरभारतीय पंडित आहे तो दरदिवशी पोलीस स्टेशनला जातो आणि सांगतो की, माझ्या मुलीचा मोबाईल चालू आहे. त्यांनी विरारच्या आकाशी पोलीस स्टेशनमध्ये मोबाईल नंबर दिले. त्या उत्तरभारतीयाने पोलीस स्टेशनला नंबर दिले आणि सांगितले की, या नंबरवर फोन लावा, माझ्या मुलीचा मोबाईल चालू आहे परंतु तो दुसऱ्याच्या हातामध्ये आहे. जो कासीम या मुलीला पळवून घेऊन गेलेला आहे त्याचा मोबाईल चालू आहे. त्याचा मोबाईल नंबर त्यांनी पोलीस स्टेशनला दिलेला आहे. या कासीमचा जो भाऊ आहे तो या उत्तरभारतीयाला धमकी देतो की, पोलीस स्टेशनला गेलास तर तुला खलास करुन टाकू. त्याचाही मोबाईल नंबर त्यांनी पोलीस स्टेशनला दिलेला आहे. एखाद्या माणसाची मुलगी पळवून घेऊन जातात, तिचे वय 18 वर्षे नाही, तो उत्तरभारतीय सगळे मोबाईल नंबर पोलीस स्टेशनला देतो तरी देखील पोलीस हातावर हात बांधून बसलेले आहेत. ही बाब आपल्याला मुळीच भूषणावह नाही. तो माझ्याकडे येऊन अक्षरश: रडला. तो दोन तास रडत बसला होता. अशा पध्दतीने 10 महिन्यामध्ये या मुंबईतून 744 व्यक्ती

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम .....

गायब होत आहेत. याचा अर्थ असा की, पोलीस काहीच लक्ष देत नाहीत. मी या बाबतीत आपल्याला एक लेखी पत्र देतो. या पोलीस स्टेशनला त्यांचे मोबाईल नंबर मिळाल्यानंतर त्या मोबाईल नंबरवरुन हा मुलगा कोठे आहे, त्या मुलीला तो कोठे घेऊन गेलेला आहे हे ताबडतोब कळू शकते. उद्याच्या 23 तारखेला या घटनेला एक महिना होईल. या एक महिन्यामध्ये या मुलीचा शोध लावण्यासाठी 50 वेळा त्या मुलीचा बाप पोलीस स्टेशनला जातो. कशा पध्दतीने काम चालले आहे हे एक उदाहरण या ठिकाणी सांगितलेले आहे.

सभापती महोदय, यानंतर मला एटीएसच्या बाबतीत सांगावयाचे आहे. जर्मन बेकरीवर झालेल्या हल्ल्याचे गुन्हेगार दुर्दैवाने आपल्याला सापडलेले नाहीत. आपण एटीएसमध्ये पोस्टिंग करताना त्यांना दीडपट पगार देऊ अशा पध्दतीचे काही तरी बोलला होता किंवा निर्णय झाला होता. पण हे फक्त गाजर दाखविण्यात आले आहे का, याबाबतीत आतापर्यंत का अंमलबजावणी होत नाही ? एटीएसमध्ये येण्यासाठी कोणीही अधिकारी तयार नाही. एटीएसच्या बाबतीत काही ठिकाणी आपल्याला जे मोठ्या प्रमाणावर अपयश येत आहे त्याला हे देखील एक कारण असू शकते, असे मला वाटते. आपल्याकडे एटीएसचे मंजूर मनुष्यबळ 700 एवढे आहे. आपण त्यापैकी एटीएसमध्ये 60 टक्के जागा भरलेल्या आहेत. 40 टक्के जागा अजूनही रिक्त आहेत. हे खाते अतिशय सेन्सेटिव्ह आहे. तेथील रिक्त जागा तातडीने भरण्याचे काम आपल्याकडून व्हावे अशी माझ ी आपल्याला विनंती आहे. एटीएसकडे जी 45 वाहने आहेत त्यातील पुष्कळशी वाहने नादुरुस्त आहेत. हे खाते अतिशय सेन्सेटिव्ह असल्यामुळे या खात्याकडे चांगली वाहने द्यावीत अशी माझी आपल्याला विनंती आहे.

आपल्या विशेष शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. दादासाहेब चव्हाण हे ग्रँट रोडला बांगलादेशीय लोकांच्या संदर्भात कायदेशीर कारवाई करण्यासाठी आपले पथक घेऊन गेले. त्या बांगलादेशीय लोकांनी श्री. दादासाहेब चव्हाण या पोलीस ऑफीसरलाच झोडले. अशा पध्दतीने या मुंबईमध्ये येऊन बांगलादेशीय लोक आपल्या पोलीस ऑफीसरवर युनिफॉर्ममध्ये असताना हल्ला चढवित आहेत, इतकी वाईट अवस्था या महाराष्ट्रामध्ये पोलीस खात्याची होत असेल तर हा मेसेज आपल्यासाठी निश्चितपणे भूषणावह नाही असे मला वाटते.

...3...

RDB/

श्री. रामदास कदम ......

सभापती महोदय, 22/11 च्या घटनेनंतर राम प्रधान समितीचा अहवाल आला. आपण त्यावेळी राम प्रधान समिती नियुक्त केली होती. त्यावेळी आपल्याला गृहमंत्री पदावरुन काढण्यात आले होते. हा निर्णय आमचा नव्हता. हा निर्णय सभागृहाचा नव्हता. आमची मागणी नव्हती. आपल्या पक्षाकडून तो निर्णय घेतला गेला होता. त्यावेळी मी असा हट्ट धरला होता की, जे पोलीस महानिरीक्षक आहेत त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे, प्रशासनावर कारवाई झाली पाहिजे. पण त्यावेळी उलटे झाले. राम प्रधान समितीने ज्या 26 शिफारशी केलेल्या आहेत, ज्या सूचना दिलेल्या आहेत त्यापैकी किती सूचनांची अंमलबजावणी आपल्याकडून झाली याची माहिती जर माननीय मंत्री महोदयांच्या उत्तराच्या भाषणामध्ये आम्हाला मिळाली तर ते अधिक सोयीचे होईल, असे मला वाटते.

कसाबच्या बाबतीत आपण कधी आणि काय निर्णय घेणार ? आज मुंबईकर अस्वस्थ आणि कसाब स्वस्थ अशी उलट परिस्थिती आपल्याला महाराष्ट्रामध्ये पहावयास मिळते. ज्याने शेकडो लोकांचे बळी घेतले त्याला जगण्याचा काय अधिकार आहे ? त्या घटनेला आता तीन वर्षे झालेली आहेत. आता आपल्या हातात सगळी माहिती आलेली आहे. आता आपल्याला कळले आहे की, 26/11 चा जो हल्ला होता तो पाकिस्ताननेच केला होता. हे आपल्याला कसाबमुळे कळले. आपण एक चांगली गोष्ट केली. तुकाराम ओंबळे यांचा पुतळा आता तयार झालेला आहे. आपण त्या ठिकाणी तुकाराम ओंबळे यांचा पुतळा बसविणार आहात याबद्दल धन्यवाद. एक चांगले काम आपण केले, एक चांगली प्रथा आपण पाडली. तुकाराम ओंबळे यांच्यामुळेच आपल्याला कसाब जिवंत सापडू शकला. त्याने स्वत:च्या पोटावर गोळ्या झेलून कसाबला जिवंत पकडण्याचे काम केले. निश्चितपणे तुकाराम ओंबळे यांना आम्ही पन्नासवेळा सॅल्यूट केलाच पाहिजे. पण जर हा कसाब जिवंत राहिला तर तुकाराम ओंबळे यांचा पुतळा उभा करुन काही उपयोग नाही. त्यांच्या आत्म्याला कधी शांती लाभेल का ? म्हणून या कसाबला आपण लवकरच फाशी द्यावी अशी केवळ मुंबई आणि महाराष्ट्रातीलच नव्हे तर संपूर्ण देशातील लोकांची इच्छा आहे. त्या बाबतीत आपण वैयक्तिक लक्ष घालावे.

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. रामदास कदम .....

अफझल गुरु 10-11 वर्षे झाली तरी अजून बिर्याणी खातच आहे. म्हणून या बाबतीमध्ये देखील आपण गांभीर्याने विचार करुन तत्काळ निर्णय घ्यावा अशी माझी आपल्याला विनंती आहे.

सभापती महोदय, मला एक गोष्ट अजून कळत नाही. या राज्यामध्ये पाकिस्तानच्या विरोधामध्ये घोषणा देणे हा गुन्हा ठरु शकतो का ? हे आता आम्हाला न्यायालय विचारु लागले आहे. आपले पोलीस पाकिस्तानच्या विरोधामध्ये घोषणा दिल्यानंतर त्यांच्यावर गुन्हे दाखल करतात. ज्यावेळी ही बाब न्यायालयासमोर येते तेव्हा न्यायालय आपल्या पोलिसांना हा प्रश्न विचारतात. या हिंदुस्थानामध्ये पाकिस्तानच्या विरोधात घोषणा देणे हा गुन्हा कसा ठरु शकतो ? आपले कोणते असे अधिकारी आहेत की, ज्यांना पाकिस्तानबद्दल इतका जिव्हाळा, आस्था, आपुलकी, प्रेम आणि ओलावा आहे ? हे आपण कशासाठी करतो ? ठाण्याच्या नौपाडा येथील जी केस आहे त्या बाबतीत आपण स्वत: लक्ष घालावे. तेथील गणेशोत्सव मंडळाने अफझलखान वधाचा देखावा दाखविला होता. शाहिस्तेखानाची बोटे शिवाजी महाराजांनी तोडली हा इतिहास आहे. आपण इतिहास कसा बदलू शकतो ? अफझलखानाचा कोथळा शिवाजी महाराजांनी काढला हा इतिहास आहे. शिवाजी महाराजांनी अफझलखानाचा कोथळा काढण्यासाठी त्याच्या पोटाला गुदगुल्या केल्या आणि कोथळा बाहेर काढला का ? हा सर्व इतिहास आपण बदलणार आहात का ? जो इतिहास आहे तो लोकांसमोर ठेवण्यामध्ये काय गुन्हा आहे ? आपण हे थांबवावे अशी माझी आपल्याला विनंती आहे. मी आपल्याला जाहीरपणे सांगेन की, अफझलखान वधाचा देखावा बघितल्यानंतर ज्या कोणत्या मुसलमानांच्या भावना दुखावल्या असतील त्यांनी पाकिस्तानमध्ये चालते व्हावे. अशा पाकिस्तानी मुसलमानांचे हिंदुस्थानामध्ये काही काम नाही, असे म्हटले तर ते चुकीचे होणार नाही. जो या देशावर प्रेम करतो, जो या मातीवर प्रेम करतो मग तो हिंदू असेल, मुसलमान असेल, तो आमचा आहे. परंतु या ठिकाणी अफझलखान वधाचा देखावा दाखविल्यानंतर ज्यांचे पित्त खवळते त्यांचे या ठिकाणी काय काम आहे ? त्यांनी पाकिस्तानमध्ये जावे. या बाबतीत आपण ठोस असा निर्णय घ्यावा.

साताऱ्यामध्ये मोठी दंगल झाली. मग या महाराष्ट्रामध्ये कशाला राहता ? छत्रपती शिवाजी महाराज आमचे दैवत आहेत. 450 वर्षापूर्वी छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक

...5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम ....

करण्यासाठी बादशहाच्या दिल्लीमधील नोकरीला लाथ घालून कवी भूषण ज्यावेळी रायगडावर आले होते त्यावेळी कवी भूषण यांनी असे म्हटले होते की, "काशी की कला जाती, मथुरा में मस्जिद वसती, अगर शिवाजी ना होते तो सुरतीया सबकी होती." हे सर्व आहे. आम्ही हा इतिहास बदलणार आहोत का ? आम्ही हे सगळे बदलणार आहोत का ? जर छत्रपती शिवाजी महाराजांचा जन्म झाला नसता, हिंदवी स्वराज्याची स्थापना झाली नसती तर कदाचित माझे नाव रामदास नसते. माझे नाव अब्दुल अमीर कसाब असते. त्यामुळे हे थांबणे अत्यंत गरजेचे आहे. हे लाड आता पुष्कळ झाले. न्यायालय देखील विचारते की, हे तुम्ही कशासाठी करीत आहात ? आपण आता इतिहास बदलणार आहात का ? या बाबतीत देखील आपण गांभीर्याने निर्णय घ्यावा. यापुढे प्रत्येक ठिकाणी मग गणेशोत्सव असेल किंवा नवरात्रोत्सव असेल त्यावेळी या महाराष्ट्रामध्ये दंगली चालू राहतील.

सभापती महोदय, सांगली पोलीस ठाण्याच्या बाबतीत 32 तपासणी पोलीस नाके उभारण्यात येणार होते. आतापर्यंत फक्त 12-13 झाले. बाकीचे तपासणी नाके, पोलीस चौक्या अजूनपर्यंत झ ालेल्या नाहीत. त्याकडे आपण लक्ष द्यावे अशी माझी आपल्याला विनंती आहे.

यानंतर श्री. गिते ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम...

महोदय, शासनाने सागरी किनारपट्टीचे रक्षण करण्यासाठी 50 स्पीड बोटी खरेदी केलेल्या आहेत. तसेच या कामासाठी पुन्हा नव्याने 28 स्पीड बोटी खरेदी केलेल्या आहेत. परंतु या स्पीड बोटी चालविण्यासाठी प्रशिक्षित कर्मचारी नेमले गेलेले नाहीत. त्या बोटी तशाच पडून आहेत. म्हणून कोकणपट्टीवरील जे खलाशी आहेत, त्यांना पोलीस म्हणून भरती केले व त्यांना स्पीड बोट चालविण्याचे तसेच समुद्र किनाऱ्याचे रक्षण करण्यासाठी प्रशिक्षण देऊन, त्यांच्या नेमणुका केल्या तर संपूर्ण सागरी किनारा अतिशय सुरक्षित राहू शकतो. या खलाशांना पोलीस म्हणून सेवेत घेऊन त्यांना स्पीड बोटी चालविण्याचे व सागरी किनारा सुरक्षित ठेवण्याबाबतचे प्रशिक्षण दिले तर शासनाकडून तीन वर्षात जे कामझाले नाही, ते काम खलाशी करु शकतील. म्हणून मी केलेल्या सूचनेचा माननीय गृहमंत्र्यांनी विचार करावा अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, देशाचा 90 टक्के व्यापार समुद्रमार्गे होत असतो. परदेशातील दोन अनाहूत बोटी गिरगाव चौपटी येथे भरकटत आल्या होत्या. या बोटीचे वैशिष्टय असे की, या दोन्ही बोटींमध्ये एकही कर्मचारी नव्हता. अनाहूत बोटी मुंबईतील समुद्र किना-यापर्यंत येतात, त्याचा अर्थ आपली सागरी संरक्षण यंत्रणा पूर्णपणे फेल्यूअर गेली आहे अशी सर्वांची भावना झालेली आहे. या बोटी कोणाच्या आहेत, त्या कोठून आल्या आहेत, त्यात कर्मचारी का नाहीत, या बोटीतून अतिरेकी मुंबईत आले की काय अशा अनेक शंका या अनाहूत बोटीमुळे लोकांच्या समोर उपस्थित होऊ लागल्या होत्या. या बोटीमुळे सागरी संरक्षण करण्यात आपण पूर्णपणे फेल्यूअर गेलो आहे हे यावरुन स्पष्ट झाले आहे.

सभापती महोदय, भारतीय नौदलाचे वरिष्ठ अधिकारी, कोस्टल विभागाचे प्रमुख, वरिष्ठ पोलीस अधिकारी, शिपिंग कॉर्पोरेशने वरिष्ठ अधिकारी, सी-पोर्ट ॲथॉरिटीचे वरिष्ठ अधिकारी, यांचेसोबत आपण एक बैठक घ्यावी व प्रत्येकाला आपापल्या कामाची सीमा ठरवून द्यावी. सागरी मार्गाकडे भविष्यात दुर्लक्ष होणार नाही याची शासनाने काळजी घेतली पाहिजे अशी माझी विनंती आहे.

2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम...

सभापती महोदय, मी या ठिकाणी एक गमतीशीर उदाहरण देऊ इच्छितो. गृह विभागात काम करणाऱ्या असली पोलीसाने नकली पोलिसांची एक फौज बनविली होती आणि तो पोलीस दरोडे टाकतो आहे. खाकी वर्दीतील पोलीस अशा पध्दतीची कामे करावयास लागली तर राज्यातील सर्व सामान्य माणसाचे काय होईल याची कल्पनाच करणे कठीण आहे. मुंबई, नवी मुंबई येथे अशा प्रकारचे 122 गुन्हे घडले आहेत. या तोतया पोलिसाला विभागाने पकडले आहे. त्याला अटक करुन त्याचे विरुध्द गुन्हा दाखल केला गेला आहे. भविष्यात असे होणार नाही याकडे आपण अधिक लक्ष द्यावे अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्रात 600 रुपये देऊन लाल दिवा विकत घ्यावयाचा आणि तो आपल्या गाडीवर बसवावयाचा आणि व्ही.आय.पी. सांगून कोठेही प्रवास करावयाचा अशा प्रकारची एक फॅशन सुरु झाली आहे. ही एक अतिशय गंभीर बाब आहे. लाल दिवा लावून संसदेवर हल्ला झ ाला, तशा घटनेची पुनरावृत्ती भविष्यात होऊ नये म्हणून माननीय गृहमंत्र्यांनी याबाबतीत जातीने लक्ष घालावे अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, गुप्तवार्ता विभाग अधिक सक्षम करण्यासाठी काय उपाययोजना केल्या आहेत. याबाबतीत देखील खुलासा माननीय गृहमंत्र्यांनी आपल्या उत्तराच्या भाषणात करावा, अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, मुंबईतील 50 टक्के पोलिसांना आपण घरे देऊ शकलो नाही. गिरणी कामगार घरांसाठी लढा देत आहेत. पोलीस कर्मचारी दिवसाला 12-12 तास काम करतो. सण अथवा दुसरे महत्वाचे कार्यक्रम असले तर 24-24 तास त्यांना जनतेच्या रक्षणाचे काम करावे लागते. पोलीस कर्मचारी एवढी सेवा करुन देखील शासन त्यांना घरे देऊ शकत नाही, ही दुर्देवाची गोष्ट आहे. मुंबईत पोलीस कर्मचाऱ्यांच्या घरांसाठी अनेक भूखंड आरक्षित होते. त्यातील किती भूखंडाचे आरक्षण उठविले गेले, त्यातील किती भूखंड आयएएस आणि आयपीएस अधिकाऱ्यांनी गृहनिर्माण सोसायटीसाठी घेतले, या गोष्टीचा माननीय गृहमंत्र्यांनी आढावा घेणे अत्यावश्यक आहे. पोलिसांच्या घरांसाठी आरक्षित असलेले भूखंड आपण इतर अधिकाऱ्यांच्या गृहनिर्माण सोसायटीला कसे काय देऊ शकतात ? पोलीस कर्मचारी चाळीस, चाळीस वर्षे जनतेची सेवा करतो. त्याचे मुंबईत स्वत:च्या मालकीचे घर नसल्याने त्याचे सामान लागलीच दुसरीकडे

3..



ABG/ प्रथम कु.थोरात 16:05

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

स्थलांतरित करण्याबाबतचे आदेश दिले जातात. मुंबईत पोलीस कर्मचाऱ्यांच्या घरासाठी आरक्षित असलेले भूखंड दुस-या व्यक्तींना देण्याचे प्रकार शासन कधी थांबविणार आहे याचा देखील या ठिकाणी खुलासा झाला पाहिजे. त्याचप्रमाणे पुणे येथे देखील पोलीस कर्मचाऱ्यांच्या घरासाठी आरक्षित ठेवण्यात आलेला मोठा भूखंड बिल्डरच्या घशात टाकण्याचे काम शासनाच्या माध्यमातून होत होते. पुणे जिल्हा पोलीस अधीक्षकांनी हरकत घेतल्यामुळे त्या भूखंडाचे वाटप होऊ शकलेले नाही. या गंभीर बाबीकडे शासनाने लक्ष घालावे अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, मी एका अतिशय गंभीर मुद्याच्या बाबतीत माननीय गृहमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो. निवडणुकीच्या निमित्ताने कोकणात मोठया प्रमाणात राडा चाललेला आहे. विधानसभेची निवडणूक आली म्हणजे तेथे एक बळी गेलाच पाहिजे. आतापर्यंत ज्यांचे ज्यांचे खून झाले, त्या खुनांचा शोध पोलीस विभाग कधी लावणार आहे ? रमेश गोवेकरची आई अजून त्याची वाट पहाते आहे, त्याचा भाऊ त्याची वाट पाहतो आहे. आमचा रमेश कधी येईल याची ते वाट बघत आहेत. रमेश गोवेकर याची केस सी.बी.आय.पर्यंत गेली. रमेश गोवेकर प्रकरण झाले त्यावेळी विधानसभेच्या निवडणुका होतो. त्यावेळी मी मालवण येथे होतो. त्यावेळेच्या जिल्हा पोलीस अधीक्षकांना दूरध्वनीव्दारे तसेच प्रत्यक्ष भेटून सांगितले होते की, समुद्राच्या किनाऱ्यावरील वाळूमध्ये एक बॉडी पडली आहे. ती कोणाची आहे ते पहा. अर्धी बॉडी वाळूत होती आणि अर्धी बॉडी वाळूच्या बाहेर होती. वाळुच्या बाहेर असलेली बॉडी कावळे खात होते. परंतु विधानसभेच्या निवडणुकीचे मतदान झ ााल्यानंतर ती बॉडी बाहेर काढण्यात आली. मतदान होऊ द्यावे, त्याचे काय व्हावयाचे ते होऊ द्यावे. परंतु त्या विभागातील आमदार निवडून येऊ द्यावा. मी जिल्हा पोलीस अधीक्षक तसेच संबधित पोलीस स्टेशनचे अधिकारी यांना सांगितले होते की, या गावाच्या आजुबाजुच्या 100कि.मी.परिसराच्या आत कोणी व्यक्ती बेपत्ता झाली आहे काय याचा आपण शोध घ्यावा. त्यांनी शोध घेऊन सांगितले की,100 कि.मी.अंतरातील एकही व्यक्ती बेपत्ता झालेली नाही. मग ही बॉडी कोणाची आली ? ती बॉडी रमेश गोवेकरची नव्हती. तुमच्या हातात पोलीस यंत्रणा असल्यामुळे तुम्ही सांगाल तशीच माहिती पोलीस अधिकारी आम्हाला व जनतेला सांगतील. तेथील सगळी सत्ता तुमच्या हातात आहे. "सत्तेपुढे शहाणपण चालत नाही" असे सांगण्याची मला आवश्यकता नाही. ती बॉडी रमेश गोवेकरची नव्हती तर ती कोणाची होती, ही गोष्ट आतापर्यंत पोलीस विभाग सागू

5...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

शकलेली नाही. अजून किती बळी घेणार आहात ? किती लोकांच्या खुनाच्या पापाचे वाटेकरी होणार आहात ? नितेश राणे कोठे आहे ? अंकूश राणेचा खून झाला. तो एका मंत्र्याचा भाऊ होता. त्याचा खून शिवसेनेने केला अशा बातम्या सुरुवातीला आल्या होत्या. त्या बातम्या नंतर का थांबल्या, त्या प्रकरणाची चौकशी का झाली नाही. अंकूश राणे प्रकरणाची चौकशी का होत नाही. त्यांचा खून कोणी केला ? सिंधुदूर्गमध्ये जे खून होत आहेत, ते खून नेमके कोणी केले, ते बाहेर का येत नाहीत, पूर्वी देखील अनेक खून झाले आहेत, खून करणाऱ्या गुन्हेगारांना किती संरक्षण देणार आहात. आबासाहेब, या पापाचे वाटेकरी तुम्ही सुध्दा आहात. सत्ता ही काही कायम टिकणारी नसते. सत्ता ही नेहमी बदलत असते. सिंधुदूर्ग जिल्यात पहिला खून श्रीधर नाईक याचा झाला. सत्यजीत भिसे याचा खून झाला. आबासाहेब, आपल्या राज्यात काय चालले आहे ? आता सन्माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर यांचा नंबर होता. सुर्देवाने ते वाचले. त्यांच्या पत्नीचे कुंकू बळकट होते म्हणून ते बचावले. आबासाहेब, आपण या प्रकरणाची संपूर्ण माहिती संबंधित पोलीस स्टेशनकडून घ्यावी. सन्माननीय सदस्य ज्या कार्यालयात बसले होते, तेथील पत्रा पाच मिनीटे अगोदर तुटला असता तर यांचा देखील नंबर लागला असता. सन्माननीय सदस्यांचा बॉडीगार्ड सोबत होता,त्याने फायरींग केली म्हणून सन्माननीय सदस्य वाचले. सिंधदूर्गमधील विधानसभेच्या निवडणुकीत कार्यकत्याचे हात तुटला नाही, डोके फुटले नाही. खून झाले नाहीत अशी एकही निवडणुक झालेली नाही. असे प्रकार झाले नाहीत अशी एखादी निवडणूक मला उदाहरणदाखल आपण सांगू शकता. कोकणातील तुमचा एक मंत्री वाचला. अजून वाचला असे मी म्हणणार नाही. पुढच्या जन्मी नाही, तुला याच जन्मी संपवितो. आबासाहेब, तुमचा एक मंत्री चिपळूनमध्ये सांगतो की, हा मंत्री कोंबडी चोर आहे. असे मी म्हणत नाही. वृत्तपत्रात जे छापून आले आहे त्यावरुन मी ही माहिती सांगतो आहे. एक राज्यमंत्री एका मंत्र्यांना कोंबडी चोर म्हणतो.

त्यांनी आतापर्यंत किती कोंबडया चोरल्या याची गृहमंत्री म्हणून आपण माहिती घ्यावी. जो मंत्री कोंबडी चोरत असेल तर तो मंत्री आणखी कोणकोणत्या गोष्टी चोरत असेल. याबाबतची वस्तुस्थिती सभागृहाला कळली पाहिजे. त्या मंत्र्याची चौकशी झाली आहे. त्या मंत्र्यांनी किती कोंबडया चोरल्या, कोंबडया चोरण्यासाठी ते कोणत्या खुराडयात गेले होते, कोंबडया चोरण्यासाठी ते दिवसा गेले होते की रात्री गेले होते. ते कॅबीनेट मंत्री या राज्यमंत्र्यांना लाकूड चोर असे

6...



श्री.रामदास कदम...

म्हणाले. हे राज्यमंत्री लाकूड चोरण्यासाठी कोणत्या जंगलात गेले होते. आबासाहेब, काय तुमचे मंत्री, काय तुमचे राज्यमंत्री आणि काय तुमचे सरकार वारे वा. जगाच्या पाठीवर असे सरकार कोठेही नसेल. दोन मंत्री एकमेकांवर कुरघोडी करीत आहे. चिपळूण शहराच्या राज्यमंत्र्यांनी दूरदर्शनवर मुलाखत देताना सांगितले की, ते कोंबडी चोर मंत्री आहेत. तुमच्या कॅबीनेट मंत्र्यांनी भास्कर जाधव यांचे कार्यालय तोडले...

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम.....

तुमच्या मंत्र्यांना तुम्ही न्याय देऊ शकत नाही तर राज्यातील जनतेला तुम्ही काय न्याय देणार? तुमची तेवढी हिंमत नाही. नगरविकास राज्यमंत्री श्री.भास्कर जाधव यांचे उद्योगमंत्री श्री.नारायण राणे यांच्या काँग्रेस पक्षातील समर्थकांनी फोडले. नगरविकास राज्यमंत्र्यांच्या समर्थकांनी उद्योग मंत्री यांचे कार्यालय फोडले. एकमेकामध्ये कार्यालय फोडण्याची स्पर्धा सुरु आहे. एक म्हणतो माझ ो 20 लाख रुपयांचे नुकसान झाले तर दुसरा म्हणतो माझे 30 लाख रुपयांचे नुकसान झाले. एका मंत्र्याचे कार्यालय फोडल्यानंतर त्याचे समर्थक रस्त्यावर येतात, रास्ता रोको करतात, जाळपोळ करतात. यामध्ये सर्वसामान्य लोकांचा दोष नव्हता. एक मंत्री दुस-या मंत्र्याच्या उरावर बसतो, कार्यालय तोडतो, बघून घेईन असे सांगतो. एक दुसऱ्याला कोंबडी चोर म्हणतो तर दुसरा पहिल्याला लाकूड चोर म्हणतो. यात लोकांचा दोष आहे का?

प्रा.सुरेश नवले : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.रामदास कदम हे ज्येष्ठ सदस्य आहेत. आपल्या भाषणामध्ये त्यांनी मंत्रीमंडळातील सदस्य श्री.भास्कर जाधव व श्री.नारायण राणे यांनी एकमेकांचे कार्यालय तोडले असा जो उल्लेख केलेला आहे तो उल्लेख कामकाजातून काढून टाकण्यात यावा, अशी माझी विनंती आहे.

श्री.रामदास कदम : उल्लेख कामकाजातून काढून टाकण्यास मला कोणतीही अडचण नाही. मी सभागृहात वृत्तपत्रात छापून आलेली बातमी वाचून दाखवितो. लोकसत्ता, सकाळ या दैनिक वृत्तपत्रामध्ये जी बातमी प्रसिध्द झाली ती सभागृहात वाचून दाखविल्यानंतर कामकाजातून वगळता येईल काय?

**तालिका सभापती** (श्री.मोहन जोशी) : वृत्तपत्रात छापून आलेली बातमी आणि सभागृहात केलेले वक्तव्य यामध्ये फरक आहे. मानहानीकारक मजकूर असेल तर कामकाजातून काढून टाकण्यात येईल.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, लोकसत्ता दैनिकामध्ये "राणे-जाधवांमध्ये संघर्ष शिगेला, जाधवांच्या कार्यालयाची नासधूस" अशा हेडिंगखाली बातमी प्रसिध्द झाली आहे. सकाळ दैनिकामध्ये म्हटले आहे की, जशास तसे उत्तर देण्याची क्षमता आमच्यात आहे, भास्कर जाधवांचे सावर्डे येथे प्रत्युत्तर. हे काय चालले आहे? नगरविकास राज्यमंत्री म्हणतात, उद्योग मंत्री नारायण राणे हे कोंबडी चोर आहेत. असे शब्द उद्‌गारल्यानंतर राणेंना का राग आला? सावर्डे येथे

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम.....

कोंबडी चोर हे शब्द उद्‌गारल्यानंतर उद्योगमंत्री प्रक्षुब्ध झाले. महाराष्ट्राच्या मंत्रीमंडळातील एक राज्यमंत्री आणि उद्योगमंत्री यांच्याबाबत कोकणातील सर्व वृत्तपत्रात हेडिंग देऊन बातम्या प्रसिध्द झाल्या आहेत. या संदर्भात माननीय गृहमंत्री कोणती भूमिका घेणार आहेत? अतिशय लाजिरवाणी गोष्ट आहे. महाराष्ट्रामध्ये कायदा व सुव्यवस्था राखली पाहिजे, या दृष्टीने या दोन्ही मंत्र्यांच्या गाडीवरील लाल दिवा काढून घ्यावा. एक म्हणतो कोंबडी चोर तर दुसरा म्हणतो लाकूड चोर. यांचे मंत्रीपद काढून घेण्यात यावे. कोकणामध्ये बिन पैशाचा तमाशा सुरु आहे. म्हणून मी गृहमंत्र्यांना विचारु इच्छितो की, या संदर्भात काय निर्णय घेणार आहात?

सभापती महोदय, माननीय गृहमंत्री सावंतवाडी येथे जाऊन आले. तेथील पक्ष कार्यकर्त्यांना भेटले असतील. त्यांनी सर्व प्रकार वर्णन करुन सांगितला असेल. आपल्या माध्यमातून माझी गृहमंत्र्यांना विनंती आहे की, कोकणात सुरु असलेला हा तमाशा आपण कसा थांबविणार आहात? एका ठराविक मर्यादेपर्यंत ठीक आहे. जेव्हा माकडीणीच्या गळ्यापर्यंत पाणी येते तेव्हा ती सुध्दा आपल्या पिल्लाला पायाखाली घेते. नगरविकास राज्यमंत्री श्री.भास्कर जाधव व उद्योगमंत्री श्री.नारायण राणे यांनी कोकणामध्ये एकमेकाची कार्यालये तोडण्याचा जो तमाशा चालविला आहे, हा विकासाच्या नावाखाली सुरु असलेला शिमगा नाही. कोकणामध्ये शिमगा हा उत्सव मोठया प्रमाणात साजरा केला जातो. त्या होळी उत्सवाच्या सणाप्रमाणे शिमगा केला असता तर आम्ही स्वागत केले असते. परंतु हा त्या पध्दतीचा शिमगा नाही. आमच्या भागात सुरु असलेला हा बिन पैशाचा तमाशा ताबडतोब थांबणे आवश्यक आहे. तो कशा पध्दतीने थांबविणार आहात हे गृहमंत्र्यांनी सभागृहाला अवगत केले पाहिजे. या संदर्भात कोणती ठोस भूमिका घेतली जाणार हे सभागृहापुढे स्पष्ट होणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्राचे गृहमंत्री यांनी माझ्या भाई या टोपण नावाबद्दल सभागृहात टिप्पणी केली होती. मी भाई म्हणून कसा परिचित आहे हे सांगू इच्छितो. आमच्या कोकणामध्ये मोठया भावाला दादा, मधल्या भावाला भाई आणि धाकट्या भावाला अण्णा म्हणून संबोधले जाते. आम्ही पाच भावंडे आहोत. माझ्या अगोदर दोन आणि माझ्या नंतरची दोन भावंडे आहेत. मी पाचांमधील मधला असल्यामुळे आपोआप आमच्या कुटुंबामध्ये मला भाई म्हणून संबोधले जाते. भाईचा अर्थ वेगळा घेतला जाऊ नये. शिवसैनिक या नात्याने माननीय शिवसेना प्रमुखांच्या

..3..





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम.....

नेतृत्वाखाली लोकांच्या विकासासाठी भाईगिरी केली. परंतु तुमच्या शासनातील राज्यमंत्री आणि रत्नागिरी जिल्हयाचे पालकमंत्री यांची दादागिरी थांबविणार आहात की नाही? तुमच्याच पक्षाच्या विरोधात चिपळूणच्या नगरपालिका निवडणुकीत ते स्वत:चे पॅनेल उभे करतात. त्यांची हिंमत कशी होते? ते पूर्वी शिवसेना पक्षात होते तेथे निष्ठा बाळगली नाही. आता तुमच्या पक्षात आले, निदान आता तरी त्यांनी निष्ठा ठेवावी. मंत्री पदावर असताना पक्षाविरुध्द स्वत:चे पॅनेल उभे करतात? राज्यमंत्री असो वा कॅबिनेट मंत्री असो, कायदा व सुव्यवस्था हातात घेऊन कोकणामध्ये जो तमाशा चालविला आहे तो ताबडतोब थांबविला पाहिजे. एकेकाळी महाराष्ट्रातील पोलिसांची स्कॉटलंड यार्डच्या पोलिसांबरोबर तुलना होत होती. आज काय झाले आहे? महाराष्ट्राच्या मंत्री मंडळातील राज्यमंत्री कायदा हातात घेत आहेत. कोकणामध्ये अशी म्हण आहे की, बैल बेफाम वागायला लागला तर वेसण घाला. या मंत्री महोदयांना तुम्ही वेसण घातली नाही तर कोकणाचा सत्यानाश होईल. माननीय गृहमंत्री हे ज्युनियर असले तरी उद्योगमंत्री कसे सिनियर होऊ शकतात? ही बाब गृहमंत्र्यांनी गांभीर्याने घेतली पाहिजे. ते कोणती भूमिका घेतात याकडे सा-या कोकणाचे लक्ष लागले आहे. मी वस्तुस्थिती सांगत आहे. म्हातारी मेल्याचे दु:ख नाही परंतु काळ सोकावतो आहे. आता म्हातारी मेलीच आहे.

सभापती महोदय, राज्यातील कायदा व सुव्यवस्थेबाबत मी जे जे विषय उपस्थित केले आहेत त्या संदर्भात माननीय गृहमंत्र्यांनी वैयक्तिक लक्ष घालावे आणि कोकणामध्ये जो मोठा पेचप्रसंग निर्माण झाला आहे तो सोडवावा अशी विनंती करतो. महाराष्ट्रातील कायदा व सुव्यवस्थेचा बोजवारा उडाला आहे. विशेषत: कोकणामध्ये कायदा व सुव्यवस्थेची स्थिती पूर्ववत निर्माण करावी एवढे बोलून माझे भाषण संपवितो.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

नंतर श्री.खर्चे....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय....

श्री. दिवाकर रावते : महोदय, मघाशी सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांचे भाषण चालू असताना त्यातील "मानहानीकारक" अशा प्रकारचा उल्लेख झाला असेल तर तो कामकाजातून काढून टाकण्यात येईल असे निदेश आपण दिले आहेत. तो मानहानीकारक उल्लेख कोणता आहे हे आम्हाला समजले पाहिजे, अशी आमची विनंती आहे.

श्री. आर.आर.पाटील : महोदय, सायंकाळी 6.30 वाजता माननीय राज्यपालांकडे जायचे असल्याने ही चर्चा किती वेळ चालणार आहे हे समजले तर बरे होईल.

**तालिका सभापती (श्री. मोहन जोशी)** : आपली चर्चा 5.00 वाजता पूर्ण होऊन उत्तराला सुरुवात होणार असे ठरलेले आहे. त्यानुसार ज्या ज्या सन्माननीय सदस्यांनी नावे दिलेली आहेत त्यांनी थोडक्यात आपले विचार व्यक्त करुन मला सहकार्य करावे.

श्री. विनोद तावडे : महोदय, राज्यातील कायदा व सुव्यवसथेच्या अनुषंगाने सभागृहात माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी अंतिम आठवडा प्रस्तावाच्या निमित्ताने जी चर्चा उपस्थित केली त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

महोदय, ही चर्चा या सभागृहात अनेक वेळा व नेहमीच होत असते. सभागृहात कायदा व सुव्यवस्थेवर चर्चा होत असताना नेहमीच म्हटले जायचे की महाराष्ट्राचा बिहार होतो की काय, पण आता खरोखरच ती वेळ आलेली आहे. कारण बिहार राज्य सुधारलेले आहे आणि आपण मात्र बिहारच्या दिशेने चाललो आहोत. राज्यात खून, दरोडे, चोऱ्या, ज्येष्ठांच्या हत्या हे प्रमाण खूप वाढलेले आहे. तक्रार करणाऱ्या तरुणाची हत्या होणे, आदिवासी वेठबिगाराला साखळीने जखडून ठेवले जाते व त्यासंबंधी तक्रार घेऊन त्याची पत्नी जाते तर तिला परत पाठवून दुसऱ्या दिवशी त्या आदिवासीचा मृतदेहच सापडतो अशी परिस्थिती आहे. याचा अर्थ या राज्यात तक्रार केली तरी कारवाई होत नाही आणि गप्प राहिलो तरी सुरक्षित नाही अशी परिस्थिती आहे. दरोडा पडत असताना अर्धा तास फोन करुन सुध्दा पोलीस स्टेशनमधील दूरध्वनीचे बिल न भरल्याने पोलिसांना माहिती मिळू शकत नाही. खरोखरच या राज्यात जे सरकार सध्या अस्तित्वात आहे त्या सरकारची कायदा व सुव्यवस्थेवर पकड राहिली आहे काय अशी शंका या निमित्ताने प्रामाणिक माणसांच्या मनात आल्याशिवाय राहत नाही. मला केवळ राजकारण म्हणून बोलायचे नाही तर

.....2

श्री. विनोद तावडे ......

आपल्याच अहवालातील आकडेवारी पाहिली तर दरोड्यामध्ये महाराष्ट्राचा पहिला नंबर लागतो. बिहार, उत्तर प्रदेश, पंजाब, तामिळनाडू, केरळ, आंध्र प्रदेश आणि दिल्ली ही राज्ये आता मागे पडली आहेत. राज्यातील लोकांचे बेपत्ता होणे, एवढेच नव्हे तर आपल्या राज्यातून पोलीस सुध्दा बेपत्ता होत आहेत. मागे आपणच सभागृहात ही माहिती दिली होती की, महाराष्ट्रात 195 पोलीस गायब आहेत आणि 7 कर्मचारी बेपत्ता आहेत. विना परवानगी रजेवर गेल्याचे कारण आपण सांगितले होते. पोलीस खात्यातील माणसेच सापडत नसतील तर सामान्य माणसाला या सर्व बाबतीत नक्कीच प्रश्न पडणार आहे. पोलीस कोठडीतील मृत्यू प्रकरण यात सुध्दा आपले राज्य अग्रेसरच आहे. नॅशनल क्राईम रिपोर्ट ब्युरो च्या रिपोर्टनुसार सर्वात जास्त घटना आपल्याच राज्यात घडल्या आहेत. गुन्ह्यात सुध्दा आपले राज्य पहिल्या टॉप-फाईव्ह मध्ये आहे. त्यात पहिला क्रमांक मध्य प्रदेश, दुसरा उत्तर प्रदेश, तिसरा बिहार, चौथा पंजाब आणि पाचवा आपला नंबर लागतो. रेव्ह पार्टी आणि अंमली पदार्थविरोधी कारवायांमध्ये याच टीम मध्ये काम करणारे पोलीस सापडतात याची आपणा सर्वांनाच जाणीव असल्याने मी फार विस्ताराने बोलणार नाही. पण अशा प्रकारे अंमली पदार्थविरोधी कारवाई करणाऱ्या अधिकाऱ्यांचेच हे काम असेल, तेच कर्मचारी त्यात अमली पदार्थाचा व्यवसाय करणारे असतील तर कशी सुरक्षितता राहणार आहे, याचा मंत्री महोदयांनी खुलासा करावा.

राज्यात खून करण्यात महिला सुध्दा क्रमांक एक वरच आहेत. त्यानुसार 3158 प्रकरणांमध्ये महिलांचा सहभाग असल्याची आकडेवारी एनसीआरबीच्या रिपोर्टनुसार उपलब्ध आहे. घटना घडल्यानंतर जे पकडले जातात व त्यांची चौकशी होऊन केस कोर्टात जाते व आरोपी निर्दोष सुटण्यात सुध्दा आपला क्रमांक वरचाच आहे. महाराष्ट्र राज्यात 10 ते 12 टक्के गुन्हे सिध्द होतात आणि बाकीच्या राज्यांमध्ये हेच प्रमाण 50 ते 60 टक्क्यापर्यंत आहे. दंगलीमध्ये सुध्दा आपले राज्य आघाडीवरच आहे. महिलांवरील अत्याचाराची प्रकरणे तर सर्वात जास्त याच राज्यात घडतात. यासंबंधी जी आकडेवारी प्रसिध्द झालेली आहे. एकूण 23431 कैदी फरार असूनर जामिनावर सुटून पुन्हा न फिरकलेले 14554 कैदी आपल्याच राज्यातील आकडेवारीनुसार आहेत. हा उल्लेख केल्यानंतर राज्याच्या कायदा व सुव्यवस्थेबाबत काय होणार आहे हे मंत्री

....3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे ........

महोदयांकडून ऐकायला आम्ही उत्सुक आहोत. आमचे तर नेहमीच असे म्हणणे आहे की, राज्यातील कायदा व सुव्यवस्थेच्या बाबतीत संपूर्ण यंत्रणेवर राजकीय दृष्ट्या आपली पकड आहे की अधिकाऱ्यांना आपण त्यांच्या ताब्यात देऊन ठेवले आहे. आपण जी कार्यपध्दती अवलंबिली आहे त्यातून ठराविक अधिकारी मस्तवाल होत आहेत व परिणामी आपली राजकीय पकड ढिली होते आणि हे अधिकारीच प्रशासन चालवितात.

मागील काळात मी एकदा म्हटले होते की, माननीय गृह मंत्र्यांनी काहीही ठरविले तरी जे दिल्लीत बसलेले आहेत त्यांनी ठरविलेले खरे अशी चर्चा मुंबई येथील सचिवालय जिमखान्याजवळ एका आयपीएस पोलीस अधिकाऱ्याच्या तोंडून मी ऐकली होती. तसा उल्लेख सभागृहात सुध्दा केला होता. त्याचबरोबर श्री. जवाहर सिंह नावाच्या आयपीएस अधिकाऱ्याने एका महिला पोलीस अधिकाऱ्यावर अत्याचार केल्यामुळे त्यांना निलंबित करण्यात आले व न्यायालयाने 50 हजार रुपयांचा दंड सुध्दा केला होता. तरी देखील हा पोलीस अधिकारी अजूनही 24 तास सुरक्षेत आहे. सभागृहात यासंबंधीची चर्चा झाली पण पुढे काय झाले तर याबाबत चौकशी समिती नेमली, त्या समितीने तयार केलेला रिपोर्ट टॅम्पर करण्यात आला. अशा प्रकारे कोणाला नंतर कसे पाठवायचा प्रयत्न केला हे देखील सभागृहात बोलला होता....

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे...

श्री.सहाय नावाच्या पोलीस अधिकाऱ्याने आपल्या सासऱ्याच्या सुरक्षेसाठी पोलीस पाठविले होते असे आम्ही वर्तमान पत्रात वाचले होते. वर्तमान पत्रामधील ही बातमी खरी नसेल असे आम्ही समजतो. श्री.अनामी रॉयच्या बँक खात्याची डिटेल माहिती आली परंतु त्यांच्या संदर्भात सुध्दा आपण काहीही चौकशी केली नाही. ठराविक अधिकाऱ्यांना विधेष असे पाठबळ मिळते परंतु इतर अधिका-यांना तशा प्रकारचे पाठबळ मिळत नाही, अशा पध्दतीचा मेसेज जनतेमध्ये जात आहे. तो काही चांगला नाही. खरे म्हणजे आपल्या शब्दात फार मोठी ताकद आहे. त्यामुळे वर्तमान पत्रात आपण नेहमी दिसत असतात.

परवा डोंबिवलीच्या दरोडयामध्ये दरोडेखोराबरोबर तुंबळ युध्द चालले होते. दरोडा पडल्यावर शेजारच्या लोकांनी पोलीस स्टेशनमध्ये अर्धा तास फोन लावला परंतु तरीही फोन लागला नाही. गस्तीसाठी जी व्हॅन फिरत असते तिला शेवटी लोकांनी धावत जाऊन आणले. तेथील रहिवाशांनी दरोडेखोरातील एकाला पकडले परंतु बाकीचे दरोडेखोर पळून जाण्याात यशस्वी झाले. हा सर्व प्रकार आपण सर्वांनी टीव्हीवर पाहिलेला आहे. डोंबिवलीमध्ये दरोडा पडल्यानंतर डोंबिवलीच्या शेजारील हाजीमलंग जवळील खोडी गावात दुसऱ्या दिवशी पुन्हा दरोडा पडला. खरे म्हणजे दरोडा पडल्यामुळे पोलिसांची गस्त वाढत असते परंतु तसे न होता पुन्हा दुस-या दिवशी दरोडा पडतो त्याला काय म्हणावयाचे ? खरे म्हणजे आपल्या राज्यात कायदा व सुव्यवस्थेचे धिंडवडे निघाले असल्यामुळे लगेच दुस-या दिवशीही दरोडा पडतो त्यामुळे याचा अर्थ दरोडेखारांची हिंमत वाढली आहे असे म्हटले तर ते चूक होणार नाही.

सभापती महोदय, सिनेमाची शुटींग होते तेव्हा जशी गर्दी जमा होत असते तशी गर्दी परवा कल्याण स्टेशनच्या बाहेर झाली होती. कल्याण स्टेशनच्या बाहेर दोन गुंडाची मारामारी अर्धातास सुरु होती. ही मारामारी पाहण्यासाठी खूप मोठी गर्दी जमा झाली होती परंतु एकही पोलीस त्या ठिकाणी पोहचू शकला नव्हता. जेव्हा हे गुंड अर्ध्या तासाने खाली पडले तेव्हा डायरेक्टर सांगतो त्या प्रमाणे तुमचे पोलीस त्या ठिकाणी हजर झाले. माननीय आबा, मला असे सांगावयाचे आहे की, आपली पोलीस खात्यावर जरब आहे, पोलीस खात्याची गुंडावर जरब आहे असे चित्र दिसून येत नाही. काही अधिकाऱ्यांना आपण इतकी खुली छूट देता की त्यांना असे वाटू लागते की, आम्हीच



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे...

राज्य चालवित आहोत. पोलीस अधिकाऱ्यांना आपण किती खुली छूट दिलेली आहे याबाबत मी विधानसभेचे सदस्य श्री. शिवाजीराव कर्डिले यांचे उदाहरण देणार आहे. शिवाजीराव कर्डिले राहूरीला प्रचारासाठी होते तेव्हा मी राहता येथे प्रचारासाठी होतो. अहमदनगर येथे पोहचत असतांना रात्री 9.30 वाजता अहमदनगर पोलीस अधीक्षक कार्यालयातून पोलीस अधीक्षक कृष्ण प्रकाश यांनी 9 वर्षा पूर्वीच्या एका बनावट जमीन प्रकरणात शिवाजीराव कर्डिले यांना कोणतीही कल्पना न देता चौकशीसाठी रात्री 10.30 च्या दरम्यान धक्का बुक्की करुन ताब्यात घेतले. आमदार शिवाजीराव कर्डिले हे प्रचाराची सभा आटोपून परतत असतांना त्यांना अटक करण्यात आली. आमदार महोदयांना रात्रभर पोलीस स्टेशनमध्ये बसवून ठेवले गेले. खरे म्हणजे गुन्हा असेल तर तो नोंदवला गेला पाहिजे. परंतु आमदार महोदयांना रात्रभर बसवून ठेवले गेले. दुस-या दिवशी सकाळच्या दरम्यान त्यांना अटक केल्याचे कागदोपत्री दाखविण्यात आले. या प्रसंगात अतितत्परता दाखविणा-या पोलीस अधीक्षकांनी जाणून बुजून गुन्हा दाखल करुन घेतला आहे असे आमचे म्हणणे आहे. आमदार महोदय, कर्डिले यांची चूक असेल, कायद्याने त्यांनी गुन्हा केला असेल तर सर्व प्रकरणे शोधून काढा आमचे त्याबाबत काहीही म्हणणे राहणार नाही. परंतु आमदार महोदय श्री. कर्डिले जेव्हा भाजपमध्ये आल्यानंतरच त्यांच्यावर गुन्हे दाखल झाले. परंतु ते 10 वर्षे मंत्री असतांना त्यांच्यावर काहीच गुन्हे नव्हते अशा भ्रमात सरकार असेल तर ते योग्य नाही. ज्यावेळेस या विषयाची माहिती घेतली त्यावेळेस मला दिसून आले की, हा गुन्हा 2002 मध्ये घडलेला होता. साठे खत प्रकरणात दिवाणी अपील करण्याची मुदत 3 वर्षापेक्षा जास्त काळ नसते. तरी सुध्दा साठे खत प्रकरणात पोलीस अधीक्षकांनी तत्परता दाखवून आमदार महोदयांना अटक केली. 9 वर्षाचा काळ ओलांडून गेल्यानंतरही पोलीस अधीक्षकांनी जाणून बुजून अटक केलेली आहे. नगरपालिकेच्या मतदानाच्या अगोदर तीन दिवस आमदार श्री. कर्डिले यांच्यावर खोटा गुन्हा दाखल करुन त्यांना अटक करण्यात आली. आमदार कर्डिले यांना अटक केल्यामुळे त्यांना नगरपालिकेच्या निवडणूकीत भाग घेता आला नाही. त्यांना अगोदर कलम 420 खाली व नंतर एका खुनामध्ये सहभागी झ ाल्याच्या कटात गोवले गेले. आमदार महोदय श्री. कर्डिले यांच्यावर

श्री. विनोद तावडे...

डॉ. कांकरीया यांनी गुन्हा दाखल केला आहे. कांकरीया यांच्यावर केसेस आहेत. या केसेसमध्ये त्यांच्यावर महिलांची छेडछाड करणे अशा प्रकारचे गुन्हे आहेत. त्यांच्याकडे अटकपूर्व जामीन सुध्दा आहे त्यामुळे अशा पध्दतीचे आरोप असलेल्याचे म्हणणे ग्राहय धरुन आमदार कर्डीले यांना अटक करण्यात आलेली आहे. या प्रकरणात कर्डीले यांचे काही चुकले असेल, गुन्हे असतील तर कायद्यानुसार तुम्हाला जे काही करावयाचे आहे ते सर्व करा. परंतु ते राष्ट्रवादी पक्षाला सोडून दुसऱ्या पक्षात गेले म्हणून अशा पध्दतीने सूड भावनेने राजकारण केले जात असेल तर ते योग्य नाही.

खालच्या सभागृहाचे सदस्य त्यांना भेटावयास जेलमध्ये जातात तेव्हा त्यांना ते सांगतात की, तुझ्या कृषी उत्पन्न बाजार समितीची माणसे राष्ट्रवादीत पाठवून दे, मार्केट कमिटीचे लोक राष्ट्रवादीत पाठवून दे, दूध संघाची माणसे राष्ट्रवादीत पाठवून दिली तर सर्व व्यवस्थित होईल. हा जो काही प्रकार झालेला आहे त्याची माहिती मी आपल्या नेत्यांना सुध्दा दिलेली आहे. राजकारण हे मुद्याच्या आधारे केले पाहिजे परंतु अशा प्रकारचे राजकारण केले जाता कामा नये. अशा पध्दतीने आपण राजकारण करणार असाल तर तुम्हाला सावंतवाडीत जाऊन मा. राणे यांना काही म्हणावयाचा अधिकार आहे काय ? तुम्ही हे काम करीत नसाल परंतु तुमच्या पक्षाचे काही लोक राजकारण करीत आहेत. आपल्याला आता कोकणामध्ये भास्करशेठ सारखा दमदार माणूस सापडला आहे. त्यांनी डायरेक्ट अरेला कारेने उत्तर दिलेले आहे. या विषयाचे वर्णन सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी केले असल्यामुळे मी पुन्हा ते करणार नाही. कर्डीले यांच्या प्रकरणात पोलीस अधीक्षकांनी ज्या पध्दतीने वागणूक दिलेली आहे ती काही बरोबर नाही.

सभापती महोदय, भगवान कृष्णावर सांगलीपासून काय भक्ती जडली आहे हे मला समजत नाही. अकोल्यातील दरोडा प्रकरणात महिलांवर जे बलात्कार झाले त्याबाबत श्री. कृष्ण प्रकाश यांनी काहीही कारवाई केली नाही. त्यांची एफिशिअन्सी अकोल्यामध्ये दिसून आली नाही. दरोडे पडतात व त्यामध्ये आमच्या आया बहिणींची इज्जत लुटली जाते व त्या ठिकाणी हेच कृष्ण तारक म्हणून उभे असतात. परंतु त्यांना कर्डीले यांची 9 वर्षापूर्वीची प्रकरणे दिसतात. आमदार कर्डीले यांचे प्रकरण दोन वर्षापूर्वीचे नाही एवढेच मी या निमित्ताने सांगू इच्छितो. कर्डीले मंत्री होते,

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे...

तुमच्या पक्षाचे आमदार होते तेव्हा त्यांना अटक करण्याची तत्परता आपण का दाखवली नाही ? कायदा आणि सुव्यवस्थेच्या संदर्भातील रिप्लाय देतांना माननीय आबा आकडेवारी देण्यामध्ये पटाईतच आहेत. क्रिकेटमध्ये मामा सेटलवाड जसे आकडेवारी देण्यामध्ये एक्सपर्ट होते तशी आकडेवारी देण्यामध्ये आबा आपण एक्सपर्ट आहात. परंतु ही आकडेवारी देत असतांना अकोल्यामध्ये ज्या आया बहिणींची इभ्रत लुटली गेली ती इभ्रत आबा आपल्या आकडेवारीने परत येणार नाही, डोंबिवलीत जे दरोडे पडले, लोकांना जी मारहाण झाली ती आपल्या आकडेवारीने परत येणार नाही. आपल्या पोलीस अधीक्षकांची अनावश्यक कार्यक्षमता आणि अकार्यक्षमता स्पष्ट होत नाही. महाराष्ट्रात कायदा व व्यवस्था चांगल्या पध्दतीची आहे असे सांगणा-या गृहमंत्र्याचे या राज्यात चालते असा मेसेज जनतेपर्यंत जाईल असे आम्ही या चर्चेतून गृहीत धरतो. आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल मी आपले आभार मानून माझे दोन शब्द पूर्ण करतो.

--------

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर (विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी म.वि.प. नियम 259 अन्वये जो अंतिम आठवडा प्रस्ताव मांडलेला आहे त्यावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, पोलीस काहीच काम करीत नाही अशी वस्तुस्थिती नाही. पोलिसांच्या कामांमध्ये खऱ्या केसेस, खोट्या केसेस असे प्रकार आहेत. या ठिकाणी सन्माननीय सदस्य सर्वश्री रामदास कदम व विनोद तावडे यांनी जी वस्तुस्थिती मांडली त्यामध्ये सत्य नाही असे मी म्हणणार नाही. पोलीस विभागातील दोन-तीन टक्के पोलीस अधिकारी व कर्मचारी वाईट वागत असतील म्हणून संपूर्ण पोलीस विभागाला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करणे चुकीचे होईल. पोलिसांनी केलेल्या खोट्या केसेस मधून मी देखील गेलो आहे. सन 2008 मध्ये जुहू पोलीस स्टेशनला एका मिटींगसाठी उपस्थित असताना माझ्यावर 307 ची केस दाखल करण्यात आली. माझ्यावर 307 ची केस दाखल झाल्यानंतर त्या केसमधून बाहेर पडण्यासाठी कोणत्या प्रकारचे दबाव टाकण्यात आले याचा मी साक्षीदार आहे. हे मी सर्व भोगलेले आहे.

सभापती महोदय, चुकीच्या पध्दतीने काम करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांवर कारवाई केल्या नंतर ते कॅट आणि मॅटमध्ये जाऊन पुन्हा सेवेत रुजू होतात. असे अधिकारी पुन्हा सेवेत आल्यानंतर त्यांची मोक्याच्या ठिकाणी पोस्टींग केली जाते. अशा अधिकाऱ्यांची कमी महत्वाच्या ठिकाणी पोस्टींग केली पाहिजे. ज्या पोलीस अधिकाऱ्यांच्या चारित्र्यावर वारंवार शिंतोडे उडालेले आहेत, त्यांच्यावर केसेस झालेल्या आहेत अशा अधिकाऱ्यांची पोस्टांग कोणत्या ठिकाणी करण्यात येते हे देखील पाहिले पाहिजे. काम करणाऱ्या माणसाकडून चूक होते हे आपण समजू शकतो. परंतु चूक दुसऱ्यांदा झाली तर ती जाणूनबुजून केली असे म्हणता येईल आणि त्या चुकीचे प्रमाण मोठे असेल तर आपण त्यांना कोणत्या ठिकाणी पोस्टींग देतो याचा देखील विचार झाला पाहिजे. या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी काही पोलीस अधिकाऱ्यांचा निर्ढावलेला असा उल्लेख केला. पोलीस अधिकारी असे निर्ढावण्याचे कारण असे की, पोलीस अधिकाऱ्यांवर कारवाई केल्यानंतर ते मॅटमध्ये जाऊन सुटतात आणि पुन्हा कामावर रुजू होतात. आपणावर कोणत्याही प्रकारची कारवाई होत नाही, झाली तर आपण कॅट, मॅट मध्ये जाऊन सुटू शकतो अशी त्याची धारणा झालेली असते. मग त्याला कोणाीची भीती राहत नाहीत. तेव्हा जे तीन-चार टक्के भ्रष्ट अधिकारी आहेत त्यांच्यासाठी शासन वेगळी यंत्रणा राबविणार आहे काय ?

..2..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर......

सभापती महोदय, पोलीस विभागात असेही अधिकारी आहेत की ज्यांच्या संपूर्ण सेवाकाळात त्यांच्या चारित्र्यावर व वर्तणुकीवर कोणत्याही प्रकारचे शिंतोडे उडालेले नाहीत. अशा अधिकाऱ्यांसाठी सरकार काय करणार आहे कारण त्यांची संख्या जास्त आहे. या अधिकाऱ्यांचा सेवानिवृत्तीनंतर पोलीस विभागाला कोणताही उपयोग होणार नसला तरी अमुक अमुक अधिकाऱ्यांवर कोणत्याही प्रकारचे शिंतोडे नव्हते म्हणून त्यांना असे बक्षिस मिळालेले आहे अशी माहिती पुढील पिढीला मिळेल. आपण असे केले तर पोलीस अधिकाऱ्यांमध्ये सुधारणा होण्याचे हे एक कारण होऊ शकेल.

सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी महाराष्ट्रात होत असलेल्या गुन्ह्याचा उल्लेख केला. आता या सर्व गुन्ह्यांमध्ये सायबर गुन्ह्याची भर पडली आहे. त्यावेळी संगणकाचा शोध लागला नसल्यामुळे कायद्यामध्ये सायबर गुन्ह्या विषयी तरतूद नव्हती. सायबर गुन्हे होऊ लागल्यामुळे आपण त्यातील तज्ज्ञ नेमले. मुंबईतील लोकसंख्या जास्त आहे आणि त्या मानाने पोलिसांची संख्या कमी आहे. तेव्हा एखाद्या ज्येष्ठ नागरिकाची हत्या झाल्यानंतर त्याच्या नोकराला शोधण्यासाठी आपण उत्तर प्रदेश आणि बिहारमध्ये किंवा अन्य राज्यामध्ये जातो. त्यामुळे अशा गुन्ह्यांची उकल होण्यासाठी वेळ लागतो हे समजू शकतो. सायबर गुन्ह्याच्या बाबतीत आपण सायबर सेलमध्ये जाऊन तक्रार केल्यानंतरही संबंधितांवर काही कारवाई होत नाही. आता एक नवीन प्रकार सुरु झाला आहे. राजकीय क्षेत्रात काम करणा-यांवर तसेच मंत्री महोदयांवर फेसबुकवर चिखलफेक केली जाते. काही मंत्र्यांना चोर वगैरे म्हटले जाते. या संबंधीचे पुरावे मी वांद्रे येथील सायबर सेलमध्ये जाऊन दिले आणि तेथील अधिकाऱ्यांशी स्वत: बोललो. परंतु त्यांच्यावर काहीच कारवाई होऊ नये ही दुर्दैवाची बाब आहे. फेसबुकवर कोण गेले, किती वाजता गेले याची नोंद झालेली असते. असे असताना पोलीस अधिकाऱ्यांकडून ती व्यक्ती मला माहीत नाही, आम्ही त्या व्यक्तीचा शोध घेत आहोत अशी उत्तरे येऊ शकत नाही. "बाप दाखव नाही तर श्राध्द घाल" असे या प्रमाणे सायबर सेलच्या बाबतीतील लॉ आहे. तेव्हा आपण अशा तक्रारीं बाबत संबंधितांवर कारवाई करणार आहात काय ? फेसबुकवर होणारा एखादा प्रकार खरा नसेल तर

..3..



AJIT/ पूर्वी श्री.जुन्नरे... 16:45

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

संबंधितांवर कारवाई करु नका. परंतु ज्यांनी राजकीय व्यक्तींवर चिखलफेक केलेली आहे त्यांच्यावर क्विक ॲक्शन घेणार आहात काय ? सायबर सेलला कमी प्रमाणात मदत होत असेल तर सायबर सेलचे आधुनिकीकरण करुन त्यांचे मनोबल वाढविण्याची जास्त गरज आहे.

सभापती महोदय, पाच सहा वर्षापूर्वी मुंबईत अशी परिस्थिती होती की, एखाद्या मोठ्या उद्योगपतीने मुलाच्या किंवा मुलीच्या लग्नामध्ये मोठे डेकोरेशन केले तर त्याला लगेच गँगस्टरकडून फोन येत असे. परंतु आता तशी परिस्थिती नाही आणि त्याचे क्रेडीट पोलीस विभागाला द्यावे लागेल. या ठिकाणी सांगण्यात आले की मुंबईत मोठ्या प्रमाणावर बाहेरुन लोंढे येत आहेत. मुंबईत जास्तीत जास्त लोक उदरनिर्वाहासाठी येत असतात. मुंबईत वाढलेल्या लोकसंख्येच्या प्रमाणात पोलिसांची संख्या वाढली आहे काय ? त्या तुलनेत आपण पोलीस दल सक्षम केले आहे काय ? या प्रश्नांचा आपणास विचार करावा लागेल.

सभापती महोदय, आज पोलिसांच्या घरांचा प्रश्न बिकट झालेला आहे. मुंबईत अनधिकृतपणे झोपडी बांधून तेथे 10-20 वर्षे राहिलेल्या लोकांना आपण 300 स्वे.फूटचे मोफत घर देतो. त्यांच्यासाठी एसआरएची योजना राबविली जाते. परंतु ज्या पोलीस वसाहतीमध्ये पोलीस वर्षानुवर्षे राहत आहेत काही जणांची तर दुसरी पिढी राहत आहे. त्या घरांची स्थिती अतिशय वाईट झालेली आहे. वरळी पोलीस वसाहतीची फार दुरवस्था झालेली आहे. वरळी वसाहतीत असे अनेक पोलीस कर्मचारी राहत आहेत. त्या वसाहतीची आपण दुरुस्ती करु शकत नाही आणि पुनर्बांधणी करु शकत नाही ही शोकांतिका आहे. आपण या ठिकाणी अनेक सांसदीय आयुधांचा वापर करुन त्यांच्या घरांसंबंधीचे प्रश्न उपस्थित केले परंतु सरकारने अजूनही त्यांना चांगल्या प्रकारची घरे दिलेली नाहीत.

सभापती महोदय, पोलीस आणि त्यांच्या कुटुंबासाठी आरोग्य विषयक एक नवीन योजना राबवावी लागेल. त्यांच्यासाठी असलेले दवाखाने फक्त रजा घेण्यासाठी आणि रजेवरुन परत आल्यानंतर जॉईनिंग रिपोर्ट घेण्यापुरते मर्यादित असतील तर त्या दवाखान्यांचे आधुनिकीकरण करण्याची आवश्यकता आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर......

सभापती महोदय, या ठिकाणी माननीय गृह मंत्री उपस्थित नाहीत. ते लंडन येथील स्कॉटलंड यार्ड पोलिसांची कॅमेरा सिस्टीम पाहून आले आहेत. दोन्ही मंत्री महोदय त्या ठिकाणी गेले होते. त्यांच्या प्रमाणे आपल्या येथे कॅमेरे बसवावयाचे झाले तर ते कशा प्रकारे बसविले पाहिजेत आणि त्यासाठी आपण काय केले आहे याची माहिती सभागृहासमोर येण्याची गरज आहे. 26.11 सारखी घटना घडल्यानंतर कॅमेरे बसविण्या बाबत चर्चा झाली. आतापर्यंत किती कॅमेरे बसविण्यात आले आणि आणखी किती कॅमेरे लागणार आहेत याची माहिती आम्हाला कळू द्या.

सभापती महोदय, पोलीस स्टेशनचे आधुनिकीकरण करणे गरजेचे आहे. एखादा उद्योजक आपल्या कारखान्यामध्ये कर्मचाऱ्यांसाठी चांगली कॅन्टीन, वाचनालय किंवा व्यायामशाळा देण्याचा प्रयत्न करतो. आता तर प्रत्येक आय.टी.पार्कमध्ये व्यायामशाळा केलेल्या आहेत. परंतु आजही काही पोलीस स्टेशनमध्ये चांगल्या प्रकारची शौचालये नाहीत. जे पोलीस 24-24 तास डयुटी करतात त्यांना डबा खाण्यासाठी चांगली स्वच्छ जागा पोलीस स्टेशनमध्ये नाही. तेव्हा आपण पोलीस स्टेशनचे खरोखर आधुनिकीकरण करणार आहात काय ? एखादा 26.11 सारखा गुन्हा घडल्यानंतर सुरक्षिततेसाठी खर्च करण्यापेक्षा आपण अगोदर अर्थसंकल्पामध्ये तरतूद केली तर पोलीस दल अधिक सक्षम होऊ शकेल.

यानंतर श्री.सरफरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किरण पावसकर....

सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील परिस्थिती विषयी सर्व माननीय सदस्यांनी आपले म्हणणे मांडले आहे. मी स्वत: त्या जिल्ह्यात गेलो होतो. निवडणुकीच्या काळात सिंधुदुर्ग जिल्ह्यातील परिस्थिती अतिशय वाईट असते या बद्दल दुमत असण्याचे कारण नाही. मी विरोधी पक्षात असतांना त्या जिल्ह्यात गेलो होतो व आता सत्ताधारी पक्षामध्ये असतांना देखील जाऊन आलो आहे. तेथील परिस्थितीला काही पोलीस अधिकारी देखील कारणीभूत आहेत. ज्यांना पोलिसांचे संरक्षण दिले गेले आहे असे लोकप्रतिनिधी त्या जिल्ह्यात गेल्यानंतर त्यांना पोलिसांचे संरक्षण मिळत नाही त्यापैकी मी देखील आहे. सिंधुदुर्ग हा पर्यटन जिल्हा म्हटला जातो. त्या जिल्ह्यात एखाद्या व्यक्तीला अटक करावयाची असेल तर त्याच्याविरुध्द गुन्हा नोंदविला जातो. परंतु गुन्हा नोंद झाल्यानंतर व निवडणुका होऊन गेल्यानंतर त्या व्यक्तीला अजूनही अटक होत नाही. उमेदवाराकडून काही चूक झाली असेल, निवडणुका शांततेत पार पडाव्यात म्हणून त्या काळात आपण शांत बसला असाल तर निवडणुका होऊन गेल्या नंतर अजून पर्यन्त आपण कशाची वाट पहात आहात? अशा परिस्थितीत त्या जिल्ह्यामध्ये पर्यटनाचा विकास होऊच शकत नाही. जोपर्यन्त होऊ शकणार नाही. त्या जिल्ह्यातील नागरीक शांत आहेत, देवाला मानणारे आहेत. परंतु तेथील आजची कायदा व सुव्यवस्थेची असलेली परिस्थिती बदलण्याची गरज आहे.

सभापती महोदय, काल आपण अत्यावश्यक सेवेसंदर्भातील विधेयकावर चर्चा करीत होतो. एखाद्या संघटनेच्या नेत्याने चिथावणीखोर भाषण केले म्हणून पोलिसांकडे वॉरंट नसतांनाही त्यांना अटक केली जाते. अशापध्दतीने जर कायदेशीर कारवाई केली जाणार असेल तर जे लोक सामाजिक, राजकीय किंवा आर्थिक बाबतीत चिथावणी देणारी भाषणे करतात त्यांच्यावर आपण कोणती कारवाई केली आहे? याचे उदाहरण द्यावयाचे झाल्यास जैतापूरच्या प्रकल्पाकरिता अशाप्रकारची भाषणे करण्यात आली, त्यामध्ये एका नागरिकाचा मृत्यू झाला आहे. तो मृत्यू त्या ठिकाणी चिथावणीखोर भाषणे केल्यामुळे झाला काय, आंदोलन करणाऱ्यांना कुणी चिथावणी दिली होती? तसे झाले असेल तर त्याची सखोल चौकशी केली जाईल असे मला उत्तर देण्यात आले होते. त्यानंतर सखोल चौकशी झाली काय, असल्यास ती किती खोलवर गेली, त्यानंतर कुणावर कारवाई करण्यात आली? याची माहिती सुध्दा सभागृहासमोर आली पाहिजे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

श्री. किरण पावसकर....

सभापती महोदय, पुण्यामध्ये जाळपोळीचा प्रकार होण्यापूर्वी टेलिफोनवर संभाषण झाले होते त्याबाबतचा मुद्दा मी सभागृहात मांडला होता. त्या शहरामध्ये बस जाळली गेली असती, ट्रक जाळला गेला असता आणि त्यामध्ये लोकांचे जीव गेले असते. त्या बाबतीत पोलिसांकडे टेलिफोनवरील संभाषणाचे पुरावे आहेत. ते पुरावे कोर्टात सादर करण्यात आले, त्यानंतर संभाषणातील आवाजाचे विश्लेषण होऊन तो आवाज त्याच व्यक्तीचा आहे काय हे पाहिले जाणार, हे सर्व पोलिसांच्या ताब्यात आहे. गृह खाते कार्यक्षम नाही म्हणून या खात्यावर चिखलफेक करतांना आपल्याला बरे वाटते. परंतु त्याचबरोबर अशी अनेक प्रकरणे प्रलंबित आहेत त्या बाबतीत सखोल चौकशी होऊन कारवाई झाली आहे काय? ती कारवाई झालेली नसेल तर आपल्याकडे आलेले टेलिफोनवरील संभाषण खोटे सुध्दा असू शकेल. त्यामध्ये संबंधित सन्माननीय लोकांची आपण कशाकरिता बदनामी केली? आपल्याला जी कारवाई करावयाची असेल ती आपण तत्काळ केली पाहिजे. जेणेकरुन या पुढील काळात लोकांपुढे चिथावणीखोर भाषणे करुन लोकांची माथी भडकविली जाऊ नयेत आणि त्यामधून निरपराध लोकांचे मृत्यू होऊ नयेत यासाठी आपण कारवाई करावी. अत्यावश्यक सेवेमध्ये काम करुन सेवा देणाऱ्या लोकांना अटक करण्याची आपण कायद्यात तरतूद करणार असाल तर ज्या ज्या ठिकाणी मोठया प्रमाणावर चिथावणीखोर भाषणे केली जातात त्या लोकांवर त्याच पध्दतीने कठोर कारवाई करावी अशी विनंती करुन माझे भाषण संपवितो.

----

(यानंतर हिंदी भाषण) ...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री एस. क्यू. जमा ( विधानसभा द्वारा निर्वाचित ) : सभापति महोदय, यह अंतिम आठवडा प्रस्ताव हमारे विरोधी पक्ष के नेताओं ने यहां पर चर्चा के लिए रखा है. मैं कहना चाहूंगा कि पुलिस के बारे में बहुत सारी शिकायतें हो सकती हैं, लेकिन हम सभी को यह बात मान्य करनी पड़ेगी कि हमारी पुलिस बहुत ही कठिन परिस्थितियों में काम करती है. यहां पर बहुत सारे माननीय सदस्यों ने कहा कि उनके पगार तथा रहने संबंधी अनेक समस्याएं उनके सामने हैं. इसके अलावा उनके स्वास्थ्य संबंधी अनेक समस्याओं का भी सामना उनको करना पड़ता है. इसलिए हम यह नहीं कह सकते हैं कि पुलिस विभाग की हालत दूसरे विभागों से अच्छी हैं. इसके अलावा एक और समस्या उनके काम के समय को लेकर है. हम कह सकते हैं कि उनके काम के घंटे निश्चित नहीं हैं. 20-20 घंटे या उससे भी ज्यादा समय उनको एक साथ काम करना पड़ता है. इसी प्रकार सप्ताह में एक दिन की मिलने वाली छुटटी के बारे में भी कोई निश्चतता नहीं है. वीकली रेस्ट मिलने जैसी कोई गारंटी उनके लिए नहीं है. उनको लेबर लॉ का भी संरक्षण प्राप्त नहीं है. कभी-कभी उनको 24 घंटे या उससे भी ज्यादा डयुटी एक साथ करनी पड़ती है. इन सभी परिस्थितियों को देखते हुए एज ए इंस्टीटयुशन हम कह सकते हैं कि महाराष्ट्र पुलिस बहुत ही सक्षम है और वह अपना काम बहुत अच्छी तरह से करती है. मुंबई जैसे शहर को सुरक्षित रखना बहुत ही मुश्किल काम है. वर्ल्ड कप जैसा क्रिकेट मैच हमारे खिलाड़ियों ने वहां पर खेला. मुंबई शहर में बहुत ही बड़े पैमाने पर गणेशोत्सव मनाया जाता है और गणेश विसर्जन के दिन इतनी बड़ी भीड़ को कंट्रोल करना आसान काम नहीं है. यह काम पुलिस कर्मचारी बहुत ही सक्षम तरीके से करते हैं. मुंबई शहर हमारा आर्थिक शहर है. हम उतर प्रदेश के किसी गांव से या उड़ीसा से या बिहार से हम तुलना करेंगें तो वहां पर क्राइम का जो कॉंसेप्ट है या क्राइम की जो टेंडेंसी है, वह मुंबई से बिल्कुल अलग है. क्योंकि मुंबई हमारे देश की आर्थिक राजधानी है. यहां पर पुलिस को लालच देकर उनसे गलत काम करने का चांस ज्यादा है.

सभापति महोदय, मैं यहां पर आपको एक उदाहरण देना चाहूंगा. मैं कहना चाहता हूं कि अगर पुलिस ने किसी व्यापारी की गाड़ी ऑक्ट्राय नाका पर पकड़ी जहां पर वह लाखों करोड़ों

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री जमा.....

रुपए की चोरी कर रहा था. यह अधिकार पुलिस अधिकारी का है कि वह उसको छोड़ता है या जुर्माना करता है.ऐसी स्थिति में 20-30 रुपए हजार पगार पाने वाले पुलिस अधिकारी को यदि 20-30 लाख रुपए या 50 लाख रुपए कोई व्यापारी रिश्वत देता है तो ऐसी हालत हो सकती है कि उस पुलिस अधिकारी की नीयत खराब हो जाए. इतनी बड़ी रकम देखकर तो बड़े लोगों की भी नीयत खराब हो सकती है. इसलिए उस पुलिस अधिकारी के ऊपर ही यह निर्भर करता है कि उसे बेईमानी करनी है या कर्तव्य भावना दिखानी है. इस तरह की परिस्थितियों में हमारी पुलिस काम करती है..हमारे यहां पर अनेक त्यौहार मनाए जाते हैं. त्यौहारों से संबंधित रैली निकाली जाती हैं, जुलुस निकाले जाते हैं, इसके अलावा हमारे यहां पर मजदूरों की स्ट्राइक होती है, लॉक आऊट होते हैं और उन सभी परिस्थितियों का सामना हमारी पुलिस को करना पड़ंता है. यह बात सही है कि पुलिस के काम में सुधार की बहुत जरुरत है. लेकिन पुलिस विभाग से मेरी कोई शिकायंत नहीं है. हमारी पुलिस बहुत ही अच्छा काम कर रही है. हमारे बड़े शहरों को उन्होंने पूरी तरह से सुरक्षित रखा हुआ है, उन्होंने हमें आतंकवाद से बचा कर रखा है. इस तरह का कॉम्पलीमेंट मैं पुलिस के बारे में करना चाहता हूं.

यहां पर हमारे माननीय सदस्यों ने कहा कि पुलिस विभाग में बहुत सारे बॅड एलीमेंट्स हैं. यह बात सही है कि हमारे पुलिस विभाग में कुछ कमियां हैं और इस विभाग में बजट की भी कमी है. पुलिस कर्मचारियों के लिए हमारे पास अच्छे मकान नहीं हैं, उनके लिए अच्छी ड्रेस नहीं है तथा पुलिस के लिए ज्यादा अच्छी सुविधाएं भी नहीं हैं. इन सारी बातों को हमें ध्यान में रखना जरुरी है. हमारे पुलिस विभाग में मैन पावर भी कम है. यहां पर माननीय मंत्री जी ने कहा कि अगले पांच साल में पुलिस विभाग में 60-65 हजार कर्मचारियों की भर्ती करेंगे. यदि मंत्री महोदय की यह इच्छा भी हो कि वे एक साल में 60-65 हजार सक्षम पुलिस कर्मियों की भर्ती कर लें तो भी बजट की कमी के कारण यह कर पाना मुमकिन नहीं है. यह बात बिल्कुल सही है कि हमारा बजट बहुत ही लिमिटेड है. सिर्फ हमारी मांग कर देने से ही एक साल के अंदर पुलिस विभाग को बहुत बड़ा बजट प्राप्त नहीं हो पाएगा.

...5

श्री जमा.....

यहां पर हमारे एक माननीय सदस्य ने भी कहा कि जिन कर्मचारियों की इमेज अच्छी नहीं है, जिनका चरित्र संदेहजनक है, ऐसे अधिकारियों को प्राइम पोस्टिंग मिल जाती हैं. ऐसे लोगों को अच्छी जगह पर पोस्टिंग मिल जाती है. यह बात सभी माननीय समझ सकते हैं कि पुलिस विभाग में अच्छी पोस्टिंग का मतलब क्या होता है. आज स्थिति यह है कि सभी लोग काम करते हैं, परन्तु जो अच्छा काम करता है उसको कुछ भी फायदा नहीं दिया जाता है इसलिए अधिकारियों की मानसिकता ऐसी हो जाती है कि हम कितना भी अच्छा काम कर लें, फायदा तो कुछ होने वाला नहीं है, इसलिए यहां पर पैसे कमा लेना ही ज्यादा अच्छा है. मेरा कहना है कि पुलिस विभाग को कुछ ज्यादा बजट देना बहुत जरुरी है, ताकि पुलिस कर्मचारियों की सुविधाएं बढ़ायी जा सकें. उनको अच्छे मकान दिए जा सकें तथा उनके बच्चों को पढ़ाई-लिखाई की ज्यादा सुविधाएं दी जा सकें. उनका तथा उनके बच्चों का बीमा कराया जाना जरुरी है. रिटायरमेंट के बाद के समय में उनके बच्चों को ज्यादा सुरक्षा देना भी बहुत जरुरी है.

माननीय सभापति महोदय, मैं कुछ बातें माननीय मंत्री जी से कहना चाहता हूं. मेरा कहना है कि महाराष्ट्र के अंदर जो हमारी इंटेलिजेंस व्यवस्था है, उसमें सुधार होने की बहुत गुंजाइश है. अभी यहां पर हमारे एक माननीय सदस्य कुछ कह रहे थे और मैंने भी स्कॉटलेंड के बारे में जानकारी ली है. मेरा कहना है कि उनके पास जो आधुनिक उपकरण हैं या आधुनिक सुविधाएं हैं तथा जो बजट उनके विभाग को दिया जाता है, उतना बजट तथा उतनी सुविधाएं हमारे राज्य की पुलिस को देना संभव नहीं है. क्योंकि इंगलेंड की आबादी हमारे देश की आबादी से कई गुना कम है. मैं कहना चाहूंगा कि चीन के अंदर पुलिस का काम आसान है, क्योंकि वहां पर प्रजातंत्र नहीं है. यहां पर तो थोड़े लोगों का जुलुस आयेगा तो भी उनकी तैयारी पुलिस से उलझने की होती है. यदि यहां पर कोई मोर्चा निकला तो उस मोर्चे में मॉब मेंटेलिटी कुछ अलग तरह की होती है. उनकी टेंडेंसी होती है कि पुलिस को मारो, पुलिस को गाली दो तथा पुलिस पर पत्थर फेंको. इसलिए मेरा कहना है कि हमारे यहां पर डेमोक्रेसी के अंदर पुलिस को ...

...6

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री जमा....

काम करना बहुत ही कठिन है. इसलिए मैं यहां पर दो-तीन सुझाव देना चाहूंगा. मेरा कहना है कि बजट इत्यादि बढ़ाने के साथ-साथ इंटेलिजेंस विभाग को मजबूत करना बहुत जरुरी है. हमारे पुलिस विभाग में एक लाख से ज्यादा पुलिस कर्मचारी हैं. इसलिए हमारे पुलिस विभाग में एक अंतर्गत व्यवस्था ऐसी होनी चाहिए कि जो कर्मचारी अच्छे हैं, करप्ट नहीं हैं या दूसरे जो लोग करप्ट हैं तथा सक्षम नहीं हैं, उनके बारे में कॉनफिडेंशियल तरीके से मॉनिटरिंग होना चाहिए. यह बात सही है कि उनकी कॉनफिडेंशियल रिपोर्ट बनती है, उनकी परफार्मेंस रिपोर्ट बनती है. लेकिन वह सब खानापूर्ति करने जैसा है. मेरा कहना है कि कोई इफेक्टिव सिस्टम होना बहुत जरुरी है, जहां पर पुलिस विभाग के अंदर यदि कोई अधिकारी गलत काम करता है, कोई अधिकारी यदि जात-पात की भावना से काम करता है या किसी राजनीतिक दबाव में काम करता है तो ऐसे लोगों को आयडेंटिफाय किया जाना चाहिए. ऐसे अधिकारी और कर्मचारियों के मन में डर होना चाहिए कि उनकी मॉनिटरिंग हो रही है.

एक और बात का जिक्र मैं यहां पर कहना चाहूंगा कि बहुत जगहों पर कम्युनिटी पोलिसिंग का कॉंसेप्ट भी है. हमारे यहां पर कुछ राज्यों में भी वह कॉंसेप्ट है तथा कुछ विदेशों में भी वह कॉंसेप्ट है. इस संबंध में मैंने एक दो जगहों की स्टडी भी की है, कम्युनिटी पोलिसिंग के बारे में वेबसाइट पर भी बहुत जानकारी है. इसलिए हम अपने राज्य में कुछ एक्सपॅरिमेंट करके बीट वाइज कुछ कम्युनिटी पोलिसिंग करें तो पुलिस और जनता के बीच में जो कम्युनिकेशन गैप है, उस गैप को दूर किया जा सकता है. कई बार त्यौहारों के मौके पर मैंने देखा है कि जब ईद आती है, दशहरा आता है, गणेश पूजा आती है तो हम पीस कमेटी की मीटिंग करते हैं. मैं यहां पर दावे के साथ कह सकता हूं कि उस कमेटी में सभी वर्ग के लोग रहते हैं और उस पीस कमेटी का बहुत फायदा होता है. यह बात मैं एक समाज के प्रतिनिधि के नाते विश्वास के साथ कह सकता हूं. पीस कमेटी का मेम्बर अपने आप को एक समाज का जवाबदार नागरिक समझ कर इस बात की कोशिश करता है कि हमारी कायदा व सुव्यवस्था कहीं पर भी बिगड़ने न पाए. हमारा सामाजिक मेल-जोल तथा प्रेम-भाव कहीं पर भी खराब न होने पाए. मेरा अनुभव यही है कि इस पीस कमेटी का असर बहुत ही अच्छा होता है. इसलिए मेरा सुझाव है कि पीस कमेटी को यदि जिला लेवल के साथ-साथ नीचे के

...7



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री जमा....

स्तर पर भी यदि बनाया जाए तो उसका बहुत फायदा हमारे समाज को होगा. इसलिए मेरा कहना है कि कम्युनिटी पोलिसिंग को ज्यादा मजबूत करने की आवश्यकता है.

सभापति महोदय, गृहमंत्री जी सभागृह में आ गए हैं. मैं माननीय मंत्री महोदय का ध्यान आकर्षित करना चाहूंगा. मैं यहां पर दो घटनाओं का जिक्र करना चाहूंगाा इन दो घटनाओं की जानकारी उनको भी मिल चुकी है. इन दो घटनाओं के बारे में नागपुर शहर में बहुत ज्यादा रोष लोगों के मन में है.

मैं बताना चाहूंगा कि श्रीमती शारदाबाई मेश्राम नाम की महिला कई सालों से लड़ रही है. इस घटना की जानकारी पुलिस कमिश्नर को भी है. उनके पति 25 सितम्बर 2009 को काम करने के लिए एक ट्रक में भिलाई गए थे. लेकिन वे तब से गायब हैं. सीताबर्डी पुलिस स्टेशन में भी रिपोर्ट दर्ज करायी गयी है. लेकिन अभीं तक उनका कुछ पता नहीं चल पा रहा है. इस बारे में सामाजिक कार्यकर्ताओं और आम जनता की मांग है कि इस घटना की सीआयडी इंक्वायरी की जाये. इससे संबंधित निवेदन भी मंत्री महोदय को दे दिया गया है. यदि वह निवेदन उनके पास नहीं पहुंचा है तो वह निवेदन मैं आपको अवश्य पहुंचाने की कोशिश करुंगा.

माननीय गृह मंत्री जी एक दूसरा मामला भी इसी तरह का है. हमारे एक ड्राइवर हैं, वे अल्पसंख्यक समाज के हैं और उनका नाम शेख हमीद है. इनको 15.12.2011 को काम करने के लिए बाहर भेजा गया. ये ट्रांस्पोर्ट कंपनी में गार्ड का काम करते थे. उनकी श्रीमती हबीबा बी ने भी पुलिस कमिश्नर को तथा गृह मंत्रालय के कार्यालय में डिटेल माहिती के साथ अपनी शिकायत दर्ज करायी है. वह व्यक्ति ईद के दो दिन पहले गया है. वह बल्लारशाह से एक ट्रिप करके आया और दूसरी ट्रिप के बाद से वह सज्जन वापस नहीं आया है. इस बारे में भी यदि मंत्री महोदय कमिश्नर महोदय को डायरेक्शन देकर छानबीन कर सकें तो बहुत अच्छा होगा. इन दोनों घटनाओं के बारे में ध्यान देना बहुत जरुरी है. ये दोनों लोग न मिलने की वजह से पुलिस की इमेज बहुत खराब हो रही है. माननीय मंत्री ध्यान देंगे तो इन दो परिवारों को राहत मिल सकती है. इतना ही मुझे कहना है. बहुत-बहुत धन्यवाद.

---

....... MM 1

अध्यक्षित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.परशुराम उपरकर (विधानसभेव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, याठिकाणी 259 अन्वये कायदा व सुव्यवस्थेवर अंतिम आठवडा प्रस्ताव मांडण्यात आलेला आहे. मी माननीय गृह मंत्री श्री.आर.आर.पाटील यांना विनंती करीन की, आबा, यापूर्वी आम्ही कोकणातील सर्वजण असे सांगत होतो की, आम्हाला मंत्री पद द्या, मंत्री पद द्या, मुख्यमंत्री पद द्या. पण आता आमचे मत असे झाले आहे की, आम्हाला मंत्री पद नसले तरी चालेल. पण शासनाने आमचा जिल्हा शांत ठेवण्याचा प्रयत्न करावा. जर खरोखर वाटत असेल तर आबा, आपण गडचिरोलीला जाण्यापेक्षा जिल्ह्यामध्ये दहशत निर्माण करणाऱ्या मंत्र्यांना गडचिरोली जिल्ह्याचे पालक मंत्री पद द्यावे आणि तुम्ही आमच्या येथे पालक मंत्री म्हणून यावे, आम्ही खरोखर तुमचे स्वागत करु. आबा, आम्ही पोटनिवडणुकीच्या वेळेपासून सातत्याने येथे मांडत आहोत. पोटनिवडणूक सर्वांनी अनुभवली आहे आणि शिवसेनेने पोटनिवडणूक जवळून अनुभवली आहे आणि त्याबाबतीत अनेक वेळा उदाहरणेही दिलेली आहेत. श्री.रमेश गोवेकर बेपत्ता झाले, लोकसभेच्या निवडणुकीमध्ये श्री.अंकुश राणे यांची हत्या झाली आणि आबा, आपण ही केस आठ तासामध्ये सी.आय.डी.कडे दिली. श्री.अंकुश राणे यांची हत्या झाल्यापासून ही केस सी.आय.डी.कडे 8 तासामध्ये देण्याचे काय कारण होते? आता याला चार वर्षे झाली. हत्या झालेली व्यक्ती कोणाही मंत्री महोदयांचा भाऊ असू दे, परंतु तो आमच्या जिल्ह्यातील होता. पण माझी मागणी एवढीच आहे की, या प्रकरणातील गुन्हेगाराचा शोध लागण्याची गरज आहे. पण अद्यापही शोध लागलेला नाही. आपण गुन्हेगार शोधावा म्हणजे तेथे खऱ्या अर्थाने सर्व बाबी समोर येतील.

सभापती महोदय, आम्ही आतापर्यंत ऐकले की, शिवसेने वाले मार खातात, शिवसेनेवाले मार देतात. पण विधानसभेची निवडणूक झाल्यानंतर तेथे श्री.रवी पाठक निवडणुकीमध्ये पडल्यानंतर काँग्रेसच्याच कार्यकर्त्यांना स्टॅपिंग झाल्याचे आम्ही पेपरमध्ये वाचले आहे. कणकवली मध्ये सुदन बांदवडेकरचे स्टॅपिंग झाले.बाया बंधू जळून मेला आणि या ठिकाणी एका माननीय मंत्री महोदयांनी टी.व्ही.वर सांगितले की, बाया बंधूचा मृत्यू मोबाईलच्या स्फोटमुळे झाला, आता काय बोलावयाचे? मोबाईच्या स्फोटमुळे माणूस जळून मरतो हे या शासनातील एका मंत्री महोदयांच्या तोंडून ऐकल्यानंतर कोकणातील सर्व जनता मात्र हबकली आहे.अशाच पध्दतीने गेल्या विधानसभेच्या निवडणुकीमध्ये स्वाभिमान संघटनेच्या बाबत पोलीस स्टेशनला रेकॉर्ड झाले आहे. त्याठिकाणी स्वाभिमान संघटनेच्या हजारो कार्यकर्त्यांनी येऊन शिवसेनेचे उमेदवार श्री.वैभव नाईक यांच्यावर रिव्हाल्वर रोखण्याचे काम केले.त्या आरोपींचे काय झाले हा प्रश्न आहे. ते आरोपी सुटले



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.परशुराम उपरकर . . . .

आहेत काय हा प्रश्न आहे.तसेच पोटनिवडणुकीमध्ये श्री.निलेश राणे यांनी आपल्या गाडीवर पोलीस स्टीकर लावला होता, त्यामुळे ती पकडण्यात आली. त्या केसचे काय झाले हे माननीय गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील साहेब आपण सांगणार आहात काय, सदरहू केस काढून टाकण्यात आली आहे काय ? मात्र आमच्या नेत्यांवरील केसेस तशाच राहिलेल्या आहेत.

आबा,आपण वेंगुर्ला येथील सर्व प्रकार अनुभवला आहे. आतापर्यंत शिवसेना दहशतवाद, दहशतवाद असे म्हणत होती पण आता आपला पक्ष देखील दहशतवाद, दहशतवाद असे म्हणू लागलेला आहे. आम्ही ही दहशत नगरपालिकांच्या निवडणुकीच्या माध्यमातून पाहिली आहे. आपण एका बाजूला राज्य रौप्य महोत्सवी वर्ष साजरे करीत असताना, दुसऱ्या बाजूला कोकणातील दोन माननीय मंत्री महोदय हे एकमेकांबरोबर भांडताना पहात आहोत. एका माननीय मंत्री महोदयांनी दुसऱ्याचे कार्यालय फोडले. मग आमच्या जिल्ह्याचे खासदार श्री.निलेश राणे म्हणाले की, श्री.नारायण राणे साहेबांबद्दल अपशब्द काढणाऱ्याला दोन हात करुन बघू असे पेपर मधील वृत्त आहे. दुसऱ्या बाजूला जशास तसे उत्तर देण्याची क्षमता आमच्यामध्ये आहे असे माननीय मंत्री श्री.भास्कर जाधव म्हणत आहेत. आपण राज्यामध्ये रौप्यमहोत्सवी वर्ष साजरे करीत असताना दोन मंत्री महोदयांमध्ये होणारे भांडण पाहिले. निवडणुकीच्या वेळी आपण प्रचारासाठी आलात आणि आपणही अशाच प्रकारचे बोलला. तुम्ही निघून गेल्यानंतर "मी पण मंत्री आहे, सिनिअर मंत्री आहे आणि मी देखील काही करु शकतो" असे सांगितले आहे. माननीय गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी सोज्वळ भाषेमध्ये सांगितले की, सज्जनाची मुले सज्जन व्हावीत आणि दुर्जनांची मुले दुर्जन व्हावीत. गुंडांची मुले गुंड व्हावीत.

यानंतर कु.थोरात . . . .

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ प्रथम सौ. रणदिवे ..... 17:15

श्री. परशुराम उपरकर. . .

वेंगुर्ल्यातील निवडणुकीमध्ये एका कॉन्ग्रेसच्या कार्यकर्त्याच्या घरात घुसून श्री. नितेश राणे आणि इतर सर्व कार्यकर्त्यांनी नासधूस केल्यानंतर त्या ठिकाणचे लोक एकत्र जमले आणि कॉन्ग्रेसच्या कार्यालयाला घेराव घालून जाब विचारत होते. सभापती महोदय, . .

प्रा. सुरेश नवले : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे.

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय, या सर्व घटना वर्तमानपत्रात छापून आलेल्या आहेत. पोलीस स्टेशनला त्याच्या नोंदी झालेल्या आहेत.

प्रा. सुरेश नवले : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा असा आहे की, वर्तमानपत्राच्या बातम्यांच्या आधारे या सभागृहात जे सन्माननीय मंत्री महोदय उपस्थित नाहीत त्यांचे नाव या सभागृहाच्या पटलावर आणणे हे योग्य नाही. वर्तमानपत्रातील बातम्या वाचणे आणि अप्रत्यक्षरित्या त्यांचे नाव या सभागृहाच्या पटलावर आणणे हे अयोग्य आहे हा माझा हरकतीचा मुद्दा आहे.

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय, वेंगुर्ल्याच्या निवडणुकीमध्ये जो प्रकार झाला त्यानंतर संपूर्ण वेंगुर्ल्यातील लोक एकत्र आले घेराव घालून जाब विचारत होते आणि पोलिसांना सांगत होते की, या दहशतवाद पसरविणाऱ्या माणसाला या शहराच्या बाहेर घालविण्यात यावे मग आम्ही घरी जातो. पण काहीही झाले नाही. दुर्दैव एवढे की, आमच्या जिल्हयाचे मंत्री आणि खासदार सोबत 40 गाडया घेऊन आले. त्या गाडयांमध्ये दांडे, चॉपर, तलावारी, बाटल्या होत्या. पाहिजे तर या बाबतीत माननीय मंत्री महोदयानी पोलिसांकडून माहिती घ्यावी. ते वेंगुर्ल्यात आल्यानंतर दंगल उसळली. आलेल्या 40 गाडयामधील कार्यकर्त्यांनी लोकांना काय बघता असे विचारले स्वतःच्या हातात दांडे घेतले आणि दगड व बाटल्या टाकून बाजारात असलेल्या निरपराध लोकांच्या गाडया तोडल्या आणि काही लोकांना मारले. एवढे करुनही ते गप्प बसले नाहीत. शेवटी निवडणुकीसाठी कोणाचा तरी बळी हवा असतो. या निवडणुकीतील माझा बळी शासनाच्या पोलिसांमुळे वाचला. शासनाचे पोलीस नसते तर या सभागृहात माझ्या बद्दल श्रध्दांजली वहावी लागली असती, असा प्रकार त्या ठिकाणी घडला. त्या ठिकाणी 40 ते 50 लोक तलवारी आणि चॉपर घेऊन बाटल्या फेकत असताना माझ्या बॉडीगार्डने शटर खाली खेचला पण त्या मॉबने तो शटर तोडला. शटर तोडून आतमध्ये घुसत असतांना माझ्या बॉडीगार्डने रिव्हाल्व्हरमधून दोन गोळया झाडल्यानंतर ते सर्वजण पांगले नाही तर माझी आणि माझ्या बरोबर चार-पाच कार्यकर्त्यांची

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्या ठिकाणी हत्या झाली असती आणि आपल्याला वर्तमानपत्रातून वाचावयाला मिळाले असते.

सभापती महोदय, हे सर्व झाल्यानंतर शासनाच्या पोलिसांनी कलम 307 चा गुन्हा नोंदविला तो मी नोंदविला नाही. मी त्या ठिकाणी जाण्या अगोदरच पोलिसांनी कलम 307 अन्वये गुंन्हा नोंदविला होता. दुसऱ्या दिवशी 6.00 वाजता श्री. नितेश राणे यांनी पोलीस स्टेशनमध्ये जाऊन माझ्या विरुध्द कलम 307 अन्वये गुन्हा नोंदविला. सभापती महोदय, पोलिसांनी कलम 307 अन्वये गुन्हा नोंदविला या घटनेला आज पंधरा दिवस झाले आहेत. सर्व आरोपी मोकाट फिरत आहेत. प्रेस कॉन्फरन्स घेत आहेत. सार्वजनिक कार्यक्रमाला उपस्थित रहात आहेत. एका बाजूला निवडणुकीमध्ये पोलिसांनी चांगले काम केले असे आम्ही वृत्तपत्रांना सांगितलेले आहे. या निवडणुकीमध्ये पोलिसांनी चोख काम केलेले आहे. 48 तासाच्या आत गुन्हेगारांना आणि गुंडाना त्या शहराच्या बाहेर हाकलून दिले. दुसऱ्या दिवशी असा चोख बंदोबस्त ठेवला की, त्या बंदोबस्तामुळे लोकांनी निर्भयतेने मतदान केले. निर्भयतेने मतदान केल्यानंतर निकाल काय आला हे देखील आपण पाहिलेले आहे. असे निर्भयतेने मतदान करण्याकरिता शासनाच्या पोलिसांनी खऱ्या अर्थाने जबाबदारीने काम केलेले आहे. पण त्याचवेळी आम्ही असे सांगितले होते की, आपण आज निवडणूक आयोगाचे ऐकत असाल पण ही निवडणुकीची आचारसंहिता संपल्यानंतर भविष्यात पालकमंत्र्यांचे आपण ऐकू नका. आमच्या मनामध्ये तीच शंका निर्माण झालेली आहे. कारण ज्येष्ठ मंत्री आहेत ते काहीही करु शकतात. माननीय गृह मंत्री महोदय, आज त्या ठिकाणी असलेल्या सन्माननीय मंत्री महोदयांच्या आश्रयाखाली सर्व काँग्रेसचे कार्यकर्ते मोकाट फिरत आहेत. त्या कार्यकर्त्यांना तातडीने अटक करावी. आजच एका शिष्टमंडळाने एस.पीं.ना भेटून या सर्व कार्यकर्त्यांना ताबडतोब अटक करावी असे सांगितलेले आहे.

सभापती महोदय, निवडणुकीतील माननीय गृह मंत्री यांच्या भाषणानंतर 6 ताराखेला वेंगुर्ल्यातील माणिक चौकामध्ये कॉन्ग्रेसच्या झालेल्या मिटिंगची कॅसेट निवडणूक आयोगाकडून मागविण्यात यावी. त्या सी.डी.मध्ये जिल्हयाचे पालक मंत्री आणि त्या ठिकाणी असलेल्या स्वाभिमान संघटनेच्या अध्यक्षांनी असे म्हटले आहे की, 11 तारखेपर्यत तुमचे आहे. 12 तारखेनंतर माझे आहे. मी बघून घेईन. जर या पुढे या सिंधुदुर्ग जिल्हयात कोणताही प्रकार घडला तर त्याला जिल्हयाच्या पालकमंत्र्यांना जबाबदार धरले पाहिजे.

..3..

सभापती महोदय, मालवण शहरामध्ये ज्यांनी आता नगराध्यक्षांचा फॉर्म भरला आहे ते श्री. सुरेश आचरेकर निवडणुकीच्या दिवशी मतदारांना मारुन जबरदस्ती मतदान करण्याचा प्रयत्न करीत होते हे दृश्य आपण टी.व्ही. वर बधितले असेल. दूरदर्शन या चित्र वाहिनीने त्या संबंधीच्या चित्रफिती दूरदर्शनवर दाखविल्या होत्या. आज तोच उमेदरवार अपक्ष उमेदवाराच्या फॉर्ममध्ये खाडाखोड झाली म्हणून आयुक्तांकडे गेला आणि आयुक्तांनी दबावाखाली फॉर्ममध्ये असलेल्या खाडाखोडी मान्य करुन अपक्ष उमेदवाराला रद्दबातल ठरविले. अशा प्रकारे किती दबाव आणण्यात येणार आहे?

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्यांनी वेळेचे बंधन पाळून मला सहकार्य करावे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी स्वत: जे भोगलेले आहे त्याबद्दल ते बोलत आहेत. ते आपल्या व्यथा या ठिकाणी मांडत आहेत लोकांच्या व्यथा मांडत नाही त्यामुळे त्यांना थोडा वेळ देण्यात यावा अशी माझी विनंती आहे.

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय, त्या उमेदवाराच्या बाबतीत पोलीस स्टेशनमध्ये केस नोंदविण्यात आलेली आहे. असे असेल तर सिंधुदुर्ग जिल्हयात निवडणुकाच घेण्यात येऊ नयेत. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील 50:50 टक्के जागा राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेस पक्षाने वाटून घ्याव्यात. आणि त्या ठिकाणी काँग्रेस व राष्ट्रवादी पक्षाने काय विकास करावयाचा आहे तो विकास करावा, बाकीचे पक्ष त्याकडे बघत राहतील. सिंधुदुर्ग जिल्हयातील लोकांना जर शांती हवी असेल तर शिवसेना ते भोगायला तयार आहे. शिवसेना त्या ठिकाणी कोणतीही निवडणूक लढविणार नाही. काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने त्या ठिकाणच्या सीट वाटून घ्याव्यात आणि त्या ठिकाणी काय वाट लावावयाची ती वाट लावण्यात यावी.

सभापती महोदय, आज त्या ठिकाणी मायनिंगच्या माध्यमातून मोठया गुन्हेगारीला उत आलेला आहे. मायनिंगच्या पैशातून गुन्हेगार निर्माण झालेले आहेत. आज बांदा या गावात जाऊन बघा. प्रत्येक नाक्या-नाक्यावर मायनिंग कंपनीचे गुन्हेगारी वृत्तीचे लोक थांबलेले असतात. आज त्या ठिकाणी मायनिंगच्या माध्यमातून गुन्हेगारीचा विषय पुढे येत आहे. माननीय मंत्री महोदयांना माझी कळकळीची विनंती आहे की, सिंधुदुर्ग जिल्हा हा पूर्वीपासून शांततामय जिल्हा आहे. बॅ. नाथ पै यांचा जिल्हा आहे. श्री. मधू दंडवते निवडून आलेला जिल्हा आहे. अशा जिल्हयामध्ये खासदार

..4..



श्री. परशुराम उपरकर. . .

आपल्या हातात दांडा घेऊन बाहेर पडत असतील तर या जिल्हयातील जनतेची बदनामी थांविण्याकरिता कोकणला मंत्री पद देण्यात येऊ नये. कोकणातील मंत्री नसले तरी चालेल. आतापर्यंत या कोकणावर पश्चिम महाराष्ट्रातील मंत्र्यांनी राज्य केलेले आहे. पूर्वी आम्ही असे म्हणत होतो की, आम्हाला  कोकणचा मंत्री द्या. आमच्या गावातील मंत्री द्या. आता आम्हाला असे म्हणण्याची वेळ आलेली आहे की, आम्हाला आमच्या गावचा मंत्री नको, बाहेरचे मंत्री चालतील. मागच्यावेळी सन्माननीय श्री. घोरपडे, श्री. अरुण मेहता मंत्री होते. ते आम्हाला चालतील पण अशा पध्दतीने विकासाच्या नावाखाली दहशत आणि दहशतीच्या नावाखाली सिंधुदुर्ग जिल्हयाचे नाव बदनाम होत असेल तर ती बदनामी थांबविण्यात यावी. सिंधुदुर्ग जिल्हा खऱ्या अर्थाने देवदेवतांची भक्ती करणारा आणि भक्तीमय असलेला असा जिल्हा आहे म्हणून माननीय मंत्री महोदयांनी या जिल्हयामध्ये काळजीपूर्वक लक्ष घालावे. तसेच कलम 307 चा गुन्हा लावण्यात आलेले आरोपी मोकाट फिरत आहेत, त्यांना तातडीने पकडण्याचे आदेश देण्यात यावेत, अशा प्रकारची मी विनंती करतो आणि माझे भाषण थांबवितो. जय हिंद. जय महाराष्ट्र.

----

यानंतर श्री. गिते. . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ पूर्वी श्री. खंदारे ...... 17:25

श्री. संजय केळकर (कोकण विभाग पदवीधर) : महोदय, नियम 259 अन्वये सभागृहात मांडण्यात आलेल्या अंतिम आठवडा प्रस्तावावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

महोदय, प्रत्येक अधिवेशनात कायदा व सुव्यवस्थेचा प्रस्ताव चर्चेला येतो. त्यावेळी आम्ही निरनिराळे मुद्दे सभागृहात मांडतो आणि त्यांना माननीय गृह मंत्री हे ठराविक पध्दतीची उत्तरे देतात. पुन्हा दुसऱ्या अधिवेशनात त्याच पध्दतीचे मुद्दे ऐरणीवर येतात. त्यामुळे मला अपेक्षा आहे की, किमान यावेळी तरी मंत्री महोदय ठोस अशा प्रकारची उत्तरे देतील आणि पुढील कारवाई त्यातून दिसेल, जेणेकरुन मार्च महिन्यातील अर्थसंकल्पीय अधिवेशनात हा विषय पुन्हा उपस्थित करण्याची वेळ येणार नाही. मी आकडेवारीत जाणार नाही कारण सर्वच सन्माननीय सदस्यांकडे ही माहिती आहे. दरवर्षी राज्यात किती चोऱ्या होता, दरोडे किती पडतात याची आकडेवारी न सांगता कोकणच्या 720 किलोमीटर किनाऱ्याबाबत मी थोडक्यात विचार व्यक्त करणार आहे.

महोदय, सन 1993 मध्ये मुंबईत भयानक स्वरुपात बॉम्बस्फोट होऊन संपूर्ण जनता भयभीत झाली होती. याची पार्श्वभूमी अशी आहे की, कोकणातील किनारे, बंदरे सुरक्षित नसल्याने त्या ठिकाणी थोड्याशा पैशासाठी देशाची सुरक्षितता धोक्यात आणली जात आहे. विकल्या गेलेल्या लोकांमुळे ही स्फोटके उतरविली गेली व त्याचा वापर या बॉम्बस्फोटांसाठी करण्यात आला ही दुर्दैवाची गोष्ट आहे. हे लोक विकले गेले नसते तर मुंबईत बॉम्बस्फोट मालिका घडली नसती. म्हणून सागरी सुरक्षेच्या संदर्भात मोठा प्रश्न आज निर्माण झालेला आहे. सभागृहात प्रत्येक वेळेला निरनिराळ्या घोषणा दिल्या जातात. या निमित्ताने माझी मागणी आहे की, कोकणात ठाणे जिल्ह्यासह छोटी मोठी अशी 48 बंदरे आहेत. ही बंदरे सुरक्षित नसल्याने त्या ठिकाणी स्फोटके उतरविली जाऊ शकतात, दहशतवादी सुध्दा उतरु शकतात. या बंदरांच्या सुरक्षिततेचा प्राथम्याने विचार करणे आवश्यक आहे. तसेच या बंदरांची योग्य पध्दतीने नाकाबंदी करणे आवश्यक आहे व ती कशा प्रकारे करणार याचे स्पष्टीकरण करणे आवश्यक आहे. केवळ सिंधुदुर्ग किंवा रत्नागिरी जिल्हा नव्हे तर मुंबईच्या जवळ असलेल्या ठाणे जिल्ह्याचे मोठ्या प्रमाणात नागरीकरण होत आहे. आज ठाणे जिल्ह्याची लोकसंख्या 1.10 कोटीपर्यंत गेलेली आहे. त्या मानाने पोलिसांची संख्या अत्यंत कमी आहे. शासनाने लोकसंख्येच्या तुलनेत पोलिसांची संख्या वाढविणे आवश्यक आहे असे मंत्री महोदयांनी उत्तरातून स्पष्ट करावे.

.....2



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर ......

महोदय, राज्यात चोऱ्या, चेन स्नॅकिंग व दरोडे हे तर चालूच आहे. दररोज आम्हाला फोनवरुन माहिती देण्यात येते की, अमुक ठिकाणी चोरी झाली, दरोडा पडला. डोंबिवली शहरात तीन शाळकरी मुलांना खंडणीसाठी पळविले होते. नुकताच डोंबिवली शहरात दरोडा पडला असता पोलिसांना मदतीसाठी फोन केला असता पोलीस स्टेशनच्या फोनचे बिल भरलेले नसल्याने ते मदतीला येऊ शकले नाहीत. अशा प्रकारे शासनाने पोलीस स्टेशनची फोनची बिले भरली जात आहेत की नाही याकडेही लक्ष देणे आवश्यक आहे जेणेकरुन असुरक्षित जनतेला पोलिसांना मदतीसाठी बोलावणे शक्य होईल. डोंबिवलीसारख्या सुशिक्षित शहरात अशा प्रकारचे भयभीत वातावरण निर्माण होणे आणि पोलिसांकडून कोणतीही सुरक्षा न मिळणे हे भूषणावह नाही. ठाणे जिल्ह्यातील ग्रामीण भागात सुध्दा याहून वेगळी परिस्थिती नाही. तालुक्याच्या ठिकाणी तसेच गावाच्या ठिकाणी सुध्दा दुकानांमध्ये दरोडे पडल्याच्या घटना घडत आहेत. तक्रार केल्यानंतर जेव्हा पोलीस त्या दुकानात चौकशीसाठी जातात तेव्हा पोलीस मात्र दुकानदारालाच विचारतात की, आपण दुकानात सी.सी. कॅमेरे का बसविले नाहीत ? सिक्युरिटी का नेमली नाही ? ग्रामीण भागातील दुकानदार अशा प्रकारे सुरक्षा किंवा सी.सी. कॅमेरे बसू शकत नाहीत याची आपल्याला जाणीव आहेच, याचाही शासनाने विचार करावा. पण पोलीस मात्र स्वत:कडे चार बोटे आणि दुसऱ्याकडे एक बोट दाखवून ज्यांच्याकडे चोरी झाली त्यांना दिलासा देण्याऐवजी त्यांनाच जाब विचारण्याचे काम करीत आहेत, यावर उपाययोजना करावी.

महोदय, ठाणे आणि रायगड जिल्ह्यात आज जी गुन्हेगारी वाढत आहे ती प्रामुख्याने सर्व गुन्हेगारी जमिनीभोवती चालली आहे. एखादा गरीब शेतकरी किंवा आदिवासी यांना संगनमताने छळण्याचे प्रकार सर्रास चालू आहेत. तसेच पोलिसांशी हात मिळवणी करुन ज्यांची जमीन घ्यायची आहे त्यांना हद्दपार केले जाते व त्यांच्या जमिनी बळकावण्याचे प्रकार सुरु आहेत. त्यात महसूल खात्यातील लोक, पोलीस, गुंड हे एक होऊन ज्यांची नावे 7/12 च्या उताऱ्यावर आहेत अशा लोकांना धाक-दपटशा दाखवून उचलून नेतात व त्यांच्या जमिनी ताब्यात घेतल्या जातात, यासंबंधी कोणतीही उपाययोजना केली जात नाही हे दुर्दैव आहे. मघाशी सभागृहात औचित्याच्या मुद्याच्या माध्यमातून देखील मुद्दा मांडलेला आहे. राज्यात वारकरी, शेतकरी यांच्यावर लाठ्या-

....3



ABG/ पूर्वी श्री. खंदारे ...... 17:25

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर ......

काठ्यांचा वर्षाव पोलिसांकडून केला जातो पण चोरांना मारताना या लाठ्या कोठे जातात हा खरा प्रश्न आहे. यासंबंधी कदाचित आपण उत्तर देऊन टाकाल पण आज सामान्य माणूस जो भयभीत आहे, भीतीच्या व दहशतीच्या वातावरणात जगत आहे त्याच्या मनातील भीती कशी काढणार आहे याचाही उपाय सांगितला पाहिजे. कारण सामान्य माणूस पोलीस स्टेशनमध्ये तक्रार करायला जरी गेला तर त्याला भीती वाटते की, आपली तक्रार लिहून घेतील की नाही, की आपल्यालाच पोलीस स्टेशनमध्ये बसवून ठेवतील, अशा प्रकारे पोलिसांचा आधार वाटण्याऐवजी त्याला पोलिसांचीच भीती जास्त वाटत आहे.

महोदय,मागील आठवड्यात माननीय गृह मंत्र्यांना आम्ही ठाणे जिल्ह्यातील सर्व आमदार भेटलो. अंबरनाथ शहरात गेल्या पाच वर्षात 20 राजकीय कार्यकर्त्यांच्या हत्या झालेल्या आहेत. यासंदर्भात आम्ही मंत्री महोदयांना भेटायला गेलो होतो. तीन वेळा आमदार म्हणून निवडून आलेले पप्पू कलानी जे आता जामिनावर सुटून बाहेर आलेले आहेत त्यांचा मुलगा बोनी कलानी हा नगरसेवक आहे. त्याने भारतीय जनता पक्षाचे नगरसेवक आणि शिवसेना पक्षाचा शाखा प्रमुख यांना मारहाण केली होती. त्यासंबंधी गुन्हा नोंदविला, एफआयआर दाखल करण्यात आला पण तरी सुध्दा या बोनी कलानीला अटक होत नाही. त्यासाठी सर्वपक्षीय मोर्चा सुध्दा निघतो तरी देखील पोलिस कारवाई करण्यात हतबलता दाखवितात. याचा अर्थ कोणत्या राजकीय शक्तीचे याला पाठबळ आहे, त्याच्या पाठीशी कोण आहेत? एका बाजूला गुन्हा नोंदविला जातो पण कारवाई होत नाही आणि दुसऱ्या बाजूला मात्र आमदार कर्डिले सारख्या माणसाला प्रचारावरुन येत असताना गाडीत बसवून पोलीस स्टेशनमध्ये आणून डांबले जाते. अशी राज्यातील कायदा व सुव्यवस्था असल्यानेच पप्पू कलानीसारखा माणूस जामिनावर सुटून आल्यानंतर तसेच त्याच्यावर इतके गुन्हे असताना सुध्दा त्याला अटक होत नाही.

ही घटना घडल्यानंतर दुसऱ्याच दिवशी पप्पू कलानीचा मुलगा भारतीय जनता पक्षाच्या नगरसेवकाच्या कार्यालयात जाऊन पुन्हा माझ्याविरुध्द तक्रार केली तर विचार कर अशा प्रकारची धमकी देतो. तसेच पप्पू कलानी सोबत दहा-पंधरा काळे कपडे घातलेले बॉडीगार्ड घेऊन फिरतो.

....4

श्री. संजय केळकर ......

तो ज्या रस्त्यावर जातो तो संपूर्ण रस्ता अडविला जातो व लोकांना त्याचा त्रास होतो. हे सर्व पोलीस व वाहतूक पोलीस डोळ्याने पाहून सुध्दा काहीच कारवाई किंवा दंड करीत नाहीत. म्हणून माझी मागणी आहे की, पप्पू कलानीचा जामीन रद्द झाला पाहिजे व त्याला ताबडतोब अटक झाली पाहिजे. राजकीय हेतूने हे सर्व होत असेल आणि आपण गुन्हेगारांना पाठीशी घालू लागलो तर लोकांचा निवडणूक प्रक्रिया व लोकशाहीवरील विश्वास उडेल.

महोदय, आम्ही नेहमीचा पोलिसांच्या निवासाबाबतचा प्रश्न सभागृहात उपस्थित करीत असतो. पोलीस ज्या इमारतीत राहतात....

यानंतर श्री. भोगले.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ श्री.गिते... 17:35

श्री.संजय केळकर.......

त्यांचे कुटुंबीय ज्या परिस्थितीत आहेत, ज्या पध्दतीने त्यांना 24 तास काम करावे लागते त्या पोलिसांची देखील काळजी घेण्याची आवश्यकता आहे. काही पोलीस निश्चितपणे प्रामाणिक आहेत. ठाणे जिल्हयाचे पोलीस हे बाजीराव सिंघमसारखे काम करीत आहेत. त्यांचे मनोधैर्य वाढविले पाहिजे. ते खच्चीकरण करुन चालणार नाही. त्यांना ताकद दिली पाहिजे. आज पोलीस स्टेशनमध्ये पोलीस उपनिरीक्षक असतील, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक असतील त्यांच्याकडून ब्लॅकमेलिंग केले जाते. तक्रारी घेऊन कोणी आला आणि त्या तक्रारीमध्ये आरोपी म्हणून कोणाची नावे असतील तर त्या संबंधितांना पोलीस स्टेशनवर फोन करुन बोलावले जाते. त्यांना धमकावले जाते, लाचखोरी करुन त्यांची नावे त्या तक्रारीतून वगळली जातात. हा प्रकार बंद झाला पाहिजे.

सभापती महोदय, मी नक्षलवादाच्या संदर्भात शेवटचा मुद्दा मांडू इच्छितो. नक्षलवादी चळवळीच्या विरोधात गडचिरोली जिल्हयामध्ये अनेक वर्षापासून राज्य पोलीस दलाचे सी-60 हे प्रभावी दल कार्यक्षमपणे काम करीत आहे. गनिमी काव्याचे तंत्र त्यांना माहिती आहे. तेथील भौगोलिक परिस्थिती त्यांना ज्ञात आहे. नक्षलवादाचे तंत्र त्यांना माहिती आहे. नक्षलवाद्यांना अडविण्यामध्ये, रोखण्यामध्ये, पकडण्यामध्ये या दलाला निश्चितपणे यश मिळते. केंद्रीय निमलष्करी दलापेक्षा सी-60 दल उजवे आहे असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. सी-60 दलामधील जे रक्षक आहेत त्यांना छोटी मोठी कामे देता कामा नयेत. त्यांना दुय्यम कामासाठी नेमले जाऊ नये. एखादा व्हीआयपी आला तर त्यांच्या बंदोबस्ताकरिता त्यांना नेमले जाऊ नये. त्यांना फक्त नक्षलवाद्यांविरुध्द लढण्यासाठी उपयोगात आणावे. हे प्रभावी दल निश्चितपणे त्यांचा बिमोड केल्याशिवाय राहणार नाही. सामान्य माणसाला दिलासा देण्यासाठी पोलीस आहेत, पोलिसांचा आदर वाढला पाहिजे असा महाराष्ट्र आम्हाला अपेक्षित आहे. या महाराष्ट्रातील कायदा व सुव्यवस्था बिघडली आहे ती ताळ्यावर आणण्यासाठी कडक पावले उचलली पाहिजेत. पोलिसांचे मनोधैर्य वाढविण्याची, यंत्रसामुग्री, सागरी सुरक्षा व्यवस्था या संदर्भात ठोस पावले उचलण्याची गरज आहे एवढे बोलून माझे भाषण संपवितो.

----

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, महाराष्ट्रातील कायदा व सुव्यवस्थेच्या संदर्भात उपस्थित केलेल्या चर्चेला सुदैवाने गृहमंत्री उत्तर देणार आहेत. एक तासाचा अवधी त्यांना उत्तर देण्यासाठी पुरेल एवढे मुद्दे आम्ही दिले पाहिजेत. दोन दिवस आम्ही कामाशिवाय सभागृहाचा वेळ वाया घालविला. आमच्याकडे कामाची वेळ असताना आम्ही सभागृहापुढे काम आणू शकलो नाही. तो आमचा दोष नाही. जर कोणाला बोलावयाचे असेल तर पाच मिनिटे बोलण्याची संधी द्यावी.

**तालिका सभापती** (श्री.मोहन जोशी) : दोन तासाच्या अवधीत सन्माननीय सदस्यांची भाषणे झालेली आहेत. महामहिम राज्यपालांनी आज चहापानाचा कार्यक्रम आयोजित केला आहे. माननीय गृहमंत्र्यांना त्या कार्यक्रमासाठी जावयाचे आहे. त्यांच्या उत्तराच्या भाषणाने ही चर्चा अडीच तासात पूर्ण होईल.

श्री.दिवाकर रावते : या कार्यक्रमाची मला माहिती नव्हती. परंतु एक बाब मी माननीय गृहमंत्र्यांच्या निदर्शनास आणू इच्छितो. आज रस्त्यावर जे उघडपणे दारु प्यायला बसतात त्यांना का आवरले जात नाही? काल ई टीव्ही चॅनेलवर नागपूर शहराचे दृश्य दाखविले जात होते. मुंबईमध्ये देखील एलफिन्स्टन रोड येथील परळ बस आगाराच्या शेजारी स्वामी समर्थ मार्गावर उघडपणे लोक दारु प्यायला बसतात. पोलीस का हतबल आहेत? आमच्याकडे महिला वर्गाकडून तक्रार आली की, आम्हाला तेथून जाता येत नाही अशी परिस्थिती आहे. माननीय गृहमंत्र्यांनी या संदर्भात लक्ष घालावे.

---

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील (गृहमंत्री) : सभापती महोदय, विरोधी पक्षाच्या वतीने अंतिम आठवडा प्रस्तावाच्या निमित्ताने राज्यामध्ये वाढत असलेल्या चोऱ्या, दरोडे, लुटमार आणि बिघडत असलेली कायदा व सुव्यवस्था या संदर्भात चिंता व्यक्त करुन या महत्वपूर्ण आयुधाचा वापर करीत सन्माननीय विरोधी पक्षनेते व सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी हा प्रस्ताव सदनासमोर मांडला आहे.

सभापती महोदय, प्रस्तावाची सुरुवात "महाराष्ट्रामध्ये चांद्यापासून बांद्यापर्यंत चोऱ्या, दरोडे, लुटमार, खंडणी, दंगलीचे प्रमाण वाढलेले असणे" अशी केलेली आहे. मी सगळ्यांची भाषणे ऐकल्यानंतर या विषयाशी चांद्याचा काही संबंध नसला तरी वांदा बांद्यात आहे हे सांगू इच्छितो. या निमित्ताने विरोधी पक्षाचा तो अधिकार आहे. राज्यामध्ये जे घडते ते शासनापुढे मांडणे आणि आमचे सुध्दा कर्तव्य आहे, अन्य विकासाची कामे करीत असताना जनतेच्या जीविताचे आणि मालमत्तेचे रक्षण करणे. हे कोणत्याही राज्य व्यवस्थेचे पहिले आणि आद्य कर्तव्य आहे. जीविताचे आणि मालमत्तेचे रक्षण करीत असताना अनेक कारणांमुळे गुन्हेगारी काही प्रमाणात दिसून येते. इतिहासातील असा कोणताही काळ नाही, ज्या काळात कधीच गुन्हेगारी नव्हती. देव लोकामध्ये देखील राक्षस नावाचा प्रकार होता आणि कायद्याचे पालन करणारे लोक असले तरी कायद्याचे उल्लंघन करणारे लोक आपल्या व्यवस्थेमध्ये नेहमीच राहिले आहेत. चांगल्या आणि दुष्ट प्रवृत्तीचे लढे आणि संघर्ष नेहमीच होत असतात. चांगल्यांनी दुष्टांवर मात करणे आणि निराधार माणसाला संरक्षण देणे हे राज्य व्यवस्थेचे काम असते.

सभापती महोदय, आज सन्माननीय सदस्यांनी चिंता व्यक्त केली. राज्यामध्ये गुन्हेगारी वाढत चालली आहे, बिहारच्या दिशेने राज्याची वाटचाल सुरु आहे, किंबहुना बिहारसारखी परिस्थिती महाराष्ट्रामध्ये निर्माण होईल असे वक्तव्य करण्यात आले. आपल्या वक्तव्यामुळे आपल्या राज्याची बदनामी होणार नाही अशी वस्तुस्थिती जरुर मांडली पाहिजे. परंतु नसलेल्या गोष्टी मांडून आपली बदनामी होणार नाही याची दक्षता आपण सर्वांनी घेणे आवश्यक आहे. फार मोठी आकडेवारी सांगण्याची आवश्यकता वाटत नाही. पण गुन्हे वाढले ते कबूल करणे आणि जी शक्तीस्थळे आहेत, जिथे गुन्हेगारीवर मात केली ते उत्तराच्या भाषणाच्या माध्यमातून मला राज्यातील जनतेच्या लक्षात आणून द्यावयाचे आहे. चोऱ्या, दरोडे, लुटमार, खंडणी यांचे प्रमाण मी सभागृहाच्या.........................................................................................



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील............

निदर्शनास आणू इच्छितो.

गेल्या वर्षी ऑक्टोबर महिन्यात 43467 गुन्हे नोंद झाले होते. या वर्षी 44860 गुन्हे नोंद झाले. म्हणजे अंशत: वाढ झालेली आहे ही गोष्ट मान्य करतो. पण त्याच वेळेला त्यातील 18888 गुन्ह्यांचा उलगडा करण्यामध्ये पोलिसांना यश आले आहे. यावर्षी डिटेक्शनचे प्रमाण निश्चितच चांगले आहे. गुन्हे घडले असले तरी ते उघड करण्याचे प्रमाण सुध्दा वाढत चालले आहे. दरोड्याचे गुन्हे हे संख्येने जास्त दिसतात. पण त्यातील अनेक गुन्हे हे तांत्रिक स्वरुपाचे असतात. एखाद्याची मारामारी झाली आणि किरकोळ स्वरुपाचा गुन्हा बेलेबल असला तरी तो नॉन बेलेबल व्हावा म्हणून मग फिर्यादीकडून पाकिट चोरीला गेले, घड्याळ चोरीला गेले अशी तक्रारीमध्ये नोंद केली जाते. दरोडा म्हणून गुन्हा नोंद करुन घ्यावा लागतो. मी अन्य राज्यांना दोष देत नाही. आपल्या राज्यात ज्यांना कोणाला गुन्हा नोंदवायचा आहे त्यांना मुभा आहे. पोलिसांनी गुन्हा नोंदवून घेतला पाहिजे. वेळप्रसंगी माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांची टीका सहन करु. परंतु पोलिसांनी गुन्हा नोंद करुन घेतला पाहिजे.

सभापती महोदय, आतापर्यंत वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या ज्या परिषदा झाल्या, त्या परिषदांमध्ये प्रत्येक वेळी हीच भूमिका मी मांडली. विधानसभेला, राज्यातील जनतेला कसे सामोरे जायचे ते मी बघेन...........

नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

श्री. आर.आर.पाटील......

पण लोकांचे गुन्हे नोंदवून घेतले नाहीत असे होता कामा नये यादृष्टीने शासनाने प्रयत्न केले. या वर्षी दराड्यांच्या गुन्हयात घट झालेली आहे. कारण मागील वर्षी याच काळात 638 गुन्ह्यांची नोंद झाली होती आणि त्यापूर्वी अनुक्रमे 752, 747 आणि 768 अशी ही आकडेवारी पाहिली तर दरोड्यात घट झाल्याचे दिसून येईल. त्या तुलनेत चोऱ्यांच्या प्रमाणात अंशत: वाढ झालेली आहे असे म्हणता येईल. जबरी चोऱ्यांचे प्रमाण घटले अअसून खंडणीच्या गुन्ह्यात मागील तुलनेत थोडी घट झालेली आहे. विशेष करुन अहमदनगर, पुणे, ग्रामीण, बीड, धुळे, नाशिक आणि ठाणे ग्रामीण या भागात मात्र दरोड्यांचे गुन्हे वाढलेले आहे हे मला कबूल करावे लागेल. याच्या कारणांचा शोध घेतला असता या जिल्ह्यांमध्ये जे प्रमाण वाढलेले आहे त्याचे मुख्य कारण लोकसंख्येच्या रेश्योत पोलिसांची संख्या कमी पडते म्हणून गुन्ह्यांमध्ये वाढ झालेली आहे. पण राजकीय आंदोलने सातत्याने होत आहेत तेथे मालमत्तासंबंधीचे गुन्हे जास्तीचे घडतांना दिसते. सणासुदीच्या प्रसंगात चोऱ्यांचे प्रमाण वाढत आहे कारण पोलीस कायदा व सुव्यवस्था राखण्यात मग्न असतात त्यामुळे चोर सुध्दा त्यांचे अंदाजपत्रक या सर्व गोष्टींचा विचार करुन तयार करीत असतात. ज्यावेळी पोलीस पहारा ठेवू शकत नाहीत अशाच वेळा गुन्हेगारांकडून निवडल्या जातात. या जिल्ह्यांमध्ये दरोडे वाढलेले दिसत असले तरी ते प्रमाण टप्प्याटप्प्याने पोलिसांची संख्या वाढवून त्यावर नियंत्रण आणण्याचा प्रयत्न केला जाईल. तसेच दरोडे प्रतिबंधक उपाययोजना प्रभावीपणे राबविणे यासंबंधीची योजना देखील पुढील सहा महिन्यात राबविण्याचे आमच्या विभागाने ठरविले आहे. मागील वर्षाच्या तुलनेत विशेष करुन ठाणे ग्रामीण, नगर, पुणे ग्रामीण, बीड, धुळे आणि नाशिक ग्रामीण या जिल्ह्यांमध्ये दरोडे नियंत्रणात आणण्याच्या दृष्टीने आवश्यक असलेल्या उपाययोजना करुन हे गुन्हे नियंत्रणात आणण्यासाठी निश्चितपणे प्रयत्न करण्यात येईल.

महोदय, रस्त्यावर पडणाऱ्या दरोड्यांमध्ये चांगल्यापैकी घट झालेली आहे. एक गोष्ट खरी आहे की, वाहने चोरीचे प्रमाण मात्र थोडेसे वाढत आहे आणि त्यामुळे लोकांची मालमत्तेची खूप मोठी हानी होते. वाहने चोरीला जातात, नंबर प्लेट्स बदलून बाहेरच्या राज्यात त्या विकून लाखो

....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील......

रुपयांची वाहने पुन्हा सापडत नाहीत. पोलिसांना हायवेवर प्रत्येक वाहन तपासणे सुध्दा शक्य होत नाही. या निमित्ताने मीच लोकांना आवाहन करतो की, तंत्रज्ञानाच्या माध्यमातून यासंबंधी एक नवीन डिव्हाईस तयार करण्यात आले असून ते डिव्हाईस जर आपल्या वाहनात बसविले तर चोरीवर कंट्रोल येऊ शकते. काही उपकरणे अशी देखील आहेत की, ती बसविल्यानंतर ज्या वाहनाची चोरी करण्याचा प्रयत्न केला ते वाहन तेथेच थांबते. काही उपकरणे अशी आहेत की, वाहन कोणत्या ठिकाणी आहे हे समजू शकते. अशा सर्व गोष्टी मार्केटमध्ये आजही उपलब्ध आहेत. त्यासाठी आपण फार मोठी किंमत मोजून, 40-50 लाखाच्या गाड्या विकत घेतो पण त्या गाडीचे संरक्षण करण्यासाठी 15-20 हजाराचे उपकरण बसविले तर चोरीवर नियंत्रण येऊ शकते. तसेच पार्किंगसाठी आपण जरी काही सवलती मिळविल्या असल्या तरी प्रत्यक्षात पार्किंग मात्र त्या ठिकाणी न करता रस्त्यावरच गाड्या लावल्या जातात व त्यामुळे गर्दी होऊन चोरांचे फावते याचा सुध्दा गाडी मालकाने विचार करावा. पोलिसांची गस्त तर आम्ही वाढविणारच पण लोकांनी सुध्दा अशा प्रकारची आधुनिक उपकरणे आपापल्या गाड्यांमध्ये बसविली तर तपास कामामध्ये पोलिसांना मदत होऊ शकते. त्या दृष्टीने किंमती गाड्यांमध्ये अशी डिव्हायसेस बसविण्याचे कम्पल्शन आम्ही करणार आहोत, तशा सूचना परिवहन अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत. अशा प्रकारच्या उपाययोजना महागड्या गाड्यांसाठी अमलात आणल्या तर चोऱ्या सुध्दा थांबू शकतात. काही गाड्या तर पश्चिम बंगाल, राजस्थान तसेच कर्नाटक मध्ये जाऊन आपल्या पोलिसांनी जप्त करुन आणलेल्या आहेत. ज्याप्रमाणे मालमत्तेची काळजी मालकाकडून घेतली जाते तशाच प्रकारे आपल्या गाडीची काळजी सुध्दा घेतली तर आतंकवादी कारवाया रोखण्यात सुध्दा यश मिळू शकेल. गुजरात आणि मुंबईत जे बॉम्बस्फोट झाले होते त्यातील प्रत्येक ठिकाणी चोरीचीच वाहने आतंकवाद्यांनी वापरलेली दिसून येतात. म्हणून वाहनांची चोरी थांबविणे किंवा त्याची काळजी घेणे हे सुध्दा आतंकवादी कृत्ये रोखण्याच्या दृष्टीने आवश्यक आहे. त्यासाठी लोकांचे चांगल्या प्रकारे प्रबोधन करण्याचाही प्रयत्न केला जाईल आणि अशा प्रकारचे डिव्हाईस जास्तीत जास्त गाड्यांमध्ये बसविले जाईल यादृष्टीने सुध्दा प्रयत्न केले जातील.

......3



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील......

कायदा व सुव्यवस्था तसेच चोऱ्यांच्या बाबतीत व्यवस्थेच्या माध्यमातून थोड्या सक्त सूचना केल्यामुळे चैन स्नॅकिंगचे प्रमाण या वर्षी घटलेले आहे. मागील वर्षी हेच प्रमाण 4573 एवढे होते आणि या वर्षी मात्र 2511 घटना चैन स्नॅकिंगच्या घडल्या आहेत. या तुलनेत 2511 ही संख्या निश्चितच कमी म्हणता येईल. त्याचबरोबर डिटेक्शनचे प्रमाण आणि चोरांना पकडण्याचे प्रमाण सुध्दा वाढलेले आहे. चैन स्नॅकिंगच्या बाबतीत पोलीसांना जे गुन्हेगार सापडतात ते अत्यंत तरुण व चांगल्या घराण्यातील मुले आढळून येतात. त्यांना लागलेल्या सवयींची पुर्तता करण्यासाठी ते चोरी करतात. पोलिसांनी असे तरुण चोरी का करायला लागले याचा तपास केला असता बदलत चाललेली जीवनशैली आणि पालकांचे मुलांकडे होत असलेले दुर्लक्ष त्याचा परिणाम म्हणून ही मुले आपल्या सवयी भागविण्यासाठी रस्त्याने जाता जाता भगिनीच्या गळ्यातील चैन खेचून काढणे अशा प्रकारची चोरी करताना आढळतात. तरी देखील शिताफीने अनेक गुन्हेगारांना अटक करणे, डिटेक्शनचे प्रमाण वाढविणे, गुन्हे कमी करण्यात यश मिळाले असे असले तरी सर्व गुन्ह्यांच्या बाबतीत हे सांगू शकत नाही. ज्याप्रमाणे अनेक सन्माननीय सदस्यांनी सभागृहात उपस्थित केले की, राज्यात एका बाजूने डिटेक्शन चांगले होत असते तरी कन्हीक्शनचे प्रमाण मात्र दिवसेंदिवस चिंताजनक असेच आहे. हे प्रमाण दिवसेंदिवस कमी होत आहे. गुन्हेगारांच्या बाजूने उभे राहणारा एखादा तज्ज्ञ वकील आणि आपल्या वतीने ज्यांची वकीली चालत नाही असा वकील न्यायालयात शासनाची बाजू मांडताना अनेक वेळा आढळून येते. अर्थात सर्वच वकील शासनाचे तसे असतात असे नाही. पण बहुतांशी अशी परिस्थिती असल्यामुळे कन्व्हीक्शनचा रेट वाढत नाही व त्याचाच परिणाम गुन्हेगारांवर जरब न बसण्यामध्ये होतो. अन्य राज्यांमध्ये कन्व्हीक्शनचे रेट वाढविण्याच्या दृष्टीने काय उपाययोजना केल्या जातात, आपण कोठे कमी पडतो याचा अभ्यास करण्यासाठी, ती पध्दत समजून घेण्यासाठी आपल्या पोलीस दलातील वरिष्ठ अधिकाऱ्यांची एक समिती स्थापन केली होती. या समितीने प्रत्यक्षात त्या राज्यात जाऊन भेटी दिल्या व त्यातून असा निष्कर्ष निघाला आहे की, प्रामुख्याने न्यायालयाच्या सुनावणीसाठी लागणारा प्रदीर्घ कालावधी, न्यायालयांची संख्या गुन्ह्यांच्या प्रमाणात कमी असणे, पंचनाम्यातील साक्षीदार फितूर होणे, उशीरा गुन्हे दाखल होणे, न्यायवैद्यक प्रयोगशाळेचे अहवाल वेळेवर न मिळणे, वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या

.....4



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील......

बदल्या झाल्यानंतर ते साक्षीसाठी उपलब्ध न होणे, एस.सी. आणि एस.टी. साठी असलेल्या कायद्यानुसार दाखल झालेल्या गुन्ह्यांमध्ये जातीचे प्रमाणपत्र न मिळणे, केसच्या नोंदी योग्य पध्दतीने न करणे अशा अनेक कारणांमुळे आपल्याकडे कन्व्हीक्शनचे प्रमाण कमी असल्याचे आढळून आले. न्यायालयांच्या संख्येच्या तुलनेत आपल्याकडे दाव्यांची संख्या मात्र प्रचंड आहे, त्यामुळे न्यायालयांची संख्या वाढविल्याशिवाय कन्व्हीक्शनचे रेट वाढणे अशक्य आहे. केवळ पोलिसांची संख्या वाढवून किंवा आरोपींना अटक केली आणि त्यांना शिक्षाच झाली नाही तर फार काळ सुध्दा त्यांना आपण जेलमध्ये ठेवू शकत नाही आणि तसे ठेवणे फारसे योग्य नाही, यादृष्टीने विचार करणे आवश्यक आहे. विधि व न्याय विभाग तसेच उच्च न्यायालयाबरोबर चर्चा करुन या गोष्टीला आम्ही सुरुवात केली आहे.

सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी राज्यातील फरारी आरोपीसंबंधीची चिंता व्यक्त केली आहे. ही गोष्ट खरी आहे की, 21533 आरोपी रेकॉर्डवर फरारी दिसत आहेत. ही संख्या सन 1960 सालापासूनची म्हणजे राज्याच्या स्थापनेपासूनची आहे. कदाचित त्यात आपल्या काळातील काही आरोपी सुध्दा असू शकतील. यात 17003 आरोपी असे आहेत की, ज्यांना पकडून कोर्टात उभे केले तर केवळ दहा ते पन्नास रुपये इतकाच दंड होऊ शकतो अशा छोट्या गुन्ह्यातील हे आरोपी आहेत. अशा छोट्या गुन्ह्यातील आरोपींचा शोध घेण्याचा प्रयत्न केला तर त्यात कोणी वेगळ्याच पत्त्यावर राहत आहेत, अशांना अटक करुन आणले तर जास्तीत जास्त 100 रुपये दंड होऊ शकतो. पण अन्य राज्यातून हुडकून आणून कोर्टासमोर आरोपींना उभे करुन त्यांच्याकडून असा किरकोळ दंड करावयाचा अशा प्रकारचे हे गुन्हे त्यांच्यावर आहेत. तसेच यातील गुन्हे दाखल होऊन दहा वर्षापेक्षा अधिकचा काळ गेलेला असल्यामुळे या आरोपींवरील गुन्हे खारीज करणे असाही आमच्या विभागाचा विचार सुरु आहे.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील ...

जेणेकरुन आपले मनुष्यबळ निष्कारण वाया जाणार नाही. एकंदर जे 4378 गंभीर गुन्हेगार आहेत त्यांचा शोध व्यापक प्रमाणात करण्यात यावा या बाबत सूचना दिल्या गेल्या आहेत. यातील किती गुन्हेगार जिवंत आहे हा देखील महत्वाचा प्रश्न आहे. परंतु जे गुन्हेगार जीवंत आहेत त्यांना पकडणे आवश्यक असून त्यासाठी गृह विभागाने प्रयत्न सुरु केलेले आहेत. 172 गुन्हेगार मागील तीन महिन्यात सापडलेले आहेत. गंभीर गुन्हयातील आरोपी निश्चितपणे शोधून काढले जातील एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

सभापती महोदय, गुन्हेगारांना जेलमध्ये घातले जाते परंतु अभिवचन रजेवर त्यांना जेव्हा पाठविले जाते तेव्हा त्यातील बरेच गुन्हेगार परत येतच नाहीत. खरे म्हणजे पोलिसांनी गुन्हेगारांना महत्प्रयासाने पकडलेले असते, शिक्षाही झालेली असते परंतु अभिवचन रजा हा मानवतेच्या दृष्टिकोनातून मानवी हक्क लक्षात घेऊन गुन्हेगारांना रजा दिली जाते व त्यातील काही गुन्हेगार पुन्हा येत नाहीत. या पुढच्या काळात अशा प्रकारचे जे संशयास्पद गुन्हेगार आहेत, ज्यांना अभिवचन रजा दिल्यानंतर ते परत येण्याची शक्यता नाही अशांच्या बाबतीत सवलत द्यावयाची की, नाही याचा गांभीर्याने विचार करावा लागणार आहे. 810 गुन्हेगार वेगवेगळया कारागृहातून अभिवचन रजेवर गेले ते परत आलेले नाहीत. पण यांची शोध मोहीम घेण्याची सूचना देण्यात आलेली असल्यामुळे हे गुन्हेगार निश्चितपणे सापडतील.

सभापती महोदय, समाजातील जे गरीब घटक आहेत, ज्यांच्यावर पिढयानुपिढया अन्याय होत आलेला आहे अशांना संरक्षण देणे, सर्वांच्या जीविताचे आणि मालमत्तेचे रक्षण करणे ही जरी पोलिसांची जबाबदारी असली तरी अशा सेक्टर्सना न्याय देणे ही आपली प्राथमिक जबाबदारी आहे. मला आकडेवारीनिशी एक गोष्ट सभागृहाच्या लक्षात आणून द्यावयाची आहे की, महिलांच्या बाबतीत जे काही थोडे फार गुन्हे होत आहेत ते चिंताजनक आहेत. परंतु तरी सुध्दा अन्य राज्यांच्या तुलनेने महाराष्ट्र राज्यातील महिलांवरील गुन्हयांचे प्रमाण कमी आहे. आपले राज्य महिलांसाठी अत्यंत सुरक्षित राज्य आहे असा निष्कर्ष अन्य राज्यांचा अभ्यास केल्यानंतर आपण काढू शकतो. मुंबईमध्ये मागच्या तारखे पासून बलात्काराच्या 200 घटना झाल्या त्याचे ॲनालिसीस केले तेव्हा

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील ...

आम्हाला असे आढळून आले की, 151 बलात्कार हे ओळखीच्या व्यक्तींकडून, मित्राकडून, लग्नाचे आमिष दाखवून, शेजा-याकडून झालेले आहेत. फक्त 11 बलात्कार अनोळखी व्यक्तींकडून झालेले आहेत. बाकीचे बलात्कार घरातील लोकांकडून, नातेवाइकांकडून झालेले आहेत. अशा पध्दतीचे गुन्हे होऊ नये व त्यावर जरब बसविणे हे जरी आपल्या सिस्टीमचे काम असले, न्याय व्यवस्थेचे असले तरी सुध्दा अनेक वेळा गुन्हे सहन केले जातात, वेळेत पोलिसांकडे तक्रारी येत नाहीत त्यामुळे फॉरेन्सीक लॅबचे रिपोर्ट मिळवणे पोलिसांना मुश्कील होऊन बसते. कधी कधी बलात्कार झाल्याच्या घटना 2-2 वर्षाने रजिस्टर होतात. त्यामध्ये पोलिसांनी कोणते तपास करावयाचे आणि कोणते रिपोर्ट मिळवायचे हा पोलिसांसमोर प्रश्न पडतो. परंतु तरी सुध्दा बाधित व्यक्तीवर बलात्कार झाल्याचा आरोप मान्य करुन गुन्हा नोंदवावा लागतो परंतु अशा गुन्हयांमध्ये शिक्षा होत नाहीत. अशा गुन्हयांमध्ये आरोपी सुटल्याचा दोष पोलिसांवर येतो. यामध्ये लोकजागृती करण्याची आवश्यकता आहे. अशा प्रकारचे अन्याय कोणी सहन करता कामा नये. महिलांच्या बाबतीत राज्य शासन निश्चितपणे संवेदनशील आहे. बलात्काराच्या ज्या घटना होतात त्या फास्ट ट्रॅक कोर्टात चालवून लवकरात लवकर गुन्हेगारांना शिक्षा मिळाली पाहिजे ही राज्य सरकारची इच्छा आहे. या बाबतीत आम्ही पोलिसांना तशा प्रकारच्या सूचना देखील दिलेल्या आहेत.

सभापती महोदय, विरोधी पक्ष नेत्यांनी तसेच सन्माननीय सदस्यांनी आर्थिक गुन्हयांच्या बाबतीत व्हाईट कॉलर क्राईमच्या बाबतीत विचार व्यक्त केलेले आहेत. या गुन्हयांमध्ये मोठया प्रमाणात तथ्य आहे. दरोडयांमध्ये, चो-यांमध्ये जेवढी मालमत्ता जाते त्यापेक्षा किती तरी जास्त पटीने मालमत्ता दिवसा ढवळया जनतेच्या खिशावर दरोडा घालून ही व्हाईट कॉलर क्राईमर मंडळी मिळवित असतात. हे गुन्हेगार वेगवेगळया संस्था काढतात, लोकांना गुंतवणूक करण्यास भाग पाडतात, व्याजाची अमिषे दाखवतात. ऑक्टोबर अखेर जे गुन्हे रजिस्टर्ड झाले होते त्यात 749,43,15,675 रुपये एवढया मोठया रकमेला चुना लावण्याचे काम वेगवेगळया संस्थानी केले आहे. इमू पालन, शेतक-यांना सवलतीच्या दराने व्याजाने कर्ज देण्याची बाब लक्षात आलेली आहे. इकॉनॉमिकल ऑफेन्सच्याबाबतीत 597 कोटी रुपयांचे गुन्हे रजिस्टर्ड झालेले आहेत.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : सभागृहाची वेळ माननीय मंत्री महोदयांचे उत्तर संपेपर्यंत वाढविण्यात येत आहे. माननीय मंत्रीमहोदयांचे उत्तर झाल्यानंतर एक निवेदन करण्यात येईल.

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, सन 2010 मध्ये 699 कोटी, 2009 मध्ये 733 कोटी म्हणजे दर वर्षी 700 ते 725 कोटी रुपयांवर जनतेच्या पैशावर दरोडा घालण्याचे काम या संस्थाकडून केले गेले आहे.

सभापती महोदय, मला एक गोष्ट प्रांजळपणे कबूल केली पाहिजे की, इकॉनॉमिकल आफेन्सच्या संदर्भात विंग निर्माण करण्याच्या दृष्टीने आतापर्यंत आम्ही ज्या उपाययोजना केलेल्या आहेत त्या अत्यंत तोकडया आहेत. एखादी चोरी झाली तर मोठमोठया बातम्या होतात, एखादा दरोडा पडला तर वृत्त वाहिन्यांवर 24 तास बातमी दाखवली जाते परंतु तुलनेमध्ये समाजात प्रतिष्ठीतपणे राहून, लोकांना फसविण्याचा उद्योग करणा-यांच्या बाबतीत काही गोष्टी करण्याची आवश्यकता आहे. मुंबई, पुणे, ठाणे, नागपूर येथील इकॉनॉमिकल विंग्स् मजबूत आहेत परंतु जिल्हा स्तरावर आमच्या शोध यत्रणा नाहीत व त्याचा परिणाम लोकांना खोटया जाहिराती द्वारे आमिष दाखवून फसविण्यात या लोकांना यश मिळत आहे.

इतकेच नाही तर माझे माध्यमांना आवाहन आहे की, जी योजना सरळ सरळ फसवी आहे हे कोणालाही पटू शकते,त्यावर आपण सुध्दा लक्ष ठेवले पाहिजे. अगदी तीन महिन्यात रक्कम दामदुप्पट करुन देणे हे कोणत्याही धंद्यात शक्य नाही. स्मगलिंगच्या धंद्यात सुध्दा इतका नफा नाही आणि राजकारणामध्ये सुध्दा इतका नफा नाही. त्यामुळे छोटया मोठया धंद्यात तीन महिन्यात रक्कम दामदुप्पट कशी होऊ शकते ? चांगल्या जनमान्य वर्तमानपत्रात यासंदर्भात जाहिराती येतात त्यामुळे त्यावर भोळी भाबडी माणसे विश्वास ठेवतात व आपले पैसे त्यामध्ये टाकतात. इतकेच नाही तर या फसविणाऱ्या संस्थांनी मोठमोठया एजन्सी पब्लिसीटीसाठी नेमलेल्या असून त्यातील काही संस्था या आंतरराष्ट्रीय संस्था आहेत. जागतीक स्थरावरील पब्लिसीटीच्या यंत्रणांना कामाला लावून योग्य पध्दतीने लोकांना फसविण्याचे काम केले जात आहे. भोळी जनता फसेल यादृष्टीने पब्लिसीटी केली जाते व त्यामध्ये मोठया प्रमाणात लोक फसत आहेत. स्पीक एशिया नावाचा घोटाळा हजार कोटी रुपयांच्यावर सुध्दा जाण्याची शक्यता आहे. परदेशातील नागरिकांनी आपल्या देशात येऊन

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील ...

आपल्या देशाची साधन संपत्ती लूटून नेणे हे बरोबर नाही. खरे म्हणजे या बाबतीतील कायदे सुध्दा अत्यंत तोकडे आहेत. सुदैवाने ठेवीदारांच्या हक्काचे रक्षण करण्याच्या कायद्याला हायकोर्टाने स्थगिती दिली होती त्यामुळे या कायद्याचा वापर आपल्याला करता येत नव्हता. परंतु हा कायदा सुप्रीम कोर्टाने योग्य ठरवला आहे. यापुढील काळात असे फसवणारे कोणी लोक आढळून आले तर त्यांच्या मालमत्ता जप्त करणे व ज्यांना फसवले आहे त्यांना त्यांचे पैसे परत देणे हे या कायद्यामुळे शक्य होणार आहे.

सभापती महोदय, दोन तीन घटनांचा उल्लेख या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी केलेला आहे. मावळच्या गोळीबाराच्या संदर्भात माजी न्यायमूर्ती श्री. एम.जी. गायकवाड यांची नियुक्ती करण्यात आली असून या चौकशीच्या कामाला सुरुवात देखील झालेली आहे. अंबड, जिल्हा जालना येथे वारकऱ्यांच्या बाबतीत गोळीबाराची घटना घडली होती त्यासाठी न्यायमूर्ती श्री. भरंगडे यांची चौकशी समिती गठीत करण्यात आली असून त्यांनी आपल्या चौकशीचे काम लवकर सुरु करावे अशी व्यवस्था शासनामार्फत केली जात आहे. मोवाडची जी घटना घडली आहे त्यासंदर्भात शासनाने न्यायमूर्ती श्री. गायकवाड यांची नियुक्ती केलेली आहे. एकंदरीतच गुन्हयांची जी आकडेवारी दिलेली आहे ती आपल्या राज्याच्या तुलनेत दिलेली आहे. परंतु उत्तराच्या माध्यमातून ही गोष्ट लक्षात आणून देऊ इच्छितो की, भारतीय दंड संहितेखाली देश भरात ज्या गुन्हयांची नोंद प्रत्येक स्टेटवाईज केली जात असते व त्यामध्ये महाराष्ट्र राज्याची वाटचाल कोणत्या दिशेने होत आहे यांसदर्भातील आकडेवारी मी आपल्याला थोडक्यात सांगणार आहे. यासंदर्भातील श्रेय मी पोलिसांना बिलकूल देणार नाही. याचे श्रेय पहिल्या क्रमांकाचे असेल तर ते अजूनही महाराष्ट्राच्या जनतेचेच आहे.

आपल्या राज्यातील जनता कायद्याचे पालन चांगल्या प्रकारे करीत असते. आपली बहुसंख्य जनता कायद्याचे पालन करणारी आहे त्यामुळे दंडसंहितेचे गुन्हे पूर्ण देशभरात नोंद झालेले असून त्यामध्ये लोकसंख्येच्या तुलनेत महाराष्ट्राचे स्थान 18 व्या क्रमांकांवर आहे. दरवर्षी आपल्या महाराष्ट्रात 2900 लोकांचे खून होत असले तरी सुध्दा आपल्या महाराष्ट्राचे स्थान देशाच्या तुलनेने बत्तिसावे आहे. आकडेच बघावयाचे झाले तर उत्तर प्रदेशामध्ये 4004, बिहार मध्ये 2915 गुन्हयांची नोंद झालेली आहे.

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील.....

तामिळनाडू 2641, मध्य प्रदेश-2277 जेथे भारतीय जनता पक्षाचे सरकार आहे, पश्चिम बंगाल 2111, आंध्र प्रदेश 1953 आणि महाराष्ट्रामध्ये 1926. सर्व राज्यांमध्ये महाराष्ट्राचा 21 वा क्रमांक आहे. देशातील सर्वात मोठ्या शहरांचा विचार केल्यास त्यामध्ये मुंबई शहराचा 30 वा क्रमांक आहे. गंभीर गुन्ह्याच्या बाबतीत महाराष्ट्र आणि मुंबई शहर किती सुरक्षित आहे हे केंद्र सरकारने घोषित केलेल्या आकडेवारीवरुन सिध्द होत आहे. सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांनी आपल्या राज्याचा दरोड्यामध्ये पहिला क्रमांक आहे असे सांगितले. दरोड्या सारख्या गुन्ह्यामध्ये महाराष्ट्राचा 7 वा क्रमांक आहे. जबरी चोरी सारख्या गुन्ह्यांमध्ये राज्याचा 4 था क्रमांक आहे. घरफोडी सारख्या गुन्ह्यांमध्ये राज्याचा क्रमांक खाली आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्रात अनेक आंदोलने होत आहेत, दंगे होत आहेत, सिंधुदुर्ग जिल्ह्यात होत आहेत, अन्य जिल्ह्यांमध्ये होत आहेत. परंतु गुन्ह्याच्या संदर्भात देशातील इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्र 25 व्या क्रमांकावर आहे. महाराष्ट्रातील कायदा आणि सुव्यवस्थेची परिस्थिती बिघडलेली आहे अशा निराशेच्या भ्रमात कोणी राहू नये. याठिकाणी सर्वच गुन्ह्याची आकडेवारी देणे आवश्यक नाही. राज्यातील जनता शांतता प्रेमी आहे. बहुसंख्य लोक कायद्याचे पालन करीत आहेत. पोलीस सुध्दा सक्षमपणे सर्व गोष्टीकडे बारकाईने पाहत आहेत म्हणून राज्यामध्ये गुन्ह्यांचे प्रमाण कमी आहे.

सभापती महोदय, माझे मित्र सन्माननीय सदस्य श्री.संजय केळकर आणि श्री.किरण पावसकर यांनी काही सूचना केल्या.

सभापती महोदय, राज्यात लोकसंख्या वाढत आहे तसेच औद्योगिकीकरण देखील वाढत आहे. अन्य राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्र राज्यात स्थलांतरित होणाऱ्या लोकांची संख्या जास्त आहे. लोकसंख्येचा विचार करता आपल्याकडे पोलिसांची संख्या थोडी कमी आहे. या बाबत मी खूप अभ्यास केलेला आहे. सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांना मी सांगू इच्छितो की, आपण सर्वांनी मला थोडी सवड दिल्यामुळे अभ्यास करण्यासाठी वेळ मिळाला आहे. रशियामध्ये 102 लोकसंख्येमागे 1 पोलीस आहे. जर्मनीमध्ये 332 लोकसंख्येमागे 1 पोलीस आहे. युनायटेड स्टेटमध्ये 429 लोकसंख्येमागे 1 पोलीस आहे. पाकिस्तानमध्ये 483 लोकसंख्येमागे 1 पोलीस आहे तर आपल्याकडे 769 लोकसंख्येमागे 1 पोलीस आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : अमेरिकमध्ये डॉ.अब्दुल कलाम यांना देखील अडविले जाते. तर आपल्याकडे कोणालाही सोडून दिले जाते.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, आपण देशातील मोठ्या शहरांचा विचार केला तर न्यूयॉर्कमध्ये 197 लोकसंख्येमागे 1 पोलीस आहे. बर्लीनला 124 लोकसंख्येमागे 1 पोलीस आहे. मुंबई शहरामध्ये 251 लोकसंख्येमागे 1 पोलीस आहे. मुंबईतील पोलिसांचे संख्याबळ उर्वरित महाराष्ट्राच्या तुलनेत जवळ जवळ दुप्पट आहे. उर्वरित महाराष्ट्रामध्ये 531 लोकसंख्येमागे 1 पोलीस आहे. मुंबईत मोठ्या प्रमाणावर स्थलांतरीत होणारे लोक, विविध जाती धर्माचे राहणारे लोक आणि मुंबईचे एकूण सामाजिक स्ट्रक्चर पाहता मुंबईत 200 लोकसंख्येच्यामागे 1 पोलीस असावा असे पोलीस महासंचालकांना वाटते. तेव्हा मुंबई शहरासाठी 12 हजार 681 पोलिसांची अतिरिक्त पदे भरली पाहिजेत अशी त्यांची मागणी आहे.

श्री.दिवाकर रावते : आपण पोलिसांची संख्या वाढवून गुन्ह्याचे प्रमाण कमी करावे आणि त्या सबंधीचा टॅक्स लोकांकडून वसूल करावा.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, राज्यातील अन्य आयुक्तालयांच्या ठिकाणी 300 लोकसंख्येमागे 1 पोलीस असणे आवश्यक आहे. परंतु नवी मुंबईमध्ये 630 लोकसंख्येमागे 1 पोलीस आहे. नाशिकमध्ये 584 लोकसंख्येमागे 1 पोलीस आहे. सोलापूरमध्ये 695 लोकसंख्येमागे 1 पोलीस आहे. या सर्व शहरांमध्ये पोलिसांची संख्या खूप कमी प्रमाणात आहे. ग्रामीण जिल्ह्याची परिस्थिती तर याही पेक्षा अधिक खराब आहे. ठाणे ग्रामीण भागामध्ये 1506 लोकसंख्येमागे 1 पोलीस आहे. पोलीस डयुटीवर झोपत आहेत, ते घटनास्थळी लगेच येत नाहीत असे मुद्दे उपस्थित करण्यात आले. आज पोलिसांना 14-16 तास डयुटी करावी लागते. तो मागे केव्हा झोपला हे आपल्याला माहीत नसते म्हणून त्याला डयुटीवर लागलेला डुलकी आपणास दिसते. अशा पोलिसांवर ॲक्शन घ्यावी म्हणून सांगण्यात येते, त्यावेळी पोलीस आयुक्तांकडून त्याने केलेल्या सलग डयुटीच्या तासाची माहिती येते तेव्हा अशा पोलिसांवर कारवाई करु नका असे सांगण्याची वेळ मंत्रालयावर येते. पुणे ग्रामीण भागात 1335 लोकसंख्येमागे 1 पोलीस आहे. मी आपणास सर्व आकडेवारी देत नाही. सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये बदलत्या परिस्थितीमध्ये जगातील सर्व मानके बाजूला ठेवून थोडे अधिकचे मनुष्यबळ द्यावे लागेल अशी स्थिती आहे. राज्यात 1 लाख 22 हजार 778

..3..

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील...

पोलिसांची आवश्यकता आहे. बाकीची सर्व कामे ठेवून इतक्या पोलिसांची भरती करणे शक्य नाही. आपण प्रत्येक वर्षी 11 हजार या प्रमाणे मागील पाच वर्षात 55 हजार पोलिसांची भरती केलेली आहे. ही भरती अतिशय चांगल्या पध्दतीने करण्यात आली. पुढील पाच वर्षात आणखी 68 हजार पदे भरण्या संबंधीचा प्रस्ताव मंत्रिमंडळा समोर आणणार आहोत. येणाऱ्या अधिवेशनामध्ये या प्रस्तावाला मान्यता मिळेल आणि राज्यातील पोलीस दलाची संख्या वाढविण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणार आहोत.

सभापती महोदय, एकीकडे पोलिसांची संख्या वाढवित असताना दुसरीकडे त्यांना आधुनिक पध्दतीचे तंत्रज्ञान उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. पोलीस विभागासाठी चांगल्या दर्जाची वाहने, अत्याधुनिक हत्यारे, चांगली कम्युनिकेशनची साधने, उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीनेही प्रयत्न केलेला आहे. पहिल्या टप्प्यामध्ये मुंबईमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याची प्रक्रिया सुरु झालेली आहे. त्यानंतर पुणे, औरंगाबाद, नागपूर, नाशिक, नवी मुंबई, ठाणे, या शहरांचा देखील प्राधान्याने विचार करावा लागणार आहे. पोलिसांना अत्याधुनिक उपकरणे देण्याच्या बाबतीत पोलीस विभागाने पावले उचललेली आहेत.

सभापती महोदय, एखाद्या जिल्ह्यामध्ये काही घटना घडल्यानंतर शितावरुन भाताची परीक्षा करण्याची काही आवश्यकता नाही. निवडणुका म्हटल्या तर त्यामध्ये वाद आणि गुन्ह्यांचे प्रमाण वाढते. काही ठिकाणांचा अपवाद वगळता राज्यामध्ये निवडणुका अतिशय शांततेच्या वातावरण पार पडलेल्या आहेत.

सभापती महोदय, या ठिकाणी वारंवार सिंधुदुर्ग जिल्ह्याचा उल्लेख करण्यात आला. हे खरे आहे त्या ठिकाणी काही घडलेल्या घटना या गांभीर्याने दखल घेण्या सारख्या आहेत. शासनाने आणि पोलीस विभागाने त्या घटनेची गांभीर्याने दखल घेतलेली आहे. कधीकधी पोलिसांची अवस्था कशी होते याची प्रचिती मी घेतलेली आहे. त्या ठिकाणी काही घटना घडल्या. परंतु दोन्ही बाजूने माझ्यावर टीका झाली आणि पोलिसांवर देखील टीका झाली. सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी गृह राज्यमंत्री म्हणून काम केलेले असल्यामुळे पोलिसांचे काम किती अवघड आहे याची त्यांना माहिती आहे. पोलिसांवर दोन्ही बाजूने टीका होते.

..4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील.....

सभापती महोदय, या ठिकाणी आमच्या दोन सहकाऱ्यांचा उल्लेख झाला. खरे म्हणजे निवडणुकीच्या काळामध्ये थोडीशी आक्रमक वक्तव्ये होत असतात. परंतु तशी वक्तव्ये व्हावयास नको होती. सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम आपण थोडा विचार करावा, जो माणूस जेथे वावरत असतो, घडत असतो त्याच्यावर तेथील संस्कार होत असतात. प्रदीर्घ काळ तेथे राहिल्यामुळे काही ना काही संस्कार स्वाभिकपणे होणार. आता नव्या वातावरणात आल्यानंतर जुने विसरण्यासाठी काही काळ लागेल. माझे असे म्हणणे आहे की, कोकणामध्ये सुधारणा होत आहे. आपणच उल्लेख केला की, मागे तेथे खून होत होते, त्यानंतर मारामाऱ्या होत होत्या आणि कालच्या निवडणुकीत निर्जीव कार्यालये तोडली गेली. म्हणजे सुधारणेच्या दृष्टीने कोकणची वाटचाल सुरु आहे असे म्हणावे लागेल. आमच्या दोन सहकाऱ्यांची जी पेपरबाजी झाली ती सरकारच्या दृष्टीने योग्य आहे असे मी मानत नाही. भविष्यात अशी पेपरबाजी करुन आपणास आमची नावे घेण्याची संधी मिळणार नाही एवढे मात्र नक्की सांगू शकतो. आम्ही आपणास अशी संधी दिली नाही तर रामदासभाई आपण आमच्यावर टीका तरी कोणती करणार ?

सभापती महोदय, आपल्याकडे एक म्हण आहे की, दोघांच्या भांडणात तिसऱ्याचा लाभ. परंतु महाराष्ट्रातील चित्र पाहिले तर दोघांच्या भांडण्यात दोघांचा लाभ झालेला आहे. तिसरा मात्र बघतच उभा राहिला. तेव्हा दोघांच्या भांडणामध्ये तिसऱ्याचा लाभ ही म्हण कोकणामध्ये आणि महाराष्ट्रामध्ये खोटी होण्याची शक्यता आहे. दोघांच्या भांडणामध्ये भांडणाऱ्यांचाच लाभ असे चित्र निकालावरुन दिसले.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर यांनी निवडणूक प्रक्रिया बंद करुन नॉमिनेटेड सदस्य करुन नगरपालिका चालवावी अशी उपरोधिक टीका केलेली आहे. आम्ही असा काही निर्णय घेणार नाही.

यानंतर श्री.सरफरे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर. आर. पाटील......

आमचा लोकशाहीवर विश्वास आहे. थोडेफार काही दोष असतील, पोलीस दलामध्ये काही त्रुटी असतील तर भविष्यात आम्ही त्या दूर करु. थोडीशी आमची बाजू सुध्दा सुधारेल. आपल्या बाजूमध्ये काही दोष असतील तर ....

श्री. दिवाकर रावते : प्रत्येक निवडणुकीमध्ये जे नरबळी जातात ते वाचतील...

श्री. आर. आर.पाटील : मी तेच सांगितले आहे, त्या ठिकाणी कोणतेही बळी गेले नाहीत. आपण ज्या शाळेत जातो त्या शाळेचे काही तरी संस्कार आपल्यावर होत असतात. सभापती महोदय, यामधील विनोदाचा भाग आपण सोडून देऊ. माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर यांनी माननीय आमदार श्री. कर्डिले यांचाही उल्लेख केला.

**उपसभापती** : मंत्री महोदय, सभागृहाची वेळ संपत आलेली आहे. आपल्याला उत्तराकरिता आणखी किती वेळ लागणार आहे?

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, आणखी तीन मिनिटे लागणार आहेत.

**उपसभापती** : सभागृहाची वेळ पाच मिनिटांनी वाढविण्यात येत आहे.

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, आम्ही काही पथ्ये पाळली आहेत. आमच्या पक्षाचे लोक सुध्दा आपल्याला तुरुंगामध्ये दिसतील. त्यांनी गुन्हे केले असतील,त्यांच्याकडून चुका झ ााल्या असतील ते पक्षाचे जरी असले तरी कायद्यासमोर सर्वजण समान आहेत ही भूमिका आम्ही स्वीकारली आहे. त्याचबरोबर लोकशाहीमध्ये विरोधी पक्षाचे स्वातंत्र्य मान्य करुन त्यांच्याकडे गुन्हेगाराच्या भूमिकेतून बघणे बुध्दिला न पटणारे आहे . तसे महाराष्ट्रामध्ये होऊ दिले नाही. खालच्या पातळीवर जर कुठे काही घडले असेल तर ते तातडीने दुरुस्त करण्याचा आम्ही प्रयत्न केला आहे.

माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी माननीय आमदार श्री. कर्डिले यांचा उल्लेख केला. खरे म्हणजे त्यांच्यावर राजकीय सूडाने कारवाई करावी अशी कोणती परिस्थिती निर्माण झाली होती? आमच्याकडे बहुमत नसल्यामुळे तिकडच्या बाजूचे दोन आमदार कमी केले पाहिजेत अशी काही परिस्थिती नव्हती. सन 2002 साली व्यवहार झाला होता परंतु त्याबाबतची तक्रार अलीकडे करण्यात आली होती. त्या तक्रारीची दखल घेत असतांना पोलिसांना माननीय श्री. कर्डिले आणि इतर जे आरोपी आहेत त्यांच्याकडे कागदपत्रे सापडली. त्यांच्याकडे 177 खरेदी पत्र सापडली,

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

श्री. आर. आर. पाटील......

103 साठे खत सापडली. ही सर्व कागदपत्रे त्यांच्या कुटुंबीयांच्या नावावर आहेत. याबाबत मी रेकॉर्ड पाहून उद्या नावे सांगू शकेन.

श्री. विनोद तावडे : जे सापडले आहेत त्यामध्ये श्री. कर्डिले यांच्या रक्ताचे नाते असलेले कुणीही नाही....

श्री. आर. आर. पाटील : या गुन्ह्याशी संबंधित असलेल्या तीन आरोपींना पोलिसांनी अटक केली असून त्यांच्याकडे हे सर्व रेकॉर्ड सापडले आहे. त्यामध्ये माननीय आमदार श्री.कर्डिले यांच्या नावावर किती रेकॉर्ड आहे आणि इतरांच्या नावावर किती आहे याची माहिती उद्या सांगू शकेन. हे सर्व रेकॉर्ड माननीय श्री. कर्डिले यांच्या नावावर आहे असे मी म्हटले नाही. या गुन्ह्यामध्ये आरोपी असलेल्या लोकांच्या नावावर 177 खरेदी पत्र आहेत. 103 साठे खत आहेत, 57 मुखत्यार पत्र आहेत. एवढया मोठया प्रमाणामध्ये सापडलेल्या मालमत्तेचे बाजारमूल्य जवळ जवळ 45 कोटी रुपयांचे आहे. तरीसुध्दा कुणावर अन्याय करावा, चुकीच्या पध्दतीने कारवाई करावी अशी शासनाची बिलकुल इच्छा नाही. सभापती महोदय, तेथील डी.एस.पी. सांगलीला होते म्हणून त्यांच्यावर शंका घेणे किंवा माझ्यावर शंका घेणे योग्य नाही. त्या ठिकाणी पोलिसांमार्फत जो तपास झालेला आहे त्याबाबत माझ्या खात्यातील इम्पार्शल वागणारा ॲडिशनल डी.जी.च्या रँकमधील एक अधिकारी त्या ठिकाणी पाठवून पोलिसांनी केलेली कारवाई योग्य आहे की नाही ही तपासून घेण्यात येईल. सभापती महोदय, पोलिसांनी केलेली प्रत्येक कृती,प्रत्येक आरोपीची अटक कोर्ट पहात असते. त्यामध्ये शासनाला डायरेक्शन देण्याची आवश्यकता नाही. याचे कारण आरोपी जास्त करुन कोर्टामध्ये असतो आणि कोर्ट ते सर्व पहात असते, जर चुकीच्या पध्दतीने काही केले असेल तर कोर्टाकडून तिथल्या तिथे जामीन दिला जातो. आमच्याकडून काही चूक झाली तर कोर्ट आमच्यावर ताशेरे देखील ओढते.

श्री. विनोद तावडे : एखाद्या आरोपीला रात्री 8 वाजता अटक करुन पोलीस स्टेशनमध्ये आणला व सकाळी 10 वाजेपर्यन्त बसवून ठेवला तर रेकॉर्डवर तसे न दाखविता आरोपीला सकाळी 8 वाजता अटक केल्याचे दाखविले जाते. अशावेळी कोर्टासमोर सादर केलेल्या कागदपत्रांच्या आधारे कोर्ट निर्णय देते एवढेच मला या ठिकाणी सांगावयाचे आहे. कोणत्याही आमदारांना रात्री पोलीस स्टेशनमध्ये आणून सकाळपर्यन्त बसवून ठेवून कोर्टामध्ये मात्र सकाळी अटक केल्याचे दाखविणे योग्य आहे काय?



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर. आर. पाटील : प्रश्न असा आहे की, कागदपत्रे पाहून जर कोर्ट आरोपीला पोलीस कस्टडी देत असेल तर त्यामध्ये पोलिसांचा दोष आहे असे कसे म्हणता येईल? या गोष्टी सरकार पहात नसते तर पोलिसांनी आरोपीला केव्हा अटक केली हे न्यायालय पहात असते. काही अधिकाऱ्यांच्या बाबतीत कोर्टाने सुध्दा कठोर कारवाई केलेली आहे. या बाबतीत सरकारची कारवाई नि:पक्षपाती असली पाहिजे या आपल्या भूमिकेशी मी देखील सहमत आहे. या करिता या घटनेची संपूर्ण माहिती घेण्याकरिता एक ॲडिशनल डी.जी. त्या ठिकाणी मी पाठविणार आहे. आमच्या अधिकाऱ्यांनी केलेली कारवाई योग्य आहे की नाही हे देखील तपासून पाहिले जाईल. कुणाच्याही बाबतीत चुकीची किंवा सूडबुध्दीने कारवाई केली जाणार नाही याची मी निश्चितपणे आपल्याला ग्वाही देतो. आजपर्यन्त आपल्या पोलीस दलाची ख्याती पाहिली तर हे दल नेहमीच इम्पार्शल राहिले आहे. माननीय सदस्य श्री.रामदास कदम हे त्या खात्याचे मंत्री असतांना आम्ही देखील पोलीस खात्यावर टिका करीत होतो. आता समोरच्या बाजूने टिका होत आहे.

**उपसभापती** : सभागृहाची वेळ 7 वाजेपर्यन्त वाढविण्यात येत आहे.

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, उल्हासनगर असेल किंवा इतर कुठल्याही घटना नोंदल्या गेल्या असतील तर त्या बाबतीत कारवाई करणे आवश्यक असून त्या सर्व ठिकाणी आम्ही कारवाई करु. आपला महाराष्ट्र कायदा व सुव्यवस्थेच्या बाबतीत, शांततेच्या बाबतीत सुरक्षित आहे याची प्रचिती भविष्यात आणून देऊ इतकेच या चर्चेच्या निमित्ताने सांगतो. विरोधी पक्षाकडून दुसऱ्या एखाद्या विषयावर चर्चा उपस्थित करणे आवश्यक होते. याचे कारण राज्यात कोणतीही महत्वाची घटना घडली नव्हती तरीसुध्दा गेल्या वर्षी जो ठराव आणला होता त्या ठरावातील शब्दरचना जशीच्या तशी ठेवून हा ठराव आणला. त्या संपूर्ण ठरावामध्ये एका शब्दाचा जरी बदल केला असेल तर आपण मला दाखवावा. नवा ठराव लिहिण्यासाठी सुध्दा तुम्हाला...

श्री.विनोद तावडे : मंत्री महोदय, आपले उत्तर सुध्दा तसेच आहे...

श्री. आर. आर. पाटील : प्रश्न जर तेच विचारले जात असतील तर वेगळे उत्तर कोठून आणायचे? सभापती महोदय, या ठिकाणी जे प्रश्न उपस्थित करण्यात आले त्याची दखल घेऊन कमी वेळामध्ये उत्तर देण्याचा प्रयत्न केला आहे. माननीय सदस्यांनी दुसरे प्रश्न उपस्थित केले आहेत त्यांची मी उत्तरे देऊ शकलो नाही ती उत्तरे लेखी स्वरुपामध्ये देण्याची व्यवस्था करण्यात येईल. एवढे बोलून माझे भाषण संपवितो. धन्यवाद.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : सभागृहाने प्रस्तावावर विचार केला आहे.

सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या शुक्रवार, दिनांक 23 डिसेंबर, 2011 रोजी सकाळी 11.00 वाजता पुन: भरेल.

(सभागृहाची बैठक सायंकाळी 6 वाजून 21 मिनिटांनी शुक्रवार, दिनांक 23.12.2011 रोजीच्या सकाळी 11.00 वाजेपर्यन्त स्थगित झाली.)

********

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही